ગુજરાત રાજ્યના શિક્ષણવિભાગના પત્ર-ક્રમાંક
મશબ / 1217 / 170 - 179 / છ, તા. 15/03/2017

# मराठी

## इयत्ता 10

**प्रतिज्ञापत्र**

भारत माझा देश आहे.
सारे भारतीय माझे बंधुभगिनी आहेत.
माझ्या देशावर माझे प्रेम आहे.
माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे.
त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.
मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.
माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करतो त्यांचे कल्याण आणि त्याची समृद्धी ह्यातच माझे सौख्य सामावलेले आहे.

**રાજ્ય સરકારની વિનામૂલ્યે યોજના હેઠળનું પુસ્તક**

तमसो मा ज्योतिर्गमय
**गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळ**
**'विद्यायन', सेक्टर 10-ए, गांधीनगर - 382010**

© **गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळ, गांधीनगर**
या पाठ्यपुस्तकाचे सर्व हक्क गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळाच्या स्वाधीन आहेत.
या पाठ्यपुस्तकातला कोणताही भाग कोणत्याही स्वरूपात गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळाच्या नियामकांच्या लेखी परवानगी शिवाय प्रकाशित करता येणार नाही.

**विषय-सल्लागार**
डॉ. मृणालिनी कामत
**कन्वीनर**
श्रीमती रोहिणी खांडेकर
**लेखन-संपादन**
श्री पी. एम. पाटील
श्रीमती निशा काळुस्कर
श्रीमती प्रिती सुधाळकर
श्रीमती निशा खेर
**समीक्षा**
श्रीमती सुदेष्णा मुरलीधर कदम
श्री हिरामण डी. महाले
श्री राजेंद्र पंडित वानखेडे
श्रीमती आशाबाई उत्तमराव देवरे
श्री संजय गोपा शेलार
श्री रमेश एन. घरटे
श्री हितेन्द्र माधवराव पाटील
**संयोजन**
डॉ. कमलेश एन. परमार
(विषय-संयोजक : हिन्दी)
**निर्माण-संयोजन**
श्री हरेन शाह
(नायब नियामक : शैक्षणिक)
**मुद्रण-आयोजन**
श्री हरेश एस. लीम्बाचीया
(नायब नियामक : उत्पादन)

## प्रस्तावना

एन. सी. ई. आर. टी. द्वारे तयार करण्यात आलेल्या नव्या राष्ट्रीय अभ्यासक्रम (NCF) च्या अनुसंधानात गुजरात माध्यमिक आणि उच्चत्तर माध्यमिक शिक्षण बोर्ड, गांधीनगरने राज्याच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक कक्षेच्या विविध विषयांचे नवीन अभ्यासक्रम तयार केले. ज्याला गुजरात सरकारच्या शिक्षण विभागाद्वारे मंजूर करण्यात आले.

नवीन राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या परिप्रेक्ष्यात तयार केलेला राज्याच्या वेग-वेगळ्या विषयांचे नवीन अभ्यासक्रमानुसार तयार करण्यात आलेले **इयत्ता-10 वी मराठी** चे हे पुस्तक ह्या स्तरावर अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर सादर करतांना आनंद होत आहे. लेखन-संपादन पॅनलच्या सभ्यश्रींनी या पाठ्यपुस्तकाच्या हस्तप्रत निर्माण प्रक्रियेत संपूर्ण काळजी घेतली आहे. एन.सी.ई.आर.टी. च्या आणि इतर राज्याचे अभ्यासक्रम, पाठ्यक्रम आणि पाठ्यपुस्तकांना पाहून-तपासून, राज्याचे पाठ्यपुस्तक जास्त गुणवत्तापूर्ण बनविण्यासाठी लेखक संपादकांनी भरपूर मेहनत घेतली आहे.

हे पाठ्यपुस्तक प्रसिद्ध करण्या अगोदर या हस्तप्रतची या स्तरावर शिक्षणकार्य करणारे शिक्षण तज्ज्ञांद्वारे सर्वांगीण समीक्षा करण्यात आली आहे. समीक्षा शिबिराच्या सुधारणा घेण्यात आल्या आहेत. तसेच मंजुरी क्रमांक प्रक्रिये दरम्यान गु.मा.आणि उ.मा. शिक्षण बोर्ड, गांधीनगरने केलेली तपासणी अहवालानंतर मिळालेल्या सुधारणा घेण्यात आल्या आहेत. या पुस्तकाची शेवटची प्रत तयार करून प्रसिद्ध करण्यात आली आहे.

नवीन अभ्यासक्रमाचा एक उद्देश विद्यार्थी व्यावहारिक भाषेचा उपयोग करतील तसेच भाषेची अभिव्यक्ती अधिक परिणामकारक बनवेल असा आहे. परंतु साहित्यिक स्वरूपे आणि सर्जनशील भाषेच्या परिचयासोबत भाषेचे वैशिष्टये समजून स्वत:च्या लेखनात उपयोग करतील असे ध्येय ठेवण्यात आले आहे. यासाठी भाषा-अभिव्यक्ती तसेच लेखन विषयी संपूर्ण माहिती दिली आहे. याविषयी विद्यार्थ्यांकडून अधिक सराव करावा.

प्रस्तुत पाठ्यपुस्तकाला रसप्रद, उपयोगी आणि क्षतिरहित बनविण्यासाठी पूर्ण काळजी घेतली आहे. तरी सुद्धा शिक्षणाची आवड असणाऱ्या व्यक्तिकडून पाठ्यपुस्तकाची गुणवत्ता वाढेल अशा सूचना आल्यास त्यांचा स्वीकार होईल.

| | |
|---|---|
| **पी. भारती** (IAS) | |
| नियामक | कार्यवाह प्रमुख |
| ता.: 13-11-2019 | गांधीनगर |

प्रथम आवृत्ती : 2017, पुनःमुर्द्रणः 2018, 2019, 2020
**प्रकाशक** : गुजरात राज्य शाळा पाठ्यपुस्तक मंडळ, 'विद्यायन', सेक्टर 10-ए, गांधीनगरसाठी पी. भारती, नियामक
**मुद्रक** :

# मूलभूत कर्तव्ये

भारतातील प्रत्येक नागरिकाची कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत :*

(क) घटनेचे पालन करणे आणि तिचे आदर्श व संस्थांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे;

(ख) ज्यामुळे आपल्याला राष्ट्रीय स्वातंत्र्यलढयास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करून त्यांचे अनुकरण करणे;

(ग) भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत राखणे व त्यांचे संरक्षण करणे;

(घ) आवाहन केले जाईल तेव्हा देशाचे संरक्षण करणे व राष्ट्रीय सेवा बजावणे;

(च) धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन अखिल भारतीय जनतेमध्ये एकोपा व भ्रातृभाव वाढीला लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथा सोडून देणे;

(छ) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे मोल जाणून तो जतन करणे;

(ज) अरण्ये, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी यासह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करणे, त्यात सुधारणा करणे, आणि सजीव प्राण्यांविषयी दयाबुद्धी बाळगणे;

(झ) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोण, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे;

(ट) सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे;

(ठ) राष्ट्र सतत पुरूषार्थ व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशा प्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे; हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे;

(ड) आई-वडीलांनी किंवा पालकांनी 6 ते 14 वर्षांतील मुलांना किंवा पाल्यांना शिक्षणाची संधी पुरवावी;

*भारतीय घटना : कलम 51-क

# अनुक्रमणिका


| पाठ-काव्यांची नावे | साहित्यप्रकार | लेखक-कवी | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1. विराणी | (विराणी) | संत ज्ञानेश्वर | 1 |
| 2. द्विजगोरक्षण | (महानुभाव गद्य) | म्हाइंभट | 3 |
| 3. संभाजीस पत्र | (पत्र) | समर्थ रामदास | 5 |
| 4. मराठ्यांचे आरमार | (बखर) | रामचंद्रपंत अमात्य | 7 |
| 5. कपऱ्या | (ऐतिहासिक कथा) | ब.मो.पुरंदरे | 9 |
| 6. दुपार | (भावकविता) | म. म. देशपांडे | 15 |
| 7. मिळवती होताना | (ललित लेखन) | इंदिरा संत | 17 |
| 8. एका नव्या यज्ञाचा उपासक | (व्यक्तिचित्रण) | डॉ. द.ता.भोसले | 21 |
| 9. माणूस माझे नाव | (कविता) | बाबा आमटे | 25 |
| 10. मारुतराया | (ग्रामीण कथा) | व्यंकटेश माडगूळकर | 27 |
| 11. क्रांतिकारकांची वज्रमुठ | (नाट्यांश) | मधुसूदन कालेलकर | 32 |
| 12. माझ्या कवितेची चव | (ग्रामीण कविता) | इंद्रिजत भालेराव | 38 |
| 13. बडोद्याचा भाग्यविधाता | (चरित्रात्मक लेख) | स्मिता भागवत आणि अविनाश कप्तान | 40 |
| 14. बिनपैशांचे खेळ | (ललित गद्य) | दिलीप. वि. चित्रे | 45 |
| 15. भारतीय जवानाचें पत्र | (कविता) | नारायण सुर्वे | 48 |
| 16. छात्रालयातील आठवणी | (कादंबरी अंश) | आनंद यादव | 50 |
| 17. नावात काय नाही ? | (विनोदी कथा) | मुकुन्द टाकसाळे | 54 |
| 18. जमाखर्च स्वातंत्र्याचा | (कविता) | मंगेश पाडगावकर | 63 |
| 19. गौराई | (ललित लेख) | इरावती कर्वे | 65 |
| 20. गच्चीवरील बाग | (शास्त्रीय लेख) | निळू दामले | 69 |
| 21. श्रावणझड | (कविता) | अनिल | 73 |
| 22. माझ्या संस्कृतची कथा | (दलित आत्मकथन) | कुमुद पावडे | 75 |
| 23. ॲन फ्रँकची डायरी | (अनुवाद) | मंगला निगुडकर | 79 |
| 24. नदी वाहते आहे | (कविता) | दासू वैद्य | 82 |


**व्याकरण**


| | |
|---|---|
| 1. वाक्य रुपांतर | 84 |
| 2. वाक्य संश्लेषण (संकलन) | 86 |
| 3. समास | 88 |
| 4. अलंकार | 93 |
| 5. वृत विचार | 95 |
| 6. कल्पना विस्तार | 98 |
| 7. सारांश लेखन | 99 |
| 8. अहवाल लेखन | 100 |


**पूरक वाचन**


| | | | |
|---|---|---|---|
| 1. वाहता नळ पाहून | (कविता) | आश्लेषा महाजन | 101 |
| 2. जीव घाबरा करणारी भाषा | (भाषाविषयक लेख) | मॅक्सीन बर्नसन | 102 |
| 3. एवढें लक्षांत ठेवा | (गझल) | विंदा करंदीकर | 104 |
| 4. भावसाक्षरता | (वैचारिक लेख) | जयंत जोशी | 105 |


●

# 1 विराणी

**संत ज्ञानेश्वर**
**( जन्म : 1275 मृत्यू : 1296 )**

ज्ञानेश्वर हे मराठीतील सर्वश्रेष्ठ संतकवी होते. पैठणजवळचे आपेगाव हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे वडील विठ्ठलपंत व आई रुक्मिणी विठ्ठलपतांनी संन्यास घेतला परंतु गुरुंच्या आज्ञेवरुन पुन:गृहस्थाश्रम स्वीकारला, त्यानंतर त्यांना चार अपत्ये झाली. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई. संन्याशाची मुले म्हणून तत्कालीन समाजाने त्यांचा खूप छळ केला. धर्माचे मर्म न कळणाऱ्या समाजाला सन्मार्गावर आणण्यासाठी ज्ञानेश्वरांनी बरीच उपदेशपर ग्रंथरचना केली.

'भावार्थदिपिका,' अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, असे ग्रंथ, शिवाय विराण्या अनेक अभंग ज्ञानेश्वरांच्या रचनेत आहेत.'भावार्थदिपिका' जी पुढे ज्ञानेश्वरी या नावाने सुविख्यात झाली.

प्रस्तुत विराणीतून (विरहिणी) ज्ञानेश्वरांची परमेश्वरा शिवाय क्षणभर राहु न शकणाऱ्या भक्ताची मन:स्थिती, प्रियकराभोवती सतत रुंजी घालणाऱ्या स्त्रीमनामधून येथे प्रकट होते. प्रियकराच्या विरहाने व्याकुळ झालेल्या प्रेयसीची भावावस्था त्यामध्ये व्यक्त झालेली आहे. श्रीकृष्णाला, विठ्ठलाला भेटण्याची आस लागलेल्या विरहिणीचे यात चित्रण आहे. कृष्णाच्या रुपाशी तिचे झालेले एकरुपत्व येथे अनुभवता येते.

---

पंढरपुरचा निळा लावण्याचा पुतळा।
विठो देखियेंला डोळां बाईये वो ॥ 1 ॥
वेधलें वो मन तयाचिया गुणीं।
क्षणभर विठ्ठलरुक्मिणी न विसंबें॥ धृ. ॥
पौर्णिमेचे चांदिणें क्षणक्षणां होय उणें।
तैसे माझें जिणें एका विठ्ठलेंविण॥ 2 ॥
बाप रखुमादेवीवरु विठ्ठलुचि पुरें।
चित्तचैतन्य मुरे बोईये वो ॥ 3 ॥

## शब्दार्थ

**लावण्य** सौंदर्य **विसंबणे** दूर जाणे **चित्तचैतन्य** मनाचा जिवंतपणा

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य विकल्प शोधून लिहा :**

(1) ज्ञानेश्वरांचे मूळ गाव कोणते ?

(अ) आळंदी (ब) देहू (क)आपेगाव (ड) पैठण

(2) ज्ञानेश्वरीचे आधीचे नाव काय होते ?

(अ) चांगदेवपासष्टी (ब) भावार्थदिपिका (क) अभंग (ड) महाभारत

**2. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

(1) ज्ञानेश्वरांनी 'लावण्याचा पुतळा' कोणाला उद्देशून म्हटले आहे ?

(2) विठ्ठलाशिवायचे जीवन ज्ञानेश्वरांना कसे वाटते, ते काव्याच्या आधारे समजवा.

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) ज्ञानेश्वरांच्या विराणीमधून भक्ताची मन:स्थिती कशी व्यक्त झाली आहे ते लिहा.

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- ज्ञानेश्वरांच्या घनुवाजे घुणघुणा, वारा वाहे रुणझुणा
- पैल तो गे काऊ कोकताहे, या विराण्या ऐकून त्यांचा आनंद घ्या.

## भाषाभिव्यक्ती

पंढरपुरच्या निळयासावळया विठ्ठलारूपामध्ये जीव गुंतलेल्या विरहिणीची व्याकुळ अवस्था व्यक्त करताना स्वत: ज्ञानेश्वरच जणूकाही त्या विरहिणीच्या अंतरंगामध्ये प्रवेश करतात. ''बाईये वो'' अशी ती पुन्हा पुन्हा आपल्या सख्यांना विनवणी करते, कारण विठ्ठलावाचून पौर्णिमेचे चांदणे सुद्धा तिला आनंददायक वाटत नाही. आता तिचे मन विठ्ठलामध्ये इतके एकरूप झाले आहे की, त्याच्याशिवाय क्षण ही तिला जगणे असह्य होते. लावण्याचा, सौंदर्याचा पुतळा असणाऱ्या श्रीकृष्णाने तिच्या मनाला व्यापून टाकले आहे.

ज्ञानेश्वरांच्या विराण्या म्हणजे, कृष्णाच्या भेटीसाठी तळमळणाऱ्या भक्ताचेच रूप आहे, शेवटी 'चित्तचैतन्य मुरे' अशी साक्षात्काराची अवस्था ज्ञानदेवांनी वर्णन केली आहे. म्हणजे कृष्णाशी ती एकरूप झालेली आहे.

केवळ आठ ओळीच्या या विरहिणीमध्ये कृष्णाचा निळा रंग, पौर्णिमेचे स्वच्छ पांढरे चंद्रचांदणे, अशी रंगांची जादू शब्दांमधून उभी केली आहे. विरहिणीची भावव्याकुळता, भक्तिभाव आणि मनोमीलनाची तळमळ शब्दबद्ध करणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या प्रतिभाशक्तिचा हा अविष्कार थक्क् करून टाकणारा आहे.

•

# 2 द्विजगोरक्षण

**म्हाइंभट**

तेराव्या शतकातील या चरित्रकाराच्या जन्ममृत्यूविषयी निश्चित माहिती नाही. महानुभाव संप्रदायातील अनुयायांनी मराठीतील गद्यवाङ्मयाचा श्रीगणेश केला. महानुभाव संप्रदाय हा परंपरेला आव्हान देणारा यादव काळातील एक महत्त्वाचा संप्रदाय. पंथाचे आचार व  विचार व्यक्त करण्यासाठी महानुभावी पंथीयांनी विपुल साहित्यनिर्मिती केली. शिशुपालवध,'रुक्मिणीस्वयंवर,' 'वछाहरण' या सारखी महाकाव्य सदृश रचना, धवळयांसारखी स्त्रीगीत रचना, 'सातीग्रंथ' यासारखे सिद्धान्तसूत्रे व पूजनीय स्थलवर्णन करणारे ग्रंथ इ. मौलिक रचनांनी त्यांनी मराठी भाषेला संपन्नता प्राप्त करून दिली. 'लीळाचरित्र' हा मराठीतील आद्य चरित्रग्रंथ असून म्हाइंभटांनी तो शके 1200 सुमारास लिहिला.

'लीळाचरित्र' या ग्रंथामध्ये श्रीचक्रधरस्वामींच्या लीळा म्हणजेच आठवणी संग्रहित केलेल्या आहेत. चक्रधरस्वामींच्या विरहाने व्याकुळ झालेल्या शिष्यांना या आठवणींमुळे काही काळ मन:शांती लाभत असे. त्यामुळे म्हाइंभट यांनी या आठवणी लिहून काढण्याचे ठरवले.महानुभाव पंथाचे आचार्य नागदेवाचार्यांनी त्यांना अनुमती दिली. त्याप्रमाणे अनेक गावांमध्ये हिंडून, अनेक लोकांना भेटून म्हाइंभटाने या लीळा गोळा केल्या. त्यांनी त्यासाठी अमाप कष्ट केले.

चक्रधरांच्या या चरित्राचे एकाक, पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे तीन भाग आहेत. पंथ स्थापन करण्यापूर्वीची चक्रधरांची एकाकी वाटचाल यामध्ये आहे.

चक्रधरांनी एका ब्राह्मणाच्या घरी गुराख्याचे काम स्वीकारले असतांनाची ही आठवण / लीळा आहे.

म्हाइंभटाचे रचनाकौशल्य त्यांचा भक्तिभाव यातील प्रसंगावरून लक्षात येतो. चक्रधरस्वामींना गोसावी, सर्वज्ञ असेही म्हणत असत.

---

एकी गावीं गोसावीयांसि अवस्थान जालें: गोसावीं पाणीपात्रासि ब्राम्हणा एकाचेया घरासि बीजें केलें: ब्राम्हणें म्हणीतलें: ''मोटेधाटे: आडवेरूंद: उभेदीघ: भीक्षा कां मागत असा? कोण्हाचीया गाइ कां राखा ना?'' सर्वज्ञें म्हणीतलें: ''हें राखैल: परि याकरवि कव्हणी राखे ना:'' तेहीं म्हणीतलें: ''ना आम्हीं आपुलीया राखौनि: मोटे दहीभातु सुनि: व्याळीए दुधभात घालुनि:'' सर्वज्ञें म्हणीतले: ''हे राखेल: परि दोहे ना: सोडील परि बांधे ना:'' तेही म्हणीतलें: ''आम्हांचि बांधोनि आणि आम्हींच दोहोनि:'' गोसावी मानिलें: मग तेहीं म्हणीतलें: ''हो कां: तरि या आटेयावरिं राहा: आमचा गोवळु गेला: तेयाचां ठाइं तुम्हीं राहा:'' मग तेयाची जाडि: वाहाणा: डांग: पागोटें: ऐसें गोसावीयांसि दीधलें: रात्रीं गोसावीयांसि दुधाभाताची आरोगण दीधली: इतुलेनि गोसावीं तेयाचीए दारीं ओटायावरि पहुडु स्वीकरिला: उदैक गोसावीयांसि दहीभाताची मोट सुदली: गोसावीं गाइ सोडिलीया: गाइ रानासि नीगालीया: पुढां गोसावी: मागां गाइ: गोसावीयांसरिसा तोही अनुवर्जीत नीगाला: मग तो म्हणे: ''कोण्हाचीए सेतीं रीगों नेदावीया: कोण्हाचीए मेरे चारावीया ना: बरवीया रानावरि घालावीया: वेळे उदकासि मेळवावीया: बरवी साउसी मेळवावी:'' मग तो राहिला: गोसावी गाइ रानाघेउनि गेले: रान पावले: आणि गोसावीयांसि खडका येकावरि आसन जाले; भवंतीया गाइ श्रीमूर्तिं अवलोकीति: आनंदुरोहंतीति बैसलीया असति: त्राहाटीति डोळे: त्राहाटीति पुसे. ऐसीया बगटावरि बगट वाटलिया:  श्रीमुर्ति अवलोकुं लागलिया: मग वीळिचांचीए अवसरीं गोसावी पुढां: मागां गाइ: मग गोसावीं वाडां गाइ घातलीया: मग गोसावीयांसि ओटेयावरि आसन जालें: तेहीं गाइ दोहिलीया: सवाया दुध दोहिलें: दहीं: लोणीं: तुप बहूत हों लागलें: ऐसां थोर दूभों लागलीया: दोहतां दोहों हातां कांडार एति: मग गोसावीयांसि दुधभाताची आरोगण दिधली: मग तीएं आपुली ओरिसारि करूनि नीजैली: मग आथूरणीं गोष्टी करूं लागलीया आजि दुणा दुध जालें: एकमेकां वीस्मो करूं लागली: जें. 'आम्हांसि गोवळु नीका जोडला:' ऐसा गोसावी तेथ नीच बीजें करीति: आणि गाइ भवंतीया आनंदु रोवंतीति बैसति: ऐसा तीनि दी अनुवर्जीत जाए: गांविचे गोवळ तेयांपुढां सांघति: ''ऐसा कवणु गा राहाविला असे? त्रुण नाहीं: उदक नाहीं: ना साउली नाहीं: एका खडकावरि घालिते:'' ऐसें दोनि दीसपरीएंत सांघीतलें: मग तेणें म्हणीतलें ''काइं पां: दुध तरि दुणा नीगताए: हें ऐसें काइ सांघताति? हे गोसावी असति आणि जाती तरि कव्हणी ठाइं कव्हणा राना चारावेया नेत असति तें पाहों:'' म्हणौनि तो तीसरां दीसीं पाहावेया राहिला: वृक्षा एकावरि: तवं जैसें गोपाळीं सांघीतलें तैसेंचि देखिलें: गोसावी आसनीं बैसले असति: भवंतीया गाइ आनंदु रोवंतितीति बैसलीया असति: ''ऐये रे : सामान्य पुरूख

नव्हतिः साक्षात श्रीकृष्णु मां'' मग एऊनि ब्राह्मणीतें म्हणीतलें: ''पैलु आमचीया गाइ राखे तो साक्षात श्रीकृष्णुः गोसावी एतीः मां एकु पाओं तुं धरिः एकु पाओ मीं धरीनः मां गोसावीयांतें पुसोंः 'तुम्ही काइ ?' गोसावीं रानौनि बीजें केलेंः वीळिचां गाइ वाडेयाआंतु घातलीयाः आणि बाहीरवाहिरे बीजें केलेः ॥

## शब्दार्थ

**अवस्थान** मुक्काम **पाणीपात्र** भीक्षा **मोटेधाटे** धष्टपुष्ट **व्याळीए** रात्री **सर्वज्ञ** श्री चक्रधरस्वामींसाठी हा शब्द योजिला आहे **दोहणे** दूध काढणे **ठाइ** जागा **जाडि** घोंगडी **डांग** काठी **आरोगण** जेवण **मोटसुदली** शिदोरी दिली **रींगो नेदावीया** जाऊ न देणे **बरवी** चांगली **उदक** पाणी **अवलोकन** पाहणे **साउसी** सावली **खडक** दगड **वीळिचांचीए अवसरी** संध्याकाळच्या वेळी **दुणा** दुप्पट **बीजे केले** पुढे गेले **अनुवर्जीत** नित्यक्रम **त्रुण** गवत(तृण)**रोवंत** रवंथ करणें **पाओ** पाय **वीस्मो** विस्मय, आश्चर्य **वाडेयाआंतु** (वाडा-गोठा) गोठ्यात

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या :**

(1) स्वामी भिक्षा मागण्यासाठी कोणाकडे गेले ?

(2) भिक्षा मागायला स्वामी गेले असतांना ब्राह्मण त्यांना काय म्हणाला ?

(3) स्वामींनी ब्राह्मणाला गायी राखण्यासंबंधी कोणत्या अटी घातल्या ?

(4) गायी प्रत्यक्ष कोण राखत होते ?

**2. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) स्वामी गायींना घेऊन निघाले त्यावेळी ब्राह्मणाने काय-काय सूचना दिल्या ?

(2) स्वामी रानात गेल्यावर तिथे काय घडले ?

(3) स्वामींबरोबर गायी रानात जाऊन आल्यावर काय चमत्कार झाला ?

**3. यादवकालीन मराठी शब्दांसाठी प्रचलित भाषेतील शब्द लिहा.**

आरोगण, पाओं, बरवा, अवसर.

## भाषाभिव्यक्ती

चक्रधरस्वामींनी आपल्या संप्रदायाची स्थापना करण्यापूर्वी त्यांची जी एकाकी वाटचाल सुरु होती त्या काळातील ही लीळा आहे.संप्रदायामध्ये त्यांना कृष्णाचा अवतार किंवा प्रत्यक्ष कृष्णच मानले गेलेले आहे. ब्राह्मणाच्या गायी राखतांना त्यांच्यातील अवतारी पुरुषाचे गुण, त्यांच्यामधील भुतदया,मानवधर्म, सह्रदयता यांचा प्रत्यय येतो. ते म्हणतात,''सोडील परि बांधेना,'' म्हणजे मी गायींना बांधणार नाही.

महानुभाव संप्रदायांच्या गद्यग्रंथांना मराठी साहित्यात फार महत्त्वाचे स्थान आहे. कारण त्या काळच्या मराठी बोलीभाषेचे सौंदर्य आणि समाजजीवनाची चित्रणे लीळाचारित्राप्रमाणेच त्यांच्या अन्य गद्यग्रंथामध्ये दिसतात.

गोसावी-म्हणजेच चक्रधरस्वामी गायी राखत असतांना त्यांना पाहण्यास गेलेल्या ब्राह्मणाला खडकावर बसलेल्या स्वामींचे जे दर्शन झाले आहे त्याची चित्रात्मकता आणि वर्णनात्मकता अभ्यासण्याजोगी आहे

गायींना रानात घेऊन जाण्याआधी ब्राह्मणाने त्यांना दिलेल्या सूचना नीट वाचा. त्यामध्ये 'कोणाच्या शेतात किंवा बांधावर गायी जाऊ न देण्याची' काळजी घेण्यास सांगितले आहे. त्यांना व्यवस्थित पाणी पाजण्यास विसरु नये अशी सूचनाही दिलेली आहे. तत्कालीन मराठी बोलीचे स्वरूप त्यातला गोडवा, अर्थपूर्ण शब्दरचना, छोटी वाक्ये यांचा आनंद या लीळेमध्ये घेता येतो.

संध्याकाळच्या वेळी ब्राह्मणाने गायीच्या धारा काढल्यानंतर दुधादह्याचा जो सुकाळ झाला आहे. त्यामध्ये वर्णन केलेला चमत्काराचा भाग कोणत्याही अवतारी व्यक्तीच्या चरित्रामध्यें समाविष्ट होतोच.

यादवकालीन मराठी भाषेचे हे रुप पाहत असतांना म्हाईंमभटाच्या प्रतिभेमुळे यातील घटना प्रसंग, व्यक्तिरेखा, यांची वर्णने अप्रतिम ठरलेली आहेत हे त्याचे श्रेय आहे हे लक्षात घ्यावे लागते.

•

| 3 | # संभाजीस पत्र |
|---|---|

**समर्थ रामदास**

**( जन्मः 1608 : मृत्यू :1682 )**

चैत्र शुद्ध नवमी (रामनवमी) शके 1530 रविवार मध्यान्ह काली नारायण उर्फ रामदास स्वामी यांचा जन्म जांब (औरंगाबाद जिल्ह्याती ताल जालना जवळ)या गावी झाला. वडिलांचे नाव सूर्याजीपंत ठोसर आणि आईचे नांव राणुदेवी होते.

त्यांनी ग्रंथराज् 'दासबोध', सव्वीस हजारा पेक्षा अधिक अभंग, मनाचे श्लोक करूणाष्टके, सवया, आरत्या इत्यादि विपुल लेखन केले. त्यांची भाषा खडकाळ डोंगरातून वाहणाऱ्या मधूर निर्मळ झऱ्यासारखी आहे. त्यांची विषय मांडणी शास्त्रीय आहे. सूत्ररूपाने व व्याख्या करून ते विषयाचे प्रतिपादन करतात. त्यांचे सर्व लेखन आत्मप्रचीतीचे आहे. त्यांनी आपल्या लेखनात विविध छंदांचा आणि वृत्तांचा उपयोग केला आहे. प्रसंगी मुक्त छंदातही त्यांनी रचना केली आहे.

त्यांचे लेखन अत्यंत सोपे सुलभ आणि अंतर्मुख करणारे

---

अखंड सावधान असावें। दुश्चित कदापि नसावें ।तजवीजा करीत बसावें ।एकांत स्थळीं ॥ 1 ॥
कांही उग्र स्थिती सांडावी। कांहीं सौम्यता धरावी॥ चिंता लागावी परावी। अंतर्यामीं ॥ 2 ॥
मागील अपराध क्षमावे। कारभारी हातीं धरावे॥ सुखी करूनि सोडावे। कामाकडे ॥ 3 ॥
पाटवणीं तुंब निघेना। तरी मग पाणी चालेना॥ तैसें सज्जनांच्या मना॥ कळलें पाहिजे॥ 4 ॥
जनाचा प्रवाह चालिला। म्हणजे कार्यभाग आटोपला॥ जन ठायीं ठायीं तुंबला। म्हणजे खोटें ॥ 5 ॥
श्रेष्ठीं जें जें मिळविलें। त्यासाठीं भांडत बसले॥ मग जाणावें फावलें। गलिमांसी ॥ 6 ॥
ऐसें सहसा करूं नये। दोघे भांडतां तिसऱ्यासी जये ॥ धीर धरोन महत्कार्यें। समजून करावें॥ 7 ॥
आधींच पडला धास्ती। म्हणजे कार्यभाग होय नास्ती॥ या कारणें समस्तीं। बुद्धि शोधावी ॥ 8 ॥
राजीं राखितां जग। मग कार्यभागाची लगबग ॥ ऐसे जाणोनियां सांग। समाधान राखावें॥ 9 ॥
सकळ लोक एक करावे। गलीम निवटून काढावे॥ ऐसें करितां कीर्ति धांवे। दिगंतरी ॥ 10 ॥
आधी गाजवावे तडाके। मग भूमंडळ धाके॥ ऐसें न होतां धक्के। राज्यास होती॥ 11 ॥
समय प्रसंग ओळखावा। राग निपटून काढावा। आला तरी कळों न द्यावा। जनामध्यें ॥ 12 ॥
राज्यामध्यें सकळ लोक। सलगी होऊन करावे सेवक॥ लोकांचें मनामध्यें धाक। उपजोंचि नये॥ 13 ॥
आहे तितुकें जतन करावें। पुढें आणिक मिळवावे॥ महाराष्ट्रराज्य करावें। जिकडे तिकडे॥ 14 ॥
लोकीं हिंमत धरावी। शर्तीची तरवार करावी॥ चढती वाढती पदवी। पावाल तेणे ॥ 15 ॥
शिवराजास आठवावें। जीवित्व तृणवत् मानावें॥ इहलोकीं परलोकीं राहावें। कीर्तिरूपें ॥ 16 ॥
शिवरायाचें आठवावें रूप। शिवरायाचा आठवावा प्रताप॥ शिवरायाचा आठवावा साक्षेप। भूमंडळीं॥ 17 ॥
शिवरायाचें कैसें चालणें। शिवरायाचें कैसें बोलणें॥ शिवरायाची सळगी देणें। कैसें असे॥ 18 ॥
सकल सुखांचा त्याग। करूनि साधिजे तो योग॥ राज्यसाधनाची लगबग। कैसी असे॥ 19 ॥
त्याहूनि करावें विशेष। तरीच म्हणावे पुरुष॥ या उपरी आतां विशेष। काय लिहावें॥ 20 ॥

### शब्दार्थ

**दुश्चित** वाईट कृत्य **तजवीज** व्यवस्था, उपाय योजना **कदापि** कधीही **सांडावी** टाकावी, सोडून द्यावी **परावा** परका **पाटवणी** पाण्याचा लहान पाट **गलिम** गनीम,शत्रु **राजी** खुष **निवटणे** वध करणे, मारणे **दिगंतर** सर्व दिशात पसरणे **लगबग** झटपट **तडाके** प्रहार **सलगी** मैत्री **धक्का** हिसका **पावणे** मिळणे **सांरा** आज्ञा (सांगणे) **जतन करणे** सांभाळणे **उपजोचि नये** उद्भवु नये **धास्ती** भय **साक्षेप** प्रयत्न

### वाक्प्रचार

**तलवार गाजवणे** पराक्रम करणे **राग निपटून काढणे** राग नाहिसा करणे **शर्तीची तरवार करणे** खूप पराक्रम करणे **जीवन तृणवत् मानणे** जीवन क्षुद्र मानणे

### म्हण

**दोघे भांडता तिसऱ्यासी जये** दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ.

### स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या:**

(1) पत्राच्या आरंभी समर्थांनी संभाजीस काय उपदेश केला आहे ?

(2) श्रेष्ठींनी जे जे मिळविले त्यासाठी भांडत बसल्याने काय होईल असे समर्थ म्हणतात ?

(3) समर्थांनी संभाजीस राज्यकारभार कसा करावा म्हणून सांगितले आहे ?

(4) ''दोघे भांडता तिसऱ्यासी जये'' काव्याच्या आधारे समजवा.

(5) राजाने प्रजेशी कसे वागावे असे समर्थ म्हणतात

(6) शिवरायांचे कोणते गुण संभाजी महाराजांनी आत्मसात करावे असे समर्थांना वाटते ?

### भाषाभिव्यक्ती

छत्रपती शिवाजी महाराजांनी शून्यातून भलेमोठे राज्य स्थापन केले. स्वत:चा जीव पणाला लावून शक्ती, बुद्धी आणि युक्तीने पराक्रम गाजवला आपल्यासारखे जीवाला जीव देणारे एक एक मावळे म्हणजे जणू प्रति शिवाजीच असे निर्माण केले. ''राज्यामध्ये सकळ लोक। सलगी होऊन करावे सेवक। लोकांचे मनामध्ये धाक। उपजोची नये॥'' अशी जीवश्च कंठश्च माणसं जोडण्याची कला शिवबामध्ये होती.तेव्हा समर्थांनी शिवबांच्या प्रयाणानंतर संभाजी महाराजांचा उग्र स्वभाव लक्षात घेऊन राज्य कसे सांभाळावे याचा उपदेश केला आहे। ''श्रेष्ठी जे जे मिळविले त्यासाठी भांडत बसू नये उलट आहे तितुके जतन करावे। पुढे आणिक मिळवावे॥ महाराष्ट्र राज्य करावे। जिकडे तिकडे॥'' हे सांगून शेवटी शिवरायांच्या अष्टपैलु व्यक्तीमत्त्वाचे स्मरण करीत राज्य करावे, असे आवर्जून सांगितले.

'संभाजी महाराजांस उपदेश असलेले हे पत्र आजही प्रत्येक व्यक्तीला सामाजिक कार्यकर्त्याला तसेच राजकारणातील धुरंधर नेत्यालाही मार्गदर्शक आहे.

•

| 4 | # मराठ्यांचे आरमार |
|---|---|

**रामचंद्रपंत अमात्य**

**( जन्म : 1650 मृत्यू : 1716 )**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळात अमात्य होते इ. स. 1674 ते 1680 काळात त्यांनी संभाजी, राजाराम, शिवाजी दुसरा व संभाजी दुसरा या चार महाराजांबरोबर काम केले. ते आज्ञापत्राचे लेखक आज्ञापत्रात नागरी , लश्करी, नीति व संचालन, राजनीती याचे वर्णन केले आहे.

---

आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यांगच आहे. जसें ज्यास अश्वबल तसी त्याची वृद्धिप्रथा आहे, तद्वतच ज्याजवळ आरमार त्याचा समुद्र. याकरितां आरमार अवश्यमेव करावें. चालीच्या गुराबा बहुत थोर ना बहुत लहान, ऐशिया मध्यरीतीनें सजाव्या. तशींच गलबतें करावीं.

आरमारास तक्ते, सोंट, डोलाच्या काठ्या आदिकरून थोर लांकडें असावीं लागतात. आपले राज्यांत अरण्यांत सागवानादि वृक्ष आहेत त्यांचें जें अनुकूल पडेल तें हुजूरचे परवानगीनें तोडून न्यावें. याविरहित जें लागेल तें परमुलखींहून खरेदी करून आणवीत जावें. स्वराज्यांतील आंबे, फणस आदिकरून हेही लांकडें आरमाराच्या प्रयोजनाचीं, परंतु त्यांस हात लावूं देऊं नये. काय म्हणोन कीं, हीं झाडें वर्षां दोन वर्षांनीं होतात असें नाहीं. रयतांनीं हीं झाडें लावून लेंकरासारखीं बहुत काळ जतन करून वाढविलीं. तीं झाडें तोडिल्यावर त्यांचे दु:खास पारावार काय ? एकास दु:ख देऊन जें कार्य करीन म्हणेल तें कार्य करणारास हित स्वल्पकाळचें बुडोन नाहींसेंच होतें; किंबहुना धनियाचे पदरीं प्रजापीडण्याचा दोष पडतो. या वृक्षांच्या अभावें हानिही होत्ये. याकरितां हे गोष्टी सर्वथैव होऊं न द्यावी. कदाचित् एखादें जें झाड बहुत जीर्ण होऊन कामांतून गेलें असलें तरी त्याचे धन्यास राजी करून घेऊन द्रव्य देऊन त्याचे संतोषें तोडून न्यावें. बलात्कार सर्वथैव न करावा.

### शब्दार्थ

**वृध्दीप्रथा** महत्त्व,मोठेपणा **अवश्यमेव करावे** आवश्यक आहे **चालीच्या गुराबा** नौका **गलबत** मोठे जहाज **तक्ते** लाकडी फळया **सोंट** जाड लाकूड **डोलाच्या काठ्या** गलबतावरील शिडाच्या काठ्या **हुजूर** राजासाठी मानपूर्वक बोलाण्याचा शब्द **रयत** प्रजा

### वाक्प्रचार

**जतन करणे** काळजीपूर्वक सांभाळणे **दु:खास पारावार नसणे** अतिशय दु:ख होणे **सर्वथैव होऊन देण** कधीच करू नये **बलात्कार न करणे** जबरदस्तीने न बळकावणे **राजी करणे** संमती घेणे.

### स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) लेखकाने आरमाराचा उल्लेख कसा केला आहे ?

(2) आरमाराचे महत्त्व कोणते ?

(3) आरमारात कोणकोणत्या प्रकारची लाकडे लागतात ?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) आरमारासाठी आवश्यक लाकडांसाठी कोणते वृक्ष तोडावे ?

(2) आरमारासाठी जीर्ण झाडाचा उपयोग कसा करावा ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) आरमारासाठी आंबे, फणस इत्यादी झाडांचा उपयोग का करू नये ?

(2) आरमारासाठी आवश्यक लाकडे कोठून आणावी ?

**4. खालील प्रश्नांची उत्तरे योग्य पर्याय निवडून लिहा:**

(1) स्वतंत्र राज्यांग कोणते ?

(अ) अश्वबल (ब) समुद्र (क) आरमार (ड) तोफा

(2) अरण्यातील सागवानादी वृक्ष कोणाच्या परवानगीने तोडून न्यावे ?

(अ) हुजूर (ब) पोलिस (क) जंगलखाते (ड) जंगलाधिकारी

(3) आरमारासाठीची लाकडे जरूर पडल्यास कोठून खरेदी करावी ?

(अ) बाजार (ब) लोक (क) जंगल (ड) परमुलख

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- पाच प्रकारच्या झाडांविषयी तसेच त्यांच्या उपयोगाविषयी प्रोजेक्ट बनवा.

## भाषाभिव्यक्ती

'आज्ञापत्र' हा शिवाजी महाराजांच्या राजनीतीवर लिहीलेला सूत्रात्मक ग्रंथ आहे. या ग्रंथाची रचना 1715-16 या काळात झाली. आहे. रामचंद्रपंत अमात्यांनी ह्या ग्रंथात एकूण नऊ प्रकरणांमध्ये शिवाजीच्या राज्यकारभाराची माहिती दिली आहे. अन्य बखरकारांच्या तुलनेत अलंकृत भाषेचा वापर न करता सहज भावाविष्कार करणारी भाषा यामध्ये आहे.

आपल्या राज्यकारभाराचे महाराजांनी उत्तम व्यवस्थापन केले होते आणि आपल्यानंतरही हे प्रशासन योग्यरीतीने चालावे यासाठी सगळ्या कर्मचारीवर्गाची नेमणूक वंशपरंपरेपेक्षा त्यांच्या कर्तृत्त्वावर केलेली होती. आपल्या सैन्याने राज्यात प्रजेसी कोणतीही दंडेली करु नये, यासाठी फार कडक सूचना दिल्या होत्या; आणि त्यांची अंमलबजावणीही केली जात असे.

यात शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यातील झाडांविषयी प्रजेच्या भावना जपण्याविषयी ज्या सूचना केल्या आहेत, त्यातून महाराजांचे हे धोरण स्पष्ट होते. शिवाजी राजांचा प्रजाहितदक्ष स्वभाव पाहता त्यांना समर्थ रामदासस्वामी यांनी 'शिवकल्याण राजा' असे म्हटले होते, त्याची सार्थकता लक्षात येते.

•

# 5 कपऱ्या

बलवंत मोरेश्वर पुरंदरे

( जन्म : 1922 )

शिवशाहीर बलवंत मोरेश्वर पुरंदरे अर्थात बाबासाहेब पुरंदरे यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करण्यात घालवले. त्यांनी राजा ''शिव छत्रपती'' हे चरित्र दोन भागात लिहिले आहे, त्यांनी अनेक ऐतिहासिक कथा कादंबऱ्या लिहिल्या आहेत. ''जाणता राजा'' हे त्यांचे प्रसिध्द नाटक महाराष्ट्रा बाहेर गुजरात, आंध्रप्रदेश आणि गोव्यातही खूप लोकप्रिय झाले.

त्यांना 2015 मध्ये ''महाराष्ट्र भूषण'' हा पुरस्कार मिळाला आहे. तसे 2007-08 मध्ये मध्यप्रदेश सरकारने त्यांना ''कालिदास सन्मान'' देऊन गौरविले आहे.

कपऱ्या ही कथा पेशवेकालीन वातावरणातील आहे. प्रत्येक मोठ्या कामामध्ये अनेक छोट्या गोष्टींचा हातभार लागत असतो आणि त्याचे महत्त्वही असते हेच या कथेतून लेखकाला सांगायचे आहे.

---

पालखीपुढे पंचवीस पावले अंतर टाकून चालणारा चोपदार तुळशीबागेच्या उत्तर दरवाजाशी थांबला व त्याने खणखणीत आवाजात ललकारी ठोकली–

मुरध्वज महाराजाधिराज!
श्रीमंत,
पंडित, सवाई माधवराव नारायणराव

बहादूर पंतप्रधान। तश्रीफ लाते है! आस्ति कदम ! आस्ते कदम!! निगा रखो ऽऽऽ !''

दरवाजात श्रीमंतांच्या स्वागताला खुद्द नारो अप्पाजी तुळशीबागवाले तर होतेच परंतु पुरंदरे, मुजुमदार, मेहेंदळे वगैरे काही सरदार मंडळीही होती.

श्रीमंतांची पालखी दरवाजात आली. नारो अप्पाजी हात जोडून स्वागताकरिता पुढे झाले. श्रीमंतापुढे नारोपंतांनी उजवा हात केला . श्रीमंतांची स्वारी शेला सावरीत व नारोपंतांच्या हाताचा आधार घेत पालखीतून उतरली.

श्रीमंताच्या पालखीबरोबर लवाजमासुद्धा बराच होता. सव्वाशे गारदी स्वार पालखीमागे होते. स्वारी नारो अप्पाजीबरोबर आत गेली. कारकूनपेशा व शागीर्दपेशाही मागोमाग गेला बाकीचे स्वार, प्यादे, भोई बाहेरच थांबले.

श्रीमंतांचीं स्वारी तुळशीबागेत कीर्तनाकरिता खास आली होती. रामजयंतीच्या आधी पाडव्यापासून रोज सायंकाळी रामापुढे कीर्तन व्हायचे. सरदार तुळशीबागवाल्यांच्या राम–उत्सवात स्वाभाविकच बडेबडे सरदार व खुद्द श्रीमंतही येत. सध्या उत्सव चालू होता. कीर्तनाची वेळ झाली होती आणि खुद्द श्रीमंत सवाई माधवरावसाहेबांची स्वारी कीर्तनाकरिता आली होती.

नारो अप्पाजी श्रीमंतांना घेऊन रामापुढच्या सभामंडपाकडे निघाले. श्रीमंतांच्या जायच्या यायच्या वाटेवर गालीचे अंथरले होते. पुढे जाऊन चोपदाराने ललकारी दिली. सर्व मंडळी उभी राहिली. श्रीमंत आले देवदर्शन करून ते सभामंडपाकडे वळले. त्यांच्याकरिता खास हिरव्या मखमलीची मसनद घातली होती. लोड लाल मखमलीचा होता व त्यावर जरतारी कशीदकाम केले होते. सर्वांचे अभिवादन स्वीकारून श्रीमंत बसले. सर्व मंडळी बसली. नारो अप्पाजी मात्र श्रीमंतांच्या पाठीमागच्या कमानीत उभेच राहिले. आणि ते स्वाभाविकच होते. नारो अप्पाजी आज 'यजमान' होते. तुळशीबागेचे मालकच ते–तुळशीबागवाले!

सभामंडप सभाजनांनी पूर्ण भरला होता. थोर थोर सरदार, सावकार व वेदान्ती, शास्त्री, पंडित बसले होते. कथेकरीबुवा तंबोऱ्याचे कान पिळीत होते व पखवाज्याची पखवाजाशी हातोड्याने ठोकाठोक चालली होती. लौकरच ही तंबोऱ्याची ताणाताणी व पखवाजाची ठोकाठोक संपली व बुवा कीर्तनास उभे राहिले. बुवांचं शरीर मोठं वजनदार होतं! सुरुवातीचे पद म्हणून बुवांनी पूर्वरंगास आरंभ केला.

सभागृहाच्या बाहेरील अंगास सर्वसामान्य नागरिकवर्गही बराच बसला होता. श्रोत्यांत मोठमोठे लोक होते. पुरंदरे होते, पेठे होते, रास्ते होते, फडणीस होते, खुद्द श्रीमंतही होते पण याहूनही काही श्रोतेमंडळी सरदार–दरकदाराच्या अधून–मधून

बसलेली दिसत होती. फारच मोठी होती ती! ह्या सद्‌गृहस्थांची वयं मात्र साता आठाच्या आतच होती. पण मोठे रसिक दिसत होते!

बुवांचा पूर्वरंग रंगू लागला मधेच एखादे पद म्हणताना 'वाहवा'! करण्यांच काम ही छोटी मंडळी मोठया आस्थापूर्वक करू लागली! हे त्यांच रसिकत्व पाहून बुवांच्या काळजात धस्स झालं. माकडाचं रसिकत्व होतं ते! वडीलधारी माणसं त्यांना दाबीत होती. भजनाच्या वेळीही ह्या पोरांनी मोठा थोरला ताल धरला. आणि तोही विसंगत! बुवांनी हातावर हात आपटून पोरांना तालावर आणण्याचा बराच प्रयत्न करून पाहिला. पण शेवटी भजनच थांबवावे लागले! बरं, मुलं पडली थोरामोठयांची. त्यांना रागावताही येईना.

वास्तविक त्या पोरांना कीर्तनाचं एवढं काही प्रेम नव्हतं. दिसतच होतं ते. बसल्या बसल्या हळूच खोड्या काढण्यात व वडीलधाऱ्या माणसांनी दाबलं तर हंडया किंवा झुंबरांचे लोलक मोजण्यातच ती सारी गर्क होती.

पूर्वरंगातलं तत्त्वज्ञान का त्यांना आवडणार? बुवांनी एखादी कोटी केली की, मंडळी हसत आणि पोरंही हसत. त्यांच्या दृष्टीने कीर्तन-पुराणासारख्या गोष्टी म्हणजे रिकामटेकड्यांचे उद्योग ! फक्त कीर्तनाच्या आणि पुराणाच्या श्रोतेमंडळींतच काय तो फरक! बाकी कीर्तन म्हणजे उभ्याने गप्पा आणि पुराण म्हणजे बसून गप्पा!

पूर्वरंग संपला. बुवांनी आख्यानाला सुरुवात केली. बुवा आख्यान अगदी रंगवून सोडीत होते. श्रोतेही रंगले होते. पोरांना मात्र त्यात काहीच चव नव्हती. ते संपतंय केव्हा ह्याचीच सारी वाट पाहत होती. शेवटी एकदाचं मूळपदावर येऊन कीर्तन संपलं व बुवांनी 'हेचि दान देगा देवा' म्हणत देवापुढे साष्टांग नमस्कार घातला. बुवांच्या टाचांना हात लावून श्रोतेमंडळी नमस्कार करू लागली. बुवांना मोठं बरं वाटत होतं! पुरंदरे, रास्ते, मेहेंदळे ह्यांच्यासारखी मातब्बर सरदार मंडळी आपल्या टाचांना हस्तस्पर्श करून नमस्कार करताहेत हे पाहून कोणत्या कथेकऱ्याला धन्यता वाटणार नाही? बुवा क्षणभर सुखसंवेदना अनुभवीत तसेच पडून राहिले! एवढ्यात जी पोरं मागे उभी होती त्यांतल्या एका चिरंजीवांच्या हृदयात भक्तीचा अकस्मात उमाळा आला! आणि चटकन पुढे होऊन त्याने बुवांचा तळपाय खाजविला! क्षणात लागण पसरली! स्वस्थपणे लोटांगण घालून पहुडलेले बुवा झटकन उठले! पोरं मिस्किलपणे खिदळत गर्दीत पसार झाली! बुवा अगदी अस्वस्थ होऊन गेले. रोजच जर असं होऊ लागलं तर? बरं, सांगावं कुणाला? आपलीच शोभा व्हायची! मुलंही थोरामोठयांची! आणि अजून सप्ताहातले सहा दिवस जायचेत! खुद्द पेशवे येतात कथेला. त्यांच्यादेखत ही कार्टी आपली आरती करतील एक दिवस! बुवा अगदी चिंताक्रांत होऊन गेले!

कीर्तन संपलं! श्रीमंत स्वारी व इतर मंडळी निघून गेली! बुवांचा मुक्काम नारो आप्पाजींकडेच होता. बोलता बोलता बुवांनी म्हटलंच,

''कस काय रंगलं कीर्तन?''

''बहुतच उत्तम! श्रीमंतांची तबियत खूष झाली!'' नारोपंतांनी मान डोलवीत म्हटले.

''ह्याहूनही रंगेल हो !'' बुवांनी कपाळाला आठ्या घालून म्हटले.

''मग अडचण कोठे!''

''ही मुलं येतात ना, तेवढी न आली तर!''

''त्यांचा काय त्रास?''

बुवा मनात म्हणाले, 'ते कसं सांगू?' नंतर मात्र म्हणाले, ''तसा त्रास म्हटला तर काही नाही. पण मधनंअधनं त्यांच्या चालणाऱ्या खोडकरपणामुळं मन द्विधा होतं!''

''बरं! उद्या पाहू ! नाहीतर बंदी करू मुलांना!''

बुवांच्या जिवात जीव आला! नारो आप्पाजींना मात्र बुवांनी मुलांची एवढी धास्ती का घेतली आहे हे समजेचना!

दुसरा दिवस उजाडला. दुपारपासूनच तुळशीबागेत कीर्तनाची तयारी सुरू झाली. तिन्हीसांजा झाल्या. सभामंडप मंडळीनी भरू लागला. श्रीमंतही आले. बुवा कीर्तनास उभे राहिले. त्यांनी चोहोबाजूंस सभामंडपात दृष्टी फिरविली. कालच्यापेक्षा चार-दोन पोरे जास्तच दिसत होती! कीर्तन सुरू झाले! बेताबेताने का होईना पण पोरांचा खट्याळपणा चालूच होता. कीर्तन संपले व बुवांनी नित्याप्रमाणे लोटांगण घातले, पण जरा भीतभीतच! त्यांनी खाली वाकायचा अवकाश, इतक्यात त्यांच्या तळपायाची खरवड सुरू

झाली. आता मात्र बुवा रागावून उभे राहिले. पण एकही पोर तेथे शिल्लक नव्हते! मंडळी निघून गेली. आणि बुवा नारो आप्पाजीबरोबर वाड्यात गेले. त्यांनी नारोपंतांना स्पष्टच सांगितले, ''उद्या जर पोरं येणार असतील तर कीर्तनाला मी काही तंबोरा हातांत धरणार नाही! भारी छळतात कार्टी!''

नारोपंतांना हे मोठे गूढ वाटे. पण उद्यापासून पोरांना आत सोडण्यास बंदी करतो असे त्यांनी बुवांना अभिवचन दिले दुसऱ्या दिवशी कीर्तनाची वेळ होताच ही सारी उपद्व्यापी पोरं तुळशीबागेकडे निघाली. फिदीफिदी हसत व गंमतजम्मत करीत एकेक जोडगोळया तुळशीबागेच्या दरवाजाशी आल्या व 'आजचा बेत' ठरवीत आत जाऊ लागल्या! तोच दारावर उभे केलेल्या दोन चोपदारांनी त्या पोरांना हटकले. मुले चकितच झाली!

''आत नाही जायचं?'' एका पोराने चोपदारास विचारले.

''नाही!'' उत्तर मिळाले आणि मिशावरून हात फिरले.

''ते का?''

''धनीसाहेबांनी सांगितलंय!''

''बराच दिसतो तुझा धनीसाहेब!''

–आणि एकदोन वीर नसलेल्या मिशांवर पीळ देत घुसलेच आतमध्ये! पण चोपदाराने त्यांना हात धरून बाहेर काढले. तेवढयात दुसरी काही आत पळू लागली. त्यांनाही चोपदारांनी धरून बाहेर सोडले. काही वेळ चोपदार आणि मुले यांच्यात जणू आटयापाटयांचा खेळ चालला होता! शेवटी मुलांना निराश होऊन दरवाजासमोर असलेल्या पारावर बसावं लागलं. आज कोणाचा वशिलाही चालेना!

श्रीमंतांची स्वारी आली आणि थोड्याच वेळात आतमध्ये कीर्तन सुरू झाल्याची चिन्हे दिसू लागली. पखवाजाची धाडधुड अन् झांजांची झिणझीण दरवाजाबाहेर पोरांना पारावर एकू येऊ लागली. पोरांनी ताडले, आज नक्कीच बुवांनी आपल्याबद्दल कलागत लावली पाहिजे!

बराच वेळ झाला. मुलं पारावर तशीच बसली होती. हसण्याखिदळण्यात मात्र खंड नव्हता. आता आपणास नक्कीच आत जावयास मिळत नाही असे पाहून त्यांनी घरोघर जाण्याचा विचार केला आणि आता निघणार एवढ्यात खासगीवाल्यांच्या वाड्याकडून मुलांना एक म्हातारबुवा येताना दिसले. त्यांचं वय खूपच होतं. धोतर, पांढराशुभ्र अंगरखा, पांढरेशुभ्र पागोटे, पांढरेशुभ्र उपरणे, हातात काठी व पायांत जोडा असा त्यांचा वेष होता. बहुधा ते तुळशीबागेतच निघालेले दिसत होते. आणि वळलेच दरवाजात! इतक्यात त्यांना काय वाटले कोणास ठाऊक, त्यांनी मागे वळून पारावर बसलेल्या मुलांकडे पाहिले आणि म्हणाले, ''का रे बाळांनो! बाहेर बसला? कथेला नाही यायचं का?''

''यायचंय ना! पण हे–हे–हे सोडत नाहीत ना आतमध्ये आम्हांला!'' चोपदारांकडे हात फिरवीत एक मुलगा म्हणाला.

त्या वृद्ध गृहस्थाने लगेच चोपदारास विचारले, ''का सोडीत नाही तुम्ही यांना?''

''धनीसाहेबांचा हुकूम आहे तसा!''

''एवढ्या मंडळींत मुलं जड वाटताहेत तुमच्या श्रीमंतांना?''

लगेच ते वृद्ध गृहस्थ दरवाजातूनच माघारे फिरले व मुलांकडे निघाले. आपल्याला प्रेम दाखविणारा असा माणूस येतोय असे पाहताच मुले त्यांच्याभोवती जमली.

''तुम्हाला कीर्तन ऐकायचं आहे ना?''

''हो!'' एका सुरात मुलं ओरडली.

''मग मी सांगतो ते कराल?''

''म्हणजे काय करायचं, आजोबा?''

''चला माझ्याबरोबर!''

मुलांना काय! काहीही करून कीर्तनाला जायला मिळालं म्हणजे झालं! आजोबांनी चला म्हणताच निघाली पोरं त्यांच्या मागोमाग. पोरंच ती!

आजोबा पुढे आणि मुले मागे. तुळशीबागेला वळसा घालून आजोबा काळ्या वावराकडे चालले. काळे वावर म्हणजे पुण्याचा दक्षिण भाग. मुलांना हे काहीच समजेना. तुळशीबाग राहिली मागे आणि आजोबा चालले भलतीकडे!

आजोबांनी आता तक पर्वतीचाच रस्ता धरला. तेव्हा मात्र मुलांच्यात चुळबुळ सुरू झाली. आजोबा मात्र काठी टेकीत पुढे पुढे चालले होते. एवढ्यात एका मुलाने आवंढा गिळीत मोठा धीर करून आजोबांच्या उपरण्याचे टोक किंचित खेचले. लगेच आजोबांनी वळून मागे पाहिले.

''अं-अं-नाही-आपलं-तुळशीबाग मागे राहिली म्हणून म्हटलं- !''

''तुम्हाला कीर्तन ऐकायचंय् ना?'' आजोबा चालता चालताच म्हणाले.

''हो!''

''मग चला माझ्याबरोबर!''

मुले पुन्हा मुकाट्याने मागोमाग चालू लागली. लवकरच आजोबा आणि मुले पर्वतीच्या उत्तर पायथ्याशी येऊन पोहोचली-

''तिथं चला!'' बांधकाम चालू असलेल्या एका इमारतीकडे बोट दाखवीत आजोबा बोलले.

मुले ताबडतोब त्या इमारतीकडे निघाली. आजोबाही बरोबर होतेच.

पेशव्यांच्या शिकारखान्याची इमारत होती ती. निम्यावर बांधकाम पूर्ण झाले होते. इमारतीचे सामान सर्वत्र पडले होते. तुळया, दगड, विटा, चुना यांचे ढीग लागले होते. सरकारी इमारतीचे बांधकाम, तिथे काय कमी? संध्याकाळ झाली असल्यामुळे सुतार, गवंडी, गडीमाणसे घरोघर निघून गेली होती. आता तेथे कोणीही नव्हते. पडलेल्या सामानाच्या अनेक ढिगाऱ्यांत दगडाच्या कपऱ्यांचेही एकदोन ढीग होते. इमारत बांधत असताना भिंतींत फट राहू नये ह्याकरिता ह्या कपऱ्या वापरीत.

आजोबा मुलांबरोबर त्या कपऱ्यांच्या ढिगाऱ्याजवळ येऊन उभे राहिले व म्हणाले, ''तुम्हाला कीर्तन ऐकावयाचे आहे ना? फेका ह्या कपऱ्या त्या ओढ्यात!''

कीर्तनाचा आणि कपऱ्यांचा संबंध काय ही शंका क्षणभरच मुलांच्या डोक्यात उद्‌भवली पण लगेच 'फेका' म्हटल्याबरोबरच त्यांनी भराभर साऱ्या कपऱ्या शेजारूनच वाहत असलेल्या आंबिलओढ्यात भिरकावून दिल्या. एक कपरी जाग्यावर ठेवली नाही त्यांनी! ढीग संपला! आता कीर्तन? ढीग संपताच आजोबा म्हणाले, ''आता चला घरी!''

मुकाट्याने मुलेही निघाली. कसलं आलंय कीर्तन अन् कसलं आलंय काय! बनवलं आजोबांनी! कीर्तन राहिलं तुळशीबागेत आणि आपण गेलो दगड फेकायला पर्वतीला! मुलं मनामध्ये असाच विचार करीत होती. पण आजोबा मात्र शांतपणे पुढे चालले होते.

सर्वजण पुन्हा तुळशीबागेपाशी येऊन पोहोचतात तो श्रीमंत पेशवे सरकारची स्वारी कीर्तनाहून परतताना दृष्टीस पडली!

''आजोबा, संपलं की हो कीर्तन!''

''होय बाळांनो! उद्या नक्की ऐकायला मिळेल तुम्हाला!''

आजोबा मोठे पडले! काय बोलायचे! मुलं मनातल्या मनात आजोबांच्या नावाने, कथेकरी बुवांच्या नावाने व चोपदारांच्या नावाने खडे फोडीत घरोघर गेली. आजोबाही घरी गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी पर्वतीच्या बागेतील शिकारखान्यावरचे गवंडी, सुतार वगैरे कामगार आले. देखरेख करणारा कारकूनही आला. ते पाहतात तो चार गाड्या कपऱ्यांच्या ढिगांपैकी एकही कपरी जाग्यावर नव्हती! कारकुनाला अत्यंत आश्चर्य वाटले! गेल्या कोठे एवढ्या कपऱ्या? त्याने ताबडतोब शनिवारच्या वाड्यात येऊन नाना फडणीसांस खबर दिली. नानांना सुद्धा फार आश्चर्य वाटले. अत्यंत काटेकोर कारभार पहाणारे नाना ह्या बातमीने किंचित बेचैन झाले. सरकारी इमारतीचे सामान जर राजधानीतून नाहीसे झाले तर दौलतीचा दबदबा तो काय राहिला? आज कपऱ्या गेल्या, उद्या दगड जातील, परवा तुळवटं जातील-एक दिवस राज्यही जाईल! छे! छे! ह्याचा तलास लागलाच पाहिजे! नानांनी कोतवालास बोलावून ही गोष्ट सांगितली व चोर पकडून देणाऱ्यास बक्षीस दिले जाईल अशी दवंडी पिटविण्याचा हुकूम केला.

लगेच कोतवालाने कपऱ्या चोरणारास जो पकडून देईल त्यास बक्षीस दिले जाईल अशी दवंडी पिटली.

दवंडी पिटून तास दीड तास झाला असेल नसेल येवढ्यात कालचे आजोबा कालच्याच वेषात शनिवार वाड्याच्या दिल्ली दरवाज्याजवळ येऊन उभे राहिले. मला नानांना भेटायचे आहे असे त्यांनी पहारेकऱ्यास सांगितले. पहारेकऱ्यांनी नानांची परवानगी मिळणार नाही असे म्हटले. पण 'कालचा कपऱ्या चोरणारा मीच! मला नानांना जातीनेच भेटायचं आहे!' असा त्यांनी आग्रह धरताच पहारेकऱ्याने नानांस वर्दी देऊन त्यांची परवानगी आणली व आजोबांस नानांपुढे नेले.

''तुम्ही कपऱ्या चोरल्या? आणि स्वत: होऊन हजर झाला?'' नानांना यात काहीतरी गूढ आहे असे वाटले.

''मी कपऱ्या चोरल्या नाहीत! नाहीशा केल्या!'' आजोबा बोलले.

''म्हणजे?'' नानांनी आश्चर्याने विचारले.

''श्रीमंतांच्या इमारतीकरिता तुळवटं गोळा केली होती, मोठमोठे दगड व विटा जमा केल्या होत्या-सगळं काही होतं! तशाच दगडाच्या लहान लहान कपऱ्याही जमा केल्या होत्या! म्हणजे दगड, विटा, तुळवटाप्रमाणे कपऱ्यांचीही जरूर आहे तर श्रीमंतांना? ''

''समजलं नाही आम्हाला आपण काय म्हणता ते!'' नाना म्हणाले.

''सरकारचे पदरी हरिपंत फडके आहेत! महादजीबाबा शिंदे आहेत! तुकोजी होळकर आहेत! रास्ते-पुरंदरे आहेत! खुद्द आपणही आहात म्हणून दौलत चालते. श्रीमंतांच्या दौलतीची इमारत आपणासारख्या कणखर तुळवटांवर व भरभक्कम चिऱ्यांवर उभारली आहे! पण दौलतीच्या पायात जनकोजी शिंदे, श्रीमंत विश्वासराव, खंडेराव होळकर ह्यांच्यासारख्या कितीतरी कपऱ्या करकचून बसल्या आहेत! कपऱ्यांनाही किंमत आहे! त्यांना डावलून चालणार नाही ! उद्याचे 'मोठे' तेच आहेत!''

''म्हणजे मुलाबाळांचा स्वराज्यात मोठा अपमान आढळला तुम्हाला? की आमच्याच हातून त्या बालदेवतांची हेळसांड झाली?''

आता मात्र आजोबांनी सारी हकिकत सांगून टाकली. नानांनी लगेच नारो आप्पाजींस विनंती करून मुलांस कीर्तनास सोडण्यास परवानगी देवविली!

बुवांच्या पुढे पुन्हा पेच उभा राहिला! पण नारो आप्पाजींनी बुवांना खोदूनच विचारले-

''बुवा! तुम्हांला मुलांचे का एवढे वावडे!''

''आहो! ही कार्टी माझा तळपाय खाजवितात! नाहीतर मला काय खाऊ का मागतात ती?'' बुवा खरं खरं बोलले.

''असं! असं! असं! असं! करतो बंदोबस्त त्याचा!'' हसत हसत नारोपंत म्हणाले.

संध्याकाळी कीर्तनास विजयी मुद्रेने सारी वानरसेना हजर होती! पण बुवांच्या पाठीमागे दोन आडदांड चोपदार कीर्तन संपेपर्यंत उभे होते!

## शब्दार्थ

**कपरी** दगडाची पातळ कपची **बहाद्दर** धैर्यवान, शूर, हुषार **शेला** पांघरण्याचे उंची वस्त्र **लवाजमा** डौल दिसण्यासारखे सामान,गाड्या, नोकर इत्यादि **गारदी** पहारेकरी **शागिर्दपेशा** राजघराण्यासंबंधाची घरगुती कामे करणारे खाते **प्यादे** पायदळातला शिपाई **भोई** पालखी, मेणा वगैरे खांद्यावर उचलून नेणारे **स्वार** घोडा, उंट यावर आरूढ झालेला मनुष्य **सरदार** मुख्य नायक **गालिचा** चित्रविचित्र रंगाच्या नक्षीचे लोकरीचे मोठे आसन **मसनद** गादी, तख्त **कशिदाकाम** कापडावर रेशमाने केलेले वेलबुट्टीचे काम, भरतकाम **अभिवादन** नमन, नमस्कार **यजमान** धनी, मालक, घरातला मुख्य पुरुष **आस्थापूर्वक** काळजीपूर्वक **विसंगत** असंबध्द, विजोड **कोटी** शब्दांवरील श्लेष **मातब्बर** श्रीमान, मोठा, सन्मान्य, श्रीमंत **द्विधा** डळमळीत, दोन प्रकारचे **कलागत** भांडण, तंटा **हेळसांड** अपमान, तिरस्कार, दुर्लक्ष **वशीला** वग, आधार **ताडणे** समजणे **तलास** तपास

## वाक्प्रचार

**लागण पसरणे** संसर्ग पसरणे, (रोग पसरणे)
**जीवात जीव येणे** सुटका होणे, काळजी मिटणे
**धास्ती घेणे** भय, भीती वाटणे

**एखाद्याच्या नांवाने खडे फोडणे** एखाद्याला दोष देणे, टीका करणे
**ललकारी ठोकणे** हाळी देणे, पुकारणे
**मूळ पदावर येणे** मूळ मुद्यावर येणे
**आरती करणे** शोभा करणे, फजित करणे
**दवंडी पिटवणे** एखाद्या बातमीची गावभर जाहिरात करणे
**काळजात धस्स होणे** अतिशय घाबरणे
**वावडे असणे** नावड असणे

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) कीर्तनकारबुवा कोणत्या मंदिरात कीर्तन करीत होते ?
(2) कीर्तनकार बुवांच्या काळजात धस्स का झाले ?
(3) कीर्तनकार बुवांना शेवटी आपले भजनच का थांबवावे लागले ?
(4) स्वस्थपणे लोटांगण घालून पहुडलेले बुवा झटकन का उठले ?
(5) कीर्तनकार बुवांचा मुक्काम कोणाकडे होता ?
(6) 'कपऱ्या' या कथेतील म्हातारबुबांचा वेष कसा होता ?
(7) 'कपऱ्या' या कथेतील कारकुनाला कोणत्या गोष्टीचे आश्चर्य वाटले ?
(8) नानांनी कोणती दंवडी पिटवली ?
(9) कीर्तनकार बुवांना मुलांचे एवढे वावडे का होते ?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) श्रीमंतांच्या पालखी सोबतच्या लवाजम्यात कोण कोण मंडळी होती ?
(2) कीर्तनाला आलेल्या श्रीमंत माधवरावांचे नारो अप्पाजींनी कसे स्वागत केले ?
(3) कीर्तनकारबुवा चिंताक्रांत का झाले ?
(4) नारोपंताना कुठल्या गोष्टीचे गूढ वाटले ?
(5) आजोबा मुलांना घेऊन कोठे गेले ?
(6) आजोबांनी मुलांना काय करायला सांगितले ?

**3. सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) कपऱ्यांना असणारे महत्त्व आजोबांनी कसे समजावून दिले ?
(2) कीर्तनात मुले कोणता खोडकरपणा करत होती ?

## भाषाभिव्यक्ती

'कपऱ्या ही एक ' ऐतिहासिक काळातील कथा आहे त्यामध्ये काही भाग इतिहासातील सत्याचा असतो तर काही भाग कल्पनेचा असतो. या दोघांच्या संयोगातून चांगली ऐतिहासिक कथा कशी निर्माण होते याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

पेशव्यांच्या काळातील वातावरण, श्रीमंतांची स्वारी येण्याचा प्रसंग, सभामंडपाचे वर्णन कीर्तनकारबुवांची कथा सादर करण्याची हातोटी साऱ्यांचे वर्णन अतिशय जिवंतपणे झाल्याने 250 वर्षांपूर्वीचा तो कालखंड डोळ्यापुढे उभा राहतो, हे लेखकाच्या निवेदन शैलीचे सामर्थ्य आहे.

कपऱ्या म्हणजे दगडाचे बारीक तुकडे. हे आकाराने लहान असले तरी एखाद्या इमारतीच्या बांधकामास ते गरजेचे ठरतात. मोठे वासे, चिरे, विटा यांच्याप्रमाणे कपऱ्यांनाही तेव्हढेच महत्त्व असते. या कथेतील आजोबांनी नाना फडणीसांना इमारत बुलंद आणि पक्की करणाऱ्या मोठ्या दगडांच्या मध्ये करकचून बसणाऱ्या आणि इमारतीला मजबुती देणाऱ्या कपऱ्यांचे महत्त्व पटवून दिले. आजची लहानमुले हीच उद्या आपले राज्य बळकट करणार आहेत हे कपऱ्यांच्या उदाहरणाने आजोबांनी दाखवून दिले. म्हणजेच राज्यकारभारात जसे मोठे सरदार, दरकदार महत्त्वाचे तसेच लहान सैनिकही त्यांचे महत्त्व डावलून चालणार नाही. ही शिकवण आजोबांनी प्रत्यक्ष नाना फडणीसांना दिली. आजोबांचा हा मुत्सदीपणा आणि चतुराई लेखकाने अचूक टिपलेली आहे.

●

# 6 दुपार

**म. म. देशपांडे**
**( जन्म : 1929 )**

मनोहर महादेव देशपांडे हे नागपूर येथे नोकरी करणारे मराठीतले नामवंत कवी होते. 'बनफूल' हा त्यांचा काव्यसंग्रह गाजला. अंतरिक्ष फिरलो पण हा त्यांच्या निवडक कवितांचा संग्रह द. भि. कुलकर्णी यांनी संपादित केला आहे. साध्या, सोप्या शब्दकळेतून उत्कट भावाभिव्यक्ती करणारी त्यांची कुशलता विशेष लक्षात घेण्यासारखी आहे.

प्रस्तुत कवितेत दुपारच्या काहीशा शांत, विश्रब्ध वातावरणाचे चित्रण आहे, आणि कवितेची शेवटची कलाटणी विलक्षण आहे.

---

पिते नीलिमा दुपार पिवळी:
आपल्याशीच हासते कळी.

सावळ्या छायते निजला पांथ;
पाऊलवाटाही स्तब्ध, विश्रांत.

पांढरा एकला फिरतो ढग
पाहत खालचे विश्रब्ध जग.

हातात हात गुंफून सावल्या
बसल्या बुंध्याशी दावीत वाकुल्या.

पक्ष्यांचे जोडपे पानांच्या आड:
फेकते खडा पोरगे द्वाड.

अशा ह्या दुपारी एखादी सून
चालली नदीला घेऊन धुणं!

### शब्दार्थ

**नीलिमा** निळा रंग **पांथ** प्रवासी, वाटसरु **स्तब्ध** स्थिर **विश्रांत** थकलेला **विश्रब्ध** दमलेला **द्वाड** खोडकर

### वाक्प्रचार

**वाकुल्या दाखविणे** चेष्टा करणे, वेडावणे

### स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) कवितेतील वर्णन कोणत्या वेळचे आहे ?

(2) कवितेतील सून काय करीत आहे ?

**2. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) कवीने दुपारचे केलेले वर्णन तुमच्या शब्दात लिहा.

(2) कवितेच्या माध्यमातून कवी काय सांगत आहे ?

**3. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :**

द्वाड = __________

विश्रांत = __________

स्तब्ध = __________

विश्रब्ध = __________

**भाषाभिव्यक्ती**

दिवसाच्या इतर प्रहरांपेक्षा दुपारची वेळ काहीशी सैलसर निवांत असते. उन्हाच्या काहिलीपासून पशु-पक्षी, माणसे आपला बचाव करु पाहतात. वृक्षाच्या छायेत वाटसरु विसावतात, पक्ष्यांची किलबिल थांबते, पाऊलवाटांवरही कोणी नसल्याने त्याही स्तब्ध होतात. जणू सगळे जगच विसाव्याच्या या क्षणांचे सुख अनुभवत असते.

पण अशा या वेळीही एखादी सून, कवीला नदीवर धुणं घेऊन जाताना दिसते. आणि या कवितेचा संपूर्ण आशयच निराळा होतो. कवी 'एखादी सून' अशा शब्दात तिचा उल्लेख करतो. या तिच्या 'स्थाना' मधून तिचे कष्ट, तिचे दु:ख कवीने किती साध्याच शब्दात वर्णन केले आहे.घरच्या सुनेला, सासुरवाशिणीला दुपारच्या भर उन्हाच्या झळा लागत असतानाही धुणं धुवून घेण्यासाठी नदीपर्यंत पायपीट करावी लागते. तिला विश्रांतीचे, आरामाचे क्षण मिळत नाहीत हे सत्य कवी 'सून' या शब्दामधून दाखवून देतो. भारतीय समाजामध्ये घरोघरी कष्टाचे डोंगर उपसणाऱ्या स्त्रियांचे प्रतीक असावे अशी ही 'एखादी सून' आहे.

•

# 7 मिळवती होताना

**इंदिरा संत**

**( जन्म : 1914 मृत्यू : 2000 )**

इंदिरा संत या मराठीतील सिद्धहस्त कवयित्री होत्या. त्यांचे मृगजळ, मेंदी, सहवास, शेला इत्यादि काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत.

प्रस्तुत लेख मृद्‌गंध या आत्मचरित्रात्मक संग्रहातून घेतला आहे. स्त्रीच्या मनाचे उत्कट आणि अनेक पदरी अनुभव व्यक्त करणारा हा लेख आहे. सुशिक्षित स्त्रीच्या भोवतीचे जग आज पूर्वीपेक्षा विस्तारलेले असले तरी त्यातही रूढी-परंपरा, जुन्या चालीरीती यांच्यामुळे संघर्षाचे क्षण कसे उभे राहतात आणि त्यामधून कसा मार्ग शोधला जातो याचे या लेखामध्ये वर्णन केले आहे.

पन्नास वर्षांपूर्वी सुशिक्षित आणि कमावत्या स्त्रीला घर आणि कार्यालय यांचा तोल सांभाळताना कशी तारेवरची कसरत करावी लागत होती याचे चित्रण या लेखामध्ये आहे.

---

शिक्षकाच्या व्यवसायात मी प्रथम पाऊल टाकले ते मुंबईत असतांना.'सायंटिफिक् अँड लिटररी एज्युकेशन सोसायटी' च्या ठाकूरद्वार येथील मुलींच्या शाळेत मला नोकरी मिळाली. ती शाळा, 'कमळाबाईंची शाळा' म्हणून प्रसिद्ध होती. स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार करणाऱ्या आणि प्रार्थना समाजाचे सदस्य असलेल्या श्री. वैद्यांच्या प्रयत्नाने ती स्थापन झाली होती. त्या वेळी श्रीमती पिरोज आनंदकर ह्या शाळेच्या प्रिन्सिपॉल म्हणून काम बघत असत. वैद्यांच्या पत्नी कमळाबाई मधूनमधून शाळेत फेरी मारून जात.

शाळा उघडण्याची तारीख जवळ आली तशी, घरची सगळी मंडळी सुखावली. ''वैनी आम्हाला खडू आणायचे हं,'' धाकट्या दिराने सांगून ठेवले. ''इंदिराला शाळेसाठी दोन चांगली पातळं घे लुगडी नकोत'' सासूबाईंनी आपल्या मुलाला बजावलं. इंजिनियर असलेल्या दिराने मला लहानशी पर्सही आणली आणि पटवून दिले,''वैनी पर्स ही हवीच. रेल्वे पास, पेन, पैसे, हातरुमाल यासाठी हवीच ना!''

सासरे मात्र काहीच बोलत नव्हते. घरची मुलगी नोकरीसाठी बाहेर जाणार, हे त्यांना आवडले नव्हते.

रेल्वेचा पास हे शब्द ऐकताच मी नोकरीच्या स्वप्नातून एकदम जमिनीवर आले. कमळाबाईंच्या शाळेत कामाला जायचे, एवढेच मनात घट्ट बसले होते. पण तिथपर्यंत जाण्याच्या रस्त्याचा एक धागाही मनाला स्पर्श करून गेला नव्हता. आता कसे होणार, हा प्रश्न अक्राळविक्राळपणे डोळ्यासमोर उभा राहिला. त्यावेळी दादरला कोहिनूर मिलमागील एका इमारतीत आम्ही राहत होतो. या प्रवासाची मला भीती वाटत होती. कारण मला अशा धावपळीची सवय नव्हती. दोन्ही बाजूंनी मासोळीसारख्या सुळसुळ सरकणाऱ्या मोटारींच्या मालिकेमधून रस्ता ओलांडणे माहीत नव्हते. पण सगळे जमले आणि शाळेसाठी जाऊ लागले. कसे शिकवायचे माहीत नव्हते, तरी आमच्या शाळेत मला सखदेवमास्तर, मुनशीमास्तर मराठी-इंग्रजी शिकवीत ते माहीत होते. त्या प्रमाणे खालच्या वर्गाला मी शिकवू लागले. नोकरीत पाऊल स्थिर होऊ लागले. पण घरातील पाऊल लटपटायला लागले.

लग्न झाल्यापासून जेव्हा आम्ही सगळे एकत्र राहायला लागलो तेव्हापासून, सकाळचा स्वयंपाक सासूबाईच करीत. मी केलेले ताकही चालत नसे. संध्याकाळचा स्वयंपाक मी करीत असे. संध्याकाळी त्यांना भात खायचा असेल तेव्हा मला आपणहून सांगत;

''इंदिरा, तांदूळ भाजून आज भात टाक.''

माझ्या हातचे त्यांना चालत नसे. पण त्यांनी तसे कधी बोलून दाखवले नाही. तेव्हा माझ्या नोकरीमुळे त्यांच्यावर कामाचा भार पडत होता, असे नव्हे. शाळेतून आल्यावर संध्याकाळी मला दमणे वगैरे काही माहीत नव्हते. चहा घेऊन लगेच मी स्वयंपाकाला सुरुवात करीत असे. तेव्हा दुपारच्या जेवणानंतरची आवराआवर, दुपारचा चहा, दळण वगैरे एवढेच त्यांना करावे लागे... पण आता त्यांची अशी समजूत झाली, की ही नोकरीवर जाते आणि घराचे सारे कष्ट आपल्याला उपसावे लागतात. सव्वानऊ-साडेनऊ पर्यंत जे जेवण तयार असेल ते मला चाले. पण तोपर्यंत त्या दमून गेल्यासारख्या दिसत, त्यांचा चेहरा लाल व्हायचा 'देवा, सोडव रे बाबा, या रगाड्यातून,' असे कधी नव्हे ते शब्द त्यांच्या तोंडून येऊ लागले. आणि माझ्याशी गमतीगमतीच्या गोष्टी करून हसवणाऱ्या ताई, मला 'अहो जाहो' करू लागल्या. अबोल झाल्या. शरीराचे कष्ट होतेच, पण मनाचे क्लेश त्यांना फार जाणवत होते. सुनेने नोकरीसाठी बाहेर पडणे हे वरवर त्यांना बरे वाटले तरी, हा विचार त्यांच्या मनाचा संस्कार स्वीकारत नव्हता. 'सून आली, पण ताईंचे कष्ट काही कमी होत नाहीत,' 'सुनेचा घरात कामाला हात लागत नाही,' 'सुनेची आपल्याला

संगतसोबत नाही,'' आपण या वयात एकटया पडलो' अशात्हेने दुसऱ्यांचे आणि स्वत:चे विचार त्यांना अस्वस्थ करीत असले पाहिजेत. आणि माझी नोकरी तर आत्यंतिक गरजेची नसली तरी, हवी तर होतीच. या विचाराविचारांच्या संघर्षात, त्या रागात राहू लागल्या.

''हे काम संध्याकाळी मी आल्यावर करीन. तुम्ही करू नका.'' असे म्हटले की तटकन. त्या म्हणत,

''मला काय धाड भरली ? मला काय दुसरा उद्योग आहे ?''

मी घरात असले तरी शेजारच्या सुनेला बोलावून सांगत,

''एवढी गवार मोडून देशील ? मला होईना बघ.''

आणि तीही माझ्याकडे बघत टोपली उचलायची. जातांना त्यांना सांगायची,

''पडा अंमळशा तुम्ही, ताई. मी आत्ता आणून देते.''

त्यांच्या मनाचे क्लेश मला समजत होते. पण मलाही उगाच चोरट्यासारखे वाटू लागले. एखादा गुन्हा तर केला नाही ना, अशा विचारने मीही अवघडून गेले. ह्यांच्यापाशी बोलून मन मोकळे करावे म्हटले तर दोन खोल्यांच्या आणि दोन गॅलरींच्या जागेत बोलायला तरी कुठे जमत होते ? शेवटी मी विचार केला. ह्यांनाही या गोष्टी समजतातच की. हे जर बोलत नाहीत, तर आपणही दुर्लक्ष करावे. आपल्याला जेवढे जमते तितके करावे आणि निश्चिंत राहावे. त्यांना बोलावेसे न वाटणे साहजिक आहे. आपणच जरूर तेव्हा बोलावे. पण एक खरे, या घरात आणि मिळवतीत एक अस्पष्ट असा दुरावा जो या नोकरीने निर्माण झाला तो पूर्णपणे कधी सांधला गेला नाही. माझ्या नोकरीच्या पूर्वी जे आमचे सासू-सुनेचे वागणे होते ते तितके जिव्हाळ्याचे पुढे राहिले नाही.अलिप्त असे राहिले.

नोकरीला एक महिना झाला आणि मला माझा पहिला पगार मिळाला. पाकिटातून पस्तीस रुपये. स्वत:च्या कमाईचा हा एक विलक्षण आनंद असतो. परसात कोथिंबीर, मिरच्यांचे वाफे करावे, खतपाणी करावे, त्या जोपासाव्या आणि कोवळ्या उन्हात त्या खुडून स्वयंपाकाला वापरण्यासाठी आणाव्यात, यात किती आनंद असतो ! हा एक सृजनाचा आनंद. जे कष्ट केले, काम केले, त्याचे हे फळ द्रव्याच्या रूपात मिळते, हा एकच फरक. माझ्या या आनंदात एक माझ्या स्वावलंबनाचाही आनंद होताच. एक वेगळेच स्वातंत्र्य त्यावेळी मनाला स्पर्शून गेले. घरी येताच मी पाकीट ह्यांच्या हातात दिले. रामुने ते बघताच तो माझेच हात ओढायला लागला,

''वैनी, आम्हाला फरसाण पाहिजे.''

माझ्या दिराने माझ्याकडे मागणी केली याचा इतका आनंद झाला ! मी चटकन पर्समधला रुपया काढून त्याला दिला. पाकिटातील तीस रुपये ह्यांनी वडिलांच्या हाती दिले. दोन रुपये पासासाठी आपण घेतले आणि तीन रुपये त्यांनी माझ्या हातात ठेवले.

''तिला काशासाठी ?'' वडिलांनी ह्यांनाच विचारले.

''लागतात. शाळेत चहाच्या वर्गणीसाठी आणि असावे जवळ थोडे...म्हणून.''

''शाळेत आणि चहा लागतो ? तो का ? सकाळी घेता. संध्याकाळी आल्यावर घेता. दुपारी परत...तीन तीनदा चहा लागतो तुम्हाला ? चहाला पैसे नाही घ्यायचे.''

इतकेच ते बोलले. पण त्याने मन पिळवटून आले. माझ्या हातातील पैसे मी खाली चटईवर ठेवले आणि न्हाणीघरात गेले. जे मनात कोंडून, दाटून आले होते, ते सगळे मोकळे झाल्यावर स्वच्छ तोंड वगैरे धुऊन बाहेर आले, मला आईची आठवण आली. पैसा तिचा होता, पण दळणाचा एक पैसा तिला काकांच्याकडे तीन-तीनदा मागितला तरी मिळत नसे. शेवटी तिने रागाने अडगळीतील जाते बाहेर काढले होते. आज माझ्यात आणि तिच्यात काहीही फरक पडलेला नव्हता. फक्त एका पिढीचा काय तो फरक !

ह्यांचाही मला राग आला. आईशी काही बोलले नाहीत, हे ठीक. पण माझा चहा ज्यांनी काढला त्यांना ह्यांनी माझ्या बाजूने दोन शब्द तरी बोलायला हवे होते आठ दिवस आम्ही आपण होऊन एकमेकांशी बोलत नव्हतो. हा माझा पहिल्या पगाराचा आनंद !

दुसऱ्या दिवशी शाळेत मी चहाची वर्गणी भरली नाही. चहा सोडून दिला. दुपारच्या सुट्टीत कसे कोंडून यायचे. सर्व शिक्षिका चहाघरात जायच्या. शिक्षकांच्या खोलीत मिस सेंजित तेवढ्या घरच्या चहाच्या किटलीची वाट बघत बसायच्या. तिथे बसू नये म्हणून मी गच्चीत जाऊन मुंबईची धुरकट माथी बघत राहायची. मुलींच्या बरोबर एक-दोन शब्द करायची.

''मिसेस संत,'' हाक आली तशी मी मागे वळून पाहिले. मिस सेंजित आपली छोटी किटली आणि कप घेऊन माझ्यापाशी येत होत्या. माझ्याप्रमाणे त्याही नवीनच होत्या. त्यामुळे आमचे जमले होते. मोठ्या प्रेमळ होत्या. किटली गच्चीच्या कठड्यावर ठेवून मला म्हणाल्या,

''तुम्ही अलीकडे चहा घेत नाही. बरं नाही का ? आणि चेहरा असा का दिसतो तुमचा ? घरात काही बिनसलंय काय ?''

त्यांनी हे सहज विचारले. पण पोटात ढवळावे तसे माझे मन ढवळून आले. खरे म्हणजे माझे मन घट्ट आहे. पण आज आवरले नाही ओंजळीत तोंड झाकून मी त्यांना सर्व सांगितले. हे बोलले नाहीत, हेही सांगितले. पैसे टाकून दिले, हेही सांगितले. असे काही सांगू नये, हा विचारच मनाला शिवला नाही. आणि शेवटी म्हटले,

''म्हणून मी चहा सोडला. घेणार नाहीं.''

आता वाटते: एरवी मी हे गृहछिद्र कुणाला सांगितले नसते. काही तरी सांगून, हसून हा विषय बंद केला असता. पण आज असे कसे बोलून गेले असेन ? माझ्यातील मिळवतीच्या कोवळ्या अस्मितेने तर हा निषेध नोंदवला नसेल ? तिनेच असे स्पष्ट बोलण्याची ताकद मला दिली नसेल ?

त्या कपात चहा ओतत म्हणाल्या,

''मिसेस संत, तुम्हाला सासरे बोलले आणि नवरा गप्प बसला. आमच्याकडे भावजया बोलतात आणि भाऊ गप्प बसतात. हेच बघा, मी येताना वैनीला 'दोन कप चहा पाठव' म्हणून सांगून आले होते. हा बघा एकच कप चहा. आणि मी माझे पैसे हिच्याजवळ देते. जग हे असंच. आपण लक्ष द्यायचं नाही.''

त्या दिवशी एक कप चहा आम्ही दोघींनी घेतला. मग मात्र चहा न घेताच शिक्षकाच्या दालनात त्यांच्याशी बोलत बसत असे. मी चहा सोडला. मात्र घरी हे ह्यांना देखील सांगितले नाही. सांगावेसे वाटलेच नाही.

काही महिन्यांनी मी ती नोकरी सोडली. कारण ज्या शाळेत हे काम करत होते, त्याच संस्थेचे मुलींचे हायस्कूल दादरला निघाले होते. त्या संस्थेने मला शाळेवर घेतले होते. पण मिळवतीचा असा हा माझा पहिला अनुभव. आतल्या पावलाला उंबऱ्याची ठेच लागली आणि बाहेरचे पाऊल आपल्या क्षेत्रात रमताना दुखावले.

### शब्दार्थ

**पुरस्कार** बक्षीस, सन्मान **पुरस्कर्ता** उत्तेजन, देणारा **क्लेश** त्रास **अंमळशा** किंचित **दुरावा** दूर देशी भोगावे लागणारे कष्ट, अंतर **विलक्षण** असामान्य **परस** घरामागचे आवार, खुली जागा **जोपासणे** संगोपन करणे, संरक्षण **अडगळ** निरुपयोगी अडचण करणाऱ्या वस्तू **निषेध** नकार, मनाई, बंदी **गृहछिद्र** घरातील दोष

### वाक्प्रचार

**जमिनीवर येणे** वास्तवाचे भान होणे

**पाऊल स्थिर होणे** स्थिरता येणे

**संघर्ष करणे** कठिण परिस्थितीशी सामना करणे

**पाऊल लटपटणे** आत्मविश्वास ढळणे

**कष्ट उपसणे** खूप कष्ट करणे

**घरकामाला हात लागणे** घरकामात मदत होणे

**चोरट्या सारखे वाटणे** संकोच वाटणे

**अवघडून जाणे** अडचणीत सापडणे

**मन मोकळे करणे** मनातले बोलणे

**मन पिळवटणे** दु:ख होणे

**मन घट्ट असणे** विचार पक्का असणे

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) लेखिकेला मुंबईत प्रथम पाऊल टाकताच कोणत्या शाळेत नोकरी मिळाली ?

(2) सायंटिफिक अँड लिटररी एज्युकेशन सोसायटी ह्या शाळेच्या प्रिन्सिपाल कोण होत्या ?

(3) इंदिराबाईंच्या सासूबाईंनी मुलाला काय बजावले ?

(4) धाकट्या दिराने वहिनीजवळ कसली मागणी केली ?

(5) पगार होताच रामुने वैनी जवळ काय मागितले ?

(6) कांही महिन्यांनी लेखिकेने नोकरी का सोडली ?

**2. खालील प्रश्नांची दोन तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) इंजिनियर असलेल्या दिराने वहिनीसाठी काय आणले ? का ?

(2) लेखिकेला प्रवासाची भीती का वाटत होती ?

(3) कोणते विचार सासूबाईंना अस्वस्थ करीत असले पाहिजेत असे लेखिकेला वाटते ?

(4) इंदिराबाईंना मिळालेल्या पहिल्या पगाराची वाटणी कशी झाली ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) इंदिराबाईंनी मधल्या सुटीतला चहा का सोडला ?

(2) इंदिराबाईंना आपल्या आईची आठवण का आली ?

(3) मिस सेंजित यांच्याही घरची परिस्थिती कशी होती ?

## भाषाभिव्यक्ती

इंदिरा संत यांच्या या लेखामधून नात्यांचे वेगवेगळे कंगोरे त्यांनी कसे चित्रित केले आहेत हे पाहण्यासारखे आहे. सासू-सुनेचे नाते हे असेच आगळे वेगळे नाते आहे, लहान सहान घटना, बोलणे किंवा कृती यांच्यामधून लेखिका आणि त्यांच्या सासूबाई यांच्यातील नात्याचा ताण व्यक्त होतो. सून मिळवती झाल्यानंतरची सासूबाईंच्या मनातली अढी त्यांच्या वागण्या बोलण्यातून दिसून आली तरी त्याबद्दल तक्रार करण्यास कुठे वाव नसतो. ही स्त्रीची घुसमट लेखिकेने येथे सांगितली आहे. मानवी व्यक्तिमत्त्वांचे चित्रण करतांना त्यांना समजून घेत लेखिका त्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेतांना दिसते.

इंदिराबाईंच्या कविते प्रमाणेच गद्यलेखनामध्येही साध्या शब्दकळेतून आपला अनुभव मांडण्याचे त्यांचे कौशल्य दिसून येते.

•

# 8 एका नव्या यज्ञाचा उपासक

**डॉ. द. ता. भोसले**

(**जन्म** : 1935)

डॉ. द. ता. भोसले प्रसिद्ध मराठी लेखक आहेत. त्यांची डोंगरदिवे, बालमुठीतील दिवस, गाडगेबाबा-जीवन आणि कार्य, ग्रामीण बोलीचा शब्दकोष वगैरे त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. चावडीवरचा दिवा, संस्कृतिच्या पाऊलखुणा ही गाजलेली पुस्तके आहेत.

प्रस्तुत पाठ 'छात्रप्रबोधन' या मासिकातून घेतला आहे. या लेखात लेखकाने श्री गाडगेबाबा यांचे व्यक्तीचित्र सुंदर रेखाटले आहे. गाडगेबाबा हे असे संत मानले जातात, ज्यांनी प्रत्यक्ष कृती करुन जीवनात स्वच्छेतेचे महत्त्व पटवून दिले आहे. आपल्या देशात सरकारने स्वच्छता मोहिम जाहीर केली आहे. याचा अर्थ प्रत्येक नागरिकाने स्वच्छतेचे काम केले पाहिजे. यामुळे देश आपोआप स्वच्छ होईल. जगामध्ये देशाची प्रतिमा उजळून निघेल.

गाडगेबाबांचे नाव डेबूजी होते, पण ते उभ्या महाराष्ट्राचे संत गाडगेबाबा झाले.

---

उपासना हा आपल्या संस्कृतीचा एक अविभाज्य घटक आहे. आपल्या संस्कृतीने निसर्गोपासना, यज्ञोपासना देवोपासना आणि देहोपासना यांना आपल्या जडणघडणीत अनन्यसाधारण स्थान दिलेले आपणास दिसते.

श्री गाडगेबाबांनीसुद्धा एका यज्ञाचा प्रारंभ केला. त्याचे नाव आहे स्वच्छतायज्ञ! माणसाच्या जगण्यासाठी अनिवार्य असणारे जल, हवा, भूमी, आणि अन्न याची शुद्धता राखणारा हा यज्ञ होता. शिवाय हा यज्ञ आहे कोणताही धार्मिक विधी नसलेला. कर्मकांडात्मक उपचार नसलेला! दीपांची आरास, पोथ्यांची रास अन् याज्ञिकांची मिरास नसलेला हा निष्काम भावनेने केलेला यज्ञ आहे. या यज्ञाचे साधन भिन्न. या यज्ञाचे साध्यही भिन्न. या यज्ञाचे फल स्वार्थमूलक नाही. याचा हेतू लौकिक सुखप्राप्ती हाही नाही. म्हणूनच त्याला 'नवा यज्ञप्रयोग' असे म्हटलेले आहे.

पोटात भडकलेली भुकेची आग; माथ्यावर कर्ज अन् अंत:करणात नानाविध काळज्यांचा कल्लोळ हिंदकळत असेल; तर तो माणूस स्वच्छपणे देवाचे नामस्मरण करू शकणार नाही, याची प्रखर जाणीव गाडगेबाबांना झाली होती आणि म्हणूनच सामान्य माणसांचे लौकिक जीवन सुस्थिर व सुखी करण्यासाठी, ते निकोप करण्यासाठी गाडगेबाबांनी जे अनेक उपाय नव्याने सुरू केले, त्यातील महत्त्वाचा उपाय म्हणजे हा 'स्वच्छतायज्ञ' होय.

श्री गाडगेबाबांनी सुरू केलेला हा स्वच्छतायज्ञ सर्वस्वी नवीन होता. अनोखा होता अन् निरपेक्ष असा होता. या यज्ञात कुणालाही भाग घेता येत होता. यासाठी कसलीही पूर्वतयारी करावी लागत नव्हती; किंवा धार्मिक स्वरूपाचे ज्ञानही आवश्यक नव्हते. मंदिराचीही गरज नव्हती. या देशात धार्मिक क्षेत्रातील मठाधीशांनी आणि महाराजांनी जागोजागी मंदिरे आणि अन्नछत्रे बांधली; पण हीच मंदिरे आणि अन्नछत्रे स्वच्छ करण्यासाठी कुणी आपल्या हातात खराटा घेतल्याचे ऐकले नाही, कुणी वाचले नाही. गाडगेबाबांनी प्रथमत: हे करून दाखविले. त्यांनी मंदिराची अंगणे स्वच्छ केली. अन्नछत्रांची पटांगणे स्वच्छ केली. विखुरलेल्या उष्टया पत्रावळी गोळा करून ती जागा स्वच्छ केली. गाई-गुरांचे गोठे त्यांनी स्वच्छ केले. दयाबुद्धीने कुणी भाकरी दिली तरच ते घेत. कुणी काही दिले नाही तर पाणी पिऊन ते आपली भूक भागवीत असत! असे उदाहरण फार क्वचित पाहावयास मिळते.

या संदर्भात कै. गो. नी. दांडेकरांनी एक मजेशीर आठवण दिली आहे. विदर्भात पूर्णा नदीच्या काठी ऋणमोचन नावाचे एक तीर्थक्षेत्र आहे. या ऋणमोचनाच्या यात्रेवेळी परिसरातल्या शेकडो बैलगाड्या व हजारो भाविक शंकराच्या दर्शनाला येत; त्यामुळे सारा परिसर घाणीने माखून जाई. यात्रा संपायच्या आधीपासूनच गाडगेबाबा तेथे येत नि आपल्या 'यज्ञाला' प्रारंभ करीत. मग वैरणीचे बुडखे; अर्धवट चावून टाकलेला चारा, बैलांचे शेण, चुलीची राख, टाकून दिलेले अन्न; भाजीपाल्याची टरफले आणि देंठ, माणसांची विष्ठा आणि थुंकीतील घाण यांनी लदबदलेला सारा परिसर या टोकापासून तो त्या टोकापर्यंत गाडगेबाबा आपल्या खराट्याने झाडून अगदी स्वच्छ करून टाकत.

गाडगेबाबांनी केवळ ऋणमोचनचा परिसरच स्वच्छ केला असे नाही; त्यांनी अवघा महाराष्ट्र स्वच्छ केला. नाशिक, पंढरपूर, आळंदी यांसारखी घाणीने माखलेली सारी तीर्थक्षेत्रे त्यांनी स्वच्छ केली. एवढेच नव्हे तर ज्या पेठेत ज्या गावात ज्या मंदिरासमोर त्यांचे कीर्तन असे, तिथला सारा परिसर आधी ते स्वच्छ करीत आणि मगच रात्री ते कीर्तनासाठी उभे राहात.

त्यांचा हा स्वच्छतेचा यज्ञ सन 1905 पासून सन 1956 पर्यंत म्हणजे त्यांच्या निर्वाणापर्यंत अव्याहत सुरू होता. हे आणखी एक नवल म्हणावे लागेल. पन्नास वर्षे एखादा माणूस एका पैची अपेक्षा न करता; कुणी न सांगता वा पोटाचा उद्योग म्हणून न करता, निरपेक्ष भावनेने अन् ईश्वराची सेवा करावी या वृत्तीने सारा महाराष्ट्र स्वच्छ करतो, ही बाबच अपवादात्मक म्हणावी लागेल.

हा स्वच्छतेचा मंत्र गाडगेबाबांनी कुठल्या ग्रंथातून घेतला नव्हता. कुठल्या गुरूने शिकविला नव्हता. कुठल्या आश्रमातून आणला नव्हता अथवा घराण्याच्या वैभवशाली परंपरेनेही त्यांना तो दिलेला नव्हता. ग्रंथातून घ्यावा म्हटले तर ते अक्षरशत्रू होते. ज्या वयात शाळेला जायचे त्या वयात परीट समाजात जन्मलेल्या एका बापाविना अनाथ पोराला मामांकडे जनावरे राखावी लागली होती. शेतीत राबावे लागले होते. दारूच्या व्यसनामुळे ज्याने घरदार-जमीन आणि पैसा-अडका सावकाराच्या घशांत घातलेला होता; अशा झिंगराजी परटाचा डेबूजी नामक अनाथ पोरगा म्हणजे नंतरच्या काळातले गाडगेबाबा; बैलांच्या शेपट्या मोडणाऱ्या अशा पोरक्या पोराला कुठला गुरू भेटणार !

समाजातील स्वार्थ आणि भ्रष्टाचार पाहून संसारातून त्यांचे मन उडाले. तो त्यांना निरर्थक वाटू लागला. संसार हा माणसाला बद्ध करतो; जखडून टाकतो. त्याच्यावर बंधने लादतो, याची त्यांना तीव्र जाणीव झाली.

जीवनाचे अंतिम साध्य प्राप्त करण्यासाठी मग या डेबूजीने एका अंधाऱ्या रात्री घरातील सर्वांना डोळाभर बघितले नि अंगावरच्या कपड्यांसह तृप्त संसाराचा त्याग केला. गौतमबुद्धाने जसा गृहत्याग केला; तसाच डेबूजीने गृहत्याग केला आणि उपेक्षितांच्या, अनाथांच्या सेवेसाठी अवघे आयुष्य वेचले. तत्पूर्वी त्यांनी बारा वर्षे भ्रमंती केली. सारा देश निरखून घेतला. स्वत:च स्वत:वर बंधने घातली. स्वत:च्या गरजा कमी केल्या. चिंध्यांचा अंगरखा, कमरेला अपरे धोतर, डोक्यावर पाणी पिण्यासाठी फुटके गाडगे, गळयात एकतारी, हातात काठी, कानात कवडी आणि पायाला झाडांची पाने अशा वेषात स्वत: आपल्या इच्छा-आकांक्षा यांना पराभूत करीत इतरांना सुखी करण्यासाठी या माणसाने आयुष्यभर अंगावर दु:ख झेलले. या डेबूजीने स्वत:चा संसार पायाखाली तुडविला आणि गरिबांचे संसार सावरले.

तुकाराम महाराजांच्या शब्दांत,

***'जे का रंजले गांजले !***
***त्यासी म्हणे जो आपुले !***
***तोचि साधू ओळखावा !***
***देव तेथेचि जाणावा !'***

या वृत्तीने त्यांनी तळागाळातल्या उपेक्षित माणसाच्या ठायी ईश्वराचे रूप पाहिले आणि निरपेक्ष सेवा करीत त्यांची पूजा बांधली. या उपेक्षितांच्या जीवनाला त्यांनी आधार दिला. आकार दिला. त्यांचे जीवन उन्नत केले. स्वच्छ केले, माणुसकीची ज्योत त्यांच्या मनात तेवत ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ही ज्योतही शुद्ध राहावी यासाठी वसा घेतला. त्याचे एक रूप म्हणजे त्यांनी अंगीकारलेला स्वच्छतायज्ञाचा अनोखा प्रयोग होय.

हा स्वच्छतामंत्र त्याला 'जगण्याने ' शिकविला होता. त्याच्या जीवनाचा तो एक अंगभूत धर्म झाला होता. माणसाचे मन स्वच्छ असेल, तर त्याचे जीवन स्वच्छ होते. ज्याचे जीवन स्वच्छ असते, त्याची कृती स्वच्छ असते. ज्याची कृती स्वच्छ असते; त्याच्या शब्दाला पावित्र्य लाभते. ज्याचा शब्द स्वच्छ असतो; त्याचा समाजमनावर परिणाम होतो. तो आपोआपच समाजमन स्वच्छ करतो आणि समाजमन स्वच्छ करणारा माणूस जणू ईश्वरोपासनेलाच स्वच्छ रूप देत असतो. त्याच्या दृष्टीने हीच खरी ईश्वरपूजा असते. हीच भावना त्याच्या समाजसेवेचा आपोआप विस्तार करीत असते. गाडगेबाबांनी या स्वच्छता अभियानाचा असाच विस्तार केला होता.

स्वच्छतेचे हे अनोखे अभियान गाडगेबाबांनी पुढील काळात विस्तारून टाकले. साधारणत: दोन दशकांनंतर गाडगेबाबांनी निष्काम सेवेचा ईश्वरी प्रसाद या भावनेतून घाण करणाऱ्या लोकांच्या मनातच आमूलाग्र परिवर्तन केले. या अडाणी लोकांना आधी स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले व नंतर त्यांनाच या कार्यात सहभागी करून घेतले. त्यामुळे या सफाईकार्याला अनेकांचा हात लाभला.

आधीच्या काळात बाबांचा एक खराटा रस्त्यावर फिरत होता; मग त्यांच्याबरोबर शेकडो खराटे रस्त्यावर नाचू लागले. त्यातून सफाई-सेवकांची एक सेवाभावी फौजच तयार झाली. गाडगेबाबांनी स्वच्छता- यागाचा विस्तार करतांना ही क्रांती घडविली होती. अडाणी माणसांची मनेही संस्कारित आणि स्वच्छ केली होती.

या अभियानाचा विस्तार करतांना त्यांनी केलेली दुसरी गोष्ट म्हणजे, त्यांनी आपल्या साऱ्याकुटुंबीयांना या यज्ञात सामावून घेतले. घराकडे पाठ फिरवून भ्रमंती करीत असलेल्या डेबूजीची (त्यावेळी ते गाडगेबाबा म्हणून ज्ञात नव्हते. ) ऋणमोचनच्या यात्रेत त्यांच्या कुटुंबीयांनी भेट घेतली आणि स्वगृही परत येण्याचा आग्रह केला. त्याला त्यांनी नकार दिला. ''मग आम्हा सर्वांचे नि तुझ्या लेकराबाळांचे कसे होणार ? ती कशी जगणार ?'' असा प्रश्न आईने विचारल्यावर डेबूजीने उत्तर दिले, ''मी जसा कष्ट करून जगतो तसे जगा अन् माझ्याबरोबर यायचे असेल तर झाडलोट करावी लागेल. मजूर म्हणून बांधकामावर काम करावे लागेल. झोपडीत राहावे लागेल. समाजसेवा करावी लागेल. ओल्या-सुक्या भाकरीवर भूक भागवावी लागेल.'' अशी अट घातली आणि त्या माऊलीने त्यास मान्यता दिली. आपल्याबरोबर साऱ्या कुटुंबीयांना या स्वच्छतायज्ञात नि सेवाकार्यात त्यांनी सामील करून घेतले ही सुद्धा खरोखर असाधारण गोष्ट म्हणावी लागेल.

व्यक्तीचे उन्नयन आणि समाजाची प्रगती यांचा विचार करता गाडगेबाबांनी या स्वच्छता मोहिमेच्या माध्यमातून केलेली तिसरी गोष्ट म्हणजे त्यांनी श्रमाला दिलेली प्रतिष्ठा ! त्यांनी या स्वच्छतायज्ञातून श्रमप्रतिष्ठेचा एक मूल्यसंस्कार केला. म. गांधींनी स्वच्छतेला 'परमेश्वर' म्हटले. गाडगेबाबांनी स्वच्छतेला परमेश्वराची सेवा मानली; म्हणजे गाडगेबाबांनी श्रम आणि सेवा यांचा मिलाफ केला. श्रमगंगा आणि ज्ञानगंगा यांचा मेळ घातला. शारीर-श्रमाचा तिरस्कार करण्याच्या आजच्या काळात त्यांनी श्रमपूजा, श्रमसेवा आणि श्रमसंस्कार यातून आत्मिक विकास आणि सामाजिक प्रगती होऊ शकते हे दाखवून दिले. श्रमातून स्वावलंबन, स्वावलंबनातून स्वाभिमान, स्वाभिमानातून स्व-उद्धार आणि त्यातून ग्रामोद्धार नि समाजोद्धार होत असतो, हेच बाबांनी समाजाला दाखवून दिले.

'आपला हात हे एक सुंदर महाकाव्य आहे. तो उगारण्यासाठी नसून उभारण्यासाठी आहे. तो घाण करण्यासाठी नसून घाण काढण्यासाठी आहे.' हे त्यांनी स्वतःच्या आचरणाने सिद्ध करून दाखविले.

गाडगेबाबांच्या हातातला खराटा हे क्षुद्र साधन नव्हते, तो मोठा अलंकार होता. ते मोठे शस्त्र होते. बाबांचा हा खराटा माणसाला नम्रता शिकविणारा, भूमीशी सायुज्ज साधणारा, संपत्तीला आमंत्रण देणारा आणि आनंद नि आरोग्य देणारा असा खराटा होता. म्हणून साने गुरुजी एकदा म्हणाले, ''**लेखणीच्या लालित्यापेक्षा मला बाबांच्या झाडूचे लालित्यच अधिक प्रिय आहे ! तेच अधिक श्रेष्ठ वाटते !** ''

## शब्दार्थ

**अनन्यसाधारण** असामान्य, असाधारण **उपचार** विधी **आरास** सजावट **रास** ढीग **मिरास** अधिकार **लौकिक** लोकांमधील, सामाजिक **प्रखर** तीव्र **निकोप** चांगले **अनोखा** वेगळा **विखुरलेल्या** पसरलेल्या **लदबदलेला** खराब झालेला **निर्वाण** मृत्यू **अव्याहत** न थांबणारा **नवल** आश्चर्य **अवघे** संपूर्ण **अपरे** छोटे **रंजले-गांजले** दु:खी होणे, त्रासणे **तळागाळातले** समाजातील उपेक्षित वर्ग **ठायी** ठिकाणी **उन्नत** चांगले **अंगभूत** जोडलेला **आमूलाग्र परिवर्तन** संपूर्ण बदल **उन्नयन** जीवन उंचावणे

## वाक्प्रचार

**भ्रमंती करणे** फिरणे **निरखून घेणे** बारकाईने निरीक्षण करणे **वसा घेणे** व्रत घेणे **अंगीकारणे** स्वीकारणे **घशात घालणे** जबरदस्तीने बळकाविणे **सायुज्ज साधणे** संबंधीत असणे **मिरास नसणे** महत्त्व नसणे

## शब्दसमूहसाठी एक शब्द

**अविभाज्य** विभागता न येणारे
**स्वच्छतायज्ञ** स्वच्छतेसाठी केलेले सतत काम
**मठाधीश** मठाचे प्रमुख अधिकारी
**अव्याहत** न थांबणारा
**अक्षरशत्रू** अक्षरओळख नसलेला, अशिक्षित
**उपेक्षित** समाजाने ज्यांची अवहेलना केली असे
**सेवाभावी** सेवा करणे हीच भावना असणारे
**कर्मकांड** धार्मिक क्रिया करण्याच्या पद्धतिला अधिक महत्त्व देणे

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) आपल्या संस्कृतीने उपासनेचे कोणकोणते प्रकार सांगितले आहेत ?
(2) गाडगेबाबांनी कोणत्या यज्ञाचा प्रारंभ केला ? का ?
(3) गाडगेबाबा स्वच्छता करतांना आपले जीवन कसे जगत ?
(4) गाडगेबाबांच्या स्वच्छता यज्ञाचा परिणाम काय झाला ?
(5) गाडगेबाबांचा कीर्तन करण्यापूर्वीचा कोणता नियम होता ?
(6) गाडगेबाबांचा स्वच्छतामंत्र कोणता होता ?
(7) गाडगेबाबांचे लहानपणी जीवन कसे होते ?
(8) गाडगेबाबांनी सफाईकार्यात कोणाला सामावून घेतले ?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) स्वच्छतायज्ञाचे वैशिष्टय समजवा.
(2) गाडगेबाबांचा वेश कसा होता ?
(3) श्रमामुळे कोणकोणत्या गोष्टींची प्राप्ती होते ?
(4) गाडगेबाबा स्वच्छतेला 'ईश्वरोपासना' का मनातात ?
(5) गाडगेबाबांनी ऋणमोचन तीर्थक्षेत्रात कोणते महत्त्वाचे काम केले ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) गाडगेबाबांनी स्वच्छता मोहिमेतून कोणकोणत्या गोष्टी साध्य केल्या ?
(2) गाडगेबाबांच्या हातातील खराटयाचे वैशिष्टय समजवा.
(3) गाडगेबाबांच्या स्वच्छतामंत्राचा जीवनाशी कसे संबंध आहे ?
(4) गाडगेबाबांचे व्यक्तिचित्र रेखाटा.

**4. खालील विधान ससंदर्भ समजवा.**

'मी जसा कष्ट करुन जगतो तसे जगा.'

**5. खालील प्रश्नांची योग्य पर्याय शोधून उत्तरे लिहा :**

(1) उपासना कशाचा अविभाज्य घटक आहे ?
(अ) धर्माचा (ब) संस्कृतीचा (क) मनाचा (ड) समाजाचा
(2) गाडगेबाबांनी कोणत्या यज्ञाचा प्रारंभ केला ?
(अ) ज्ञानयज्ञ (ब) कर्मयज्ञ (क) धर्मयज्ञ (ड) स्वच्छतायज्ञ
(3) विदर्भात पूर्णा नदीच्या काठी कोणते तीर्थक्षेत्र आहे ?
(अ) ऋणमोचन (ब) कष्टभंजन (क) वैजनाथ (ड) नागनाथ
(4) गाडगेबाबांची खरे नाव काय होते ?
(अ) डेबूजी (ब) दामाजी (क) बाबूजी (ड) दाजी
(5) डेबूजीने किती वर्ष भ्रमंती केली ?
(अ) आठ (ब) पाच (क) बारा (ड) दहा

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- ''गाडगेबाबांचे कार्य'' याविषयी माहिती मिळवा आणि वाचा.
- 'स्वच्छतेचे जीवनातील स्थान' या विषयावर निबंध लिहा.

•

# 9 माणूस माझे नाव

**मुरलीधर देवीदास आमटे**

**( जन्म :** 1914 **मृत्यू :** 2008 **)**

'मुरलीधर देवीदास आमटे ' हे बाबा आमटे या नावानेच ते सर्वांना परिचित आहेत. त्यांचे बालपण समृद्ध श्रीमंत अशा कुटुंबात गेले. त्यांच्या कुटुंबाने त्यांना बाहेरच्या जगातील दु:खापासून दूर ठेवण्याचा खूप प्रयत्न केला. पण ती बंधन झुगारुन गरीब कुष्ठरोग्यांची सेवा आणि पुनर्वसन या महान कार्याला त्यांनी आपले जीवन समर्पित केले. त्यांनी हजारो पीडितांची आयुष्ये बदलून अर्थपूर्ण केली. ज्या काळात कुष्ठरोगा विषयी समाजात घृणेची भावना होती. त्या काळात गडचिरोली जिल्हयात माडिया गौड आदिवासी जमातीसाठी त्यांनी लोकबिरादरी प्रकल्प उभारला.

त्यांच्या समाज कार्याचा प्रचंड आवाका पाहिला की ''महामानव'' हे त्यांच्यासाठीचे संबोधन सार्थ असल्याचे पटते. त्यांना ''मॅगसेसे'' चा पुरस्कार देऊनही गौरविले आहे.

''माणूस माझे नाव'' ही कविता आजच्या तरूण पिढीला प्रेरणा देणारी आहे.

---

माणूस माझे नाव, माणूस माझे नाव
दहा दिशांच्या रिंगणात या पुढे माझी धाव....

बिंदुमात्र मी क्षुद्र खरोखर
परी जिंकले सातहि सागर
उंच गाठला गौरीशंकर
अग्नियान मम घेत चालले आकाशाचा ठाव......माणूस

मीच इथे ओसाडीवरती
नांगर धरूनी दुबळ्या हाती
कणकण ही जागवली माती
दुर्भिक्ष्याच्या छाताडावर हसत घातला घाव.... माणूस

ही शेते अन् ही सुखसदने
घुमते यातून माझे गाणे
रोज आळवित नवे तराणे
मी दैन्याच्या विरुद्ध करतो क्षणक्षण नवा उठाव....माणूस

सुखेच माझी मला बोचती
साहसास मम सीमा नसती
नवीन क्षितिजे सदा खुणवती
दूर दाट निबिडात मांडला पुन्हा नवा मी डाव....माणूस

**शब्दार्थ**

**रिंगण** गोलाकार फिरणे (लहान मुलाचे रांगणे) **क्षुद्र** क्षुल्लक, लहान, हलके **मम** माझे **ओसाड** निर्जन, उजाड **दुबळा** अशक्त, दुर्बल **दुर्भिक्ष्य** दुष्काळ **सुखसदन** आनंदाचे घर, आनंदी घर, **घुमणे** प्रतिध्वनि निघणे **आळविणे** गोड शब्दांनी प्रसन्न करणे **तराणे** विशिष्ट प्रकारचे गीत **निबिड** घनदाट, गर्द

### वाक्‌प्रचार

**डाव मांडणे** नवीन खेळ सुरु करणे **ठाव घेणे** अजमास घेणे, थांगपत्ता

### स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) माणूस हे आपल नाव असेल तर आपल्याला काय शक्य आहे ?

(2) कवी बिंदुमात्र असा क्षुद्र असूनही त्याने काय जिंकले आहे ?

(3) कवी बाबा आमटे यांनी दुबळ्या हातांना हाती धरून कोणते कार्य केले ?

(4) कवी कशाच्या विरुद्ध क्षणक्षण नवा उठाव करतो आहे ?

(5) मला काय बोचते आहे, असे कवी म्हणतो ?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) 'माणूस माझे नाव' या कवितेतील मध्यवर्ती कल्पना तुमच्या शब्दात मांडा.

(2) बाबा आमटे यांनी कणाकणाने माती कशी जागवली ?

(3) ''सुखेच माझी मला बोचती'' असे बाबा आमटे का म्हणतात ?

### विद्यार्थी-प्रवृत्ती

- आनंदवन सोमनाथ हेमलकसा या स्थळांना भेट द्या
- साधनाताई आमटे यांचे 'समिधा' पुस्तक वाचा
- डॉ. प्रकाश आमटे याचे 'प्रकाशवाटा' पुस्तक वाचा

### भाषाभिव्यक्ती

''ज्वाला आणि फुलें'' या पुस्तकातून ''माणूस माझे नाव'' हे काव्य घेतले आहे. हे काव्य 'आनंदवनात' नित्य चालीवर म्हटले जाते.

''असाध्य ते साध्य करिता सायास'' या उक्तीप्रमाणे बाबांचा देखील, चिकाटीचे प्रयत्न आणि भरपूर परिश्रम यावर विश्वास होता.

अगदी बिंदुमात्र असलेला माणूस या दोहोंच्या आधाराने सप्तसागरही पार करु शकतो. आणि गौरी शंकर सारखे शिखर ही गाठू शकतो. त्यामुळे प्रयत्न आणि परिश्रमांच्या जोरावर त्यांनी कुष्ठरोग्यां सारख्या उपेक्षित रुग्णांनाही हाताशी धरून आत्मनिर्भर केले स्वावलंबी बनविले त्यांच्या परिश्रमाने मातीतून मोती पिकवून त्यांना जगण्याची नवी उमेद दिली. तर असे बाबा दुर्मिक्ष्याच्या छाताडावर हसत हसत घाव घालून घट्ट पाय रोवून उभे राहू शकतात.

बाबांना सुखसदनात पहूडण्यापेक्षा दैन्याच्या विरूद्ध दंड थोपटून ताठ उभे राहणे अधिक आवडते, कारण त्यांना सदैव पराक्रमाची नवी क्षितिजे नेहमीच खुणावित असतात, आणि म्हणूनच आनंदवन सोमनाथ हेमलकसा या सारखे मोठे प्रकल्प ते सहज उभारु शकतात.

'माणूस माझे नाव' या काव्यात बाबा आमटे यांना स्वत:च्या कर्तुत्त्वाचा आलेख मांडायचा नाही तर तरूणांना संदेश द्यायचा आहे. ही आजच्या पिठीतील नवतरूणांच्या मनातील ऊर्मी समर्थपणे जागवणारी कविता आहे.

•

# 10 मारुतराया

**व्यंकटेश माडगूळकर**

**( जन्म :** 1927 **मृत्यू :** 2001)

व्यंकटेश दिगंबर माडगूळकर मराठीतील प्रसिद्ध ग्रामीण लेखक, चित्रपट कथालेखक, चित्रकार म्हणूनही गाजले. 'तू वेडा कुंभार', 'सती ही नाटके', 'बनगरवाडी', 'वावटळ', या कादंबऱ्या, 'पुढच पाऊल', 'सांगते ऐका', या चित्रपटांच्या कथा व 'गावाकडल्या गोष्टी', 'काळी आई', 'जांभळाचे दिवस', हे कथासंग्रह असे माडगूळकरांचे प्रसिद्ध साहित्य आहे. 'माणदेशी माणसे', हा त्यांच्या शब्दचित्रांचा संग्रह खूप गाजला. ग्रामीण जीवनातील दारिद्रय, दु:ख इ. ची भेदक जाणीव माडगूळकरांच्या साहित्यात दिसते.

मारुतराया ही कथा 'गावाकडच्या गोष्टी', या कथा संग्रहातून घेण्यात आली आहे. प्रस्तुत कथेत एक वानर गावात प्रवेश करतो आणि धुमाकूळ घालतो, गावातील लोक वानराशी कसे वागतात आणि शेवटी वानराचा 'मारुतराया' कसा होतो. त्याचे अतिशय खुमासदार आणि मजेशीर वर्णन केले आहे. या कथेतील ग्रामीण माणसे ज्या तेऱ्हेने वागतात त्या प्रकारे शहरातील माणसे वागणार नाहीत. त्याचे विशिष्ट रीतीने साऱ्या प्रसंगातले वागणे कथेचे बलस्थान आहे.

---

जून महिन्यातल्या ओल्या सकाळी गावात एक भला मोठा वानर आला. एकटाच. त्याचा गोतावळा त्याच्या माग नव्हता. आमच्या भागात हा प्राणी आगदीच विरळा. त्यामुळंच सर्वांच्या कौतुकाचा, आदराचा. जवळजवळ दहा-बारा वर्षांनी तो गावात दिसला. कुठून आला आणि कसा आला, कोण जाणे ! पण आला, तो शेपटीची चवरी मिरवीत गावमारूतीच्या देवळात शिरला. गाभाऱ्यात गेला आणि घटकाभरानं बाहेर येऊन शिखरावर बसला. लांब शेपटी हलवीत उनाला बसला.

हा विलक्षण प्रकार पांडू गुरवाच्या बायकोनं बघितला आणि पोरगी काखेला मारून ती बाहेर पडली. घोडं चारायला गेलेल्या नवऱ्याला ही हकीकत सांगणं अगदी जरूर होतं. कारण मारूती गावात आला होता. देवळात जाऊन आला होता !

देवळाजवळ असलेल्या शाळेत येण्यासाठी गावातली गुलाम पोरं पाटीदप्तरं हलवीत आली आणि शाळेच्या पायरीवर येऊन बसली. कारण शाळा अद्याप उघडलीच नव्हती. मास्तरांचा चहा अद्याप व्हायचा होता.

तारेवर चिमण्या बसाव्यात, तशी ती पोरं पायरीवर दाटीवाटीनं बसली आणि आपल्या मिचमिच्या डोळयांनी नव्या सूर्याचा चमकदार प्रकाश बघू लागली, तेव्हा मारुतीच्या शिखरावर बसलेला तो नवखा प्राणी त्यांनी पाहिला. आनंद, आश्चर्य आणि भीती यांमुळं त्यांची मनं उडू लागली.

मग मुसलमानाचं धीट पोर पुढं झालं आणि आपलं नकटं नाक खाजवीत ओरडलं,

'अरं, वांडर, वांडर हूप, तुझ्या शेंडीला शेरभर तूप!'

त्याची री सर्वांनीच ओढली, तेव्हा वानर आपलं काळं तोंड विचकून पोरांना भिवडवू लागला. जागच्या जागी नाचू लागला.

मग मुसलमानाच्या पोरानं धोंडा उचलला आणि नेमानं त्याच्या पाठीत बकावला. त्यासरशी वानर हातभर उडाला. वेदनेनं कळवळलाय चीं चीं ओरडत पळाला आणि पिंपळाच्या शेंड्यावर जाऊन पानांत दडला. पोरं खाली जमा झाली, तेव्हा त्यांना दम देऊ लागला. त्यामुळं पोरं जास्तीच चेवली आणि भराभर धोंडे फेकू लागली. पण वानर फार उंच होता. धोंड्याची फेक त्याच्यापर्यंत पोचेचना. हे त्या धूर्त प्राण्याच्या ध्यानात आलं. पिंपळाची कोवळी पानं खात तो आरामात बसला.

दरम्यान ही बातमी पांडू गुरवाला मिळाली होती. तो घाईघाईनं घरी आला आणि टोपल्यातली कोरभर भाकरी घेऊन पिंपळाखाली गेला. धपाटे घालून त्यानं पोरं हुसकून लावली. आरडाओरडा केला,

'कुठं फेडाल, रं, हे पाप? बाराघरची बारा जमून आलाया आन् मारुतरायाला धोडं घालत बसला. त्यानं काय केलंय् रं तुमचं ? '

गुरवानं धुडकावली, तेव्हा ती चांबट पोरं गुरवाला शिव्या घालीत पळाली.

हातातला भाकरीचा तुकडा वर करून पांडू वानराला बोलावू लागला,

'या, या! हनुमंता, हे घ्या!'

पण वानर पालेच खात बसला. त्यानं गुरवाकडं बघितलं नाही.

रानात जाता जाता ही मजा बघत उभ्या राहिलेल्या आबानानांनी गुरुवाला वेड्यात काढलं. हनुवटीला झोले देत म्हटलं,

'लेका, पांड्या, आज वार कोणता?'

'शनवार, नाना !'

'मग भाकरी कशी घेणार रं, तो मारुतराया?'

'मग?'

'अरं, फराळाबिराळाचं काय आण, गाढवा!'

नाना वारकरी होते. मोठे भाविक होते. गावातली चार मंडळी जमवून ते भजन करीत. भजनाचा टाळ, मृदंग, इत्यादी सारा सराजम त्यांच्या घरी होता. रामजन्म, मारुतिजन्म, असले समारंभ ते मोठ्या हौसेनं करीत. म्हाताऱ्याच्या शब्दाला गावात चांगला मान होता!

नानांचं हे बोलणं गुरवाला पटलं धांदलीनं घरी जाऊन तो मूठभर शेंगदाणे घेऊन आला. ते दाखवून वानराला विनवू लागला,

'देवा, या! हे घ्या, खाली उतरा!'

पण वानर नुसताच डेकावून खाली पाही. पांढऱ्या पापण्यांची चमत्कारिक उघडझाप करी. आपल्या काळ्या, लांबसडक बोटांनी काखेत खाजवी आणि कोवळा पाला ओरबाडून खाई.

वानर बघेना, तेव्हा गुरव नानांना बोलला,

'नाना, माझ्या पाप्याच्या हातचा फराळ घेणं त्याला पसंत नाही. तुम्ही बघा'

तेव्हा नाना पुढं झाले आणि शेंगदाणे हाती घेऊन विनवू लागले,

'देवा, मी तुमचा दासानुदास आहे. माझा निवद घ्या. म्हाताऱ्याची सत्त्वपरीक्षा घेऊ नका!'

नानांनी नाना परीनं विनवलं, पोथीत ऐकलेल्या संबोधनांनी हाका घातल्या, तेव्हा वानर खाली उतरू लागला.

आतापर्यंत बरेच गावकरी गोळा झाले होते. मारूती खाली उतरू लागला, तशी त्यांची मनं अधीर झाली.

वानर बुंध्याशी आला. पिंपळाच्या बेचक्यात बसला. नाना जवळ गेले आणि त्यांनी हात वर केला. वानरं पुढं वाकला, नानांशी भिडला. आपल्या काळ्या पंज्यांनी त्यानं म्हाताऱ्याचा हात धरला. गमतीदारपणं इकडेतिकडे बघितलं.

नाना म्हणाले,

'घ्या. घ्या आता. अनमान का ?'

मग एकाएकी वानरानं तोंड पुढं केलं आणि मक्याचं कणीस दातरावं, तसा नानांचा हात दातरला, कांडरला आणि शेपूट उडवीत तो पुन्हा झाडाच्या शेंड्याशी गेला.

त्या चाव्यानं नाना कळवळले झीट येऊन खाली बसले लोक धावले म्हाताऱ्याला अल्लाद उचलून आणून त्यांनी घरात झोपवलं आणि हातावर गावठी उपचार केले.

बापाचा हात फोडलेला बघताच थोरला पोरगा कळवळला. पेरणीच्या कामी म्हातारा निकामी झाला, आता रोजगारी गडी बघणं आलं, या विचारानं फार हळहळला.

मग गावातले लोक कुजबुजले, की नानांचा आपल्या सुनेशी संबंध आहे, हे खरं असलं पाहिजे. त्याशिवाय वानरानं त्यांना फोडलं नसतं ! आणि त्यानंतर मारुतीला शेंगदाणे द्यायला कुणीच तयार होईना. कुणीच धजेना. विषाची परीक्षा बघा कुणी ? पण गावात आलेला देव उपाशी ठेवावा कसा ? गुरवाच्या मनाला ही गोष्ट पटली नाही. आपल्या आठ वर्षांच्या मुलीला शेंगदाणे देऊन तो वानराला म्हणाला,

'देवा, दे लेकरू अस्त्राप हाय. ह्याच्या हातचं तरी घ्या ! '

ती अजाण पोर हातात शेंगदाणे घेऊन उभी राहिली, तेव्हा वानर पुन्हा खाली आला आणि पोरीची पोटरी फोडून गेला ! सोनाराच्या लिंबावर जाऊन बसला. गुरवाच्या बायकोनं ऊर बडवून घेतलं आणि वानराच्या नावानं बोटं मोडली. तालुक्याच्या दवाखान्यात दाखवण्यासाठी पोर पाठीशी टाकून गुरव निघून गेला.

वानर कुणाच्याच हातचं खाईना, तेव्हा सर्वांना मोठी पंचाईत पडली. पानाच्या चंच्या सोडून, घोळक्या घोळक्यानं उभं राहिल्या राहिल्या त्यांच्या चर्चा चालू झाल्या.

दरम्यान सोनाराच्या लिंबावरून वानर लव्हाराच्या जांभळीवर गेला. तेव्हा खाली बघून मुकाट मोट ठोकणारा लव्हार तोंडातला तंबाकूचा गुळणा टाकून उठला आणि बायकोला म्हणाला,

'थोड्या शेंगा दे, ग. वानर आलाय आपल्या दारात ! '

'येडं का काय ? मरू दे त्यो वानर आपलं काम बघा. '

'अग, दारात आलाया आपणहून त्याला काय तरी दिलं पाहिजेल ! '

बायकोची वाट न बघता बयत्याच्या आलेल्या शेंगांतल्या ओंजळभर काढून तो बाहेर आला आणि वानराला दाखवून बोलावू लागला. आजूबाजूस कुणी नाही, हे पाहून वानर खाली आला आणि लव्हाराचं तंगडं चाबलून धूम पळाला. गावातला एक लव्हार जायबंदी झाला. आता शेतकीची अवजारं बनवणार कोण ?

त्या लठ्ठ वानरानं सकाळपासून तिसरा प्रहरपर्यंत असा धुमाकूळ घातला. पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणं ते दिसेल त्या माणसावर दात चालवू लागलं, तेव्हा नानांचा थोरला पोरगा अधिक खवळला. बचकेसारखे धोंडे हाती घेऊन जांभळीखाली आला. रागानं वानराला म्हणाला,

'राया, तू फार डाळ नासलीस! '

आणि नेम धरून त्यानं धोंडा भिर्कावला. हिकमतीनं एका अंगाला होऊन वानरानं तो चुकवला आणि दात विचकीत तो नानांच्या मोठ्या मुलावर धावून आला. दुसरा धोंडा उचलून पोरगाही हुशार राहिला. तेव्हा वानर चारी पायांवर अल्लाद उड्या घेत अण्णा जरगाच्या मळयात घुसला.

हातात धोंडा घेऊन नानांचा पोरगा त्याच्यामागं काळासारखा लागला. त्याचा आवेश बघून गावातली आणखी काही तरणीबांड पोरं त्याच्याबरोबर धावली. काठ्या. धोंडे घेऊन धावली.

दोन-चार मैल ताणपट्टा काढल्यावर वानर थकला. अंगावर आलेले धोंडे चुकवण्यात त्याच्याकडून कुचराई होऊ लागली आणि मग दहा-बारा धोंड्यांत तो खाली पडला. पडला, तसा पोरांनी गराडा घालून त्याला मधे घेतला. आता आपण वाचत नाही, हे जाणून तो शहाणा प्राणी केविलवाणे हातवारे करून आपल्याभोवतीच फिरू लागला. तेव्हा वाण्याचा सदा हात आवरून नानांच्या पोराला म्हणाला,

'अरं, अरं, तो हात जोडतोय् पाया पडतोय् 'मला मारू नका ' म्हणतोय् '

पण नानांच्या पोराला क्रोध आवरला नाही. आवेशानं पुढं होऊन त्यानं वानराला काठ्या घातल्या. बाकीच्या पोरांनी निर्दयपणं त्याला धोंडाळला. नाकातोंडाला रक्ताचे बुडबुडे येऊन, हातपाय झाडून वानर मेला, निश्चेष्ट पडला, तेव्हा त्याचे दोन्ही पंजे एकमेकांत गुंतले होते आणि केसांचं शिप्तर असलेलं त्याचं डोकं मातीत भरलं होतं.

ती त्याची दशा बघून नानांच्या पोराला कणव आली. तो विचार करून बोलला,

'पोरांनू, एक जण हतं राहा. आमी जाऊन टाळ-मृदंग घेऊन येतो. मारुतीला वाजतगाजत माती देऊ ! '

त्याचा आवाज विलक्षण मऊ आला होता.

मेल्या वानराकडे दयाळूपणानं पाहत सदा बोलला,

'गरीब आपल्या हातनं मेला, वाईट गोष्ट झाली ! '

मग सर्वांच्या सांगण्यावरून तो गिधाडं वारायला तिथं राहिला आणि पोरं गावात आली.

वानर मारल्याची हकीगत लोकांना कळली, तेव्हा त्यांनी हात जोडले आणि गावात घडलेल्या या अपराधाबद्दल क्षमा कर, अशी मारुतीला विनवणी केली.

भजनी मंडळीसहित पोरं रानात गेली. रामनामाचा गजर करीत त्यांनी मोठ्या मानसन्मानानं वानराला ओढ्यात आणला आणि माणसासारखा जाळला !

नानांच्या जिवाला ही गोष्ट फार लागली. दुखण्यातून बरे झाल्यावर त्यांनी ज्या जागी वानराला मारला, त्या जागी एक दगडी चौथरा बांधला.

आता भाविक लोक जाता येता त्याच्या पाया पडतात !

## शब्दार्थ

**गोतावळा** सगेसोयरे **विरळा** वेगळा, कमी, सापडणीस **उनाला बसणे** उन खात वसणे **चवरी** टोक **बकावला** मारला **चेवणे** राग येणे **धोंडे** दगड **धूर्त** चाणाक्ष, लबाड **कोरभर भाक** भाकरीचा तुकडा **चांबट** विचित्र **उंडग्या** वाईट, बेकार **धांदलीने** गडबडीने, गोंधळाने **ओरबाडणे** ओढणे, बोचकारणे **अधीर** चंचल, उत्सूक **दातरणे** चावणे **कांडरला** फोडणे **झीट** बेशुद्ध **न बघणे** न जुमानणे **अल्लाद** हळूवार **गावठी** ग्रामीण **अस्त्राप** निष्पाप **लव्हार** लोहार **तरणीबांड** तरुण **निश्चेष्ट** अचल **कणव** दया **चौथरा** चौकोनी उंच ओटा **सराजम** साहित्य

## वाक्प्रचार

**धपाटे घालणे** मार देणे **हुसकून लावणे** पळवून लावणे **शब्दाला मान देणे** आदर **ऊर बडविणे** दु:खाने छाती बडवून घेणे **डाळ नासवणे** धुमाकुळ घालणे **री ओढणे** दुसऱ्या प्रमाणेच बोलणे **हात जोडणे** शरण जाणे **विनवणी करणे** प्रार्थना करणे, विनंती करणे **हातपाय हलविणे** मेहनत करणे **उनाला बसणे** ऊन खात बसणे **तोंड विचकणे** तोंड वाकडे करून चिडविणे **कुजबुजणे** हकू आवाजात बोलणे **कुचराई करणे** कामाची टाळाटाळ करणे

## टीपा

**चवरी :** चामर, वनगाईच्या केसांच्या झुबक्यास मूठ बसवून केलले साधन देव अथवा राजा यांच्या मानार्थी चवरी हलवली जाते.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) वानर गावात येऊन कोठे बसला होता ?

(2) वानराला बघून मुसलमानाचं पोर काय ओरडला ?

(3) नानांनी वानराला कसे विनवले ?

(4) नानांनी चौथरा का व कोठे बांधला ?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) शाळेतल्या मुलांनी वानराला पहाण्याचे शब्दचित्र लिहा.

(2) गावात वानर आल्याची बातमी कळताच पांडू गुरवाने प्रथम कोणती कृती केली ?

(3) नानांचा मुलगा वानराच्या मागे का लागला ?

(4) वानराला बघून लोहार काय बोलला ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) शाळेतील मुलांनी वानराला कसा प्रतिसाद दिला ?

(2) गावातल्या लोंकानी वानराचा वध कशा रीतीने केला ?

(3) वानराने गावात कसा धूमाकूळ घातला होता ?

**4. पुढील शब्दांसाठी कथेतून शोधून ग्रामीण शब्द लिहा :**

| | | | |
|---|---|---|---|
| **वेगळा** | ________ | **लोहार** | ________ |
| **नवीन** | ________ | **ग्रामीण** | ________ |
| **चावट** | ________ | **अपमान** | ________ |
| **शनिवार** | ________ | **दया** | ________ |
| **पाय** | ________ | **घेराव** | ________ |

**विद्यार्थी - प्रवृत्ती**

- व्यंकटेश माडगूळकरांच्या कथा मिळवून वाचा.
- ग्रामीण कथांचा संग्रह तयार करा.

**शिक्षक- प्रवृत्ती**

- विद्यार्थीना ग्रामीण व शहरी जीवना विषयी काही प्रसंग सांगा.
- पाळीव प्राणी व हिंसक प्राण्यांनविषयी माहिती सांगा.

### भाषाभिव्यक्ती

व्यंकटेश माडंगूळकरांचा जन्म माणदेशातला लेखनाइतकेच त्यांचे चित्रकलेवंरही प्रभुत्व होते. त्यामुळेच त्यांच्या लेखनातही हीच चित्रदर्शी शैली दिसते खेड्यातील जीवनाची नेमकी नस त्यांनी त्यांच्या लेखनातून दर्शवलेली आहे. खेड्यातील जीवन, तेथील माणसांचे परस्परसंबंध, शेतीशी जोडलेले आयुष्य यामधून मानवी मनाचे वेगवेगळे पदर त्यांनी उलगडून दाखवलेले आहेत उदा. नानांचा हात वानराने फोडला तो प्रसंग पाहा. त्यामधले ''पेरणीच्या कामी म्हातारा निकामी झाला. आता रोजगारी गडी बघणं आलं या विचारानं फार हळहळला.'' असे नानाच्या मुलाबद्दल लेखक म्हणतात, माणसाच्या मनाची व्यावहारिक बाजू अशात्ऱ्हेने त्यांनी मांडली आहे. बापाच्या मायेबरोबरच पुढे येणाऱ्या खर्चामुळे चिंतातुर होणाऱ्या शेतकऱ्याच्या मुलाचे हे अस्सल चित्रण आहे. माडगूळकरांच्या लेखणीचे हे वैशिष्टय आहे की खेड्यातील नातेसंबंधांची गुंफण ते अतिशय सूक्ष्मपणे आणि प्रभावीपणे ते आपल्या लेखनात करतात.

ही कथा वाचल्यानंतर भारतीय लोकांच्या मनात असणाऱ्या अंधश्रद्धेकडे त्यांनी निर्देश केलेला आहे हे लक्षात येते. ज्या वानराच्या उपदव्यामुळे हैरान होऊन गावकऱ्यांनी त्याला मारले त्यालाच 'मारूतराया' म्हणून त्याची खेडेगावातील लोक कशी पूजा करतात, या घटनांमधील विसंगती लेखकाने सांगितली आहे.

माडगूळकरांच्या भाषेचे सामर्थ्य तुम्हाला या कथेमधून लक्षात येईल झाडावर बसलेला वानर हळूहळू उतरत नानांकडे कसा येतो याचे वर्णन वाचले तर तो प्रसंग प्रत्यक्ष डोळ्यापुढे उभा राहतो नाना, गावातील मुले, नानांचा मुलगा यांच्या संवादांमधून या व्यक्तिरेखा माडगूळकर यांनी जिवंत केल्या आहेत.

●

# 11 क्रांतिकारकांची वज्रमूठ

**मधुसूदन कालेलकर**
**( जन्म : 1924 मृत्यू : 1985 )**

मराठीतले लोकप्रिय नाटककार त्यांनी 'दिवा जळू दे सारी रात', 'चांदणे शिंपीत जा', 'ही श्रींची इच्छा', 'दिल्या घरी तू सुखी रहा', 'तो राजहंस एक', अशा अनेक नाटकांचे लेखन केले. थोरले माधवराव पेशवे, बालगंधर्व यांचा शोध आपल्या नाटकांतून त्यांनी घेण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या नाटकांमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनावर आधारित 'सागरा प्राण तळमळला' हे नाटक फार महत्त्वपूर्ण आहे. त्यात सावरकरांच्या कणखर आणि सतत संघर्ष करणाऱ्या देशभक्त व्यक्तिमत्त्वाचा शोध घेतांना त्यांच्या अंतरंगामध्ये प्रवेश केलेला आहे.

याच नाटकातील हा एक प्रवेश आहे त्यामधून सावरकरांच्या स्वभावाचे अनेक पैलू लक्षात येतील त्यांची देशभक्ती किती प्रखर होती, ते तर यामध्ये समजतेच पण त्याचबरोबर त्यांचे जीवितकार्य कोणते होते तेही लक्षात येते.

क्रांतिकारकांचे कार्य फारच दुष्कर, कठीण असते पण ते त्यांनी स्वत:हून स्वीकारलेला असते. त्यामुळे कोणत्याही संकटाला, अत्याचारांना ते घाबरत नाहीत. म्हणूनच क्रांतिकारक संख्येने मूठभर असले तरी त्यांचा निर्धार वज्रासारखा मजबूत असतो.

---

[अंदमान येथील तुरुंगाच्या आवारातील जेलर बारीचं ऑफीस. कोपऱ्यात एक खुर्ची-टेबल व काही फाईल्स आहेत. भिंतीवर बंदुका, हातकड्या, कोलू, दंडाबेडी वगैरे वस्तू लटकवलेल्या आहेत. वेळ सकाळची. हातांपायांत बेड्या अडकवलेल्या सावरकरांना दोन वॉर्डर आत आणतात.]

**सावरकर** : ही माझी कोठी ?

**अधिकारी** : नाही. हे ऑफिस आहे जेलर बारीबाबाचं !

**सावरकर** : इतर कैद्यांपैकी इथे कुणालाच आणलेलं नाही. मग मला एकट्यालाच का आणलंय ?

**अधिकारी** : जशी बारीबाबांची इच्छा. दुसरं काय ?

**सावरकर** : अस्सं !

**अधिकारी** : तुम्ही कुणी खुनी दरोडेखोर नाही. राजबंदी आहात. शिवाय बॅरिस्टरही आहात म्हणून सांगतो की, बारीबाबाचं मन दुखावेल, असं वागू नका. मोठमोठे खुनी दरोडेखोर चळचळा कापतात त्यांच्यासमोर.

**सावरकर** : वा ! मग पाह्यलाच पाहिजे मला तुमचा बारीबाबा.

[तोच दुरून आरडाओरडा कानी येतो. 'पकडो इस लौंडेको । बदमाष, कमीना, कुत्ता साला । बेत लगाव । चमडी निकालो हरामजादेकी । दंडाबेडी लगा दो कमीनेको । आजादी चाहिये सालोंको । बंद कर दो अंधेर कोठडीमें । यहाँ राज बारीबाबाका चलता है, बारीबाबाका । '

सावरकर हे ऐकत शांतपणे उभे आहेत. अधिकारी त्यांचा हा शांतपणा पाहून चकित होतो. तोच जेलर बारीबाबा आत येतो. हातात सोटेवजा काठी आहे. तो येताच अधिकारी सलाम करतो. सावरकर बारीकडे पहात पण नाहीत. बारी आपल्या खुर्चीवर बसतो. फाईल चाळतो. सावरकरांकडे तो मुद्दाम दुर्लक्ष करतो. तोच एक वॉर्डर येतो.]

**वॉर्डर** : साहेब.

**बारी** : ( न पहाता ) येस .

**वॉर्डर** : 14 क्रमांकाच्या कोठडीतील तो 137 नंबरचा कैदी गळफास लावून मेला.

**बारी** : तेवढाच सरकारचा खर्च वाचला. डरपोक साला. दहा खून केले होते म्हणे. पण या बारीबाबाला घाबरून आत्महत्या केली. डॉक्टरला बोलावून खात्री करून घे, तो खरोखरच मेला आहे म्हणून. आणि फेकून द्या प्रेत बाहेरच्या जंगलात. ( सावरकर अजून शांतच आहेत. ) जंगलातल्या गरीब प्राण्यांची भूक तरी कशी भागायची ? आणि हे बघ, 207 नंबरचा तो कैदी आहे ना ... त्या बॉम्ब कटातला इंदुभूषण.

**वॉर्डर** : त्याची तब्येत बरी नाही साहेब.

बारी : त्याला काय तब्येत सुधारायला आणलाय इथे ? त्याला कोलूचं काम दे. ब्रिटीश अधिकाऱ्यांवर बाँब टाकायला– गोळया झाडायला हव्यात काय ? भोगा म्हणावं त्याचं प्रायश्चित्त. देशाची सुटका करायची ना. करा. आता येथून सुटका नाही मरेपर्यंत. जाव.

[वॉर्डर निघून जातो.]

**अधिकारी** : (धीर करून) साहेब आपल्या हुकुमाप्रमाणे ...

**बारी** : याला इथे आणलंस. गुड्. (सावरकरांकडे पहात) सो यू आर दॅट सावरकर–

**सावरकर** : येस् , अँड आय होप यू आर दॅट जेलर बारी.

**बारी** : (रागाने) मिस्टर बारी. कळलं सावरकर.

**सावरकर** : येस् ! देन से बॅरिस्टर सावरकर.

**बारी** : ओह् ! ( वॉर्डरला ) सोडून द्या त्याला. तो काही वाघ नाही. (वॉर्डर त्यांना सोडून बाजूला उभे रहातात. ) आणि असलाच तर दात आणि नखं काढून घेतलेला.

**सावरकर** : पण लाज विकलेला नाही. एक लाचाल देशद्रोही, तुझ्यासारखा.

**बारी** : (चिडून) मिस्टर सावरकर.

**सावरकर** : ( शांतपणे ) बॅरिस्टर सावरकर.

**बारी** : अशी उद्दाम भाषा इथे चालायची नाही.

**सावरकर** : आणि अशी उद्धाम वागणूकसुद्धा. वाघाचे दात आणि नखं काढली, तरी त्याची झेप अचूक असते. पण जातिवंत वाघ क्षुद्र कीटकांच्या वाटेला जात नाही कधी.

[ वॉर्डर, अधिकारी गांगरून गेले आहेत. बारी रागाने सोटा टेबलावर आपटतो. ]

**सावरकर** : सोटा मोडेल पण खरा देशभक्त मोडणार नाही, वाकणार नाही कण्यात.

**बारी** : माझं नाव ऐकताच सारे कैदी लटपटतात.

**सावरकर** : ते खुनी दरोडेखोर. देशाकरता शीर तळहातावर घेऊन मृत्यूला आव्हान देऊन निघालेले क्रांतिकारक नाहीत.

**बारी** : तुमच्यासारखे मूठभर क्रांतिकारक काय वाकडं करणार ब्रिटीश सरकारचं ?

**सावरकर** : क्रांतिकारक मूठभर असले, तरी प्रत्येक मूठ ही वज्रमूठ आहे. ब्रिटीश साम्राज्याचा चक्काचूर करण्याचं सामर्थ्य आहे या मुठीत.

**बारी** : पण आज सारं अंदमान माझ्या मुठीत आहे. आकाशातला परमेश्वर येशू असला, तरी अंदमानचा परमेश्वर मी आहे मी.

**सावरकर** : काँग्रॅच्युलेशन्स.

**बारी** : फॉर व्हॉट ?

**सावरकर** : म्हणजे तुमच्याही नशिबी क्रूसावर चढून खिळे ठोकून घ्यायचा योग दिसतोय.

[ बारी एकदम उसळून उभा रहातो. ]

**बारी** : (शांत होत) तुम्ही इथे चांगले वागलात, तर माझ्यासारखा चांगला माणूस कुणी नाही.

**सावरकर** : माझ्याशी कुणी वाईट वागलं, तर माझ्यासारखा वाईट माणूस कुणी नाही.

**बारी** : ते यथावकाश कळून येईल आपल्या दोघांना. बाय् द वे, बोटीतून उडी मारून मार्सेलिसला पळून जाणारे तुम्हीच का ?

**सावरकर** : हो, का ?

**बारी** : तुम्ही तसं का केलं ?

**सावरकर** : इथे येऊन तुमच्याशी गाठ पडायची होती म्हणून.

**बारी** : इतकं सहज बोलताय तुम्ही ? पण तुम्हांला जन्मठेपेची शिक्षा झाली आहे, हे विसरू नका.

**सावरकर** : कसा विसरेन ? एखाद्या गौरवचिन्हासारखा माझ्या सुटकेचा दिवस सांगणारा हा लोखंडी बिल्ला इंग्रज सरकारनं

घातलाय ना माझ्या गळयात.

**बारी** : पण मी इंग्रज नाही, आयरिश आहे.

**सावरकर** : त्यामुळे माझ्या शिक्षेच्या वर्षात काही फरक पडणार नाही.

**बारी** : ते मलाही माहीत आहे. पण मी आयरिश आहे, हे एवढ्याकरता सांगितलं, की लहानपणी मी इंग्रजांच्या हातून आयर्लंडला सोडवण्यासाठी झालेल्या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला होता. पण आता माझं मत पालटलं आहे.

[ सावरकर फक्त हसतात. ]

**बारी** : तुम्ही बॅरिस्टर आहात. मी एक साधा जेलर आहे, म्हणून माझा उपदेश तुच्छ मानू नका. खून से खून. खून कधीही स्वातंत्र्य देणार नाही.

**सावरकर** : मग हे तुम्ही तुमच्या आयर्लंडमधील स्वातंत्र्यवीरांना का शिकवीत नाही ?

तुम्हांला माहीत नसेल बारीबाबा, पण तुमच्या आयर्लंड देशानं आमच्या मदनलाल धिंग्राचा गौरव केला होता, त्याला हुतात्मा म्हटलं होतं.

**बारी** : माझ्या मायदेशानं केलेली प्रत्येक गोष्ट मला आवडावी, असा तुमचा आग्रह नाही ना ?

**सावरकर** : नाही. पण मदनलालनं प्राण दिले, ते आपल्या प्रिय मातृभूमीसाठी. पण आपल्या मातृभूमीशी बेइमान होऊन ब्रिटीशांनी फेकलेल्या चतकोर भाकरीचे तुकडे चघळणाऱ्या गुलामांना हौतात्म्य काय असतं, ते कसं कळणार ?

**बारी** : तुमचा उपरोध कळला मला. पण हौतात्म्यानं भारलेल्या हुतात्म्यांना फासावर लटकवण्यासाठीसुद्धा काही लोकांची गरज असते.

**सावरकर** : पण इथे तुम्हांला तोही त्रास नाही. स्वत:च्या हातांनीच इथे लोक गळफास लावून घेतात.

**बारी** : मला त्यांची दया येते. ओ दोज् पुअर सोल्स् .

**सावरकर** : दयाच दाखवायची असेल, तर ती स्वत:च्या लाचारीवर दाखवा. स्वखुषीने फासावर लटकणारे लोक दयेची भीक मागत नाहीत कधी.

**बारी** : भीक मागून या जगात काहीसुद्धा मिळत नाही.

**सावरकर** : ते मलाही ठाऊक आहे. म्हणूनच तर आम्ही इंग्रजांबरोबर लढायला सिद्ध झालो, घरादाराची पर्वा न करता. मिस्टर बारी, माझे वडील बंधू याच जेलमध्ये आहेत.

**बारी** : तुमचे वडील बंधू ? इथं आहेत ?

**सावरकर** : हो... बाबाराव.

**बारी** : हे नाव प्रथमच तुमच्या तोंडून ऐकलं.

**सावरकर** : ते घरचं नाव आहे. सरकारदरबारी नाव आहे, गणेशपंत दामोदर सावरकर .

**बारी** : ओ ! नो ! या नावाचा कुणीही मनुष्य इथे नाही !

**सावरकर** : मी सांगतो, ते इथेच आहेत.

**बारी** : पहिली गोष्ट म्हणजे तुमचे बंधू इथे नाहीत. आणि असलेच, तरी ते तुम्हांला सांगणं हा गुन्हा ठरेल माझासुद्धा.

**सावरकर** : आपण तर अंदमानचे परमेश्वर. परमेश्वर कधीच गुन्हा करीत नसतो. ( बारी मनापासून हसू लागतो. ) मला पक्कं कळलंय, की माझे वडील बंधू आजारी असून त्यांना कोलूचं काम देण्यात येतंय. त्यांना कमालीच्या यातना सहन कराव्या लागत आहेत.

**बारी** : मग तुम्ही लोक इथं काय सुख, चैन उपभोगायला आला आहात ? सुखानं रहायचं होतं, तर घरीच का नाही बसलात ?

**सावरकर** : बहुसंख्य लोकांनी सुखात जगावं, म्हणून काही लोकांना दु:खात जगावं लागतं. आम्हांला हौस का होती इथं येण्याची ?

**बारी** : नाहीतर काय ? चांगली बॅरिस्टरी करायची सोडून ही अवदसा का आठवली तुम्हांला ?

**सावरकर** : बारीबाबा, तुमच्या आयर्लंड देशात अशी अवदसा कुणालाच आठवली नाही ?

**बारी** : निदान मला तरी नाही.

**सावरकर** : पण तुमच्या सिनफिनवाल्यांना आठवली. मिघरला आठवली, आमच्या तात्या टोपेंना आठवली, झाशीच्या राणीला आठवली आणि मदनलाललाही आठवली.... तुम्हांला ती कधीच आठवणार नाही. मिस्टर बारी, तुमचे आयरिश ओरेशन्स तुम्ही विसरलेले असाल पण मीघरच्या स्वोर्डस् स्पीचमधील ती अजरामर वाक्ये अजूनही लक्षात आहेत माझ्या.

मेल्या मनाच्या मुडद्यांना असं काही आठवायचं नाही. मनापेक्षा पोट मोठं असलं, की असं होतं बारीबाबा.

[ बारीला हा टोमणा झोंबतो. ]

**बारी** : ( विषय पालटीत ) वास्तविक पहाता तुमच्यासारख्या राजबंद्यांशी राजकारणावर बोलणं हे नियमाविरुद्ध आहे. पण तुमच्यासारख्या तरुण ... प्रख्यात विद्वान माणसाला खुनी, दरोडेखोर, बदमाशांच्या टोळीत पाहून अंत:करण तळमळलं, म्हणून इतकं बोललो, इतकं ऐकून घेतलं.

**सावरकर** : कारण तुम्हाला खंत आहे. तुम्ही तुमच्या देशाशी केलेल्या द्रोहाची.

**बारी** : हां ! आता मागे काय झालं ते झालं ! त्याच्याशी मला काही कर्तव्य नाही. केवळ तुम्ही इथे कारागृहाचे नियम पाळा म्हणजे झालं. नियमाविरुद्ध वागलात, तर तुम्हाला शिक्षा करावी लागेल. आणि इथल्या शिक्षेची तुम्हाला कल्पना नाही. कोलूची शिक्षा.

**सावरकर** : मी ती करून घेणार आहे. जी शिक्षा माझे वडील बंधू बाबाराव भोगत आहेत, आजारीपणात. सुखाप्रमाणेच दु:खंही वाटून घेतो आम्ही.

**बारी** : वेल् ! तुम्हाला तशी हौसच असेल, तर माझं काहीच म्हणणं नाही. ( अधिकाऱ्याला ) घेऊन जा यांना आणि सात क्रमांकाच्या बराकीच्या वरच्या मजल्यावरील कोठडीत बंद करून ठेवा. (सावरकरांना ) मिस्टर सावरकर, तुम्ही इतरांपेक्षा वरच्या दर्जाचे, म्हणून ही वरच्या मजल्यावरची कोठडी दिलीय तुम्हाला.

**सावरकर** : धन्यवाद ! (जाऊ लागतात.)

**बारी** : जाण्यापूर्वी एक सावधगिरीची सूचना देऊन ठेवतो. तुम्ही इथून पळून जाण्याचा प्रयत्न कराल, तर भयंकर संकटात पडाल. या तुरुंगाभोवती मोठमोठी गहन अरण्यं असून त्यात महाभयंकर क्रूर रानटी लोक रहात असतात. ते तुमच्यासारखं कोवळं पोर पहातात आणि त्याला काकडीसारखं खाऊन टाकतात. ( सावरकर हसतात. ) हसता काय, ही हकीगत आहे. हे जाणून इथून पळून जाण्याचा प्रयत्न करू नका, मार्सेलिस्सारखा.

**सावरकर** : हे मार्सेलिस् नाही, पोर्टब्लेअर आहे, हे मी जाणून आहे.

[सावरकर वॉर्डरबरोबर जातात. बारी त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहू लागतो. तोच वॉर्डर येतो. ]

### शब्दार्थ

**कोलू** तेल काढण्यासाठी बैलाच्या मानेवर ठेवण्याचे साधन **कोठडी** तुरूंगात कैद्यांसाठी असलेली खोली **बॅरिस्टर** इंग्लंडमध्ये वकीलीची परीक्षा पास झालेला वकील **राजबंदी** राजकीय कैदी **उद्दाम** उद्धट **जातिवंत** श्रेष्ठ **वज्रमूठ** वज्राप्रमाणे बळकट मूठ **आयरिश** आयर्लंडचा नागरिक **उपरोध** सरळ न बोलता तिरकस बोलणे **आयरिश ओरेशन्स** – आयर्लंडच्या समारंभातील भाषण की ज्यात देशभक्ताचे कर्तव्य, ध्येय सांगितले आहे **खंत** दु:ख **गहन** घनदाट **पोर्टब्लेअर** अंदमानची राजधानी **जेलर** तुरुंगाधिकारी **वॉर्डर** तुरुंगातील सेवक **गहन** दाट

### शब्दसमूहाला एक शब्द

**देशद्रोही** देशाचा विश्वासघात करणारा **राजबंदी** राजकीय कारणांसाठी ज्यांना कैद केले जाते असे कैदी **क्रांतिकारक** क्रांती करणारे **हुतात्मा** देशासाठी आपल्या जीवनाचे बलिदान देणारा

## वाक्‌प्रचार

**अवदसा आठवणे** स्वत:चे नुकसान होईल असे वागणे **चळचळा कापणे** अत्यंत घाबरून थरथर कापणे **गांगरून जाणे** गोंधळून जाणे **शिर तळहातावर घेणे** जिवाची पर्वा न करता लढणे **चक्काचूर करणे** नाश करणे **मातृभूमीशी बेइमान होणे** मातृभूमीच्या विरुद्ध गुन्हा करणे **घरादाराची पर्वा न करणे** घरादाराचा सर्वस्वाचा त्याग करणे **लाज विकणे** निर्लज्जापणाने वागणे **अंत:करण तळमळणे** व्यथित होणे, मन अस्वस्थ होणे

## टीपा

**ओ दोज पुअर सोल्स** अरेरे ! ते बिचारे आत्मे ! तुरूंगाधिकारी बारी वरील उद्‌गार गळाफास लावून आपले जीवन संपविणाऱ्या कैद्यांविषयी काढतो पण त्याच्या मनात दया नाही, क्रूरता आहे.

**जन्मठेप** मरेपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा

**जेलर बारी** अंदमान येथील तुरुंगाधिकारी होता तो आयर्लंडचा रहिवासी होता. बारी यांनी इंग्रजांच्या तावडीतून आपला आयर्लंड सोडविण्याच्या स्वातंत्र्यलढयात प्रथम भाग घेतला होता नंतर त्यांचे मत बदलले आणि त्यांनी इंग्लंड देशासाठी काम करायला सुरुवात केली.

**येशू** येशू ख्रिस्त हा ख्रिस्ती धर्माचा संस्थापक

**मार्सेलिस** स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा मार्सेलिस बंदरातील सुटकेचा प्रयत्न जगप्रसिद्ध आहे. मार्सेलिस बंदर फ्रान्स देशाच्या अधिकारात होते; हा कायदा सावरकरांना माहिती होता. इंग्रज अधिकारी सावरकरांना भारताहून काळया पाण्याच्या शिक्षेसाठी अंदमानात नेत असतांना, इंग्रजांपासून सुटण्यासाठी त्यांनी बोटीतून समुद्रात उडी मारली. सावरकरांनी फ्रान्सच्या अधिकाऱ्यांकडे मदत मागितली; परंतु फ्रान्सच्या अधिकाऱ्यांनी सावरकरांना मदत करण्याचे नाकारले आणि ब्रिटीशांकडे त्यांना सोपविले.

**मिघर** थॉमस फ्रँन्सीस मिघर हा तरुण आयरिश क्रांतिकारक नेता होता. त्याचे 20 जुलै 1846 चे तेजस्वी भाषण जगप्रसिद्ध आहे.

**वज्र** हे इंद्रदेवाचे अमोघ शस्त्र आहे. या शस्त्राचा कधीही पराभव होत नाही. दधिची ऋषींच्या हाडांपासून हे शस्त्र बनविले गेले.

**सिनफिन** याचा अर्थ ''आम्ही आमच्यासाठी'' असा होतो ही आयर्लंडची जुनी राजकीय चळवळ आहे. इ. स. 1905 पासून 'आयरिश रिपब्लिकन पार्टी' आयर्लंडवरील ब्रिटीश शासनाचा अंत आणण्याचे ध्येय ठेवून चळवळ करीत होती. आयर्लंडमध्ये आयरिश लोकांचेच शासन असले पाहिजे, हा त्यांचा हक्क आहे; असे क्रांतिकारक मानत होते. आयर्लंड देश ब्रिटीशांचे शासन झुगारुन इ. स. 1949 साली स्वतंत्र झाला.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) सावरकर कोणत्या प्रकारचे कैदी होते ?

(2) सावरकरांना कोणत्या तुरुंगात आणले ?

(3) 137 क्रमांकाच्या कैद्याने तुरुंगात आत्महत्या का केली ?

(4) जेलर बारीची कैद्यांशी वागणूक कशी होती ?

(5) जातिवंत वाघाचे वैशिष्टय कोणते ?

(6) खरे देशभक्त कसे वागतात ?

(7) जेलर बारी स्वत:ला कोण मानतो ?

(8) आयर्लंड देशाने कोणत्या हुतात्म्याचा गौरव केला ?

(9) जेलर बारी कोणत्या देशाचे होते ?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) जेलर बारीने इंदुभूषणला कोलूची शिक्षा का केली ?

(2) सावरकर बारीला देशद्रोही का म्हणतात ?

(3) सावरकर क्रांतिकारकांची वज्रमूठ का म्हणतात ?

(4) बारी यांचे सावरकरांविषयीचे मत कोणते होते ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) सावरकरांनी तुरुंगाधिकारी बारीकडून स्वत:साठी कोलूची शिक्षा का मागून घेतली ?

(2) सावरकरांचे व्यक्तिचित्रण करा.

**4. खालील प्रश्नांची योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा :**

(1) अंदमानच्या तुरुंगात कोणी आत्महत्या केली ?

(अ) बारी (ब) इंदुभूषण (क) वॉर्डर (ड) बाबाराव सावरकर

(2) अंदमानच्या तुरुंगात बारी कोण होता ?

(अ) तुरुंगाधिकारी (ब) चोर (क) कैदी (ड) दरोडेखोर

(3) सावरकरांना किती वर्षांची शिक्षा झाली ?

(अ) पाच (ब) सात (क) दहा (ड) पन्नास

**5. खालील विधाने कोण-कोणाला कोणत्या संदर्भात बोलले ते समजवा :**

(1) ''सोटा मोडेल पण खरा देशभक्त मोडणार नाही, वाकणार नाही कण्यात.''

(2) ''भीक मागून या जगात काहीसुद्धा मिळत नाही.''

**6. खालील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा :**

देशद्रोही x __________

उद्दाम x __________

दयाळू x __________

**7. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा :**

शिर = __________

मायदेश = __________

तुच्छ = __________

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- विनायक दामोदर सावरकर यांचे 'माझी जन्मठेप आत्मचरित्र वाचा.'
- सावरकरांच्या स्वातंत्र्यचळवळीतील कार्याविषयी निबंध लिहा.

**भाषाभिव्यक्ती**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जिद्दी स्वभावाची, उज्ज्वल देशभक्तीची आणि प्रभावी आयुष्याची प्रेरणा घेऊन अनेक लेखकांनी लेखन केले आहे. त्यांच्यावर कथा, कविता, कादंबऱ्या रचल्या गेल्या आहेत. हा भाग त्यांच्या आयुष्यातील सर्वात कठीण आणि धैर्याची, संयमाची, निग्रहाची परीक्षा पाहणारा काळ आहे. पन्नास वर्षांच्या काळ्या पाण्याची शिक्षा त्यांना इंग्रजांनी सुनावली होती. अंदमानसारख्या नरकयातना देणाऱ्या तुरुंगात त्यांची रवानगी केली होती. अत्यंत कठोर अशा शरीरयातना आणि मानसिक यातना देणाऱ्या या तुरुंगाचा अधिकारी बारीसाहेब आणि स्वा. सावरकरांच्या संवादामधून सावरकरांचा झुंजार स्वभाव आणि स्वत:च्या कार्याविषयीचा विश्वास व्यक्त होतो.

इंग्लंडविरुद्ध लढणाऱ्या आयर्लंडचा स्वतंत्रतेचा लढा आणि भारतीय स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांनी दिलेला लढा यात तत्त्वत: काहीही फरक नाही. कारण देशसेवेचे व्रत डोळसपणाने स्वीकारलेले असते. ते संख्येने कमी असले तरी त्यांच्या निर्धाराने ते आपल्यास हवे ते मिळवू शकतात, कारण त्यांच्या मुठित त्यांचा आत्मविश्वास असतो आणि या मुठीत वज्राचे बळ असते.

•

# 12 माझ्या कवितेची चव

**इंद्रजित भालेराव**
**( जन्म : 1962 )**

प्राध्यापक इंद्रजित भालेराव हे आजच्या काळातले कृषी संस्कृतीचा गौरव गाणारे लोककवी म्हणून सुप्रसिद्ध आहेत. ते परभणी येथील ज्ञानोपासक कॉलेजमध्ये मराठीचे प्राध्यापक आहेत.

पीकपाणी, आम्ही काबाडाचे धनी, दूर राहिला गाव, रानमळयाची वाट इत्यादि अनेक काव्यसंग्रह त्यांनी लिहिले आहेत. त्याशिवाय विपुल गद्य वाङ्‌मयही त्यांनी लिहिले आहे. तर अशा त्यांच्या वाङ्‌मय सेवेला अनेक पुरस्कारही मिळाले आहेत.

त्यांच्या कवितेवर लोक संगीताचा दाट ठसा असलेला दिसतो. त्यांच्या 'कवितेची चव' या कवितेतून ते आपल्याला कविमनाचा शेतकरी म्हणून भेटतात.

---

माझ्या कवितेला यावा
शेना-मातीचा दर्वळ
तिने करावी जतने
काटयाकुटयात हिर्वळ

माझ्या कवितेने बोल
काळजातला बोलावा
उन्हाळयात खापराला
जसा असतो ओलावा

असो काळा-सावळाच
माझ्या कवितेचा रंग
गोऱ्या-गोमटया कपाळी
बुका अबिराच्या संगं

माझ्या कवितेचा हात
असो ओबडधोबड
नांगरल्या मातीवानी
न्हावं काळीज उघडं

खारी-आंबट-तुरट
माझ्या कवितेची चव
ऊर फोडुनिया माझा
तिनं पोटातून यावं

**शब्दार्थ**

**दर्वळ** दरवळ, सुगंध पसरणे **जतन** काळजीपूर्वक रक्षण, संगोपन **खापर** मडक्याचा तुकडा, मातीचे भांडे

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) कवीला आपल्या कवितेला कसला दर्वळ असावा असे वाटते ?

(2) आपल्या कवितेतील बोलांची तुलना कवी कशाशी करीत आहे ?

(3) कवीच्या कवितेचा रंग कसा आहे ?

**2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन-तीन वाक्यात लिहा :**

(1) काटयाकुट्यात हिरवळ जतन करावी यातील भावार्थ समजवा.

(2) आपल्या कवितेचा हात ओबड-धोबड आहे असे कवी का म्हणतो ?

(3) ''ऊर फोडुनिया तिन पोटातून यावं'' संदर्भासह स्पष्ट करा.

**3. योग्य विकल्प शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(1) कवीच्या कवितेने काटयाकुट्यात------ जतन करावी.

(अ) चव (ब) भाषा (क) गोडवा (ड) हिरवळ

(2) कवीच्या कवितेचा हात------असावा.

(अ) कोमल (ब) काळासावळा (क) ओबड-धोबड (ड) गोरागोमटा

(3) कवीच्या कवितेने ------बोल बोलावा.

(अ) मनातला (ब) काळजातला (क) मधुर (ड) ह्दयातला

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- ना. धो. महानोरांच्या रानातल्या कविता वाचा.'
- 'कांदा मुळा भाजी' हा सावतामाळ्यांचा अभंग समजून घ्या.

## भाषाभिव्यक्ती

इंद्रजित भालेराव यांची कविता अशा कवीची आहे, जे खेडयातील माणसांशी शेतीशी खेडयांतील रीतीभाती आणि त्यातील अडीअडचणीशीं, प्रश्नांशी मनाने समरस झाले आहेत. त्यांच्या कवितेवर लोक संगीताचा, लोककाव्याचा दाट संस्कार आहे. खेड्यातील जीवनाच्या अनुभवातून येणारी ही कविता आहे. म्हणून कवी म्हणतो की त्यांच्या कवितेला चव आहे ती शेतातल्या मातीची आणि सुवास आहे तो ही मातीचा.

''असा काळा-सावळाच
माझ्रा कवितेचा रंग
गोऱ्या गोमटया कपाळी
बुका अबिराच्या संग''

या ओळी वाचा शेतातल्या काळ्या मातीशी एकरूप झालेला. पंढरपुरच्या काळ्या पाषाणातला विठोबा त्यांच्या वारीला जाणारा सश्रद्ध वारकरी वर्ग आणि भजनकीर्तनात रंगणारे शेतकरी यांची आठवण होते. अबीर पांढरा आणि बुक्का काळा असतो या दोघांच्या उल्लेखातून महाराष्ट्राच्या श्रद्धेचे निधान असणाऱ्या विठूमाऊलीच्या आणि शेतकऱ्यांच्या नात्याची दृढता व्यक्त केलेली आहे.

यातील ग्रामीण शब्दांचा वापर या कवितेला वेगळे सौंदर्य प्राप्त करून देतो. उदाहरणार्थ, दर्वळ, मातीवानी शेनामातीचा

•

| 13 | बडोद्याचा भाग्यविधाता |
|---|---|

**स्मिता भागवत**
**( जन्म : 1945 )**
**अविनाश कप्तान ( सहलेखक )**
**( जन्म : 1948-2014 )**

स्मिता भागवत या मूळच्या बडोदे शहरातल्या विजया कप्तान, अविनाश कप्तान यांच्या ज्येष्ठ भगिनी. याच कारणाने दोघांचे हे सहलेखन सहज शक्य झाले. दोघांनाहीं 'सयाजीराव महाराज' हा असीम अभिमानाचा विषय स्मिता भागवत यांनी मराठी व गुजराती भाषेत विविध प्रकारचे लेखन केले आहे 'श्वेत प्रेमना रक्तिम पडछाया' या त्यांच्या गुजराती कादंबरीला गुजराती साहित्य अकादमीकडून उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मुमिळालेला आहे मराठीत त्यांची एकूण आठ पुस्तके प्रकाशित झालेली आहेत।

श्री अविनाश कप्तान यांनी बडोदा नरेश श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या जीवन चरित्राचा अनेक वर्षे सखोल अभ्यास आणि संशोधन करून चरित्रात्मक सामग्रीचे संकलन केले आणि स्मिता भागवत यांनी त्याला पुस्तकरूप दिले ''इये सयाजीचिये नगरी'' हे सुंदर चरित्र वाचून सयाजीराव महाराज हे कसे एक श्रेष्ठ राज्यकर्ता होते, हे समजते जन्मत: युवराज नसूनही त्यांच्या स्वभावात खऱ्या अर्थाने राजेपण होते. राजा म्हणून आपल्या जवाबदारीचे भान होते. प्रजावत्सल अशा या राजाला शिक्षणाविषयी तळमळ होती राज्यकारभाराच्या पद्धतीत त्यांनी अनेक सुधारणा केल्या व त्याची अमलबजावणी ही ते त्वरित करीत असत. आजही प्रत्येक बडोदेकराला अभिमान आणि गौरव वाटावा असा हा वेगळा नृप होता. श्री कप्तान यांनी याच विषयावर 'नृपावेगळा' हे नाटकही लिहिले होते व त्याचे अनेक प्रयोगही झाले आहेत. हा चरित्रात्मक निबंध वाचून विद्यार्थ्यांना हे पुस्तक वाचण्याची इच्छा निश्चितपणे होईल.

---

साडेसहा वर्षांच्या प्रशिक्षणानंतर सयाजी महाराजांच्या हाती सत्तेची सूत्रे आली. जन्मत: युवराज नसलेल्या सयाजीरावांच्या स्वभावात मात्र राजेपण आले होते. आपल्या हाती सोपवण्यात आलेली राज्याची धुरा म्हणजे एक विश्वस्वनिधी आहे, अशी त्यांची भावना होती. त्यामुळे आपल्या जबाबदाऱ्यांचे त्यांना सतत भान असे. आपण प्रजेचा नेता आहोत. अशी भावना त्यांच्या मनात होती.

महाराजांच्या वर्तनात तारुण्याचा उत्साह होता. स्वभावात प्रजापालक राज्यकर्ता होण्याचा आग्रह होता. राज्यकारभाराच्या पद्धतीत सुधारणा करण्यास ते उत्सुक होते. तेंव्हा, कागदपत्रे लाल कितीत ठेवण्याचा रिवाज संस्थानात होता.

महाराजांनी 'टिपण पद्धत' सुरू केली. प्रशासनाचे विकेंद्रीकरण सुरू झाले. ते गरजेचेही होते. तोवर क्षुल्लक रकमेच्या मंजुरीसाठी महाराजांकडे धाव घ्यावी लागे. सारे स्वत: करण्याचा अट्टाहास महाराजांना चुकीचा वाटला. त्यांनी आधुनिक पद्धत अंमलात आणण्याचा आग्रह धरला. त्यांनी खाजगी कार्यवाह नेमून विविध खात्यांवर खातेप्रमुखांची नेमणूक केली. त्यांच्याकडून ते साप्ताहिक अहवाल मागवत. कायद्यात एकसूत्रीपणा यावा व कायद्याचे मुद्दे लेखी उपलब्ध व्हावेत यासाठी त्यांनी कायदा समित्या स्थापन केल्या. त्यांनी 1884-85 साली महसूल खात्यापासून हिशेब व हिशेबतपासणी खाते वेगळे केले. रजिस्ट्रेशनची नोंदणी पद्धत अंमलात आणली. निवडक तालुक्यांत अंमलबजावणीचे अधिकार आणि न्यायाधिकार वेगवेगळे केले. हा प्रकल्प यशस्वी झाला.

प्रसंगपरत्वे महाराजांना अमदाबाद, कोलकाता, काशी, अलाहाबाद, आग्रा, ग्वाल्हेर, अजमेर, पुणे आणि जोधपूर या शहरांना भेट देण्याची संधी मिळाली. त्यामुळे त्यांच्या निरीक्षणास विशाल क्षितिज प्राप्त झाले. कुठेही काही चांगले दिसले की त्यांना ते हवेसे वाटत असे. त्यांचे हे वाटणे स्वप्नील वा हपापलेपणाचे द्योतक नव्हते. जे हवेसे वाटेल ते प्राप्त करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे हा त्यांच्या स्वभावाचा अंगभूत धर्म होता. त्यांच्या नीरक्षीरविवेकबुद्धीची पावती होती. त्यामुळे त्यांची प्रत्येक इच्छा महत्त्वांकाक्षेच्या कक्षेस पोचली.

याच काळात त्यांना औद्योगिक विकासाचे महत्त्व पटले. प्रसंगपरत्वे भाषण देण्याची वेळ येई तेव्हा ते लोकांना सोन्याचांदीत पैसे गुंतवण्यापेक्षा उद्योगधंद्यात पैसे गुंतवून ते वाढवा असा सल्ला देत. धंद्यात पैसा गुंतवल्यामुळे तो वाढतो. सोन्या–चांदीमुळे संपत्तीत वाढ होत नाही असे ते ठासून सांगत. त्यांनी 1882 साली 'बरोडा कॉटन स्पिनिंग अँड विव्हिंग मिल ' सुरू करण्यास उत्तेजन दिले. खटपट करून, सरकारी सहाय्य मिळवून त्यांनी 1885 साली गणदेवीस साखर कारखाना काढला.

गुन्हेगारांची नीतिमत्ता सुधारण्याच्या उद्देशाने त्यांनी 1883-84 साली एक अभिनव प्रकल्प हाती घेतला. तुरुंगातील कैद्यांसाठी 'सर्वसामान्य नीतिमत्ता व सद्वर्तन' या विषयावर दर आठवड्यास त्यांनी आगळी व्याख्यानमाला सादर करण्याची व्यवस्था केली. या प्रकल्पात प्रबोधनाच्या प्रशासन पद्धतीची प्रसादचिन्हे गवसतात, असे मत व्यक्त करून सुजाणांनी या प्रकल्पाचा गौरव केला.

महाराजांच्या मनात शिक्षणाविषयी अलोट प्रेम निर्माण झाले होते. 1884 साली त्यांनी एक धाडसी निर्णय घेतला. परदेशगमनासाठी समुद्र ओलांडणे निषिद्ध समजण्यात येत असणाऱ्या काळात त्यांनी कनिष्ठ बंधू संपतराव यांना शिक्षणासाठी परदेशी पाठवण्याचे धाडस केले. पुढे परदेशगमनाबद्दल अपार टीका आणि 'गैरहजर राजा ' हा टोमणा ओढवून घेणारे महाराज स्वत: मात्र तोवर युरोपला गेले नव्हते.

1885 सालातील जानेवारी महिन्यात गव्हर्नर जनरलचे एजंट वॉटसन सपत्नीक बडोदा भेटीस येण्याचे ठरले. ही संधी साधून महाराजांनी लेडी वॉटसन यांच्या हस्ते, बडोदा पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन करावे असे ठरवले. पिण्याच्या पाण्याची तीव्र समस्या, हे बडोदेकरांचे प्राक्तन होते.

महाराज सावळी तालुक्याच्या दौऱ्यावर असताना अचानक मही योजनेच्या प्रकल्पाशी मिळताजुळता ठरणार प्रकल्प यशस्वी करण्याचा मार्ग त्यांच्या चाणाक्ष नजरेत भरला. आकस वा पूर्वग्रह बाळगणे हे त्यांच्या स्वभावात नव्हते. रास्त कारणामुळे भूतकाळात अंमलात येऊ न शकलेल्या उत्तम योजनांचा, ते सोयीच्या परिस्थिती निर्माण करून आदराने स्वीकार करत म्हणून 'सयाजी सरोवर' ही योजना अंमलात येऊ शकली. आधुनिक शैली वापरून तयार केलेली ही जलयोजना शहराच्या पूर्वेस बारा मैल अंतरावर आजवा नावाच्या खेड्यात साकार झाल्यामुळे ती 'आजवा सरोवर' म्हणूनही परिचित आहे. या योजनेसाठी पाच वर्षांचा कालखंड व चौतीस लक्ष रुपये खर्च झाले. दूरगामी विचाराची कास न धरणाऱ्या आणि वरवरचा विचार करून टीका करण्याची सवय असलेल्या स्वत:स धुरंधर समजणाऱ्या काही उथल व उतावळया डुढ्ढाचार्यांनी खर्चाकडे बोट दाखवून महाराजांच्या आधुनिकतेच्या सोसावर भरपूर टीका केली. अर्थात महाराजांवर त्याचा परिणाम झाला नाही. अपेक्षेप्रमाणे, ही योजना पुढे सर्वार्थाने लाभदायक ठरली. रयतेस नळाच्या पाण्याची आधुनिक सोय प्राप्त झालीच; शिवाय 1926 सालापासून या योजनेतून सत्तर हजारांचे वार्षिक उत्पन्न मिळू लागले आणि टीकाकारांचे तोंड बंद झाले. शिवाय, या प्रकल्पाच्या यशामुळे राज्यातील इतर भागांच्या पाणीसमस्येवर तोड काढण्याची प्रेरणा मिळाली ते वेगळेच !

महाराजांच्या मनातील शिक्षणविषयक आस्था जगजाहीर होती. मल्हाररावांच्या काळात बडोद्यात एक हायस्कूल, चार प्राथमिक शाळा व चार संस्कृत पाठशाळा होत्या. पेटलादला एक इंग्रजी शाळा होती. दिवाण सर टी. माधवराव यांनी 1875 साली शिक्षणखाते सुरू केले होते. त्या खात्याचा योजनाबद्ध विकास व्हावा अशी त्यांची इच्छा होती. या रास्त इच्छेचा महाराजांनी आदराने मान राखला. त्यांनी 1884-85 साली शिक्षणखात्याची पुनर्रचना केली. तोवर कुणीही शाळेत मास्तरकी करण्याचा- विद्यार्थ्यांना शिकवण्याचा प्रघात होता. महाराजांना हे योग्य वाटले नाही. विद्यार्थ्यांना नियमबद्ध रीतीने शिक्षण मिळावे असे त्यांना वाटे. शाळेत शिक्षण देणाऱ्या शिक्षकास औपचारीक प्रशिक्षण देणे त्यांनी गरजेचे ठरवले. परिणामी, शिक्षक-प्रशिक्षणाच्या प्रकल्पाची योजनाबद्ध आखणी झाली आणि त्वरित अध्यापन पाठशाळा अर्थात टीचर्स ट्रेनिंग स्कूल कार्यरत झाले.

भारतीय संगीताचे शास्त्रशुद्ध शिक्षण देणारी तालेवार संस्था बडोद्यात असावी अशी महाराजांना हौस ! त्यांनी गायनशाळेच्या- म्युझिक कॉलेजच्या-मनोरम इमारतीची निर्मिती केली. या इमारतीसमोर नितांत-सुंदर तलाव बांधला. तलावास लाभलेले संगीताचे सान्निध्य कलात्मकतेने सूचित करण्याच्या उद्देशाने त्यांनी या तलावास 'सूरसागर ' हे सुरेल नाव दिले.

त्यांनी शिक्षणक्षेत्रात महत्त्वाचा प्रयोग 1885 साली सुरू केला. प्रयोगाच्या सुरुवातीस त्यांनी आपला मनोदय समग्रतेने जाहीर केला. 'दरवर्षी तीस शाळांची निर्मिती करावी. त्या इमारतींच्या निर्मितीसाठी साठ हजार रुपयांची सोय व्हावी . मुलींनी शाळेत यावे, यासाठी डोळस प्रयत्न व्हावेत . या प्रयत्नांचा भाग म्हणून शाळेत शिक्षिका अधिक ठेवण्यावर भर दिला जावा. तसे केल्यामुळे पालकांना आपल्या मुलींना शाळेत पाठवणे सुरक्षित वाटेल; तसेल, मुलींना शाळेत पाठवण्याची अधिकाधिक इच्छा होईल. प्रत्येक शाळेत वाचनालय असावे. समाजाच्या सर्व स्तरांत शिक्षण पोचवण्याची कार्यवाही व्हावी. केवळ पुस्तकी ज्ञानावर भर न ठेवता, कार्यानुभवाचे महत्त्व जपले जावे. शारीरिक शिक्षणाचीही व्यवस्था व्हावी. अभिजात इंग्रजी साहित्याच्या अनुवादाच्या कामासाठी विद्वानांची नेमणूक व्हावी. नगरात ग्रंथालयांची संख्या वाढवावी. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा उपयोग करण्याची सवय लावावी. ग्रंथालयात वावर असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे. अज्ञानांध:कारावर मात करण्यास, साक्षरांनी कंबर कसावी...'

महाराजांनी कलांचे महत्त्व जोपासण्यासाठी 'कलाभवन' हे सूचक नाव धारण करणाऱ्या इमारतीची योजना 1890 साली आखली. त्या निमित्ताने, बडोद्यात उपयोजित कलांचे शिक्षणकार्य सुरू झाले. हे काम तांत्रिक शिक्षणाचा ओनामा ठरावे असे होते. इंजिनीयरिंगची मेकॅनिकल शाखा; तसेच चित्रकला , शिल्पकला, सुतारकाम, रंगकाम, ब्लीचिंग व कॅलिको प्रिंटिंगच्या अभ्यासक्रमाने या कार्याचा शुभारंभ झाला. या कामाची घडी नीट बसल्यावर कृतार्थ होऊन थांबणे महाराजांना ठाऊक नव्हते. कार्यावर पूर्णविराम ठेवण्याचा समाधानास त्यांच्या स्वभावात स्थान नव्हते. एक काम मार्गी लागत असताना दुसऱ्या व ते मार्गी लागत असेल तेव्हा तिसऱ्या कामाचा शोध हा त्यांचा स्वभाव होता. त्यांनी प्रगतीचा ध्यास घेतला होता. पत्नीच्या मृत्यूपासून त्यांना निद्रानाशाचा रोग जडला होता, हे खरे! परंतु 'मी जागा आहे, कारण माझ्या मागे कामाचा लकडा आहे' असे सातत्याने म्हणणे हे त्यांचे ब्रीदवाक्य ठरू लागले होते.

'कलाभवन'च्या पहिल्या टप्प्याचे काम मार्गी लागत असताना त्यांनी मृत्तिकाशिल्प (सिरॅमिक्स), वास्तुकला, स्थापत्यशास्त्र, रसायनशास्त्र, वस्त्रोद्योग; तसेच अन्य ललितकला आणि तंत्रज्ञानाच्या शाखा यांचे काम हाती घेतले.

कलाभवनाचे काम योग्य हाती सोपल्यावर, युरोपच्या दौऱ्यावर असताना, महाराजांच्या मनात अद्वितीय वस्तुसंग्रहालय निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा जन्मली. मनात विचारप्रवेश होताच काम सुरू करणे हा त्यांचा खाक्या! स्वाभाविकच, संकल्पित वस्तुसंग्रहालयासाठी भारत आणि युरोपातील अनेक अनोख्या प्रेक्षणीय वस्तू गोळा होऊ लागल्या. 1894 साली तयार झालेल्या या म्युझियमचा चित्रसंग्रह, भारतात सर्वोत्कृष्ट समजला जातो. महाराजांनी अनेक पाश्चात्त्य चित्रकारांची चित्रे मूळ स्वरूपात मिळवली. त्यामुळे जागितक स्तराच्या पर्यटकांसाठी हे म्युझियम हे अनोखे आकर्षण बनले. काही वर्षांपूर्वी सर रिचर्ड मीड यांनी जे संस्थान 'सर्वार्थाने टाकाऊ आहे व त्यात सुधारणेची सुतराम शक्यता नाही' अशी नोंद लिहिली होती, त्या संस्थानास राजा सर टी. माधवराव आणि सयाजीराव महाराज यांच्या झंझावाती उद्यमशीलतेने जागतिक स्तरावर मानाच्या स्थानी नेऊन ठेवले!

न्यायमंदिर आणि म्युझिक कॉलेज यांच्या बेचक्यात, एका भारदस्त इमारतीची निर्मिती करण्यात आली. स्त्री अध्यापन पाठशाळा या नावाने तिथे शिक्षिका प्रिशक्षण केंद्र सुरू झाले. मंडईची वास्तू न्यायालयास दिल्यामुळे मंडईसाठी इमारत बांधण्याचे काम शिल्लक राहिले म्हणून राजमहाल रोडवर एका प्रशस्त देखण्या वास्तूची निर्मिती करून मंडईची उत्तम व्यवस्था करण्यात आली. खंडेराव मार्केट नावाने प्रिसद्धी पावलेली ही वास्तू, लाल दगडांची नसली तरी आजच्या तारखेसही वास्तुशास्त्राचा अलौकिक नमुना ठरते. या इमारती आजही बडोद्यास 'सयाजी नगरी' नाव देण्यास उद्युक्त करतात.

महाराजांनी अमरेली जिल्ह्यात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा प्रयोग हाती घेतला. त्यामुळे शिक्षण-क्षेत्रास नवे वळण मिळाले. महाराजांना मंद गती कधीच अभिप्रेत नसे. त्यांच्या झंझावाती व्यक्तित्त्वाने ह्या प्रकल्पात विलक्षण वेग भरला. परिणामी, 1906 सालापावेतो हा उपक्रम संस्थानव्यापी बनला.

1892 साल उजाडले तेव्हा एकशेअठरा मैलांचा रेल्वेमार्ग तयार झाला होता. संस्थानाची प्रमुख गावे राजधानीस जोडली गेली होती. लक्ष्मीविलास पॅलेस तयार झाला. महाराजांचे स्नेही व खाजगी कारभारी पेस्तनजी दोराबजी खंडाळावाला यांनी राजप्रसादाची अप्रितम सजावट केली. प्रासादाभोवती देखण्या उद्यानाची निर्मितीही त्यांनीच करवून घेतली. महाराजांचे वास्तव्य वैभवशाली प्रासादात आणि प्रजा गुरांच्या गोठ्यात असा घाट, मल्हाररावांचा अपवाद वगळता, बडोदेकरांनी कधी पाहिला नाही. 'जो जनतेचे रक्षण करतो, पालन करतो, तोच पिता साक्षात मानावा , जन्म दे तो निमित्त केवळ!' या उक्तीस न्याय देत, सयाजीराव महाराज प्रजेचे पालन करत. राजप्रासाद सजत असताना हा मुलुखावेगळा राजा, नगराचा तोंडवळा बदलण्यात मग्न होता. जनतेस पिळून भव्य इमारती निर्माण करण्याचा सोस ही मोगल राज्यकर्त्यांची मानसिकता व खासियत! महाराजांना ते कधीच अभिप्रेत नव्हते. आपल्यासाठी हवामहल नि प्रजेसाठी कोंडवाडा ही त्यांची रीत नव्हती. रस्त्यांच्या रुंदीकरणाचे महत्त्व जाणून, त्यांनी ते काम सुरू केले. राज्याच्या गरम हवामानावर उतारा म्हणून बागबगीचे व कारंजांच्या निर्मितीचाही त्यांनी सपाटा लावला.

महाराजांच्या दरबारात अगणित रत्ने जमली होती. मुख्य म्हणजे त्यांचे बडोदे संस्थानात असणे महाराजांच्या गुणग्राहकतेमुळे घडले होते. बंगाली, मद्रासी, पंजाबी, इंग्रज... सारे स्वेच्छेने बडोद्यास आले. महाराजांनीही समभावाने त्यांचे स्वागत केले. 'गुणापूजा स्थानम् नच् लिंगम् नच वय :' हे लक्षात घेऊन गुणांची आणि गुणिजनांची कदर करत त्यांनी सर्वांचा प्रतिपाळ केला. त्यांच्या लेखी दोनच भेदांना महत्त्व होते. चारित्र्यसंपन्न लोक व कटकारस्थानी ! त्यांची दक्ष नजर हा भेद सहज पारखू शके.

बडोद्याचे गुणसंवर्धन करण्यासाठी आणि व्यक्तिश: स्वत:ची प्रगती साधण्याच्या उद्देशाने दहा वर्षांत अनेक गुणसंपन्न व्यक्ती डेरेदाखल झाल्या. सुरुवातीस, म्हणजे महाराजांच्या हाती सत्तेची सूत्रे आली तत्पूर्वी, बहादूर अंबालाल साकरलाल देसाई आणि अब्बास अली तय्यबजी यांचे बडोद्यास आगमन झाले होते. पुढे मनुभाई मेहता व रियासतकार दिवाण बहादूर गोविंद

सखाराम सरदेसाई बडोद्यास आले आणि पस्तीस वर्षे बडोद्याचे होऊन राहिले. काळ पुढे सरकत होता तसतसे महाराज राजकाजात मुरब्बी होत होते. गुणीजनांसाठी बडोदे संस्थान श्रद्धास्थान बनले. खाशेराव जाधव, केशवराव दाशपांडे, चिं. वि. जोशी, श्रीमती गंगुताई पटवर्धन... आणि कितीतरी! प्रसिद्ध 'रविकिरण मंडळा' चे महत्त्वाचे घटक कवी माधव ज्युलियन, कवी चंद्रशेखर यांना महाराजांचा वरदहस्त लाभला. कवी यशवंत तर बडोद्याचे 'राजकवी' होते.

अचेतन बाबी आणि दिखाऊ सौंदर्यालाच त्यांनी महत्त्व दिले असे नव्हे. आर्षदृष्टी लाभलेल्या या राजाने, नगराचे चैतन्य वाढवण्याचे औचित्य साधले. त्यांच्या रत्नपारखी स्वभावाची कीर्ती ऐकून, या नगरीत अखिल हिंदुस्थानी गुणिजनांचा आपसूक मेळावा भरला.

### शब्दार्थ

**टिपण** लिहिणे **अट्टाहास** आग्रह **महसूल** धारा, जमाबंदी, वसूल **द्योतक** दाखवणारे, चिन्ह **अंगभूत** समाविष्ट, अंग मानलेले **क्षितिज** आकाश आणि पृथ्वी एकत्र आल्यासारखा भास होणे **कनिष्ठ** लहान **तीव्र** उग्र, कडक **मुलुख** प्रांत, प्रदेश **आकस** द्वेष **रास्त** योग्य **प्राक्तन** नशीब **धुरंधर** कुशल, शहाणा **पुनर्रचना** नविन योजना **ओनामा** सुरुवात करणे **निद्रानाश** झोप न लागणे **झंझावती** तूफानी, वादळ **प्रतिपाळ** संभाळ **आर्षदृष्टी** ऋषीप्रमाणे पहाणारी दूरदृष्टी **अज्ञानांधकार** अज्ञानरुपी अंधार **ब्रीद** प्रतिज्ञा, ध्येय, बाणा **चाणाक्ष** चतुर **मुलखावेगळा** सर्वांहून निराळा **प्रघात** वहिवाट, चाल **खाक्या** बाणा **डेरेदाखल होणे** मुक्कामी हजर होणे

### वाक्प्रचार

**प्रयत्नांची पराकाष्ठा करणे** खूप प्रयत्न करणे **ओनामा करणे** सुरूवात करणे **सुतराम शक्यता नसणे** मुळीच शक्यता नसणे **प्रबोधन करणे** शहाणे करणे, ज्ञान देणे

### टीपा

**नीरक्षीर विवेक** योग्य अयोग्य ठरवण्याची क्षमता संस्कृत साहित्यातील एका कल्पनेनुसार राजहंसाजवळ दूध-पाणी एकत्रितपणे दिले असेल तरी नेमके दूध पिण्याची कुशलता त्याच्याजवळ असते. त्यावरुन जो माणूस चांगले वाईट यातील फरक जाणतो. त्याच्यासाठी हा शब्द वापरतात. नीर-पाणी, क्षीर - दूध

**रविकिरण मंडळ** सप्टेंबर 1923 मध्ये पुण्यात मराठीतील काही कवींनी (यशवंत, माधव जूलियन, गिरीश, श्री व. सौ. रानडे इ.) रविवारीएकत्र येऊन कविता वाचणे, काव्यचर्चा करणे अशा उद्देशाने स्थापन केलेले मंडळ. कवितेमध्ये आधुनिक विचारांचा प्रवाह यावा हा या कवींचा हेतू होता.

**गुणापूजा स्थानम नच लिंगम नच वय** व्यक्तीच्या गुणांचीच पूजा होते. त्याचे स्थान स्त्रीपुरुष भेद किंवा त्याचे वय या गोष्टी महत्त्वाच्या नसतात.

### स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) सयाजी महाराजांनी राज्यकारभारातील विकेंद्रीकरणासाठी कोणती पद्धत सुरु केली?

(2) 1882 साली महाराजांनी कोणती मिल सुरु करण्यास उत्तेजन दिले?

(3) 'आजवा सरोवर' साठी किती वेळ व पैसा खर्च झाला?

(4) बडोद्याचे राजकवी कोण होते?

(5) महाराजांनी तलावास कोणते नाव दिले? का?

(6) सयाजीराव महाराजांनी साखर कारखाना कोणत्या गावी काढला?

(7) बडोदा संस्थानाविषयी 'टाकाऊ' अशी नोंद कोणी केली होती?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) महसूल खात्यात महाराजांनी कोणते बदल केले?

(2) महाराजांच्या प्रसंगपरत्वे भाषणात कोणत्या गोष्टींचा उल्लेख असे?

(3) गुन्हेगारांची नीतिमत्ता सुधारण्यासाठी महाराजांनी कोणते प्रयत्न केले?

(4) सयाजीराव महाराजांनी कलांचे महत्त्व ओळखून ती कशी जोपासली ?

(5) आपल्या हातात आलेल्या राज्याविषयी सयाजीरावांची कोणती भावना होती ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) सयाजीरावांच्या 'टिपण पद्धत' या विषयी माहिती लिहा. ?

(2) शिक्षणक्षेत्रात सयाजीराव महाराजांनी 1885 साली कोणता महत्त्वाचा प्रयोग सुरु केला ?

(3) 'सयाजी सरोवर' या योजनेवर लोकांनी टीका का केली ?

(4) सयाजीराव महाराजांच्या सामाजिक कार्याविषयी माहिती द्या ?

(5) सयाजीराव महाराजांच्या दरबाराविषयी माहिती लिहा.

(6) राजप्रासादाची सजावट कोणी आणि कशी केली ?

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- बडोद्यातील प्रेक्षणीय स्थळांची छायाचित्रे व माहिती मिळवा.

**शिक्षक-प्रवृत्ती**

- बडोद्यातील सयाजीराव महाराजांनी निर्माण केलेल्या इमारती व राजमहाल, उद्याने इ. स्थळे दाखवण्यासाठी सहल आयोजित करा.

•

**14**

# बिनपैशांचे खेळ

**दिलीप वि. चित्रे**
**( जन्म : 1938 )**

श्री दिलीप चित्रे हे मूळचे बडोद्याचे. त्यांनी महाराजा सयाजीराव महाविद्यालयातून आर्किटेक (B. Arch) ची पदवी घेतली इ. स. 1965 साली ते लंडनला गेले आणि 1971 साली अमेरिकेला गेले. न्यूयोर्क मध्ये व वॉशिंग्टन D.C मध्ये प्रायव्हेट सेक्टर मध्ये काम केले आणि आता गेली 25 वर्षे V.S. गव्हर्मेन्ट मध्ये आर्किटेक्ट म्हणून काम करीत आहेत. सध्या ते फ्लोरिडा मध्ये स्थायिक होऊन आपल्या व्यक्तिगत आवडीची कामे करीत आहेत.

फोटोग्राफी, साहित्याचे वाचन लेखन, प्रवास आणि समाजकार्य ही त्यांची आवडीची कार्यक्षेत्रे आहेत. कुंपणापलिंकडले शेत, हिमगंध (कविता) अलिबाबाची हीच गुहा (दोन अंकी संगीत नाटक) कशासाठी, कुणासाठी मीना-अफघान मुक्तीचा आक्रोश आणि बहिष्कार इत्यादी लेखन त्यांनी केले आहे. (गुजराती कविता अनुवाद)

---

अलीकडे मी मुलं पाहतो. त्यांचे खेळ-खेळणी पाहतो. त्यांच्या खेळण्यांवर आणि खेळण्यासाठी होणारा खर्च पाहतो. अत्यंत काळजीनं, मुलांना कुठलाही अपाय होऊ नये या दृष्टीनं डिझाईन केलेली त्यांची खेळणी, प्ले-ग्राऊंड्स पाहतो, त्या वेळी वाटतं, की कुठं होतं हे सारं माझ्या लहानपणी ? केवळ आर्थिक परिस्थितीमुळे त्या वेळच्या माझ्या पिढीला हे मिळू शकलं नाही, की आताच्या सांस्कृतिक, आर्थिक गरजा बदलल्या ? मुलांना अधिकाधिक संरक्षणाच्या आवरणाखाली आवळलं, की पालकांनी फक्त कायदेकानूंच्या कसोट्यांनुसार मुलांच्या सुरक्षिततेचा विचार करताना मुलांचं बाल्य हरपलं ? ते खरंच हरपलं, की आम्ही वाढलो तेव्हा आमचंच बाल्य हरपलं होतं ? आणि आता आहे हेच खरं आहे ? या सगळयाला कारणीभूत काय आणि कोण ? समजा, असेल आमचं बाल्य हरपलं, पण आयुष्यात आमचं कुठं काय अडलं ? केवळ महाग किमतींच्या खेळण्यांमुळे बुद्धिमत्ता वाढते असं कुठं आहे ? खेळताना इजा न होता वाढलेली मुलंच शूर होतात असं कुठं आहे ? माझ्या लहानपणी कुठं होती खेळणी मला ? होते ते सगळे समवयीन मित्रमैत्रिणी. होती ती केवळ घरातीलच नव्हे, तर आजुबाजूची सगळीच आदरणीय वडीलधारी मंडळी. होते ते आश्वासक वातावरण. आणि होते ते सतत मनावर घडत जाणारे संस्कार. या संस्कारांवर आणि बिनपैशांच्या खेळण्यांशी खेळतच आमचा पिंड वाढला.

आज मी या गोष्टींचा विचार करायला लागलो तर मला माझं बालपण आठवतं. आजूबाजूचं पन्नास-पंचावन्न वर्षांपूर्वीचं माझ्या भोवतालचं जग आठवतं, माणसं आठवतात. माझे सवंगडी आठवतात अन् त्यांच्याबरोबर मी जे बिनपैशांचे खेळ खेळत वाढलो ते खेळ आठवतात...

आता मागे वळून बघताना हे लक्षात येतं, की आमचं बडोद्यातलं, कादवेकर वाड्यातलं वातावरण त्या वेळीही किती मोकळं होतं. आम्ही वाढत असताना मुलं-मुली हा भेदभाव कसा नव्हता ? वाढत्या वयाबरोबर ती जाणीव कशी झाली नाही ? की मोठ्यांनीसुद्धा पहिल्यापासूनच मुलांना मोकळीक दिल्यामुळं वातावरण आणि मनं कशी स्वच्छ, निर्मळ झाली ! देसायांची अनिल आणि मंदा, गडकऱ्यांची कुंदा, चांदोरकरांचा अरुण, दिनेश आणि सुधा, कादवेकरांचा रवी आणि देवू-म्हणजे देवयानी, आंबेगावकरांची परिमल, घोसाळकरांची सुलभा व बाबा आणि जंगमांचा भिखाराम, जाधवांचा शंकर, शिंद्यांचा याद्या-म्हणजे यादव अन् आमचे त्या वेळचे शिक्षक व आदर्श असलेले, अत्यंत गरिबीत वाढणारे, शाळेत न जाणारे पण जीवनाच्या आणि जगण्याच्या ईर्षेत अग्रणी असणारे, समोरच्या पडक्या कौलारू घरांमधून स्वत:ला पुरेसं अन्न नसतानाही कबुतरांची खुराडी जपणारे बापू, भुऱ्या, रोंग्या...आमचं सगळयांचंच एक विश्व होतं: बरोबर खेळण्याचं, भांडण्याचं, वाढण्याचं !

पण कुणाकडेही कसली खेळणी असल्याचं मला आठवत नाही. एक तर, त्या वेळी आतासारखी खेळणी उपलब्ध नव्हती. असती तरी ती विकत घेऊन देण्याची कोणाची ऐपत नव्हती. आणि ऐपत असती तरी वाड्यातल्या त्या एकंदर सांस्कृतिक वातावरणात मुद्दाम खेळण्यांशी खेळायची आवश्यकताही नव्हती !

आमचे खेळ होते ते सगळे बिनपैशांचे, आम्हीच तयार केलेले. अमुक पाहिजे, आणून द्या म्हणून घरात सांगायचं नाही. आपणच ती करमणुकीची साधनं तयार करायची आणि ती इतकी गंमतीची असत की आता आठवतांना सतत बदललेल्या काळाचीच जाणीव होत राहते.

सगळे खेळ सगळयांनी एकत्र खेळण्याचे. प्रत्येक सीझनप्रमाणे बदलणारे. दुपारचे वेगळे, संध्याकाळचे निराळे. उन्हाळयातले पावसाळयात नाहीत. पावसाळयातले थंडीत नाहीत.

उन्हाळयाच्या सुट्टयांमधली दुपार ही गोट्या खेळण्यात जात असे. गोट्यांना बडोद्याचा शब्द म्हणजे 'लखोट्या' बडोद्याची खास अशी एक परिभाषा आहे. निरनिराळया रंगीबेरंगी लखोट्या आमच्याकडे असत. मुंबईला मुलं ज्याला 'ढप्पर' म्हणतात त्याला आम्ही म्हणायचो, 'गिठ्ठ' . हे गिठ्ठे म्हणजे चांगले वजनदार, एकेक इंच व्यासाचे लोखंडी बॉल बेअरिंग्स असत. दुपारभर ते घरांच्या भिंतीवर बहेरून आपटले जात. भिंतीचं प्लॅस्टर उडून त्या विद्रूप होत. मुलांच्या आरडाओरड्यांनी अन् लखोट्यांवरून होणाऱ्या भांडणांनी आतले कावून जात-आणि आम्हांला वाड्याबाहेर हाकलून देण्यात येई. पण लखोट्या हा खास आमच्या आवडीचा खेळ असे. मी कधी उन्हाळयाच्या सुट्टीत मुंबईला मामाकडे आलो की तिथल्या चाळीतली मुलं जमवून लखोट्यांचे डाव मांडी. त्यांच्या 'गोट्या' , 'ढप्पर' या शब्दांची मी टर उडवत असे; तर माझ्या 'लखोट्या' , 'गिठ्ठ' या परिभाषेला ती मुलं हसत.

उन्हाळा संपता संपता भोवऱ्यांचे दिवस येत. आम्ही कधी तयार भोवरे बाजारातून विकत आणले नाहीत. सूरसागर तलावावरून पलीकडे गेलं की लहेरीपुरा दरवाजातून आत शिरल्यावर लगेच उजवीकडे एका सुताराचं लहानसं दुकान होतं. भोवरे बनवून देण्यासाठी आम्ही त्याच्या उरावर बसायचो. मग तो कुठला तरी लाकडाचा तुकडा घेऊन लेथवर चढवायचा आणि चिझलनं त्याला आकार द्यायला सुरुवात करायचा. भोवऱ्याचा आकार झाला की त्या गरगर फिरणाऱ्यां लेथवरच्या भोवऱ्यावर क्रेयॉनसारख्याच परंतु ऑइल पेन्टच्या वड्या तो दाबून धरायचा. भोवऱ्याचे रंग कसे, कुठले हवेत हे आम्ही ठरवत असू. असा दीडदोन आण्यांना भोवरा तयार करून मिळे. मग त्याला आर बसवण्याचं काम आमचं. ते कुशलतेनं करावं लागे. आरीचा खिळा किती मोठा घ्यायचा, तो किती आत ठोकायचा हे भोवऱ्याच्या आकारावरून ठरवावं लागे. खिळा बरोबर सरळ आत ठोकावा लागे. तो थोडा जरी तिरका आत गेला तर भोवऱ्याचा गुरुत्वमध्य जाऊन त्याचा तोल जात असे व त्याची फिरण्याची गती वाढत नसे. खिळा आधी ठोकून घ्यायचा. मग त्याचं डोकं उडवायचं. नंतर दगडावर घासून घासून ती आर टोकदार करायची. जाळीनं भोवरा लपेटून तो अशा तऱ्हेनं दुसऱ्या भोवऱ्यावर नेम धरून फेकायचा, की टोकदार आरीनं दुसऱ्याच्या भोवऱ्याला भोक पडलं पाहिजे. कोणी नवीन भोवरा करून आणला रे आणला, की दोनचार दिवसांत भरपूर भोकं पडून तो तोंडावर देवीचे व्रण असलेल्या चेहऱ्यासारखाच दिसायला लागे.

एक अवघड खेळ म्हणजे सायकलचं चाक दामटीत रस्त्यावरून चालवण्याचा. हा मला कधी नीट जमत नसे. पण भुऱ्या, रोंग्या, अनिल यात वाकबगार असायचे. सायकलच्या दुकानातून कुठल्या तरी जुन्या सायकलचं चाक आणलेलं असे. स्पोकस् नसलेलं. रबरी टायर नसलेलं. नुसतं लोखंडाचं रीम. त्याच्या घळीत काठी अडकवून ढकलत ढकलत, त्याचा तोल सांभाळत, त्याच्या मागून धावणं, हे वाटतं तेवढं सोपं नाही. सगळयांत म्हणजे ते डावीकडे, उजवीकडे वळवणं, त्याची गती कमी जास्त करणं हे त्याहून कठीण. आम्ही असल्या चाकांच्या मागे धावण्याचे खेळ खेळायचो तेव्हा क्वचित श्रीमंतांकडची मुलं राजमहाल रोडवर चाकांचे बूट घालून स्केटिंग करायची. मला खात्री आहे की त्यांना भुऱ्यासारखं हे असं सायकलीचं चाक दामटणं जमलं नसतं. हुल्लाहूपची रिंग कमरेभोवती गरागरा फिरवत ठेवणं जसं सगळयांनाच जमत नाही, तसलंच हे.

चौदा जानेवारी म्हणजे संक्रांत. बडोद्यासारख्या ठिकाणी डिसेंबर जानेवारी चांगलीच थंडी असायची. पण हे तर पतंगीचे दिवस. तेव्हा थंडीची मिजास मुळीच चालत नसे. मुंबई-पुण्याकडे आजही संक्रांतीतल्या पतंगीची गंमत नाही. ती फक्त गुजराथेतच. मी माझ्या मुलांना माझ्या लहानपणाच्या पतंगींच्या गोष्टी नेहमी सांगत असे. पण म्हणजे नेमकं काय याचं पुसटसंही चित्र नुसत्या कल्पनेनं त्यांच्या डोळयांपुढं उभं राहणं शक्य नव्हतं. शेवटी एकदा अमेरिकेतून मुद्दाम संक्रांत गाठून त्यांना बडोद्याला घेऊन गेलो. तो सगळा प्रकार त्यांना एवढा आवडला की चार वर्षांनी पुन्हा संक्रांतीला बडोद्याला घेऊन जाण्यासाठी ती मागे लागली आणि आम्ही पुन्हा गेलो.

मांजा बनवण्यापासून संक्रांतीची तयारी.

मांजा बनवण्याची धमाल महिना-पंधरा दिवस आधीच सुरू व्हायची. साहेबरावाच्या हॉटेलमधून रिकाम्या झालेल्या सोडा वॉटरच्या बाटल्या आणायच्या. पतंगींचा मांजा बनवायला आम्हांला सोडा वॉटरच्या बाटलीचींच काच लागायची. दुसरी चालत नसे. सोडा वॉटरची बाटली मी खलबत्त्यात घालून कुटायचो. काचा सगळीकडे उडायच्या, म्हणून खलाच्या व्यासाच्या आकाराहून थोडा मोठा असा गोल पुठ्ठा कापायचा. त्याच्या मधोमध बत्त्याच्या आकाराचं खोल भोक पाडायचं. त्यातून बत्ता आत घालायचा आणि पुठ्ठयाचं झाकण खलावर दाबून काचा कुटायच्या. अगदी बारीक. मग ती कुटलेली काच फडक्यात घेऊन बोटांनी गाळायचो. थोडक्यात, वस्त्रगाळ करायची. हे करताना काचेच्या तुकड्यांनी बोटं कापायची. पण त्याचं काहीच वाटत नसे.

एकदा दोरा सुतवला गेला की जीव भांड्यात पडायचा. केव्हा एकदा त्याची 'पॉवर' अजमावून पाहतोय असं व्हायच. पण नवीन ताजा मांजा संक्रांतीशिवाय मी काढत नसे.

मधल्या काही काळात मी पतंगीसुद्धा घरी बनवण्याचं सत्र सुरू केलं. मोठ्या आकाराच्या, सुंदर डिझाइन्सच्या, वेगवेगळया रंगांच्या कागदांचे सांधे जोडलेल्या पतंगीच्या प्रकाराना 'डोळेदार', 'लंगोटदार', 'माथेदार', 'चक्का','आद्धा','टुक्कल' अशी नावांची परिभाषा असे. त्यात पुन्हा स्वत:च्या क्रिएटिव्हिटींचा आनंद विलक्षण असे.

त्या तसल्या जानेवारीतल्या थंडीच्या दिवसांत स्वेटर घालून, मफलर गुंडाळून पाच-साडेपाचला वर चढल्या चढल्या मी पत्रे बडवून ''ओऽऽ काऽऽटी हैऽऽऽ !'' ची आरोळी ठोकून आसमंताला जाग आणून मग झुंजूमुंजू होण्याची वाट पाहत बसे. किंचित थोडंसं धूसर असं दिसायला लागताच पतंग उडवायला जाव तर त्या अंधूक प्रकाशात आकाशामध्ये दुसऱ्याही पतंगीच अस्तित्व जाणवे. त्या क्षणापासून ते पुन्हा सूर्य मावळून आकाशातली पतंग दिसेनाशी होईपर्यंत सगळा दिवस छपरावरच जाई.

आठवणींतल्या सगळया खुणा पुसल्या गेल्या-त्या फक्त वाड्याच्या आणि तिथल्या घरांच्या. पण माणसांच्या, त्यांनी दिलेल्या प्रेमाच्या, ज्या वाड्याच्या संस्कृतीनं माझ्यावर परिणाम केले त्या संस्कारांच्या खुणा कशा पुसल्या जाणार ? आणि ज्या वाड्यात आम्ही सतत बिनपैशांचे खेळ खेळून मोठे झालो, त्या खेळांच्या आणि ज्यांच्याबरोबरच हे खेळ खेळलो त्या सवंगड्यांच्या आठवणी ? त्या तर तशा सदैव ताज्याच राहणार !

## शब्दार्थ

**हरपणे** गमावणे, हरविणे **कसोटी** परीक्षा **इजा** उपाय, पीडा, जखम **समवयीन** सारख्या, वयाचे **पिंड** देह **सवंगडी** मित्र **ईर्षा** उत्साह, हौस, चुरस **अग्रणी** नेता, नायक **उपलब्ध** सापडलेले **ऐपत** सांपत्तिक सामर्थ्य **परिभाषा** विशेष अर्थाच्या शब्दांची सूचि **विद्रुप** कुरूप **वाक्बगार** हुशार माहितगार **धूसर** धुराच्या रंगाचा

## वाक्प्रचार

**कावून जाणे** त्रासून जाणे **टर उडवणे** उपहास करणे, फजिती करणे.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :**

(1) लेखक बडोद्यात कुठे रहात होते ?
(2) लेखकाचे खेळ कसे होते ?
(3) लेखकाच्या लहानपणी कोणत्या गोष्टी नव्हत्या ?
(4) लेखक उन्हाळ्याच्या सुट्टीत कोणते खेळ खेळत असे ?
(5) 'ढप्पर' ला लेखक आणि त्याचे मित्र काय म्हणत असत ?
(6) पतंगांची नावे लिहा ?
(7) सक्रांतीत लेखक छपरावर किती वेळ असे ?
(8) लेखकाच्या मित्रांची नावे लिहा.

**2. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) भोवरा कसा बनवला जातो ? भोवऱ्याचा खेळ कसा खेळला जात असे ?
(2) लेखकाच्या मते कोणता खेळ अवघड आहे ? तो कसा खेळला जाई ?
(3) लेखक आणि त्यांचे मित्र मांजा कसा बनवीत असत ?
(4) श्री दिलीप चित्र्यांच्या मते, त्यांच्या बालपणीच्या कोणकोणत्या आठवणी सदैव ताज्या राहतील ?

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- तुम्ही खेळत असलेल्या बिन पैश्यांच्या खेळांची यादी करा.
- मुलींचे बिनपैशांचे खेळ कोणते ते शोधून काढा.
- घरातील आजी आजोबांच्या बालपणातील गोष्टी ऐका.
- ''रम्य ते बालपण'' निबंध लिहा.

•

# 15 भारतीय जवानाचें पत्र

**नारायण सुर्वे**

**( जन्म : 1926 मृत्यू : 2010 )**

आधुनिक वास्तववादी मराठी काव्याच्या प्रांतात 'नारायण सुर्वे' हे अतिशय महत्त्वाचे नाव आहे. त्यांच्या आगमनानेच मराठी काव्यरसिकांमध्ये एक वेगळी चेतना निर्माण झाली होती परभणी येथे भरलेल्या 1995 च्या आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. 1998 मध्ये त्यांना पद्‌मश्री पुरस्कार मिळाला. इ. स. 1962 साली त्यांनी लिहिलेल्या कवितांचा पहिला संग्रह 'ऐसा गा मी ब्रह्म' प्रकाशित झाला. त्यांचे 'जाहीरनामा', 'नव्या माणसाचे आगमन', 'माझे विद्यापीठ', 'सनद', इ काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत.

प्रस्तुत कविता म्हणजे त्यांच्या पत्नीला 'भारतीय जवानानें', लिहिलेले पत्र आहे पण हे लिहितांना सैनिकाला वेळोवेळी पुढच्या युद्धाला तयार व्हावे लागते आणि त्याचे पत्रलेखन थांबते. ही कविता वाचताना हे सैनिक त्याच्या घराचे गावाचे, हिमालयाचे वर्णन करतो भारत-चीन युद्धाच्या वेळी सैनिकाच्या मनात निर्माण झालेल्या भावस्थितीचे वर्णन या कवितेत केले आहे.

---

आपलें लाल कौलांचें दोन खणी इवलें सुंदर घर
तांबड्या मातीच्या भिंती; त्यावर तूच चितारलेले मोर
घरासमोरचा जुना पिंपळ घेऊन चांदण्यांचा घडा
हिमालयाच्या रक्षणासाठी जसा मी इथे बंदुक घेऊन खडा
चिमणे हंसपक्षी निजले असतील तुझ्या उबदार कुशींत
पिंपळावर आला असेल चंद्र; माझी याद सांगीत
हवी होतीस तूंही इथे पट्टे गोळयांचे झरझर सारीत
दोघांनीं मिळून आपण शत्रूस केलें असतें गारद
थांब; हुकुम झाला आहे, अग्निवर्षाव करतो, मग लिहितों,
निघालों तेव्हा सूर्य येत होता डोंगराआडून पेंगत
हिरव्या पर्णराजींत गांव होतें कमळासारखे उमलत
दंव होते लकाकत; पांखरें दिगंत व्यापाया निघालीं
शेतांत हारीनें वाकलेलीं कणसें तरारुन चमचमलीं
बांधून पाठीस भाकर निघालों आईचा आशीर्वाद घेऊन
दोन्ही भुजांच्या पंखांत उभी होतीस बोबडपंखी घेऊन
गांवकरी आले, पाठीवर हात फिरले, छातींत बळ आलें
जयजयकाराने इंद्रायणीचे; माझ्या गंगेचे पुन्हा काठ भिजले
थांब; हुकुम झाला आहे, पुढे सरकण्याचा, आधी पुढे सरतों.
हा भव्य हिमालय चकाकणारे बर्फ, ही उत्तुंग शिखरें
झुलत इथे आकाश चिवचिवत उडती नटरंगी पाखरे
अशा थोर भूमींत जन्मलों आपण इथेंच जन्मला बुद्ध
सांडले अकारण रक्त चिन्यांनीं लादलें अकारण युद्ध
चिनी सैनिक हेरूं; पिटाळून लावूं भारतीय हद्दीतून
तेव्हाच घराच्या ओढीनें आमचे पाय वळतील सीमेवरून
सांग गांवकऱ्यांना हुशार रहा ! आणि तूंही थोडी हो धीट
विजयी होऊन परत येणार आहे; तूंच ना काढलीस तीट
आगे बढो; हुकुम झाला आहे, आम्ही ध्वज उंचावून चालतों.

### शब्दार्थ

**दोन खणी** भाग (दोन खोल्या) **खडा** उभा **उबदार** गरम, उष्ण **गारद** पराभूत **लकाकत** दिशेच्या अंतिम टोकापर्यंतचा प्रदेश **भुजा** बाहू **हेरणे** शोधणे

### वाक्‌प्रचार

**पिटाळून लावणे** पळवून लावले **गारद करणे** पराभूत करणे, हरवणे.

### स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :**

(1) जवानाच्या घरा समोर कशाचे झाड आहे ?
(2) गावकऱ्यांनी सैनिकाला कसा निरोप दिला ?
(3) जवान देशाच्या रक्षणासाठी कोठे उभा आहे ?
(4) भारतीय जवानाचे युद्ध कोणा विरुद्ध आहे ?
(5) आपल्या लहान मुलांसाठी जवानाने कोणते शब्द वापरले आहे.

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) घराचे वर्णन कवीने कवितेत कसे केले आहे.
(2) चिनी सैनिकांनी अकारण रक्त सांडले आहे असे कवी का म्हणतो ?
(3) हिमालयाचे वर्णन कवितेत कसे केले आहे ?
(4) युद्धावर जाताना जवानाला गाव कसे दिसते ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) कवितेतील गावाचे वर्णन करा ?
(2) गावकऱ्यांना हुशार रहा असे जवान पत्रात का लिहीतो ?
(3) लढाईच्या मैदानात जवान आणि पत्नी यांनी मिळून काय केले आहे ?
(4) जवानाने गावकऱ्यांना कोणता संदेश दिला आहे का ?

**4. पुढील कल्पना स्पष्ट करा :**

(1) घरासमोरचा जुना पिंपळ घेऊन चांदण्यांचा घडा:
पिंपळाच्या पानांवर पडणारा चांदण्यांचा प्रकाश पाहून कवीला वाटते की पिंपळाचे झाड चांदण्यांची घागर घेऊनच उभे आहे.
(2) चिमणे हंसपक्षी ............ कुशीत :
सैनिकाच्या पत्नीच्या कुशीत झोपलेली सैनिकाची लहान मुले त्यांना कवी 'चिमणे' हंसपक्षी असे म्हणतो.
(3) बोबडपंखी - लहान मुले.

### विद्यार्थी-प्रवृत्ती

- नारायण सुर्वे यांच्या कविता मिळवून वाचा
- भारतीय सैन्याविषयी माहिती गोळा करा.

### शिक्षक-प्रवृत्ती

- भारतीय जवानाविषयी माहिती सांगा.

### भाषाभिव्यक्ती

भारत आणि चीन यांच्यातील युद्धांची जखम भारताच्या हृदयावर कायम राहील. भारतावर हा हल्ला मित्र म्हणून समोर आलेल्या देशाने अतिशय अचानक केलेला होता, त्यामुळे पुरेसे शस्त्रबल नसून सुद्धा भारतीय फौजेने शत्रूचा सामना केला. त्यांच्याशी झुंज देताना अपुरी शस्त्रे, अपुरे खाद्यपदार्थ आणि रक्त गोठवणारी थंडी असूनही अपुरे गरम कपडे अशा सर्वप्रकारच्या कमतरतेतही भारतीय सैनिकांनी आपले मनोधैर्य न गमावता शत्रूशी लढा दिला.

या कवितेतील सैनिक अशा झुंजार, लढाऊ, भारतीय सैनिकाचे रूप स्पष्ट करतो. त्याच्या पत्रातून तो स्वत:च्या पत्नीला धीर देतो आहे. मध्ये मध्ये त्याला जेव्हा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचना येतात तेव्हा त्याला पत्रलेखन थांबवावे लागते. आपले कर्तव्य पार पाडताना बाकी सगळी नाती, आठवणी घर, दार, यांना विसरून तो फक्त देशाचा आणि देशाच्या सीमा वाचवण्याचा विचार करतो हे पाहून वाचकाचे मन अभिमानाबरोबर करुणेनेही भरून येते.

•

# 16 छात्रालयातील आठवणी

**आनंद यादव**

**( जन्म : 1935 मृत्यू : 2016 )**

आनंद रतन यादव यांचा जन्म कोल्हापुरजवळ 'कागल' या छोट्यांशा गावात झाला. एका गरीब शेतकरी कुटुंबात जन्म झाल्यामुळे शिक्षणासाठी खूप त्रास सहन करावा लागला. शिक्षणासाठी त्यांनी घर सोडले व पुण्यात राहायला गेले. पुढे खूप मेहनत करून त्यांनी पुणे विद्यापीठाची डॉक्टरेट मिळवली. ते तेथे भरलेल्या 83 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. आनंद यादव यांचे 'झोंबी' हे गाजलेले पुस्तक आहे या पुस्तकाला 1990 चा साहित्य अॅकेडमीचा पुरस्कार मिळालेला आहे. या शिवाय 'नटरंग', 'घरभिंती', 'स्पर्शकमळे', 'गोतावळा', अशी अनेक पुस्तके त्यांनी लिहिलेली आहेत. प्रस्तुत पाठ हा 'नांगरणी' या पुस्तकातून घेतलेला आहे.

यामध्ये एका गरीब पण तीव्र संवेदनाशीलता असणाऱ्या कल्पक मुलाने आपल्या आठवणी सांगितल्या आहेत. त्याबरोबर त्यांचे भावविश्व, त्यांची प्रतिभाशक्ती कशी आकारत होती. याचेही चित्रण त्यांनी केले आहे.

---

छात्रालयात आठ आठ दिवसांनी कामाची पाळी बदलत होती. दोन दोन विद्यार्थ्यांना एक एक काम विभागून दिलं जात असे. छात्रालयातील दोन्ही गोपुरी संडासांच्या आधारानं नि बागेतल्या पालापाचोळयाच्या आधारानं सोनखत तयार केलं जात असे. संडाससफाईची पाळी आली की विद्यार्थी नाराज होत. पाण्यानं रोज संडास धुवावा लागत असे. साठलेली घाण उघडी करून तिच्यावर पालापाचोळा टाकावा लागत असे. तो थर पूर्ण केला की पुन्हा संडासाचे उपकरण बसवावं लागत असे. बसवण्यापूर्वी ते धुऊन घ्यावं लागे. हे सगळं करताना विद्यार्थ्यांच्या कोवळया जिवावर येई. ब्राह्मण विद्यार्थी तर खूपच नाराज होत. मानसिक तयारी करावी लागे. अशा वेळी तो नास्ता वगैरे प्रथम खाऊन घेई. मग संडाससफाई करी. त्यानंतर आंघोळ करी नि उद्योगाला लागे. तरीही दिवसभर काही त्या हातांनी खावं असं वाटत नसे. उलट स्वैपाकाची पाळी ही रोज सकाळी संध्याकाळी जवळ जवळ दीड-पावणेदोन तास खाऊन टाकत असे. ती इतर कोणत्याही पाळीपेक्षा वेळखाऊ पाळी होती. झाडणं, दळणाचं धान्य निवडणं, पाणी भरणं यासारखी कामं एकदा अर्धापाऊण तास केली की दिवस निभावत असे.

मला एक गोष्ट दिसून आली की संडासपाळी ही कुणालाही नको असली तरी ती रोज फारच थोड्या वेळात आवरणारी गोष्ट आहे. उरलेला वेळ मला माझ्यासाठी इतर कामात घालवता येण्यासारखा आहे. म्हणून मी ज्याच्याकडं संडाससफाईचं काम आहे, त्याला माझं काम देत असे. मी एकदा संडाससफाई करत असे. जन्मभर गुराढोरांचं शेणमूत भरलं. गावाकडचं घर तर हगणदारीकडलाच त्यामुळं रोज परड्याकडनं म्हशी घेऊन जातायेता ती पार करावी लागत होती. त्याचा मानसिक फायदा मला संडाससफाई करताना होऊ लागला. खऱ्या अर्थानं मी सर्वोदयी झालो. गांधीजींच्या तत्त्वानुसार माझ्या हातून आरोग्यसेवा घडू लागली नि सगळयाच प्रकारचं काम समान योग्यतेचं मानण्याचा आदर्शही मी घालून दिला. ज्यांना अशा कामाची सवय नसते किंवा जे शारीरिक कामच कधी करत नाहीत अशासाठी हे समानतेचं तत्त्व होतं, हे माझ्या सहज ध्यानात येऊन गेलं.

बरेच दिवस माझं हे काम सुरळीत चाललं होतं; पण हळूहळू एक गोष्ट घडली. बारीकसारीक कारणावरनं छात्रालयातील विद्यार्थ्यांत कुरबुरी होत. मीही त्यात हळूहळू सापडत गेलो. माझी ज्याच्याशी कुरबूर होई तो माझ्याविषयी माझ्यामागं मित्राबरोबर बोलताना माझा उल्लेख 'आपल्या छात्रालयाचा भंगी ' असा करी. मला बघून मित्रांना 'जातो; जरा संडासात भर टाकून येतो. सेवा करणारे जय्यत तयार असताना हयगय का करा ? ' असं तो म्हणे. संडासला निघून जाई.

...मन खट्टू होऊन जात होतं. पण काही करता येत नव्हतं. खाली मान घालून सकाळी सफाई करायला गेलो की सूडबुद्धीनं कुणी तरी वाट्टेल तशी उपकरणावरच घाण करून ठेवलेली असे. त्यामुळं पुढंपुढं मलाही हे काम नको नकोसं वाटू लागलं. मी माझ्या वाटणीला येतील तीच कामं क्रमानुसार करू लागलो.

कॉलेज संपवून घरी आलो की जेवण करून प्रथम डोणीवर जाऊन कपडे धूत असे. उलट आबा-तुकाराम विश्रांती घेत. तीनसाडेतीन वाजता उठून कपडे धूत. माझा जेवल्या बरोबर लगेच कपडे धुण्याचा हेतू फार वेगळा होता. हायस्कूलची मुलं आपले कपडे घाईघाईनं सकाळी धूत, त्याच घाईनं आंघोळ करत, पाळीची कामं करून टाकत. जेवत नि अकरा ते पाच हायस्कूलला जात. त्यांच्या या गडबडीत त्यांचा धुण्याचा किंवा अंगाचा साबण पुष्कळ वेळा डोणीवर, इकडं तिकडं दगडावर,

बाजूला विसरून राहिलेला असे. मला तर कोणत्याही साबणासाठी पैसे खर्चणं शक्य नसे. म्हणून मी ही वेळ निवडली होती. ह्या वेळेत कुणाच्याही विसरलेल्या साबणानं मी माझे कपडे भराभर धुऊन काढत होतो. पुष्कळ वेळा साबणाचे बारके बारके तुकडे तिथंच पडलेले असत. ते गोळा करून मी वापरत होतो. तुकडे एकत्र दाबून साबणाचा मुटका करत होतो नि तोच साबण पुरवून पुरवून वापरत होतो. एक कपडा धुताना झालेल्या फेसात दुसरा कपडा भिजवून बडवत होतो. अंगाचा साबण मात्र मी कधीच अंगाला लावला नाही. एक तर आजवर मी अंगाचा साबण कधी वापरला नव्हता. त्याची मला गरजही कधी भासली नव्हती. चिपेनं अंग घासून आंघोळ करण्याची कुणब्याची परंपरा मी चालवीत होतो. दुसरं असं तो साबण लावला तर त्याचा अंगाला वास येणार होता. त्या वासावरनं मी कुणाचा साबण अंगाला लावलाय याचा पत्ता लागला असता.

सूतकताई करता करता विद्यार्थ्यांशी गप्पागोष्टी होत. ह्या गप्पागोष्टीत सूर लागला की विद्यार्थी आपल्या गावाकडच्या गोष्टी सांगत. आपले आईवडील कसे प्रेमळ आहेत, भावंडं काय काय करतात, याविषयी ते बोलत. घराकडच्या गंमतीजमती सांगत. मीच तेवढा एकटा देशावरचा होतो. बाकीची सगळी कोकणातली मुलं. त्यांचे आईवडील त्यांना अधून-मधून भेटायलाही येत. त्यांना खाऊचे डबे आणत. घरवेडी मुलं आईवडील परत जाताना रडत. त्यांची इच्छा शिक्षण सोडून देऊन गावाकडं येण्याची असे. आईवडील आणि गरुजी त्यांची समजूत काढत. चार दिवस मग ती उदास होऊन वागत. पुन्हा छात्रालयात रमून जात. घराकडच्या आठवणी उत्साहानं सांगत.

माझ्याजवळ सांगायला अशा काहीच आठवणी नव्हत्या. आईदादाविषयी चांगलं सांगण्याजोगं माझ्याजवळ काही नाही, याचं वाईट वाटे. मी ज्या परिस्थितीत रत्नागिरीला शिकायला आलो ती परिस्थिती मी संपूर्ण लपवून ठेवली होती...

एकदा नकळत घराकडच्या आईदादांच्या काल्पनिक आठवणी सांगितल्या... माझ्या लहानपणापासनंच मी शिकून मोठा साहेब व्हावं, असं त्यांना कसं वाटतं, मी शाळेला जाऊ लागलो त्या वेळी दसऱ्याला त्यांनी मला साहेबासारखा पांढराशुभ्र कोट, तशीच एक पँट नि बूट कसा आणला होता, त्या पोशाखात माझा एकट्याचा फोटो कसा छान काढला आहे, मी सातवी पास व्हावं म्हणून आईंदादांनी जोडीनं कसा नरसोबाच्या वाडीच्या दत्ताला नवस केला होता, तो फेडण्यासाठी आम्ही तिघेही कसे गेलो होतो, तिथं कृष्णा नदीत पाय घसरून मी कसा बुडत होतो, आईनं मला पदर देऊन कसं वाचवलं, मी रत्नागिरीला येताना त्यांना किती किती वाईट वाटलं, पण माझं शिक्षण पूर्ण व्हावं म्हणून त्यांनी आपली मनं कशी आवरली, हे रंगवून सांगितल.

ओघाओघात या आठवणी सांगण्यात अडकत गेलो. आपआपले आईवडील आपल्या शिक्षणासाठी किती धडपडतात नि कष्ट करतात या विषयावर गप्पा रंगल्या होत्या. प्रत्येकजण त्यात हिरीरीनं भाग घेत होता. दुसऱ्याला सांगण्यासाठी आग्रह करत होता. सोहळा सुरू असल्यासारखं झालं होतं...मी बाजूला राहणं अशक्य झालेलं. मग दोस्त-मैतरांचे प्रसंग गोळा केले आणि त्यात माझी कल्पकता मिसळली.

खोलीवर गेल्यावर डोळे मिटून उदासीन होऊन बसलो.

अशी उदासीनता अधनंमधनं कधी कळत तर कधी नकळत अनेक कारणांनी येत होती. अशा अवस्थेत रात्री प्रार्थनेच्या वेळी काही भक्तिपर गीतं, भजनं म्हटली जात असत, त्यांतील देवाच्या आळवणीत मी व्याकुळ होऊन रमून जाई. भजन म्हणता म्हणताच देवाशी बोलण्याचा प्रयत्न करी. 'माझ्यासाठी अशी परिस्थिती का निर्माण केलीस ?' म्हणून विचारी. डोळे भरून येत. शोकावेग अनेक वेळा आवरेनासा होई.

माझ्या खोलीतला तुकाराम असाच घरवेडा झालेला. तो मोठी मोठी पत्रे आपल्या आईवडिलांना लिही तेवढीच मोठी पत्रे त्याला घरून येत. त्याच्या कुटुंबालत तो जीव की प्राण होता. पण परिस्थितीमुळे त्याला रत्नागिरीला छात्रालयात राहावं लागल होतं. त्याला छात्रालयातली पाळीप्रमाणं येतील ती कामं करायला नको वाटे. ती सगळी कामं त्याला बायकी वाटत. मग तो आपल्या नास्त्यातला थोडा नास्ता मला देई नि माझ्याकडनं प्रसंगी कामं करून घेई. घरून आलेल्या पैशातनं हळूच हॉटेलातल चमचमीत खाऊन येई. कोणत्या हॉटेलात काय चांगलं मिळतं, ते रसिकतेनं सांगे. मिसळ, चिवडा, कांदापोहे, भजी, शिरा, चहा यापलीकडं त्याची झेप नसे. मी त्याचं कौतुक ऐकून 'असं का' म्हणत तोंडातल्या तोंडात सुटलेलं पाणी गिळत असे... क्षणभरानं मनाला आदर्शाची आठवण करून देई. त्याचा फौजदारी बडगा दाखवून देई.

सप्टेंबर महिना. फिरणं हुंदडणं कमी होऊन अभ्यास जोरात चालला होता. तुकारामचं लक्ष अभ्यासात नव्हतं. तो नुसताच पथारीवर उताणा पडून राही नि उघड्या छातीच्या आसपासचं अंग एका हातानं चोळे. मग उठून भराभर पत्रं लिहीत बसे.

जुनी पत्रं ट्रंकेतनं काढी नि वाचत बसे.

त्या दिवशी त्यानं मला आपली घरची पत्रं वाचायला दिली. दहा पंधरा विस्तृत पत्रं मी वाचली. भावंडांचे, आई-मुलांचे, वडिलांचे गाढ प्रेमाचे धागे त्यात उलगडत होते. त्या धाग्यांनी हे कुटुंब कसं एकमेकाला बांधलं गेलंय, याची कल्पना आली. त्याचं कुटुंबच्या कुटुंब नावनिशीवार, वयवार माझ्यासमोर उभं राहिलं. त्यांचे आवाजही माझ्या कानावर येऊ लागले. मनानं मी त्या कुटुंबाला फार जवळंच मानू लागलो... तुकाराम आणि मी मग त्याच्या कुटुंबाविषयी अर्धी अधिक रात्र बोलत बसलो. सगळयांच्या प्रेमाच्या कथा तो मला सांगत होता नि मी उपाशी माणसासारखा हपापून त्या ऐकत होतो.

दुसरे दिवशी संध्याकाळी मी चिटणीससरांच्याकडं थोडा वेळ जाऊन प्रार्थनेच्या वेळी परत आलो, तर मला कळलं की तुकाराम दोन-तीन दिवसांसाठी गावी निघून गेलाय.

...मला एकदम एकटं एकटं वाटू लागलं. रात्रीचं जेवण आटोपून मी खोलीवर आलो नि अंथरुणावर आडवा झालो. तुकारामाची पथारी तशीच पाखरू हरवलेल्या घरट्यासारखी मोकळी पडली होती.

...घरात माझ्या हातरुणाची जागा अशीच मोकळी पडली असणार. पंगतीची येळ. सगळी भावंडं आता जेवून एका कडंनं हातरुणावर पडली असतील. न्हाई तर हातरुणावर बसून गप्पा मारत असतील. मोकळया जाग्याकडं बघून माझ्या आठवणी निघाल्या असतील...'ह्या वक्ताला दादा रत्नागिरीत काय करत असंल बरं ?' आईला वाटत असंल; पोरगं जेवलं असंल का नसंल अजून ? दादा मळयात एकटाच असणार. शिवा नाळरोगी. त्येला वस्तीला जावं लागतंय का कुणाला दखल ? शिवाला निसाची कामं अजून जमत न्हाईत. मळयात आला जुंधळयाच्या भांगलणी सुरू झाल्या असतील. ह्या दिसांत हीचका मळयात असत्यात. सहाजणांचं सहा आरं एकदम हुईत असतील. दादाआई, हिराशिवा, धोंडूसुंदरा एकाकडंनं एका रांगंत एकदम बसत असतील...जुंधळयाला वाटत असंल, आवंदा आनंदा कसा दिसत न्हाई ?... बैलास्नीबी असंच वाटत असंल. झाडंसुदीक येडबडल्यागत झाली असतील... मी हितं आठंग्या वनात एकटाच येऊन खुळयागत पडलोय.

मी उठलो नि कंदिलाची वात वर केली. कवितांची वही काढली नि मनात येईल ते 'अष्टाक्षरीत' लिहीत बसलो. जिवात गावाकडच्या सगळया आठवणी गजबजून उठल्या. नवं काही तरी सापडल्यागत झालं नि घरची माणसं, पिकं, झाडं, जनावरं, मळा, घर, माती यांना घेऊन भरभरून कविता करू लागलो.

अजूनपर्यंत पत्रातनं जुजबी माहिती आईदादाला कळवीत होतो. पण आता तुकारामसारखी दीर्घ दीर्घ पत्रं लिहावीत असं वाटू लागलं. आईची अनेक प्रेमळ रूपं आठवू लागली. दादाच्या दराऱ्याखाली ती दडपली होती. तरीही जमेल तेवढी माया माझ्यावर नि भावंडांवर ती करत होती. दादाचा निर्दय, निष्ठुर चेहरा पालटून मला तो मवाळ दिसू लागला. संसारानं गांजलेला, दारिद्र्यानं चिंबून गेलेला, कष्टानं पिचून जाता जाता त्यातच घटकाभराची विश्रांती शोधणारा, गतानुगतिक परंपरांचा बळी झालेला एक साधा शेतकरी जीव वाटू लागला. कष्टणारी भावडं युगानुयुगं महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांत उगवणारी नि सातत्यानं जळणाला तोडली जाणारी, तरी पुन्हा उगवणारी झाडं वाटू लागली. त्या सगळयांवर आपला जीव ओतावा असं वाटू लागलं.

मी आतबाहेर पालटल्यागत झालो नि घराकडं मोठीमोठी पत्रं लिहून सगळयांच्या आठवणी जागवू लागलो. सगळयांच्या तपशीलवार चौकशा करू लागलो. पत्रं लिहिताना जीव गावाकडं उडून गेल्यासारखा वाटू लागला. दौलताच्या गोबऱ्या आठवणी अधिकच व्याकुळ करू लागल्या.

गावाकडं असताना रत्नागिरीला जायचं ठरलं तेव्हा कल्पनेत मी रत्नागिरी रंगवली होती. तिथलं छात्रालय, कॉलेज, विद्यार्थी, प्राध्यापक. निसर्ग आणि त्या सर्वांतील वावरणारे आपण मनानं रंगवत कागलात हिंडत होतो. शरीरानं तिथं होतो, तरी मनानं रत्नागिरीत होतो. आता शरीरानं रत्नागिरीत असूनही मनानं गावाकडं जाऊ लागलो. तिथं रमू लागलो नि रत्नागिरी निमित्तमात्र भोवताली राहू लागली. मनपाखराचा विपरीत खेळ सुरू झाला.

### शब्दार्थ

**डोणी** कपडे धुण्याचा दगड **मैतर** मित्र **आठंग्या वनात** आडरान **हयगय** दुर्लक्ष, हेळसांड **जुजबी** किरकोळ, हलके

### वाक्प्रचार

**जीवावर येणे** कंटाळा येणे **कुरबूर होणे** असंतोष होणे, नाराजी होणे **कष्टाने पिचून जाणे** कष्टाने थकून जाणे.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) छात्रालयात किती दिवसांनी कामाची पाळी बदलत होती ?
(2) छात्रालयात सोनखत कसे तयार केले जात होते ?
(3) लेखक छात्रालयात कपडे धुण्यासाठी कधी जात होते ?
(4) लेखकाने पास व्हावे म्हणून लेखकाच्या आई वडिलांनी कोणाला नवस केला होता ?
(5) लेखक शिक्षणासाठी कुठे गेले होते ?
(6) लेखकाला कोणत्या कामाची पाळी नकोशी वाटे ?
(7) तुकाराम लेखकाला त्याच्यातील थोडा नास्ता का देत असे ?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) लेखक आपले कपडे कसे धूत असे ?
(2) रत्नागिरीला जाण्याअगोदर लेखकाने कोणती कल्पना रंगवली ?
(3) लेखकाला छात्रालयाचा भंगी असे का म्हणत होते ?
(4) तुकारामाने आपल्या घराविषयी काय सांगितले.
(5) लेखक खऱ्या अर्थाने सर्वोदयी झाला असे का म्हणतो ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) लेखकाने आपल्या आईदादांच्या कोणत्या काल्पनिक आठवणी सांगितल्या ?
(2) विद्यार्थी आपल्या गावाकडच्या कोणकोणत्या गोष्टी सांगत होते ?
(3) तुकारामाने पत्रात काय लिहिले होते ?
(4) शिक्षणासाठी लेखकाने कोणते कष्ट घेतले ?
(5) विद्यार्थी सुतकताई करताना आणखी काय करत असत ?
(6) लेखकाला एकटेपणा वाटल्यावर त्याने काय केले ?

### विद्यार्थी-प्रवृत्ती

- आनंद यादवांचे 'झोंबी' हे पुस्तक मिळवून वाचा.
- विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागात जाऊन त्या जीवनाचा अभ्यास करावा.

### शिक्षक-प्रवृत्ती

- आनंद यादवांविषयी आणखी माहिती सांगा. मुलांना ग्रामीण भागात घेवून जावून सहलीचे आयोजन करणे.

## भाषाभिव्यक्ती

स्वत:चे घर, आईवडील, भावंडे आणि मायेची माणसे या सर्वांना सोडून परक्या गावातील छात्रालयामध्ये (Hostel) राहणे, तेथील समवयस्क मुलांशी नाते निर्माण करणे नव्या वातावरणाशी जुळवून घेत अभ्यास करणे हे खरे पाहता कठीणच असते. त्यांत घरची परिस्थिती यथातथा असेल तर जवळ असणाऱ्या तुटपुंज्यां रकमेत, सगळ्या तडजोडी करत, इतरांना काही कळू न देता आपला दिनक्रम सांभाळणे ही तर तारेवरची कसरतच असते. आनंद यादव यांचे घर कोकणापासून दूर, घरच्या माणसांची आठवण आली तरी त्यांना भेटणे अशक्य, अशावेळी लेखक स्वत:ला आणि इतरांना समजून घेत आपली जीवनदृष्टी कशी घडवतो, माणूस म्हणून कशारीतीने विकसित होतो, आपल्या समंजस आणि शहाण्या स्वभावानुसार वागण्यामुळे सगळ्यांचे भान त्याला कशारीतीने येते हे यात पाहता येते त्यांच्या घरच्यांबरोबरच गुरेढोरे, झाडेपाने, मळा, रान याच्याशी असणार लेखकाचे नाते यामध्ये फार सहृदयतेने वर्णन केले आहे.

•

# 17 नावात काय नाही?

**श्री मुकुंद टाकसाळे**

'टाकसाळीतील नाणी' हा या लेखकाचा पहिलाच विनोदी कथासंग्रह आहे चि. वि. जोशी, पु. ल. देशपांडे यांच्या सारख्या महान लेखकांची विनोदाची परंपरा मराठी साहित्याला लाभली आहे. त्यांची परंपरा समर्थपणे पेलण्याची ताकद टाकसाळे यांच्या लेखनात आहे. त्यांच्या कथांमधील निर्व्याज विनोदाच्या दर्जामुळे ते, आजचा एक लक्षणीय विनोदी लेखक म्हणून मान्यता पावले आहेत. प्रसंगनिष्ठ आणि शब्दनिष्ठ विनोद असे दोन्ही प्रकार त्यांच्या लेखनात दिसून येतात.

त्यांनी चोवीसहून अधिक पुस्तके लिहिली आहेत. त्यातील काही - मिस्किलार, हसंबद्ध, साडेसत्रावा महापुरूष, राधेने ओढला पाय, आनंदी आनंद, गमतीगमतीत, जयवंत दळवींचा विनोदनामा, नाही मनोहर तरी, पु. ल. नावाचे गारूड, सक्काळी सक्काळी हास्यमुद्रा अशी अनेक पुस्तके त्यांची आहेत.

---

शेक्सपिअरचे अन् माझे एका वाक्याबाबत अगदी टोकाचे मतभेद आहेत. ते सुप्रसिद्ध वाक्य म्हणजे 'नावात काय आहे?' शेक्सपियरसारख्या जबाबदार नाटककारानं इतकं बेजबाबदार विधान करावं, याचं आश्चर्य वाटतं.

त्याला आमच्या बहिणीसारखी म्हणजे चि. सौ. कां. पमीसारखी बहीण असती आणि विजय जोशीला हुडकून काढायची कामगिरी तिनं त्याच्यावर सोपवली असती, म्हणजे समजला असता हिसका! महाराष्ट्र बँकेच्या शिवाजीनगर येथील चार-पांच मजली 'लोकमङ्गल' इमारतीत नेमका आपल्याला हवा तो विजय जोशी हुडकणं म्हणजे गवताच्या गंजीत हरवलेली सुई हुडकत बसण्यासारखाच प्रकार.

आमची पमी म्हणजे चक्रमपणाचा अर्क आहे, अर्क! काय, तर, म्हणे--

. 'मी स्वत:ला दाखवून घेणार नाही. पोह्याच्या बश्या घेऊन बाहेर येणार नाही.'

पोह्याच्या नसल्या आणायच्या बश्या, तर शिऱ्याच्या आण, उपम्याच्या आण, तू फार स्वत:ला सुधारक समजत असशील, तर इडली घरी बनव आणि ती घेऊन बाहेर ये. पण पमीचा 'मुलगी बघण्या' च्या समारंभालाच विरोध होता. ती म्हणायची,

'मी काय भाजीपाला आहे का मंडईतला?'

यावर आपण काय बोलणार? हिचं लग्न नाही, म्हणून माझं लग्न लांबणीवर पडत चाललेलं. पण पमीला त्याची जाणीव नाही.

छे छे, असल्या मुलीचा भाऊ म्हणून जन्माला येण्यापेक्षा 'एकुलतं एक' जन्मावं, हे उत्तम!

'बरं, तू नव्या विचाराची आहेस ना...मग गाठ एखादा प्रियकर आणि जा त्याचा हात धरून पळून!'

तेवढेच बाबांनी तिच्या लग्नासाठी म्हणून बाजूला ठेवलेले तीस-चाळीस हजार रुपये वाचतील, (ही रक्कम नेमकी किती आहे, याचा बाबांनी अजून पत्ता लागू दिलेला नाही. कारण काही नाही. एकूणच बाप जमातीचा स्वत:च्या पोरावरचा अविश्वास!)

पण पमी असलं धारिष्ट दाखवणार नाही. तिच्या सगळ्या नव्या विचारांचा ताप आमच्याच डोक्याला! आता सदाशिव पेठेतल्या 'शुभमंगल वधू-वर सूचक मंडळा'त नाव नोंदवलेलं. पमीसमोर लिहिलेला मजकूर येणेप्रमाणे:

'मुलगी स्वतंत्र विचारांची. गोत्र, पत्रिका असल्या गोष्टींवर विश्वास नाही, 'दाखवण्या' च्या समारंभाला विरोध. मुलगा-मुलगी एखाद्या हॉटेलात भेटतील, दोघांच्या मनमोकळ्या गप्पांतून एकमेकांच्या आवडीनिवडी, स्वभाव, अपेक्षा यांचा परिचय होईल.'

म्हणजे हिच्या या असल्या (अ) विचारामुळं फक्त माझ्या डोक्याला ताप वाढला. बावा रिटायर्ड- तशात त्यांना अप्रतिम सांधेदुखी! तेव्हा सारी धावाधाव माझ्या नशिबी आलेली. माझा एक नवा कोरा 'नॉर्थ-स्टार' पार झिजून गेला. एक स्थळ बिबवेवाडीला, तर दुसरं कोथरूडला, तर तिसरं वडगाव-धायरीच्या थो ऽ ऽ डं अलीकडं.

हा एक उद्योगच होऊन बसला, सक्काळी सक्काळी लूना बाहेर काढायची. दिवसभर उन्हात या टोकापासून त्या टोकापर्यंत पुण्यातली प्रेक्षणीय 'स्थळं' बघत हिंडायचं.

'मुलाला यंदा कर्तव्य नाही. तो अमेरिकेला जाणार आहे.'

'एकुलता एक मुलगा आहे, त्याची हौसमौज-सगळं व्यवस्थित झालं पाहिजे. झेपणार आहे का तुम्हांला ?'

'त्याचं दोनच महिन्यांपूर्वी लग्न झालं.'

'तुम्ही बेडकीहाळ म्हणजे देशस्थ का कोकणस्थ ?'

अशा एकेका वाक्यातच बोलणं आटोपायचं; पण या 'एकवाक्यते' साठी दहाबारा मैलांची भर दुपारची चांदण्यातली रपेट!

त्यातून एखाद्या ठिकाणी चर्चा जर थोडी पुढं सरकलीच, तर पमीची 'हॉटेलात भेटण्या' ची अट ऐकूनच पुढचा माणूस ताबडतोब दार उघडण्यासाठी उठत असे.

सगळ्या सुट्या आणि किरकोळ रजा खर्ची घालून पुणे आणि पुणे परिसर पिंजून काढल्यावर मी या निष्कर्षाप्रत आलो, की 'प्रचलित विवाहपद्धतीत चि. सौ. कां. पमीचं लग्न जमणं ही अशक्य गोष्ट आहे.'

मी हा माझा निष्कर्ष जाहीर केल्यानंतर प्रथेप्रमाणं आई-बाबांनी पमीच्या आणि माझ्या नावानं चिडचिड व्यक्त केली. मी आणि आई-बाबांनी पमीच्या नावानं शिमगा केला, आणि पमीनं माझ्या आणि आई-बाबांच्या नावानं ठणाणा केला. घरात चिडचिडीचं असं रम्य वातावरण चालू असतानाच पमीच्या नावावरचं एक बंद पाकीट पोस्टमननं आणून दिलं. पमीनं ते आशेन फोडलं आणि तिचे डोळे लकाकले. पत्र येणेप्रमाणे :

स. न. वि. वि.

माझं नाव विजय जोशी, मी महाराष्ट्र बँकेत ('लोकमङ्गल' बिल्डिंग मध्ये ) नोकरीला आहे,

मी तुम्हांला पाहिलेलं आहे आणि तुमच्याशी लग्न करण्याची माझी इच्छा आहे. माझा घरचा पत्ता

वर दिलेला आहेच. प्रत्यक्ष भेटीत आपण बोलूच.

विनीत,

विजय जोशी

घरात एकदम ट्रान्सफर सीन!

खरं तर या 'स्थळा' ला ताबडतोब होकार कळवावा, असं बाबांचं मत पडलं. आईचं म्हणणं:

'तसं सगळं चांगलं आहे, पण शिवाजीनगरऐवजी टिळक रोड, बाजीराव रोड अशी जवळची ब्रँच हवी होती.'

पमी मनातून हुरळली होती. पण एक-दोनदा दुधानं तोंड पोळल्यानं तिला हे ताकही फुंकून पिण्याची सावधगिरी दाखवावी, असं वाटत होतं. दुधानं तोंड, म्हणजे असं, की एक असंच साऱ्या गोष्टी अनुकूल असणारं स्थळ चालून आलं होतं. पण प्रत्यक्ष भेटीत मुलाच्या डोक्यावर भलंमोठ्ठं टक्कल असल्याचं आढळून आलं. दुसऱ्या एका अनुकूल 'स्थळा' बाबत चौकशीअंती असं आढळून आलं, की त्याच्या घरात आनुवंशिक वेड होतं. (त्यामुळंसुद्धा तो पमीशी लग्न करायला तयार झाला असेल.) तेव्हा पमी मला म्हणाली,

'याला काही कळवण्याऐवजी तू एकदा 'लोकमङ्गल' मध्ये जाऊन ये. मुलगा दिसायला कसा आहे, त्याची वागणूक कशी आहे, पगार काय आहे, हे सारं काढून आण. मगच आपण 'हो' म्हणू.'

मी खरं तर या प्रस्तावाला 'नाही' च म्हणायला हवं होतं. पण माझ्या डोळयांसमोर मला सांगून येणाऱ्या छान छान मुली उभ्या राहिल्या. म्हटलं, आधी लगीन कोंडाण्याचं उरकून टाकावं. त्यामुळं दुसऱ्या दिवशीच माझ्या ऑफिसला 'आजारी आहे', असा फोन टाकला आणि 'लोकमङ्गल' मध्ये दाखल झालो.

'लोकमङ्गल' या इमारतीचं नाव वाचूनच 'शुभमंगल' शब्द आठवतो. मी मनात म्हटलं,

'एका अर्थानं इमारतीचं नाव 'मंगल' आहे, हा मंगल कामगिरीवर निघालेल्या माझ्या दृष्टीने शुभशकुनच मानायला हवा.'

गेल्या गेल्या तळमजल्यावर 'स्वागत कक्ष' आहे. तिथे 'पूछ-ताछ' असा फलक होता. त्या फलकापलिकडच्या माणसाला मी विचारलं,

'जोशी कुठं भेटतील ?'

'जोशी ? इथं शंभर जोशी आहेत. असिस्टंट जनरल मॅनेजर जोशी आहेत, चीफ मॅनेजरांपैकी तीनजण जोशी आहेत, झालंच, तर रिकव्हरीला दोन, स्पेशल ॲडव्हान्सला पाच, प्रिमायसेस्ला दोन, एक्स्टेंशन काऊंटरला एक.... !'

मी त्या माणसाला मध्येच थांबवत म्हणालो,

'मला विजय जोशी हवे आहेत.'

'विजय जोशी...जोशी...रिकव्हरीला एक व्ही. एस्. जोशी म्हणून आहेत...'

'मग तेच....तेच असतील.' मी घाईघाईनं म्हणालो.

'झालंच, तर स्पेशल ॲडव्हान्सला एक विजय जोशी आहे. म्हणजे ते नाटकात काम करतात, तेच ना ?'

'अं...हो हो. तेच असतील।'

'प्रिमायसेस्चा जोशी म्हणजे रड्या जोशी. सारखं त्याचं तोंड जोडे मारल्यासारखं असतं.'

'नाही...नाही. त्यांच्याकडं माझं काम नाही.' मी तत्परतेनं म्हणाले. 'रड्या' जोशीशी पमी लग्न करणं शक्यच नव्हतं.

'झालं. संपले विजय जोशी.' काऊंटरवरचा माणूस म्हणाला.

'अरे, एक्स्टेंशन काऊंटरला कॅशियर विजय जोशी आहेत की....' शेजारच्यानं त्याला आठवण करून दिली.

'हो, हो. ते एक विजय जोशी आहेत. तुम्हालां नेमके कोणते जोशी हवे आहेत ?'

'तेच. एक्स्टेंशन काऊंटरवरचे.' मी म्हणालो. मला तरी, मला (किंवा पमीला) हवा असणारा विजय जोशी नेमका कुठल्या खात्यात आहे, हे कुठं ठाऊक होतं ?

मनात विचार केला: सुरुवात एक्स्टेंशन काऊंटरपासूनच करावी.

तळमजल्यावरच काऊंटर असल्यानं फारसं चालायलाही लागणार नव्हतं. एक्स्टेंशन काऊंटरवर फारशी गर्दी नव्हती. मी बाजूची पोस्टर्स वाचण्यात थोडा वेळ घालवला. ताबडतोब पास-बुक अद्ययावत करून देण्याची हमी एका पोस्टरमध्ये, तर दुसऱ्यात डिमांड ड्राफ्टचे पैसे अर्ध्या तासात देण्याचं आश्वासन देण्यात आलेलं होतं. नुसतं वाचूनच मनाचं समाधान झालं.

हे वाचन चालू असतानाच माझं लक्ष 'कॅश' च्या पिंजऱ्यावर होतं. तिथल्या दोन पिंजऱ्यांपैकी एकात एक बाईंच होती. तीही वयस्कर. तिचं नाव 'विजय जोशी' असणं शक्यच नव्हतं आणि असतं, तरी पमीच्यासाठी 'स्थळ' म्हणून त्या बाईंचा काही उपयोग नव्हता. दुसऱ्या पिंजऱ्यातला माणूस म्हटलं, तर 'विजय जोशी' वाटत होता, म्हटलं, तर नाही. त्याच्या वयाचा नेमका अंदाज बांधता येईना, थोडे थोडे केस पांढरे झाल्यामुळं तो थोडा वयस्क वाटत होता, पण लग्नाचा उमेदवार म्हणूनही तो चालला असता.

मी दुरूनच त्यांच निरीक्षण करण्यासाठी कॅशच्या पिंजऱ्यासमोरून चार-पाच फेऱ्या मारल्या. हळूहळू बाजूचे चमत्कारिक नजरेनं माझ्याकडे बघू लागले आहेत, हे माझ्या ध्यानी आलं. दारातला बंदूकधारी माझ्या आसपास वावरू लागला. सिक्युरिटीच्या एका आडदांड गार्डनं कॅशच्या पिंजऱ्यापाशी जास्त वेळ रेंगाळल्यावर सरळ मला अडवलं.

'काय विचार आहे ?' आवाज लावून त्यानं विचारलं.

'काही नाही...ते हे...जोशी...विजय जोशींकडे काम होतं,' मी चाचरत उत्तरलो आणि तडक कॅशच्या पिंजऱ्यापाशी जाऊन आतल्या 'विजय जोशी असेल-नसेल' वाटणाऱ्या इसमाला म्हटलं, 'मला विजय जोशींना भेटायचंय्.'

'ते आज आले नाहीत.'

'का बरं ?'

'त्यांच्या मुलीचं आज बारसं आहे.'

'बारसं का मुलीचं? बरं. बरं' मी काहीतरी बोलायचं, म्हणून बोललो. शेजारी बंदूकधारी येऊन उभा राहिल्यानं माझी चांगलीच घाबरगुंडी उडाली. मला बोलणं सुधरेना.

'काही निरोप द्यायचाय् का?' त्या पिंजराबंद माणसानं विचारलं.

'नाही...निरोप नाही...पण...मला एक माहिती हवी होती... त्यांचं लग्न झालयं् का? '

माझ्या या प्रश्नावर पिंजराबंद आणि बंदूकधारी खो खो हसू लागले. हसू ओसरू लागल्यावर पिंजराबंद म्हणाला,

'अहो, त्यांच्याच मुलीचं बारसं आहे, लग्न झाल्याशिवाय त्यांना मुलगी होईल का?'

या प्रश्नावर बंदूकधारी यावेळी ठो ठो हसला, मी ओशाळून म्हणालो,

'अच्छा...अच्छा त्यांची मुलगी. मला वाटलं, दुसऱ्या कुणाच्या तरी मुलीचं बारसं आहे.'

'दुसऱ्याच्या मुलीच्या बारशासाठी कोण सी.एल्. टाकील?'

आता आणखी हसू ऐकत बसण्याची माझी तयारी नव्हती. मी तिथून खसकलोच.

मी तिसऱ्या मजल्यावरल्या 'रिकव्हरी' त येऊन पोचलो. अर्धा मजलावर, अर्धा

मजला खाली, असे चमत्कारिक चढउतार केल्याशिवाय कोणताच सेक्शन हाती लागत नसे. हे, म्हणे, या इमारतीचं इटालियन स्टाइलचं आर्किटेक्ट, मी तिथल्या एका टेबलावरच्या माणसाला हळूच विचारलं,

'विजय जोशी कुठं?'

'मीच विजय जोशी,' तो गृहस्थ माझा प्रश्न पुरा व्हायच्या आत म्हणाला.

'माझं काम असं होतं....'

'बसा.'

माणूस तरुण होता, उमदा होता. पमीला पत्र लिहिणारा बहुधा हाच असणार. पण एकदम सुरुवात कशी करायची?

'चहा घेणार?' त्यानं विचारलं.

'हो.' मी तत्परतेनं म्हणालो. चहामुळं इकडच्या तिकडच्या गप्पा मारायला भरपूर वेळ मिळणार होता.

'आम्ही एक नाटक बसवतो आहे. कॉलनीत.' मला हा नाटकाचा विषय बरा सुचला.

'बरं. कोणतं नाटक?'

'अं...' मला, सालं, नाटकाचं नावसुद्धा झटकन् आठवेना. 'ते हे...'

'घ्या चहा.'

मी पटकन् चहाचा कप तोंडाला लावला. पिता पिता नाटकाचं नावही आठवून ठेवलं. तेवढ्यासाठी मुद्दामच हळू चहा प्यायलो.

'हं...'रायगडाला जेव्हा जाग येते...'' चहा संपल्या संपल्या मी म्हणालो.

'वा! उत्तम! ऐतिहासिक....त्यातून शिवाजी महाराजांच्या जीवनावरचं. म्हणजे, प्रश्नच नाही.' उत्तेजनपर बोलण्यात हा विजय जोशी चांगलाच पटाईत दिसला.

'तुम्ही कोणती भूमिका करताय् त्यातली?'

आता आली का पंचाईत? त्या नाटकातली फक्त शिवाजी महाराजांची भूमिकाच मला आठवत होती. ती मी करतोय्, म्हटलं असतं, विजय जोशी उडालाच असता.

'छे छे...मी आपला मागं...पडद्यामागं...बॅक स्टेज...'

'कुणीतरी तेही करायलाच पाहिजे, पडद्यामागच्या कलाकारांचे श्रमही तेवढेच महत्त्वाचे.' विजय जोशींचं पुन्हा उत्तेजनपर बोलणं.

'आपण...या नाटकाचं दिग्दर्शन करावं, अशी कॉलनीतल्या मंडळींची इच्छा आहे.' आता बर्फ फुटला होता. संभाषणाची गाडी नाटक, ही आवड कशी लागली, वेळ बरा मिळतो तुम्हांला, पण लग्नानंतर कसं जमवणार, या मार्गानं बरोबर नेता आली असती. पण....

'तुमचा काहीतरी घोटाळा झालाय्. अहो, नाटकवाले जोशी स्पेशल अॅडव्हान्सल आहेत. याच मजल्यावरचं पलिकडचं ऑफिस.'

'थँक्यू.' मी घाईघाईनं उठत म्हणालो.

एवढं कौशल्यपूर्ण संभाषण (नाटकाचं) वाया गेलं, याचं, नाही म्हटलं, तरी दुःख झालंच.

'स्पेशल अॅडव्हान्स' ला गेलो. म्हटलं, या वेळी फालतू गप्पा बंद. सरळ मुद्द्याशी गाठ ठेवायची.

दारात पांढऱ्या कपड्यांतला शिपाई उभा होता. त्याला विचारलं,

'जोशी कुठं बसतात?'

हा प्रश्न विचारला न् मला माझी चूक लक्षात आली. पण तोपर्यंत भात्यातून बाण निघून गेला होता.

'कोणते जोशी? कुठल्या झोनचे? पुणे झोनचे? साऊथ झोनचे? की नॉर्थ झोनचे? इथं झोनागणिक एक जोशी दिलेला आहे...'

'मला नाटकवाले जोशी पाहिजेत.'

'मग पयल्यांदाच सांगायचं नाही का? ते जोशी कॅन्टीनला गेलेत.'

आता कॅन्टीनला जाणं आलं.

कॅन्टीनमध्ये बऱ्यापैकी गर्दी होती.

एकाला विचारलं,

'नाटकवाले जोशी कुठाय्त?'

त्यानं दाखवलेल्या टेबलाच्या दिशेनं गेलो.

नाटकवाला जोशी पडवळाची भजी खात होता.

'या, हो, घ्या-पडवळाची भजी घ्या.'

'नको नको.' मी संकोचून म्हणालो.

'घ्या, हो. लाजताय् काय? अहो, जगातल्या कुठल्याच बँकेच्या कॅन्टीनमध्ये इथल्यासारखी पडवळाची भजी, भाजणीचं थालिपीठ, उकडीचे मोदक असे खास महाराष्ट्रीय पदार्थ मिळत नसतील.'

मग त्यानं माझ्यासाठी पडवळाची भजी मागवली.

नाटकावर 'कौशल्यपूर्ण संभाषण' न करता सरळ विषयालाच हात घालावा, असा सुज्ञ विचार मी पहिलं भजं खाता खाताच करून टाकला.

'बोला, काय सेवा करू?' नाटकीपणे नाटकवाल्या जोशीनं विचारलं.

'सेवा....म्हणजे....'

'एक गोष्ट.' मला अडवत तो म्हणाला, ''परीक्षक म्हणून नाट्यस्पर्धेसाठी किंवा एकांकीका-स्पर्धेसाठी बोलवायला आला असाल, तर स्पष्टच सांगतो....येणार नाही. त्या 'कामगार कल्याण' ला एकदाच परीक्षक होतो. रोजच्या जागरणानं बद्धकोष्ट,पित्त, डोळेदुखी, डोकेदुखी असे नाही नाही ते रोग झाले. शिवाय रोज इथं ऑफिसला उशिरा आल्याबद्दल साहेब बोंबलायचा, ते वेगळंच तेव्हा.''

'छे, हो....माझं नाटकाचं काम नाहीच.'

'वा! झकास! बोला...'

'म्हणजे... काम तसं नाजूक आहे. कसं विचारावं, ते समजत नाही...'

'आलं लक्षात, तुमची बहीण लग्नाची आहे, होय ना?' नाटकवाल्या विजय जोशीनं नेमकाच प्रश्न विचारला. याचा अर्थ यानेच पमीला पत्र लिहिलं असणार

'होय. तिच्यासाठी...' मी बोलू लागलो.

'कोणत्या गाढवानं माझं स्थळ सुचवलं तुम्हांला?'

'का?'

'अहो, माझं लग्न गेल्याच वैशाखात झालंय्.'

प्रश्नच मिटला.

मी निघण्याच्या दृष्टीनं बशीतलं शेवटचं पडवळाचं भजं तोंडात टाकलं.

माझा पडेल चेहरा बघून नाटकवाला जोशी सहानुभूतीनं म्हणाला,

'तुम्ही इथं बॅचलर जोशी हुडकता आहात का?'

'बॅचलर नुसता जोशी नाही, बॅचलर विजय जोशी.' मी या वेळी नेमका बोललो.

'मग तुम्ही तळमजल्यावरल्या एक्स्टेंशन काऊंटरला जा. तिथं कॅशला विजय जोशी आहे...'

'त्याच्या मुलीचं आज बारसं आहे.' मी ताबडतोब माहिती पुरवली.

'अच्छा, म्हणजे त्याचंही लग्न झालेलं दिसतंय् मग आता कुठला विजय जोशी उरला बरं?' काही काळ विचार केल्यानंतर नाटकवाला विजय जोशी म्हणाला,

''आठवलं. 'प्रिमायसेस्' चा विजय जोशी लग्नाचा आहे.''

'म्हणजे रड्या जोशी?'

आता दचकण्याची पाळी नाटकवाल्या विजय जोशीची होती. त्यानं विचारलं,

'तो रड्या आहे, हे तुम्हांला कसं ठाऊक?'

मी गूढ हसलो.

पण रड्या असला, तरी दोन वर्षांत ऑफिसर होईल. माहित्येय्?'

मी नाटकवाल्या विजय जोशीचे आभार मानून उठलो.

विमनस्कपणे खाली उतरणार, एवढ्यात एका केबिनवर 'विजय जोशी' अशी पाटी दिसली. म्हणजे बँकेत अजून विजय जोशी शिल्लक होते, तर! माझा चेहरा प्रफुल्लला. 'केबिन' म्हणजे हा बराच मोठ्ठा साहेब असणार, तेव्हा पुन्हा कौशल्यपूर्ण संभाषणाचं टेक्निक वापरणं भाग होतं. मी मनातल्या मनात देवाचं नाव घेतलं आणि केबिनच्या दारावर टकटक केलं.

'येस, कम इन्...' आतून करारी आवाज आला.

आत प्रवेश केला, तेव्हा एक पन्नाशीचा रुबाबदार माणूस टेबलाच्या पलीकडं बसलेला आढळून आला.

बोंबला! आता याच्याशी पमीबद्दल काय बोलणार?

'बसा. बोला...'

'मी...म्हणजे...मला जरा खातं उघडायचं होतं इथं. त्याची माहिती हवी होती.' मी तोंडाला येईल, ती थाप ठोकून दिली.

'कुठं राहता तुम्ही?' सौजन्यपूर्ण आवाजात त्यांनी विचारलं.

'सदाशिव पेठेत.'

'मग तिथं आमची ब्रँच आहे ना, इतक्या लांब कशाला खातं उघडताय्?'

'नाही...मोठी इमारत आहे. वाटलं, पैसा इथं अधिक सुरक्षित राहील.'

'किती लाख गुंतवणार आहात?'

माझ्या तोंडाला कोरड पडली.

'साहेब, आपण मध्यमवर्गीय माणसं...आपण कुठून आणणार पैसे ?...म्हणजे मला खरं तर लोनबद्दल माहिती हवी होती. म्हणजे...मला एक शिवणयंत्र घ्यायचं होतं...'

साहेबांनी टेबलावरली बेल वाजवली.

पांढऱ्या कपड्यांतला शिपाई आला.

'हे सेन्ट्रल ऑफिस आहे. इथं लाखांच्या गोष्टी होत असतात. मोठमोठ्या कंपन्यांचे चेअरमन-जनरल मॅनेजर इथं येतात. त्यातून तुम्हांला इथंच खातं उघडायचं असेल, तर खाली एक्स्टेंशन काऊंटरला जा. त्यांना खाली एक्स्टेंशन काऊंटरला घेऊन जा...'

शेवटचं वाक्य त्यांनी शिपायाला उद्देशून म्हटलं.

साहेब त्यामानानं बरेच सौजन्यानं वागले, असंच म्हणावं लागेल.

तळमजल्यावर आल्यावर मी अगदी शेवटचा प्रयत्न म्हणून रिसेप्शन काऊंटरपाशी आलो.

'बोला...भेटले का जोशी ?' मघाच्याच माणसानं विचारलं.

'भेटले. पण त्यांतला एकही मला नको होता. मला लग्नाचा कुणी विजय जोशी असेल, तर तो हवा होता.'

'मग हे अगोदर नाही का सांगायचं ? 'प्रॉयॉरिटी' ला जा...दुसऱ्या माळ्यावर.'

मी दुसऱ्या माळ्यावर गेलो. अर्धा मजला वर, अर्धा मजला खाली-असली इटालियन स्थापत्यशास्त्राची गंमत पुन्हा एकदा अनुभवून मी 'प्रॉयॉरिटी' त पोचलो. एव्हाना लंच-टाइम झाल्यामुळं लोक बाहेर पडत होते.

मी पांढऱ्या कपड्यांतल्या शिपायाला विचारलं,

'विजय जोशी कुठं बसतात ?'

'विजय जोशी म्हणजे ते आय्. डी. बी. आय्. चं काम पाहतात, ते.... ?'

'हो, हो...तेच.' आय्. डी. बी. आय्. ही काय भानगड आहे, लक्षात नाही आलं, तरी मी ठासून म्हणालो.

'ते आत्ताच गेले.'

'कधी ?'

'हे काय..तुम्ही अशे आलात आणि ते अशे गेले.'

'परत कधी येतील ?' मी विचारलं.

'आज नाही येणार. हाफ्-डे घेतलाय् त्यांनी.'

'म्हणजे दुपारी परत नाही येणार ?'

'नाही.'

दैवदुर्विलास म्हणतात, तो हाच ! मी खिन्न मनानं 'लोकमङ्गल' च्या बाहेर पडलो.

भर उन्हाची लूना घराकडे धावत असताना माझ्या डोक्यात चिंतन चालू होतं. माणसाला कसं ठसठशीत, चारचौघांत वेगळं उठून दिसेल, असं नाव पाहिजे.

अशोक जोशी, विजय जोशी, अजय कुलकर्णी वसंत देशपांडे ही काय नावं झाली ?

शेक्सपियरची ऐसी की तैसी ! तो जर हयात असता, तर मी नक्कीच त्याच्याशी वाद घातला असता. काहीही लिहायचं, म्हणजे काय ? म्हणे: 'नावात काय आहे ? गुलाबाच्या फुलाला गुलाब न म्हणता दुसरं काही (उदाहरणार्थ, 'धोत्रा') म्हटलं, तर त्याच्या सुवासात थोडाच फरक पडणार आहे ?' होय, पडणार आहे.

आत्ताचा सगळा घोळ केवळ 'विजय जोशी' या नावामुळंच झाला होता. याच माणसाचं नाव हेरंब दाढे किंवा प्रद्युम्न म्हात्रे असं असतं, तर सबंध इमारतीत त्याला काही मिनिटांतच हुडकून काढता आलं असतं.

आता घरी गेलं, की पमी म्हणणार, याला एवढं साधं काम जमलं नाही. आई म्हणणार, याला कुठलं काम जबाबदारीनं करायलाच नको. बाबा हवेत दृष्टी लावून हात झटकत स्वत:शीच 'श्रीराम ...श्रीराम' असं पुटपुटणार. तेव्हा आता घरी नकोच जायला. जाऊ सावकाश. काय घाई आहे? अशुभस्यं कालहरणं!

दोस्ताच्या खोलीवर जाऊन मस्तपैकी ताणून दिली. किती दिवसांत दुपारी असं झोपता आलेलं नव्हत. सारखी आपली बहिणीच्या वरसंशोधनाची मोहीम आणि त्यासाठी वणवण वणवण!

संध्याकाळी सातला निवांत घरी पोहोचलो, तर बाहेरच्या खोलीत पमी एका देखण्या, रुबाबदार तरुणाबरोबर गप्पा मारत, हास्यविनोद करत बसलेली.

मी आल्यावर तिनं ओळख करून दिली.

'हे विजय जोशी. दुपारीच ते घरी आले...मग आम्ही दोघं कॅम्पमधल्या हॉटेलात गेलो. थोडक्यात...आम्ही लग्न करायचं ठरवलं आहे.'

मी अत्यानंदानं दोघांचंही शेकहॅन्ड करून अभिनंदन केलं.

मनातल्या मनात विजय जोशीचे हार्दिक आभारही मानले. या भल्या गृहस्थामुळं माझ्या लग्नाची वाट मोकळी झाली.

मी पमा मी म्हणालो,

'पमे, तू स्वत:ला आधुनिक विचाराची मानतेस ना?'

'हो. आहेच मी.' पमी विजय जोशींवर इंप्रेशन मारण्यासाठी मुद्दाम ठसक्यात हे वाक्य म्हणाली.

'मग तू असं कर. लग्नानंतर तूच यांचं नाव बदलून 'प्रद्युम्न बेडकीहाळ' असं कर.' मी म्हणालो आणि खुर्चीत बसलो.

### शब्दार्थ

**हुडकणे** शोधणे **कामगिरी** विशेष काम **हिसका** आचका झटका **समारंभ** उत्सव **धारिष्ट्य** धैर्य **प्रेक्षणीय** पहाण्यालायक **हुरळणे** विचार न करता उत्साहाने प्रेरित होणे **निष्कर्ष** सार, तात्पर्य **प्रचलित** चालू, रूढ **आश्वासन** धैर्य देणारे भाषण, वचन **वयस्क** प्रौढ, पोक्त **चाचरणे** बोलताना अडखळणे **ओशाळणे** शरमणे, लाजणे **तत्पर** त्वरित **पटाईत** तरबेज, निष्णात, कुशल **पंचाईत** उठाठेव **उत्तेजन** प्रोत्साहन **गूढ** दुर्बोध, समजण्यास कठिण **विमनस्क** अस्वस्थ मन:स्थिती **प्रफुल्ल** आनंदित **सौजन्य** चांगुलपणा **दैवदुर्विलास** वाईट नशीब **मोहीम** लष्कराची स्वारी, महत्त्वाच्या कामासाठी निघणे **रेंगाळणे** मागे राहणे, सावकाश काम करणे **करारी** पक्क्या मनाचा **नॉर्थस्टार** ध्रुवतारा **रिटायर्ड** निवृत्त **ट्रान्सफरसीन** बदललेला देखावा **ब्रँच** शाखा **चीफ मॅनेजर** व्यवस्थापक **गार्ड** रक्षक **कॉलनी** वसाहत.

### वाक्प्रचार

**पिंजून काढणे** शोधाशोध करणे **शिमगा करणे** अचकट विचकट बोलणे **डोळे लकाकणे** डोळ्यात तजेला येणे **घाबरगुंडी उडणे** भयभीत होणे **टोकाचे वागणे** एकांगी विचाराने म्हणी वागणे **ठासून बोलणे** स्पष्ट, सडेतोड बोलणे **चेहरा पडणे** उदास होणे, निराश होणे **गवताच्या गंजीत सुई हुडकणे** म्हणी अत्यंत अवघड कार्य **दुधाने तोंड पोळले की ताकही फुंकून पिणे** सावधगिरी बाळगणे **भात्यातून बाण निघून जाणे** परिणामांचा विचार न करता बोलले गेलेले शब्द

### स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) कोणत्या वाक्याच्या बाबतीत शेक्सपियरचे आणि टाकसाळे यांचे टोकाचे मतभेद आहेत?

(2) पमीचा भाऊ 'लोकमंगल' इमारतीत कोणाला शोधायला निघाला होता?

(3) पमीच्या भावाने नाटकवाल्या विजय जोशीला झटकन कोणत्या नाटकाचे नाव सांगितले?

**2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन-तीन वाक्यात लिहा :**

(1) शुभमंगल वधू-वर सूचक मंडळात पमीच्या नावासमोर कोणता मजकूर लिहिला होता?

(2) होकार कळविण्यापूर्वी भावाने काय करावे असे पमीला वाटले? कां?

(3) पमीचा भाऊ घरी आल्यानंतर त्याच्या मते त्याला घरची मंडळी काय वेगवेगळ्या प्रतिक्रिया देतील असे वाटले?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) विजय जोशीची शोधाशोध लेखकाने कशी केली ?
(2) पमीचे लग्नाविषयी नवे विचार कसे होते ?
(3) लेखक घरी गेल्यावर त्याला काय दृश्य दिसले ?
(4) 'नावात काय नाही ?' या कथेत आलेले इंग्रजी शब्द शोधून त्यासाठी मराठी पर्यायी शब्द शोधा.
(5) ''नावात काय नाही ?'' या कथेच्या शीर्षकाची सार्थकता समजवा.
(6) ''नावात काय नाही ?'' या पाठात कोणत्या प्रसंगाने आपल्याला अधिक हसू येते ?

**4. योग्य विकल्प शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(1) पमीचा कोणत्या गोष्टीसाठी विरोध होता ?
(अ) स्वयंपाक करणे (ब) लग्न करणे (क) दाखवून घेणे (ड) घरकाम करणे

(2) नाटकवाला जोशी काय खात होता ?
(अ) खारे दाणे (ब) बटाटे वडा (क) पडवळाची भजी (ड) कांदा भजी.

•

# 18 जमाखर्च स्वातंत्र्याचा

**मंगेश पाडगावकर**

**( जन्म : 1929 मृत्यू : 2015 )**

मंगेश केशव पाडगावकर यांना इ. स. 1980 साली साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. त्यांचे आले मेघ भरुन, माणसाच्या मनासाठी, मोरु, त्रिवेणी, स्नेहगाथा, जिप्सी, बोलगाणी, चांदोमामा, चिंतन, उदासबोध, राधा, सलाम हे काव्यसंग्रह आहेत.

प्रस्तुत कविता 'सलाम' या काव्यसंग्रहातून घेतली आहे. या कवितेत कवी आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आताच्या स्थितीचे वर्णन करीत आहे. स्वातंत्र्याचा उपयोग सर्व घेतात आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर फायदा किती झाला आणि तोटा किती झाला; याचा जेव्हा हिशोब केला जाईल तेंव्हाच खरी परिस्थिती कळेल स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही देशात परिस्थिती कशी आहे, याचे विदारक चित्रण कवीने केले आहे.

---

जमाखर्च स्वातंत्र्याचा मांडमार केव्हा ?
जाब उंच प्रासादांचा मागणार केव्हा ?
        धूतं शोषकांच्या ओठी घोष संस्कृतीचा
        चूड इथे या ढोंगाला लागणार केव्हा ?
विलायती वेशांमधली भुंकतात कुत्री
माणसास माणूस इथे मानणार केव्हा ?
        घाम ओतुनी जो पिकवी मळे अमृताचे
        दिवा झोपडीतुन त्याच्या लागणार केव्हा ?
प्राक्तनात अस्पृश्याच्या छळाचीच गाथा
आग आंधळया धर्माला लागणार केव्हा ?
        इथे पडे सत्तेभोवती कडे भ्रष्टतेचे
        काजळी दिव्याभवतीची झाडणार केव्हा ?
किती काळ बघत बसावे फुगे घोषणांचे ?
भास हे भ्रमाचे सारे फोडणार केव्हा ?

**शब्दार्थ**

**प्रासाद** राजवाडा, मोठी घरे **धूर्त** लबाड **विलायती** पाश्चात्त्य, परदेशी **अमृतेचे मळे** धान्य पिकविणे **काजळी** काळा रंग **भास** वाटणे **प्राक्तन** ललाट, नशीब

**शब्दसमूहला एक शब्द**

**जमाखर्च** केलेला खर्च आणि मिळालेले पैसे यांचा लिहीलेला हिशोब
**शोषक** लोकांचे शोषण करणारा

**वाक्प्रचार**

**जाब मागणे** योग्य उत्तर मागणे **चूड लागणे / लावणे** नष्ट होणे / नष्ट करणे **दिवा लागणे** जीवन सुखाचे होणे **अस्पृश्य** समाजातील खालचा वर्ग की ज्याची इतर वर्गाकडून पूर्वी पिळवणूक केली जात होती. अस्पृश्य याचा अर्थ स्पर्शसुद्ध चालत नाही, अशी माणसे. आता समाजाच्या विचारसरणीत फरक झाला आहे; त्यामुळे अशी स्थिती राहिली नाही

**स्वाध्याय**

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) संस्कृतीचा घोष कोण करतात ?
(2) अस्पृश्यांच्या प्राक्तनात काय आहे ?
(3) सत्तेभोवती कशाचे कडे पडले आहे ?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) नेत्यांच्या उंच प्रासादांचा जाब का मागितला पाहिजे ?

(2) विलायती वेशातील लोकांना कशाची उपमा दिली आहे ? का ?

(3) आंधळ्या धर्माबाबत काय केले पाहिजे ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) स्वातंत्र्याचा जमाखर्च मांडण्याची वेळ आली आहे, असे कवीला का वाटते ?

(2) लोकांच्या भ्रमाचा नाश का केला पाहिजे ?

**4. खालील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा :**

जमा x ________

शोषक x ________

स्पृश्य x ________

स्वातंत्र्य x ________

**5. खालील काव्यपंक्ती ससंदर्भ समजवा :**

(1) ''जमाखर्च स्वातंत्र्याचा मांडणार केव्हा ?''

(2) ''काजळी दिव्याभोवतीची झाडणार केव्हा ?''

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

● 'स्वतंत्र भारत' या विषयवार निबंध लिहा.

**भाषाभिव्यक्ती**

मंगेश पाडगावकर यांची कविता प्रामुख्याने निसर्गविषयक आणि प्रेमविषयक जाणिवांची आहे. पण 'सलाम' या काव्यसंग्रहामध्ये त्यांनी आसपास घडणाऱ्या घटना, राजकारणाचे बदलते रुप, समाजाची ढासळत जाणारी मूल्यव्यवस्था याविषयी भाष्य केलेले आहे. 'जमाखर्च स्वातंत्र्याचा' या कवितेत स्वातंत्र्यानंतर भारतीय नेत्यांनी जनतेसाठी खरेच काही केले आहे की फक्त स्वत:चा फायदा करुन घेतला आहे, हे कवी विचारतो आहे तो म्हणतो,

''घाम ओतुनी पिकवी मळे अमृताचे,
दिवा झोपडीतून त्याच्या लागणार केव्हा ?''

या ओळीतून लक्षात येते की, शेतकरी असोत, कामगार असोत, अस्पृश्य असोत, गरीब असोत या कुणालाही स्वतंत्र भारतात मानाचे स्थान आजही मिळालेले नाही.

भारतीय राजकारणाचा स्वार्थी चेहरा या कवितेमधून स्पष्टपणे दाखवलेला आहे. समाजातील दांभिकपणावर पाडगावकर टीका करतात. कधी उपहासातून, कधी विडंबनातून तर कधी थेटपणे त्यांनी ही टीका केली आहे. त्यांचा विरोधी सूर या कवितेतही दिसतो.

●

# 19 गौराई

**इरावती कर्वे**

**( जन्म : 1905 मृत्यू : 1970 )**

श्रीमती इरावती कर्वे या समाजशास्त्र, मानववंशशास्त्र आणि शिक्षण या विषयातील तज्ज्ञ होत्या. त्यांनी लिहिलेल्या 'युगान्त' या पुस्तकाला इ. स. 1967 साली साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला त्यांनी भोवरा, गंगाजल, परिपूर्ती इ. पुस्तके लिहिली आहेत.

प्रस्तुत पाठ 'परिपूर्ती' या पुस्तकातून घेतला आहे. पाठात गौरी, गया, बजाबाई, माळीणबाई यांची व्यक्तिचित्रे आहेत हल्ली सरकारतर्फे स्त्रीसशक्तिकरण मोहिम राबवली जात आहे. स्त्री पूर्वीच्या काळापासूनच सर्व कुटुंबाचा आधारस्तंभ आहे. स्त्री मुलांचे पालनपोषण करणे व त्यांच्यावर संस्कार करणे, घरातील सर्व व्यवहार करणे, आर्थिक मदत आणि सामाजिक संबंध या सर्व आघाड्या सांभाळते. स्त्री स्वत:ला गौण समजून कुटुंबाला महत्त्व देते. कुटुंबानेसुद्धा स्त्रीचे घरात महत्त्वाचे स्थान आहे, याची जाणीव ठेवली पाहिजे.

---

मुलें खेळत होतीं. मधूनमधून गौरीचा आवाज ऐकूं येई, ''माधव, आता तुझी पाळी. आता तूं मास्तर हो, आम्ही मुलं होतों......अरे, असं काय? ताठ उभं राहून मोठ्यानं बोल ना?- असं तोंडांतल्या तोंडांत का बोलतात मास्तर?-'' मध्येच कशानेसा चंदू रडूं लागला. परत गौरीचा आवाज ऐकूं आला, ''बघू रे, लागलं का आहे? हात्तिच्या! कांहीसुद्धा लागलं नाही, आणि आपला उगीच गळा काढून काय रडतोस? सांगतें ना? ऊठ बघूं.'' तिचा स्वर उंचावला. मी मुलांना हाक मारली, त्यांच्या हातावर खाऊ ठेवला आणि गौरीला म्हटलें, ''गौरे, का ग सारखी त्या चंदूला दटावतेस? पाहावं तेव्हा आपलं तुझं गुरकावणं चालूं असतं. नीट खेळावं.'' ''अग, पण मी कांही उगीच बोलत नाही. सारखा एवढंसं झालं म्हणजे 'यँ - यँ' करतो म्हणून म्हटलं-'' असें पुटपुटून ती आपल्या मित्रांना घेऊन जाई. आणि रोज हे असेंच चालायचे तिघेजण बरोबरीचींच, पण जेव्हा पाहावें तेव्हा ही त्यांना शिकवायची, त्यांची समजूत घालायची, प्रसंग पडल्यास त्यांचा कैवार घेऊन आमच्याशीं भांडेसुद्धा. ''गौराई आमची बाळाई - सकरुबा आमचा जावाई.'' मला बायकांचें गाणें आठवलें. गौरी महाराष्ट्राचें माहेरवाशिणीचें प्रतीक, तर भोळा शंकर जावयाच्या स्थानी योजलेला.

आमच्या शेजारींच पाहा ना! तीन भोळे रागीट शंकर आहेत. थोरला भोळसर, मधला रागीट व धाकटा हेकट. पण त्यांच्या घरची गौराई तिघांना पुरून उरते. दिसायला कशी नाजुक दिसते! जयदेवांची सगळीं मृदु व्यंजनें घालावीं तिच्या वर्णनासाठी! ठेंगणी, गोरी, नाजुक हसणें, मृदु बोलणें, बोलसांना किंचित् मान खाली घातलेली, टपोऱ्या डोळ्यांवर पापणी अर्धवट मिटलेली; पण अशी पक्की आहे! बोलतां-बोलतां जरा मान उचलून तिने डोळे पूर्ण उघडले म्हणजे लक्ष्यात येतें की, मांजरडोळ्यांची ही पोर चांगली वस्ताद आहे, थोरल्याच्या दादागिरीला ती दाद देत नाही; मधल्याचा रागीटपणा तिच्यापुढे चालत नाही; धाकट्याला ती नीटपणें प्रेमाने सांभाळील, पण हट्टबिट्ट मुळीच चालायचा नाही हो तिच्यापुढे! --तसेंच तें समोरचें बिऱ्हाड. सगळीं मुलें काळीसावळीं, पण मुली दिसायला हुशार, हसतमुख, तोंड भरून बोलणाऱ्या, आणि मुलगे सगळे संकोची, मागे-मागे राहणारे!

जी स्थिति मुलींची तीच मोठ्या बायांची. आमची गया आली म्हणजे फाटकांतच तिची पहिली सलामी होईल. कुत्र्याच्या अंगावर हात फिरवील, मांजराला उचलून घेईल, ''काय भागूजी, बागेंत काय लावलं आहेस?'' म्हणून माळ्याला विचारील. घरांत आली म्हणजे धाकटीला गाणें म्हणून दाखवील, ''वा ताईबाई! माझ्यापरीस मोठ्या दिसतां की!'' म्हणून ताईला म्हणेल. आणि मग चहा पितां-पितां आपल्या घरच्या सगळ्या हकीकती सांगेल. चार महिने झाले, आली होती. मीं म्हटलें, ''अग, या इतक्या लांब कशाला आलीस एवढं पोट घेऊन?-- तोंड कसं सुकलं आहे!'' ती म्हणाली, ''बाई मीं निरोप पाठवला म्हणजे एवढी अंगणांतली खाट द्या पाठवून तीन महिन्यांसाठी.'' ''हात्तिच्या! एवढयासाठी का इथवर आलीस? निरोप कां नाही लावलास?'' ती हसली, ''तुम्हाला माहीत नाही का घरधन्याचा सोभाव? ते कांही यायचे नाहीत. मग काय करूं? 'बाईंनी कबूल केलं तर खाट न्यायला येईन?' असं बोललेत मात्र.'' ती गेल्यावर आठ दिवसांतच तिचा नवरा छकडा घेऊन खाट न्यायला आला. बाहेरच्या बाहेरच जात होता , पण मीं थांबवले व विचारलें, ''कधी बाळंत झाली गया?'' ''काल.'' त्याने उत्तर दिलें. ''काय झालें?'' त्याने तोंडांतल्या तोंडांत पुटपुटत खालच्या मानेने उत्तर दिलें तें मला नीट ऐकूंच आलें नाही. ''ठीक आहे ना गया?'' ''होय जी.'' असें तो परत पुटपुटला व आता ही बाई विचारणार तरी काय-काय ह्या भीतीने खालच्या मानेने आपला चालूं लागला. गया बाळाला घेऊन आल्यावर मीं तिला ही हकीकत सांगितली. तशी ती पोटभर हसली व मान वेळावून म्हणाली, ''तसेच हैत ते.

कोणाशीं बोलायचं म्हंजे जिवावर येतं त्यांना. मी एवढी घरांत बोलतें ना पण ते निसते हूं म्हंतील नाही तर नाही म्हंतील. आन् निसते भोळे सांब! माजी सासू सांगेल तें ऐकायचं. आता कुठं चार पोरं झाल्यावर मी काय सांगतें ऐकतात.''

बजाबाई तर आली म्हणजे सगळ्या घरादाराला जाहिरात लागते. ''अवो माळीदादा, बाई हैत का?'' अशी तिची खणखणीत आरोळी ऐकूं आली की घरांतलीं माणसें मला म्हणातात, ''हं, आला वाटतं तुझा पठाण!'' उचनिंच, हाडाने रुंद अशी आहे ती. रूपसुद्धा चांगलं आहे, पण कष्टाने चेहरा सुकलेला. बिचारी विधवा आहे आणि आपल्या दोन भावांचा संसार करते. भावजय घरांत शिजवते, भाऊ धारा काढून गावांत दूध विकतो, आणि गोवऱ्या करणें, म्हशी विकणें, विकत घेणें, चार माणसांजवळ गोड बोलून कर्ज काढणें, तें फेडणें, म्हशींचे गवत, पेंड, सरकी विकत घेणें आणि अगदी तिच्या मर्जीतल्या खाशा गिऱ्हाइकांना स्वत: दूध घालणें हें सगळें ती स्वत: करते. मावळांतल्या भावाकडून चिंच आली की ती विकणें, काकड्यांची गाडी आली की भावाला घेऊन जाऊन आपल्या मोजक्या गिऱ्हाइकांना पाट्या ओपून त्याला पैसे करून देणें; कशी बाई एकटी एवढीं कामें करते कोण जाणे! –भाऊसुद्धा चांगले कामसू आणि देखणे; पण तिच्यासारखा व्यवहार कांही त्यांना जमत नाही. तिची सगळ्या कुटुंबावर हुकमत, पण ती कांही नुसती बसून हुकूम तोडणारी नाही. तिचा अधिकार कष्टाने, प्रेमाने मिळवलेला आहे. आज स्वारी संध्याकाळीं आली, ''बाई, कावो माज्या भावाला परत लावला? मी इचारायला लावला होता 'बाईंना चीच हवी का!' म्हणून.'' मीं म्हटलें, ''अग, मला काय माहीत तुझा भाऊ म्हणून! इथे फाटकाबाहेर घोटाळत होता; मुलांनी विचारलें, 'काय पाहिजे?' म्हणून, तशी म्हणतो, 'माळीबाबा कुठं हायत?' भागू घरीं नव्हता. मीं म्हटलं, 'कोण उगीच रेंगाळतो आहे?' 'जा' म्हणून सांगितलं.'' तशी ती अगदी गयाबाईसारखीच हसली नि मान वेळावून म्हाणाली, ''आता काय करावं? निसते भोळे सांब हैती. तरी म्यां नीट सांगितलं होतं, बाईंना इचार म्हणून.''

महाराष्ट्रांत फिरतां-फिरतां अशा किती गौराया मीं पाहिल्या आहेत! किती कष्ट करतात! किती अधिकार गाजवतात! गौरीचा लाडिकपणा, गौरीचा भोळेपणा, गौरीचा प्रेमळपणा, सगळे त्यांच्यांत दिसून येतें. ती हिमालयाची मुलगी, तर ह्या सह्याद्रीच्या माहेरवाशिणी. वन्य, राकट, पण प्रेमळ. आपल्या तापट रानटी भावांना सांभाळणाऱ्या, आपल्या रागीट नवऱ्यांना ताळ्यावर आणणाऱ्या, भोळ्या सदाशिवांच्या डोक्यावर बसलेल्या अशा पार्वत्या सर्व जातींत सर्व महाराष्ट्रभर दिसतात. त्यांना उत्तरेकडील सुसंस्कृत रुबाबी-नबाबी बोलणें-चालणें माहीत नसेल, त्यांच्या हास्यांत नाजुकपणा नसेल. त्यांच्या जिभेच्या रासवटपणांत प्रेमाचा ओलावा कोणाला दिसत नसेल तर तें पाहणाऱ्यांचें दुर्दैव. बजाबाई विधवा होऊन बीस वर्षे झाली असतील. नवऱ्याचें दु:ख ती कधी कोणाला दाखवीत नाही; पण नुकतीच ती नवीन लुगडें नेसून आली होती तेव्हा मी तिला म्हणालें, ''बजाबाई, भाऊ अगदी चोज करतात नाही तुझें? काय सुरेख लुगडें घेतलें आहे!'' तशी तिचें हसें मावळलें. सुकलेला चेहरा एकदम उदासीन व दु:खी दिसला. ती बोलली तेंसुद्धा स्वत:च्या शब्दांत नाही, तर तिच्या देशांतील स्त्रियांच्या अनंत अज्ञात पिढ्यांनी दोन ओळींच्या ओवींत साठवलेल्या त्यांच्या हृदयाच्या व्यथेंत. ती म्हणाली, ''बाई, 'काय करायची दिराभावाची पालखी?! भर्तारावांचुनि नार दिसते हालकी ॥ '''

आमची माळीणबाई अगदी म्हातारी झालेली आहे. तिचा नवरा तर कित्येक वर्षें कांही काम करीत नाही. त्यांतून गेलें वर्षभर त्याला भ्रम झालेला. ते नाही-नाही तें बायकोकडून मागतो. पण ती बिचारी त्याचें सगळें कोड पुरवते. परवा डोक्यावरची पाटी अंगणांत ठेवून जरा विश्रांतीसाठी खाली बसली. मीं म्हटलें, ''काय, माळीणबाई, कसं काय? माळीबुवा बरे आहेत ना?'' ती कावून-थकून गेली होती. ''नुसता तरास हाय बाई! आज मला म्हणतात, 'तूं कुणाकडे भाजी इकूं नकोस. मी नाही तुला जाऊं देणार.' मी त्यांना चुकवून आलें बघा. भाजी इकूं नको तर खायला काय घालूं कपाळ!'' आमचा भागू तरुण आणि फटकळ. तो म्हणतो, ''काय म्हाताऱ्याचा वनवास आहे तुम्हांला? एकदां गेला तर सुटाल तरी.'' ''नग-नग. भागुजी, असं म्हणूं नये रे राजा, तुला काय ठावं त्यांनी मला किती सुखाचे दिवस दावले ते!'' म्हातारीने डोळे टिपले. अशी ही शंकरपार्वतीची सदा भांडणारी, सदा रुसणारी गळ्यांत गळा घालणारी जोडी आहे.

मुलांचा खेळ संपला होता. तिघेंजण फाटकाशीं उभी होतीं, गौरी बोलत होती, ''माधव, तूं इथे उभा राहा. मी. चंदूला पोचवून येतें, बरं का?'' तिनें चंदूला दहा पावलांवर असणाऱ्या त्याच्या घराच्या फाटकाशी पोचवलें. ''नीट जा हं, चंदू. धावूं नकोस. पडशील वाळूवर.'' असें त्याला बजावून ती परत आली, माधवचा हात धरला आणि म्हाणाली, ''चल महाद्या, तुला पोचवतें.'' आणि तो महादेवपण मुकाट्याने तिचा हात धरून चालूं लागला. मी हसत गुणगुणलें, ''गौराई आमुची बाळाई, सकरुबा आमुचा जावाई.''

## शब्दार्थ

**स्वर उंचावणे** मोठ्या आवाजात बोलणे **दटावणे** रागावणे **गुरकावणे** दमदाटी करणे **हेकट** हट्टी **संकोच** लाज, भीड **वस्ताद** पक्की **सोभाव** स्वभाव **पेंड** वाळलेले गवत **सरकी** कापसाचे बी **खाशा** विशेष खास **जयदेव** गीतगोविंदचा रचनाकार **ओपून** मोजून **चीच** चिंच **भर्तार** पती, नवरा **हुकमत** सत्ता, अधिकार **भावजय** भावाची बायको, वहिनी **सकरुबा** शंकर **दावले** दाखवले **तरास** त्रास **घरधनी** पती, नवरा **व्यथा** दु:ख **प्रतीक** चिह्न, खूण **कावणे** त्रासून, जाणे **माझ्यापरीस** माझ्यापेक्षा **हैत** हायत, आहेत

## वाक्प्रचार

**गळा काढून रहणे** मोठयाने रहणे **कैवार घेणे** एखाद्याची बाजू घेणे **पुरुन उरणे** एखाद्याला वरचढ ठरणे **दाद न देणे** लक्ष न देणे **जिनावर येणे** नकोसे वाटणे **चोज करणे** लाड पुरविणे **भ्रमहोणे** भास होणे

## शब्दसमूहाला एक शब्द

**माहेरवाशीण** लग्न झालेली स्त्री स्वत:च्या मोहरी जाते ती.

**विधवा** जिच्या पतीचा मृत्यू झाला आहे अशी स्त्री

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) गौराईचे थोडक्यात वर्णन करा.

(2) गया बाईंकडे का आली होती ?

(3) बाईंनी बजाबाईच्या भावाला परत का पाठवले ?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) सह्याद्रीच्या गौरायांचे वैशिष्टय कोणते ?

(2) गौराई तिघा मुलांना कशी सांभाळते ?

(3) बजाबाईला पठाण का म्हणत असत ?

(4) माळीणबाई म्हातारी झाली तरी तिला काम का करावे लागते ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) गयेचे व्यक्तिचित्र रेखाटा.

(2) बजाबाईची कोणकोणती कामे करते ?

(3) 'गौराई' पाठाद्वारे लेखिका काय सांगू इच्छिते ?

**4. खालील शब्दांसाठी पाठातील ग्रामीण शब्द शोधून लिहा :**

चिंच, मी, माझ्यापेक्षा, स्वभाव, शंकर, त्रास, पती.

**5. खालील ग्रामीण शब्दांसाठी प्रचलित भाषेतील शब्द लिहा :**

सोभाव, ओपून, ईचार, ठावं, निसते, दावले.

**6. योग्य पर्याय निवडून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा:**

(1) महाराष्ट्राच्या माहेरवाशिणीचे प्रतीक कोण आहे ?

(अ) लक्ष्मी (ब) गौरी (क) सीता (ड) सरस्वती

(2) लेखिकेकडे खाट मागण्यासाठी कोण आली होती ?

(अ) बायजा (ब) गौरी (क) बजाबाई (ड) गया

(3) बजाबाई आली म्हणजे सगळ्या घरादाराला काय लागते ?

(अ) सवय (ब) गरज (क) जाहिरात (ड) मदत

(4) गौरी कोणाची मुलगी आहे ?

(अ) हिमालय (ब) विंध्या (क) सातपुडा (ड) सह्याद्री

(5) जावई कोणाला म्हटले आहे ?

(अ) शंकर (ब) विष्णू (क) इंद्र (ड) वरुण

**7. खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा :**

(1) जिच्या पतीचा मृत्यू आला आहे अशी स्त्री

(2) लग्न झालेली स्त्री स्वत:च्या माहेरी जाते ती

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- श्रीमती इरावती कर्वे यांची पुस्तके मिळवा आणि वाचा.

•

# 20 गच्चीवरील बाग

**निळू दामले**

निळू दामले हे सुप्रसिद्ध लेखक, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ता आहेत.

निळू दामले या लेखकांची अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांची सामाजिक, धार्मिक, आठवणी, राजकीय वैचारिक इ. विषयांवर पुस्तके लिहिली आहेत. दामलेंनी 'बॉबस्फोटानंतर', 'मालेगाव', 'धर्मवादक', 'दुष्काळ-सुकाळ', 'इस्तंबूल', 'ते कैरो', 'जरुसलेम',लवासा, लंडन, बॉम्बिंग, 2005 ओसामा त्याचा इस्लाम त्याचा फायदा टेक्नियम, बदलता अमेरिकन इ. पुस्तके प्रकाशित आहेत. प्रस्तुत पाठ हा 'गच्चीवरील बाग' त्याच्या माणूस आणि झाड या पुस्तकातून घेण्यात आला आहे.

---

एका सोसायटीमध्ये एका वयस्कर गृहस्थांनी उत्साहानं बैठक भरवली. गच्चीमध्ये शेती करायची कल्पना त्यांना फार आवडली होती. त्यांचा मुलगा कलाकार होता. त्यानं छान चित्र काढून नोटीस लावली होती. गच्चीतच दिवा लावून बैठक झाली. काकड्या, डाळिंबं खायला मिळणार, दररोज लागणारं कढीलिंब आणि आलं कोथिंबीर मिळणार या विचारानं महिला मंडळी हुरळलेली होती.

वैज्ञानिक माहिती सांगायला मी सुरवात केली. पंधरा मिनिटांपेक्षा जास्त वेळ घेणार नाही असं सांगितलं. दहा-पंधरा मिनिटांत विषय मांडण्याची सवय मला होती. परंतु पाचही मिनिटं झाली नाहीत तर मंडळी चुळबूळ करू लागली. दिवसभराच्या कामामुळं शीण आला असेल असं समजून मी आवरतं घेतलं. ''आता झाडं कशी लावायची ते बोलूया'' असं म्हणून मी पिशवी कशी भरायची, माती कशी तयार करायची ते सांगायला सुरवात केली. तरीही चुळबूळ थांबेना. एक बाई म्हणाल्या, ''माती तयार करायला कुठं आम्हाला वेळ आहे हो ? तुम्ही आम्हाला माती कुठं मिळते सांगा, आम्ही तयार माती घेऊन येऊ.''

''माती तयार करणं अगदी सोपं आहे. खर्च नाही. फुक्कट. थोडा वेळ लागतो एवढंच. दुसरं असं की दुकानातून चांगली माती आणली तरी काही दिवसांनी तिच्यातला कस संपतोच. त्या मातीत कस तयार करावाच लागतो. सारखी सारखी नवी माती आणता येत नाही. तेव्हा चांगली माती तयार करायला शिकणं कधीही चांगलंच. आपल्याला त्यात काहीही करायचं नसतं. हवा, पाणी, सूर्यप्रकाश आणि वातावरणातलेच जंतू आपापली कामं करत असतात, आपण दिवसातून एकदा तिकडं पाहायचं असतं एवढंच.'' असं मी त्या बाईंना समजून दिलं.

बैठकीतली माणसं आपसात बोलू लागली. ज्या गृहस्थांनी बैठक भरवली होती ते काही लोकांशी बोलून बैठक पुढं चालू करण्याच्या प्रयत्नात होते. काही वेळानं ते उभे राहिले व म्हणाले -''झाडाचं विज्ञान वगैरे गोष्टी आपण यथावकाश करूच, आताच त्यात जाऊ नये असं लोकाचं मत आहे. लोकांना भाज्या व फळं यांच्यात रस असल्यानं दामले यांनी तयार पिशव्या आम्हाला द्याव्यात व त्यामध्ये भाज्या लावून द्याव्यात.''

मी कागद घेतला. गच्चीचा आकार त्यावर काढला. साधारणपणे किती चौरस फूट गच्ची आहे ते कागदावर लिहिलं आणि कोणती फळं किंवा भाज्या लावायच्या आहेत असं विचारलं. त्यावर तिथं गोंधळ माजला. भाजी व फळं कोणती लावावीत यावर प्रत्येकाची वेगळी मतं होती. काही वेळ गेल्यानंतर मी उभा राहून बोलायला सुरवात केली.

''तुम्हाला मदत व्हावी म्हणून मी काही सूचवतो. त्या सूचनेनुसार सुरवात करा, व मग तुमच्या इच्छेनुसार त्यात हवे तसे बदल करा.'' असं म्हणून मी वांगी आणि भेंडीची लागवड करा असं सांगितलं. या दोन्ही भाज्या मुंबईच्या हवेत केव्हांही बऱ्यापैकी येतात. पिकाची अगदीच भरमार जरी झाली नाही तर थोडीफार भाजी नक्की मिळते, त्याचाही एक आनंद असतो असं मी सांगितलं.

माझं बोलणं संपल्यावर पुन्हा गोंधळ सुरू झाला. एक मध्यम वयाचे गृहस्थ उभे राहिले. ते म्हणाले, की फळं आणि भाज्यांच वाटप कसं करायचं यावर वाद चालले आहेत. फळं किती होणार आणि लोकांमध्ये कशी वाटायची यावर माणसं बोलत आहेत. प्रत्येक घरात किती माणसं आहेत ते पाहून वाटप करायचं की प्रत्येक घराचा किती चौरस फूट एरिया आहे ते मापून त्याप्रमाणं वाटप करायचं यावर वाद चालला आहे. झाडांची काळजी घेण्यासाठी माळी ठेवायचा तर त्याचे पैसे कसे गोळा करायचे तेही ठरत नाहीये. इमारतीत सोळा बिऱ्हाडं आहेत, गच्चीत होणारी भाजी विभागली तर प्रत्येकाच्या वाट्याला बचकभर भाजीही येणार नाही. मग त्यासाठी इतका सारा खटाटोप करणं आवश्यकच आहे काय असाही मुद्दा एकानं काढला होता. त्यापेक्षा बाजारातूनच भाजी आणणं काय वाईट असा मुद्दा एकानं काढला होता. शेवटल्या मजल्यावर राहणाऱ्या एका गृहस्थानं आम्हाला गच्चीतल्या ॲक्टीविटीचा त्रास होईल अशी तक्रार केली. आमचं छत गळेल, चिलटं आणि डास होतील असं त्यांना वाटत होतं.

एकानं मुद्दा काढला, की पालिकेकडं जाणारा कचरा आपण दूर करत असल्यानं गच्चीवरच्या शेतीचा खर्च पालिकेनंच का देऊ नये. आधी पालिकेशी बोलावं व नंतरच हे काम सुरू करावं असं त्या माणसाचं मत होतं. फारच मतं झाली होती. शेवटी असं ठरलं की पुन्हा एकदा बैठक घ्यावी व त्यामध्ये या सगळ्या मुद्दयांची चर्चा करावी. तोवर हा प्रकल्प भिजत ठेवावा.

बैठक संपल्यावर मी ज्या गुहस्थांनी उत्साहानं बैठक बोलावली होती त्यांच्या घरी गेलो. ते दु:खी झाले होते. ''अहो, माझा विचार होता की झाडं लावणं ही एक आनंदाची गोष्ट असल्यानं लोक आपणहून ती करायला येतील. आमच्या इमारतीत सगळी माणसं उत्तम स्थितीत आहेत. त्यांना कशाचीही ददात नाही. शिवाय गच्ची तशीच पडून आहे. त्यामुळं काही तरी झाडं गच्चीत वाढतील असं मला वाटत होतं. पण झालं भलतंच. पण जाऊ द्या. मला वाटतं की थोडा वेळ जाऊ द्यावा.''

एका धनाढ्य व्यापाऱ्यांचा किस्सा सांगतो. कोणाकोणाकडून ऐकून ते एके दिवशी माझ्याकडं पोचले. मला बळेबळे आपल्या घरी घेऊन गेले. त्यांच झाडावर प्रेम होतं. घरात भरपूर झाडं होती. घरात गेल्यावर फराळ झाला. मग ते एका झाडासमोर उभे राहिले. त्या झाडाला त्यांनी दूध घातलं. आणि डोळे मिटून काही तरी मंत्र पुटपुटत राहिले. मी पाहत होतो. मंत्र झाल्यावर मला त्यांनी आपणहूनच सांगितलं की जपानमधून एक माणूस आला होता व त्यानं जपानी भाषेतला एक मंत्र त्याला सांगितला होता. तो मंत्र झाडासमोर म्हटला की ते झाड उत्तम वाढेल असं त्या जपानी माणसानं सांगितलं होतं.

मी त्या मित्राला म्हणालो ''समजा, मी मराठीत त्या झाडाशी बोललो तर ते झाडाला कळेल काय ? समजा, मी कानडीत त्या झाडाला टाकून बोललो तर ते झाड चिडून फळ देणार नाही काय ?'' मित्र माझ्याकडं पाहत राहिला. मी त्याला समजून दिलं की झाडाशी बोलावं लागतं असं जे म्हटलं जातं ते मराठी-जपानी-गुजराती वगैरे भाषेच्या अर्थानं नाही. झाडाला रासायनिक भाषा समजत असते. त्याला नत्र हवं असतं, फॉस्फेट हवा असतो, त्याला पाणी हवं असतं. ती त्याची भाषा. संप्रेरकं कशी भाषा वापरतात ते सांगायचा मी प्रयत्न केला. अर्धा मिनिट त्या मित्रानं ऐकून घेतलं आणि नंतर त्यानं फोन ओढून शेअर्सच्या भावांची चर्चा सुरू केली. मी मनावर घेतलं नाही.

अशाच एका मित्रानं मला गच्चीत नेलं. गच्चीत बाग करायचं आमंत्रण मला दिलं. मी त्याला सांगितलं की झाडं मी सुरवातीला उभी करून देईन पण नंतर त्यांनी दररोज अर्धा तास झाडांना काय हवंय नकोय ते पाहावं, माती नीट करावी, खराब पानं खुडून टाकावीत, पाणी पुरतंय की नाही ते पाहावं. तो म्हणाला, ते त्याला शक्य होणार नाही. त्याचा आग्रह होता की मी दररोज त्याच्याकडं येऊन जावं. मी त्याला म्हटलं की मी आलो तर माझी फी द्यावी लागेल. त्यानं विचारलं, किती फी घ्याल ? मी त्याला सांगितलं की मी तासाला दोनशे रुपये आणि पेट्रोलचा खर्च ऐवढी फी घेतो. तशी त्याचं तोंड आंबट झालं. मी त्याला म्हटलं की त्यानं डॉक्टरला बोलावलं असतं तर त्याची किती फी दिली असती ? तर तो म्हणाला मी काही डॉक्टर नाही. मी त्याला सांगितलं, की अपोर्च्युनिटी कॉस्ट नावाची गोष्ट असते. हा एक तास मी माझ्या कामात खर्च केल्यावर मला दोनशे रुपये मिळत असतील तर ती माझ्या कामाची किंमत समजावी. त्यानं विषय टाळला. मग मी म्हटलं की माझ्याकडं एक माळी आहे. त्याला पाठवतो. माळ्याची फी दोन तासांसाठी पन्नास रुपये राहील. तीही देणं त्या मित्राला योग्य वाटेना. शेवटी झालं ते एवढंच की मी त्या दिवशी पिशव्यांत उसाचं चिपाड भरून त्यात वांगी, भेंडी आणि मक्याच्या बिया पेरून दिल्या व निघून गेलो. पुढं काय झालं ते माहीत नाही.

शाळा, कॉलेजं, खाजगी संस्था, कारखाने अशा अनेक ठिकाणी असा अनुभव आला.

एकदा मी शहर शेतीबद्दल बोलायला सांगलीला गेलो होतो. माझ्या समोर एक दांडगा शेतकरी बसला होता. मी जे काही सांगत होतो त्याकडं त्याचं फारसं लक्ष नव्हतं. माझं भाषण झाल्यावर त्या शेतकऱ्यानं प्रश्न विचारला की त्याच्या उसाच्या शेतामध्ये त्यानं दर एकरी किती नत्र घालाव. मी म्हटलं की मला ते माहीत नाही. त्यावर तो हसला व म्हणाला की आम्ही शेती हा शब्द वापरू नये. माझ्या प्रत्येक वर्गामध्ये एक-दोन तरी माणसं शेती करण्याचं मनात ठेवून आलेली असतात. मुंबईच्या जवळ त्यांनी कुठं तरी जमीन घेतलेली असे व तिथं त्यांना फळबागा करायची इच्छा असे. मी त्यांना सांगत असे की आम्ही जे करतो ती नेहमीची शेती नसून चौरस फुटांतली शेती आहे. गच्चीमध्ये दहा-वीस झाडं लावल्यावर त्यातल्या प्रत्येक झाडाकडं लक्ष देता येतं. शेतामध्ये मक्याची हजारो ताटं असतात, काकडीच्या हजारो वेली असतात. तिथं प्रत्येक वेलीची चौकशी करणं, काळजी घेणं शक्य नसतं. एका मुलाला शिकवणं आणि शंभर मुलांचा वर्ग चालवणं या गोष्टी अगदीच वेगळ्या असतात. शहर शेतीमध्ये झाड कसं वाढतं याचा अभ्यास करता येतो. त्यातून विज्ञान शिकता येतं. शहर शेतीमध्ये ज्या गोष्टी कळतात त्यांच्यावर अवलंबून मोठी शेती करता येत नाही. कारण मोठ्या शेतीतले सारे नियमच वेगळे असतात. म्हणून शहरी शेतीत जे कळतं त्याच्या आधारे देशाच्या अर्थव्यवस्थेची, देशाच्या किंवा साऱ्या जगाच्या शेतीची गणितं मांडणं खरं नसतं. शहरी शेती आनंदासाठी असते, बौद्धिक आनंदासाठी असते. तिच्यातून थोडंफार उत्पन्न मिळू शकतं पण त्याचा हिशोब बाजाराच्या कसोट्यांवर करणं बरोबर नसतं.

शहर शेतीबद्दल वर्ग घेतांना मी काही हजार लोकांशी बोललो. झाडं लावावी असं त्यांना जरूर वाटत होतं, झाडांचं महत्त्वही त्यांना पटलेलं होतं. झाडं लावणं हा एक चांगला विचार आहे हे सर्वांना मान्य होतं. पण तो विचार अमलात आणण्यासाठी ज्या काही सवयी लावून घ्याव्या लागतात त्या लावणं जमत नसावं. माणसांची जगण्याची एक धाटणी असते. एखादी नवी गोष्ट माणसाच्या मनाला आवडते पण जगण्याच्या धाटणीत ती बसत नसते. दारात एक झाड असणं आणि त्या झाडाचा अभ्यास करणं ही गोष्ट शहरी माणसाच्या चाकोरीत नाही. मुंबईसारख्या शहरामध्ये सार्वजनिक गोष्ट शेअर करण्याची लोकांची सवय तुटली आहे. स्वत:च्या पुरतं, कुटुंबाच्या पुरतं काहीही करणं माणसाला उत्तम जमतं. परंतु सार्वजनिक कामासाठी वेळ देण्याची वेळ आली की ते त्यांना जमेनासं झालंय. फार तर फार आर्थिक फायद्यासाठी चार माणसं एकत्र येतात. त्यातही आपल्या पोळीवर जास्त तूप कसं येईल याचीच काळजी जास्त असते, सर्वांनी मिळून जास्तीत जास्त तूप घेऊया म्हणजे स्वत:च्या पोळीवरचा वाटाही आपोआप मोठा होईल हा विचार अजून सामाजिक मनामध्ये रुजलेला दिसत नाही. सामूहिक जीवनाची एक वेगळी सवय असते. उपकार, सेवा याच कसोट्यांवर सामूहिक जीवन उभारलं जातं असं नाही. स्वार्थ या स्वाभाविक कसोटीवरही उत्तम सामाजिक जीवन उभं राहू शकतं. प्रत्येकाला स्वार्थ असतो. प्रत्येकाला चांगलं जगायचं असतं ही अगदी साधी गोष्ट आहे. स्वार्थ हे एक माणसाला कामाला लावणारं, माणसाला जगण्याची प्रेरणा देणारं वास्तव आहे, त्याच्या मुळाशी व्यक्ती हा घटक आहे हे वास्तव ध्यानात घेतलं तर सामूहिक जीवनही बऱ्यापैकी उभं करता येतं. आपली तशी तयारी अजून झाली नसावी. ओरबाडी किंवा एकदम सर्वसंगपरित्याग अशी दोनही टोकं टाळून एक व्यवहार्य उपयुक्त सामाजिक जीवन शक्य आहे असं लक्षात येईल तेव्हा गच्चीतली शेती शक्य होईल, इमारतीचे कॉरिडॉर आणि जिने आपोआप स्वच्छ राहू लागतील आणि रस्त्यावर होणारी घाणही थांबेल. शहरी शेती करण्याची लोकांची इच्छा आहे, पण जमत नाहीये. सवयी बदलणं हे वेळ खाणारंच काम असतं.

सामाजिक पातळीवर ज्या गोष्टी शक्य झाल्या नाहीत त्या गोष्टी व्यक्तिगत पातळीवर अनेकांना जमल्या आहेत. मुंबईत कुर्ला इथं राहणाऱ्या श्रीमती मगर यांनी एकदा फोन करून दाभोलकर, डॉ. दोशींना आपल्या कुर्ल्याच्या घरी आपली बाग पाहायला बोलावलं. आम्ही सर्वजणं त्यांच्याकडं गेलो. कुर्ल्यातल्या मुख्य सडकेवर त्यांच घर आहे. रस्त्यावरून सतत वाहनं वाहत असतात. त्यांच्या गच्चीवर गेल्यावर आपण एका गजबजलेल्या शहरात आहोत असं वाटतच नव्हतं. एका छोट्या जंगलात, शेतात आहोत असंच वाटत होतं. मगरबाईंची गच्ची म्हणजे एक बाग होती. पिशव्या, कुंड्या, खोकी, वाफे, ढीग अशा नाना प्रकारच्या जागी त्यांनी फळं आणि भाज्या लावल्या होत्या. रांगेनं शेवग्याची झाडं होती आणि त्यावर शेंगा लटकल्या होत्या. आंबेही होते. पपया होत्या. त्या दिवशी फलाहार झाला, आपल्या बागेतलीच फळं त्यांनी आम्हाला खायला दिली.

मगरबाईंची मुलं मोठी झाली होती, त्यामुळं घरामध्ये त्यांना काही वेळ मोकळा मिळत होता. एके दिवशी त्यांनी डॉ. दोशींचा लेख कुठल्याशा वर्तमानपत्रामध्ये वाचला. त्यां दोशींकडं गेल्या. दोशींना त्यांनी झाडं कशी वाढवली ते विचारलं. पिशव्या गोळा करा, त्यात उसाचं चिपाड घट्ट भरा, त्यात ऊस, केळ, अंजीर वगैरे झाडं लावा. वेळच्या वेळी पाणी द्या, शेण घाला असं साधं गणित दोसींनी सांगितलं. मगरबाई घरी गेल्या आणि त्यांनी लागवड केली. त्यानंतर त्या पुन्हा दोशींना त्रास द्यायला, विचारायला गेल्या नाहीत. दोनच वर्षांत त्यांनी स्वत:ची बाग उभी केली. झाडं लावणं, त्यांचं हवं नको पाहणं व त्यातून गोळा झालेला अनुभव याच्या आधारे त्यांची ही बाग उभी राहिली होती. आपलं आपणच काही करू शकलो याचा आनंद व्यक्त करण्यासाठी त्यांनी दोशी-दाभोलकरांना प्रेमानं घरी बोलावलं होतं.

दहा वर्षांपूर्वी दाभोलकरांनी भारावून टाकल्यावर मी वनस्पतींचा अभ्यास करू लागलो. त्यां अभ्यासात जे काही हाती लागलं ते विद्यार्थी, शेतकरी, कामगार, डॉक्टर, इंजिनियर, कचेरी कर्मचारी, महिला अशा नाना प्रकारच्या लोकांसमोर ठेवलं. विज्ञान ही माझी शिस्त नाही, जगण्याणं साधन नाही. शेती हेही माझं जगण्याचं साधन नाहीं. परंतु ज्ञानाचा आनंद मला हवासा वाटतो. हे ज्ञान लोकांसमोर ठेवणं आणि लोकांना सभोवतालच्या गोष्टीचं भान आणून देणं हे काम मला आवडतं. भान आणून देणं हे तर पत्रकाराचं मुख्य काम असतं. भान आणून देत असताना श्रोते व वाचकांना विषयाची गोडी लागावी, त्या विषयात आनंद मिळावा अशी माझी अपेक्षा असते. शिक्षण व्यवस्थेमध्ये आताशा ज्ञान, आनंद व गोडी या गोष्टी मिळेनाशा झाल्या आहेत. ही खोट माझ्या वर्गामध्ये व लिखाणामध्ये भरून निघते असं मला वाटतं. दाभोलकरांनी लावून दिलेला हा नाद टिकला. वाढत गेला. या नादात मी वनस्पतीशी संबंधित असणाऱ्या विज्ञान शाखांतला मजकूर वाचू लागलो. शेती, वनस्पतीशास्त्र, सूक्ष्म जीवशास्त्र, मातीशास्त्र, कायाशास्त्र, जैवतंत्रज्ञान, पेशीविज्ञान आणि अनुवंशविज्ञान अशा विविध विषयांत मला गोडी निर्माण झाली. मी जे वाचत गेलो ते वर्गामध्ये सांगत गेलो, लेखामध्ये लिहीत गेलो. आनंदासाठीच तर जगायचं असतं. झाडांच्या अभ्यासात तो आनंद फार मिळतो. काही प्रमाणात तो आनंद इतर लोकांपर्यंतही पसरवता आला. माझ्या वर्गात बरीच माणसं येऊन गेली. अजून एकाही माणसानं माझ्यावर टमाटे फेकलेले नाहीत. दैनिक-साप्ताहिकांतून या विषयावर अनेक बारीक बारीक टिपणं मी लिहिली. अजून एकाही माणसानं असलं फालतू लिखाण बंद करा असं मला सांगितलेलं नाही. लोकांना वनस्पतीबद्दल ऐकायला आवडतं असं लोक म्हणत आले. चला, झाडं लावणं जमलं नसेल, पण निदान झाडांबद्दल गोडी तरी निर्माण झाली.

## शब्दार्थ

**यथावकाश** थोडया वेळानंतर **भरमार** खूप, जास्त **बचकभर** ओंजळीत मावेल एवढे **खटाटोप** मेहनत, प्रयत्न **प्रकल्प** योजना **ददात** तोटा, उणीव **कसोटी** परिस्थिती **धाटणी** पद्धत

## वाक्‌प्रचार

**प्रकल्प भिजत ठेवणे** काम बंद ठेवणे **तोंड आंबट होणे** नाराज होणे

## मूळ इंग्लिश शब्द

**ऑपॉर्च्युनिटी कॉस्ट** (Opportunity Cost) नड भागण्याची किंमत वेळेवर उपयोगी पडण्याचे मूल्ये
**ॲक्टीव्हिटी** (Activity) उपक्रम
**कॉरिडोर** (Corridor) इमारतीच्या मधली जागा.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) गच्चीवर कोणत्या भाज्या लावण्याची सूचना दामल्यांनी केली ?
(2) श्रीमंत मगर यांनी फोन करुन घरी कोणाला बोलावलं ? का ?
(3) मातीचा कस वाढविण्यासाठी कोणते नैसर्गिक घटक काम करतात ?
(4) निळू दामले यांनी वनस्पतीचा अभ्यास केव्हा सुरु केला ?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) गच्चीवरील शेतीमुळे कोण-कोणते फायदे होणार होते ?
(2) डॉ दोर्शींनी मगरबाईना कोणते मार्गदर्शन केले ?
(3) मगरबाईंनी आपली गच्चीवरील बाग कशी फुलवली त्याचे वर्णन करा.
(4) वनस्पतीशी संबंधित कोणकोणत्या विज्ञानशाखांचा उद्देश लेखकाने केला आहे ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) धनाढय व्यापाऱ्याच्या घरी लेखकाला कोणता अनुभव आला ?
(2) बैठकीत लेखकांनी कोणती माहिती सांगितली ?
(3) लेखकाच्या मित्राचा बागकामाचा उत्साह का मावळला ?
(4) लेखकांचे वनस्पती विषयक ज्ञान स्पष्ट करा ?
(5) शहरी शेती आणि मोठी शेती यातील तुलनात्मक फरक स्पष्ट करा.

### विद्यार्थी-प्रवृत्ती

- तुमच्या परिसरातील झाडांविषयी माहिती एकत्र करा.
- वृक्षारोपण करा.

### शिक्षक-प्रवृत्ती

- घरातील ओला कचरा आणि म्हणजे भाज्याचे देठं, असा वेगळा करुन त्याचा वापर झाडांच्या खतासाठी कसा करता येईल ते मुलांना सांगणे.
- त्याच बरोबर प्लास्टीकच्या पिशव्यांचा वापर टाळण्यास सांगणे.

•

# 21 श्रावणझड

अनिल ( आत्माराम रावजी देशपांडे )
( जन्म : 1901 मृत्यू : 1982 )

प्रयोगशील कवी आणि मराठीतील मुक्तछंदाचे प्रणेते असणाऱ्या अनिलांनी समीक्षा सुद्धा लिहिली. फुलवात, सांगांती, दशपदी, भग्नमूर्ती, निर्वासित चिनी मुलास इ. कवितासंग्रह 'दशपदी' या संग्रहाला 1977 मध्ये साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे.

दशपदी ही सुद्धा मुक्तछंदाप्रमाणेच अनिलांनी मराठी साहित्याला दिलेली नव्या वाङ्मय प्रकाराची देणगी आहे. दश ओळींची ही कविता असते म्हणून तिला अनिलांनी 'दशपदी' असे नाव दिले. त्यांनी 'दशपदी' चे शास्त्रशुद्ध विवेचन केले. त्यात प्रत्येकी दोन ओळींचे शेर आणि एकूण दश ओळींची रचना असून वेगवेगळी भावचित्रे रंगवलेली असतात.

'श्रावणझड' या कवितेत पावसाची संथ, लयबद्ध रिमझिम आणि कवीच्या मनात झरणारा भावनांचा पाऊस यांचे सुंदर चित्रण कवीने रेखाटलेले आहे.

---

श्रावणझड बाहेरी मी अंतरि भिजलेला
पंखी खुपसून चोच एक पक्षि निजलेला
अभ्रांचा हृदयभार थेंब थेंब पाझरतो
विझलेला लांब दिवस चिंब होत ओसरतो
उथळ उथळ पल्वलांत संगळून जळ बसतें
क्षणजीवी वर्तुळांत हललेंसें भासवितें
चळतें प्रतिबिंब जरा स्थिर राहुन थिजतांना
बिंदुगणिक उठलेलें क्षीण वलय विरतांना
झिमझिम ही वाऱ्यासह स्थायी लय धरुन असे
संमोहन निंद्रेंतुन शब्दांना जाग नसे !

### शब्दार्थ

**अंतर** मन **अभ्र** ढग, मेघ **पलवल** डबके **संगळणे** साचणे, जमणे **वलय** वर्तुळाकार **संमोहन** भ्रम

### स्वाध्याय

**1. खालील दिलेल्या विकल्पांमधून योग्य विकल्प शोधून उत्तरे लिहा :**

(1) श्रावणझड कवितेचे कवी कोण ?
(अ) केशवसुत (ब) बालकवी (क) अनिल (ड) पाडगावकर

(2) कवी अनिल यांचे खरे नाव काय ?
(अ) वि. वा. शिरवाडकर (ब) आचार्य अत्रे
(क) ना. सी. फडके (ड) आत्माराम रावजी देशपांडे

**2. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

(1) कवी अनिलांनी 'श्रावणझड' कवितेत डबक्याचे वर्णन कसे केले आहे ?
(2) 'दिवस कधीचा विझून गेला आहे' असे कवी का म्हणतात ?
(3) या कवितेच्या आधारे 'दशपदी' काव्य प्रकाराचे वैशिष्ट्ये समजावा.

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) 'श्रावणझड' या कवितेच्या आधारे 'श्रावणातल्या पावसाचे' वर्णन करा.

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- बालकवींची 'श्रावणमासी' कविता मिळवा आणि समूहगान करा.

**भाषाभिव्यक्ती**

ही कविता संथ लयीत वाचली तर तिच्यामध्ये असणाऱ्या शब्दांचे, आशयाचे आणि नादमयतेचे सौंदर्य लक्षात येऊ शकेल. श्रावणातला पाऊस, आषाढ महिन्यात कोसळणाऱ्या पावसासारखा धुवांधार बरसत नाही.तर शांतपणे पडत असतो. त्याचा रिमझिमता नाद कवीला जाणवतो. प्रत्येक दोन ओळी वाचल्या तरी कविता अपूर्ण वाटत नाही. उदा. ''अभ्रांचा हृदयभार थेंब थेंब पासरतो, विसलेला लांब दिवस चिंब होत ओसरतो.''

या दोनच ओळी वाचल्या तरी त्यातील अर्थ स्पष्ट होतो. आकाशात दाटून आलेल्या काळ्या पावसाठी ढगांचे बरसणे म्हणजे त्यांच्या मनात साठून आलेल्या भावनांचे बरसणे आहे असे कवी म्हणतो. आभाळात सूर्य नसल्याने दिवस कधीच विझून गेलेला आहे असे वाटता, म्हणून कवीने हा दिवस 'लांबलेला दिवस' आहे असे म्हटले आहे.

याप्रकारे पहिल्या दोन ओळीपासूनच पुढे या कवितेचा आनंद घेण्यासाठी तुम्हाला प्रयत्न करता येईल.

कवी अनिल यांनी यामध्ये 'पलवल' (डबके), 'अभ्र' (ढग), 'अंतर' (मन), 'जळ' (पाणी), 'बिंदुगणिक' (प्रत्येक थेंबानुसार), 'स्थायी' (टिकाऊ), 'संमोहन' (मोहभास, मोहजाल), अनेक संस्कृत शब्दांचा वापर केला आहे. या शब्दप्रयोगांमुळे कवितेची रसपूर्णता वाढली आहे.

श्रावणतल्या पावसात चिंबा भिजून गेलेल्या एका दिवसाचे चित्र यात दिसतेच आणि त्याबरोबरच कवीची मानसिक स्थिती सुद्धा या शब्दांमधून प्रकटते. पंखांत चोच खुपसून निजतेला पक्षी, बरसणारे ढग, छोट्या डबक्यांत साचलेल्या पाण्यात हलणारी प्रतिबिंबे, वाऱ्याची झुळुक या दृश्यांची मोहिनी वाचकांच्या मनावर परसत जाते. आणि शब्द मुक होतात. या कवितेतील आंदोलने वाचकांच्या मनात उमटतात.

•

# 22 माझ्या 'संस्कृतची' कथा

**कुमुद पावडे**

मराठीतील, दलित साहित्यातील या महत्वपूर्ण लेखिका आहेत. त्यांच्या 'अंत: स्फोट' या आत्मचरित्रात्मक लेखनातून पुढिल निबंध संपादित करण्यात आला आहे. यामध्ये एकूण नऊ लेखांचा समावेश आहे. दलित समाजातील मुलगी संस्कृतसारखा विशिष्ट जातीपुरता मर्यादित राहिलेला विषय शिकू पाहते, तेव्हा तिला कोणत्या अडचणी येतात, कोण मदतरुप होते आणि कसा संघर्ष करावा लागतो त्याचे यामध्ये वर्णन आहे.

कोणत्याही जातीपेक्षा शेवटी माणसांमधल्या स्वभावाचा नेमका पैलू हेरण्याची लेखिकेची हातोटी यामध्ये दिसते. त्यांच्या गोखले गुरूजींचे व्यक्तिचित्रे मनेज्ञ आहे. लहानपणी उच्चवर्णियांच्या घरी येणारा अनुभव मन दुखवणारा आहे.

आत्मकथानात स्वत:विषयी लेखक सांगत असतो. पण आपण काही एकट्याने जगत नसतो. आपल्याशी इतर माणसे कशी वागली आणि आपल्यावर त्या साऱ्यांच्या वागण्याचा काय परिणाम होतो आणि आपल्या वागणुकीमुळे इतरांच्या काय प्रतिक्रिया आहेत त्याचे चित्रण दिसते.

---

अनेकदा मी माझ्याबद्दल प्रत्यक्ष माझ्याच तोंडावर फार ऐकत असते. निमूटपणे ऐकण्याची आता सवय झालीय किंबहुना तेच अंगवळणी पडलंय. ऐकावं लागतं ते असतं माझं कौतुक. ह्याचं दुसरं नाव स्तुती. वास्तविक स्तुती ऐकायला मला मुळीच आवडत नाही.

आता माझं कौतुक कशाबद्दल असे विचाराल, तर ते कौतुक असतं माझ्या संस्कृत ज्ञानाचं. संस्कृत शिकल्याचं अन् शिवकण्याचं. काय कोणी संस्कृत शिकतच नाही? तसं नाही. पण मी ज्या समाजातून आले, त्या समाजाचा आणि संस्कृतचा संबंध भारतीय मनाला जुळण्यासारखा वाटत नाही.

बोलणाऱ्याला वाटतं ऐकणाऱ्याला कळत नाही, कारण नीच जातीच्या माणसाची ते बोलणं कळून घेण्याची कुवत नसते. किंबहुना कळावं असा काहींचा रोख असतो, कारण बोलण्यानं मी खचावं. 'अहो, किती आश्चर्य आहे नाही? आपण संस्कृत शिकवता म्हणे, सरकारी महाविद्यालयात? आम्हाला फार आनंद होतोय. बरं का?' शब्द साधेच असतात. वाच्यार्थ अगदी सरळ पण ध्वन्यर्थ मला निरनिराळ्या रूपांत सतावतो. 'आमचं कुठल्या जन्माचं पाप आहे की, तुमच्याही हातून आम्हाला संस्कृत शिकावं लागतं.'

पर्यायानं काय की, जात विसरण्याच्या प्रयत्नात जात विसरलीच जात नाही आणि मग कुठेसं ऐकलेलं आठवतंय, 'जन्मानं जी येते आणि गेल्यानंतरही जात नाही, ती जात.'

या द्वेष आणि घृणेकडे पाहतच मी अतीताच्या अंतरात शिरते.

माझ्याबरोबर शिकणाऱ्या मुली ब्राह्मण आणि इतर जातीच्याही असत. त्यांच्याच घरावरून जावं लागे. मी सोबतीसाठी सहजच थांबे. माझ्यासमोरच आया आपल्या लेकींना बजावत असत, 'बघ हं, शिवू नकोस हिला, हिच्यापासून दूर रहा आणि हिच्यासोबत खेळू नकोस. नाहीतर घरात घेणार नाही पुन्हा.' माझ्या बालमनावर ह्याचा परिणाम काय होतो आहे ह्याची जाणीव त्या तथाकथित सुशिक्षित व सुसंस्कृत आयांना होत नसावी. मला कळत नव्हतं असं का?

मी रोज स्वच्छ आंघोळ करते पिअर्स सोपनं, माझी आई कामिनिया तेल लावून छान वेणी घालते, माझे कपडेदेखील स्वच्छ धुतलेले असतात, माझ्या जातीच्या मुलींना माझ्याबरोबर खेळायला फार आवडते, कारण एक छान वास घ्यायला मिळतो. कारण वडील स्वत: कॉस्मेटीक्सचे शौकीन. त्यामुळे निरनिराळी तेले, साबण, सेंट्स इत्यादी घरात सदैव असत. माझ्या वर्गातल्या इतर मुलींना (म्हणजे आमच्या वस्तीचा परिसर सोडून) देखील माझ्याबरोबर बसायला आवडत असे. आणि तरी या बायांनी असं का बोलावं? किंबहुना घराच्या बाबतीत जरी तुलना केली तर ह्यांच्यापेक्षा आपलं घर अधिक स्वच्छ असतं. आई रोज शेणानं सारवतेय, पांढऱ्या मातीच्या किनार रेखीव असतात. अंगणात सडा घातलेला असतो, रांगोळी घातलेली असते, कुठल्याशा सणाच्या निमित्तानं,पंधरवड्यातनं संपूर्ण घराच्या वरच्या माळ्याच्या भिंतीपासून खालच्या माळ्यापर्यंत लख्ख चुन्याची सफेदी केली जाते आणि उकळत्या सोड्याच्या पाण्यात शिजवलेली चिंधी धुतली जाते. काशाची भांडी लख्ख घासलेली असतात. उलट ह्या मुलींकडे मला पिण्याच्या भांड्यांवरदेखील पाण्याच्या थेंबाचे व्रण व तुपकट ओशटपणा दिसतो. उलट मलाच ह्या मुलींबरोबर बसायला आवडत नसे.

हायस्कुलात गेल्यावर 9व्या वर्गात मी संस्कृत घेतलं ऐच्छिक विषय म्हणून. मी संस्कृत घेऊ नये म्हणून अप्रत्यक्ष असे रीतसर सर्व प्रयत्न झालेच. 'तूला जमणार नाही. घरी सांगायला कुणी नाही. संस्कृत अतिशय कठीण असतं. वगैरे, वगैरे.' पण मी दगड बनल होते. कुठल्याही बोलण्याचा परिणाम माझ्यावर होत नाहीसा पाहून बोलणारांनी बोलणं सोडून दिलं. पण मनात आलेली अढी नष्ट व्हावी कशी ? मतामतांची पर्वा मला करायची नव्हती. मला फक्त हातेकर गुरुजींचा विचार करावयाचा होता. हातेकर गुरुजींना माझं 5व्या वर्गापासून अतिशय कौतुक. एवढीशी चिमुरडीसर्वच विषयांची कशी पटकन् उत्तर देते. मी हातेकर गुरुजींना विचारलं, 'सर. मी संस्कृत घेऊ ना ?' 'तर घे की, अग पण तू आर्टसचे विषय घेतलेत म्हणे. गणित तुझं चांगलं असताना. गणित, सायन्स घे, संस्कृतबरोबर.' 'पण सर. मला गणितात रुची नाही.'–मी. 'अग, पण तू डॉक्टर होशीला ना ?' 'मला डॉक्टरचा पेशा आवडत नाही सर. दु:ख सहन होत नाही.' नि ते हसले. म्हणाले, 'उलट ज्यांना दु:ख सहन होत नाही तेच अधिक लायक डॉक्टर बनू शकतात. पीडितांची सेवा होणार नाही तुझ्याकडून ? तुमच्या समाजात खरे तर ह्याचीच जास्त गरज आहे. बरं, तुझी इच्छा.'

अपार उत्सुकतेनं आणि रुचीनं मी संस्कृत शिकू लागले. अकारान्त पुल्लिंगी 'देव' शब्दाचा पाठ करताना मी मंत्रोच्चारांच्या स्वराचा लय उचलला. विशेषत: निसर्गाच्या बाबतीत संस्कृतचा पहिला पाठ गिरवण्यात मला खरीखुरी मदत ज्यांची झाली त्या गोखले गुरुजींचा मला आदरानं उल्लेख कारावास वाटतो. तसं झालं नाही तर माझ्या रक्ताच्या बिंदूनादेखील ती बेइमानी टोचेल. आमचे गोखले गुरुजी. धोतर, फुलशर्ट, काळी टोपी, कपाळावर गंधाचा टिळा, वेदशाळेतील Typical खणखणीत शुद्ध उच्चार आणि विद्यार्थ्यांकडून संसकृत अध्ययन करवून घेताना कमालीची कळकळ. मला प्रथम भीती वाटली, त्या जुन्या वळणाच्या माणसाला माझ्याबद्दलची घृणा मला शिकविण्यापासून परावृत्त तर नाही ना करणार ? पण ही भीती निराधार ठरली. अनुभव माझ्या अटकळीच्या नेमका उलटा आला.

एका कसल्याशा निबंधस्पर्धेत मला शाळेत (भिडे कन्याशाळा) पाठवलं होतं प्रतिनिधी म्हणून. स्पर्धेचं केंद्र होतं भोसला वेदशाळा. महालातील कुठलाही भाग माझ्या परिचयाचा नव्हता. मी भीतभीत माझी अडचण गोखले गुरुजींना सांगितली. गुरुजी म्हणाले, 'तुम्ही माझ्याकडे या ना,' (गुरुजी आम्हाला एकेरीनं कधी बोलत नसत.) 'मी तुम्हाला घेऊन जाईन.' आणि त्यांनी मला त्यांचा पत्ता दिला. विचारत विचारत सांगितलेल्या पत्यावर महालातील गल्लीबोल पार करत पोहचले. गुरुजींच घर म्हणजे प्रशस्तपणे पसरलेला वाडाच. सारवलेले भले मोठे आंगण व त्यात तुळशीवृंदावन, मोठी विहीर, आतच लहानसं महादेवाचं मंदिर, सारं कसं जुनं पुराणं ठेवणीतल्या बनारसी शालूसारखं. मी संकोचून आत प्रवेशले. 'या' आपुलकीच्या खणखणीत स्वरानं स्वागत केलं. कोण आलंय म्हणून पहायला दोन मुलं बाहेर आली. 10-12 वर्षाची. एकूण वळणावरून धोतर, शर्ट, शेंडी आणि गंधटिळा आणि चेहरा–मोहरा. ती मुलं गुरुर्जींचीच होती. थोड्या वेळानं गुरुजींच्या हाकेसरशी त्यांच्या पत्नीही बाहेर आल्या. सोवळ्यातच होत्या त्या. चेहरा सात्त्विकपणानं तुडुंब भरलेला. आतिथ्यशीलतेनं शरीराचं अंग अंग बोलकं. परिचयाची औपचारिकता आटोपली. त्या लगबगीनं आत गेल्या आणि काही वेळानं मोठा मुलगा पोह्याच्याबशा घेऊन बाहेर आला. मी घाबरले. मनातल्यामनात धाकधुक होत होती. 'या बाईला माझी जात कळली तर ?' आवंढे गिळत मी पाण्याच्या घोटाबरोबर पोहे संपवत होते. कोणाच्याच बोलण्याकडे माझं लक्ष नव्हतं. येथून मी कशी व केव्हा बाहेर पडेन ह्याचीच सारखी चिंता. समजा, ह्याच वेळी बडींचं कोणी आपल्याला ओळखणारं इथं आलं तर!

'परमेश्वरा! वाचव बाबा ह्या जीवघेण्या प्रयत्नातून.' अनेक आर्जव त्या दयाघनाची करत होते. पण तसं काही झालं नाही. ती सारी माणसंच फार चांगली. मोकळेपणं बोलत. निदान गुरुजींना तरी निश्चितच माझी जात माहीत होती. परंतु कमीपणाची कसलीही जाणीव मला झाली नाही. आणि मला गुरुजीविषयी नितान्त आदर वाटला. जुन्या संस्कारातील ह्या महाब्राह्मणाचा नि:पक्षपात हीन जातीच्या विद्यार्थिनीविषयीही तसाच कायम राहिला हे त्यांच्या उच्च विचारांचे आणि उदार हृदयाचे लक्षण नाही असं म्हणण्यात काय हशील आहे ? गुरुजींनी सांगितलेला अभ्यास उत्तमपणे करावा, अनभ्यासानं त्यांना क्रोध आणू नये हेच माझे त्यावेळचे लक्ष्य ठरले. कोणी कोणाच्या जीवनास कसं उजळून टाकील हे सांगता येत नाही. एखाद्या क्षुद्र जीवाच्या जीवनाला दिव्यत्वाचा स्पर्श करण्याचं सामर्थ्य आपल्यात आहे ह्याची जाणीवही गुरुजींना नसावी. मॅट्रिकनंतर माझी त्यांची भेट नाही. कदाचित ते मला ओळखणारही नाहीत. परंतु शब्दांच्या दक्षिणेनं पवित्रपणाचा अंशभाग चुकवून आदराचा मनावरील बोझ शिथिल करू इच्छिते. कारण गोखले गुरुजींनी त्यावेळेस आपुलकी दाखविली नसती आणि त्यांच्या सनातनी वृत्तीला शोभणारी हीनत्वाची भावना दर्शविली असती तर मी संस्कृत शिकले असते काय ?

नाही-हो करत अखेर मॅट्रिक्युलेशन केलेच, परीक्षेतले संस्कृत विषयाचे मार्क्स पाहून मी एकदम घोषित केलं, 'मी संस्कृतात एम.ए. होणार.' आमच्या शेजारची पूर्वीची सुविद्य मंडळी मागच्याप्रमाणेच हसली. थट्टेन. त्यात काही प्रोफेसर वकीलही होते. असं, कसं शक्य आहे? मॅट्रिकच्या वर्गात मिळाले असतील जास्त मार्क्स म्हणून संस्कृतात एम.ए. होणं इतकं का सोप आहे? भलत्याच बढाया मारू नयेत. आपापली कुवत ओळखावी. बोलणारे बोलत होते. गम्मत अशी की, बोलणारे हे सारे आमच्याच जातीचे लोक होते. पण त्यांचे शब्द मला माझ्या निर्णयापासून परत फिरवू शकले नाहीत. मी त्यांना उत्तर दिलं नाही. उत्तर मला माझ्या कृतीनं द्यावयाचं होतं आणि त्यासाठी मी खूप अभ्यास करणं आवश्यक होतं. संस्कृतच घेऊन एम.ए. करायचं तर सुप्रसिद्ध मॉरीस कॉलेजमध्ये जायला हवं. मैत्रिणीच्या बहिणीकडून मी कॉलेजमधल्या कितीतरी गोष्टी ऐकल्या होत्या. येथले विद्वान व रसिक प्रोफेसर्स, व्रात्य मुलं आणि सुंदर मुली आणि थोरली लायब्ररी, माझा (Interest) फक्त शिकविणाऱ्या प्रोफेसरांविषयी व लायब्ररीपुरता मर्यादित आणि मी मॉरीस कॉलेजमध्ये जाऊ लागेल.

महात्मा जोतिबा फुल्यांच्या सहवासात राहिलेल्या सावित्रीबाईला काय भोगावं लागलं असेल हयाची थोडीफार कल्पना येऊ लागली होती.

तर माझं बी.ए. झालं. बी.ए.च्या गुणपत्रिकेतदेखील मला वाखाणण्याजोगे मार्क्स होते. कोणत्याही प्रकारे बाध न येता मी चांगले मार्क्स मिळविले होते. मला माझ्या गुरुजनांच्या नि:पक्षपातीपणाबद्दल अभिमान होताच आणि त्याबरोबर आनंदही परंतु माणसाच्या आयुष्यात कोणतेही सुखाचे अनुभव निर्भेळ नसतात. किंबहुना कसलं तरी गालबोट लागल्याशिवाय ते सुख पचनी पडत नसतं. तर माझ्या एम.ए.ची कथा. एम.ए.च्या द्वितीय वर्षाला आम्ही स्नातकोत्तर विभागात (विद्यापीठाच्या) शिकावयास गेलो. तेथे अतिशय नामवंत विद्वान आम्हाला शिकवत असत. तेथील विभाग प्रमुख भारतीय कीर्तीचे विद्वान. त्यांना माझं संस्कृत शिकवणं आवडत नसे, तसं ते स्पष्टदेखील दर्शवीत. किंबहुना तसं जाणवू देण्यात त्यांना दुष्ट आनंद होत असे. त्यांचे ओरखडणारे टोमणे ऐकून माझं मन रक्तबंबाळ होत असे. एक प्रकारे मी ह्या श्रेष्ठ पंडिताची धास्तीच घेतली होती. बोलणं तसं अतिशय मधुर, समजूतदार पण अतिशय विषलिप्त. माझे मन नकळत गोखले गुरुजींशी ह्यांची तुलना करत असे. एवढा हा भारतीय कीर्तीचा डॉक्टर माणूस, आधुनिक वेष करणारा, टोपी न घालणारा, आत्म्याचे तत्त्वज्ञान रसाळपणे रंगविणारा, सहजतेनं गहन विषय सुकर करून सांगणाऱ्या ह्या महात्म्याला ग्रंथातील आत्म्याचं तत्त्वज्ञान प्रत्यक्षात उतरवण्यास का कठीण जावं कळेना मला! आधुनिकतेचा स्पर्श झालेला हा माणूस आणि पुराण्या संस्कृतीतील गोखले गुरुजी. एक संस्कारांनीच कोता झालेला तर दुसरा संस्कारांनीच समृद्ध बनलेला; फलाभाराने वाकलेल्या वृक्षासारखा. दिवस जातात. प्रसंगही निभावतात पण त्यातील जाण कायमच घर करून राहते. अंत:करणाच्या अंतर्गभात. एवढ्या कठीण कसोटीतूनसुद्धा मी निभावले. एम.ए., झाले. गुणवत्ता घेऊन. प्रा. डॉ. कोलत्यांकडून (माजी उपकुलगुरू, नागपूर विद्यापीठ)अभिनंदनाचा रंगबेरंगी सुवासिक फुलांचा गुच्छ आला. मी अनिमिष नेत्रांनी पाहात होते. त्या फुलांत मला दिसत होते, अभिमानात पाकळी न पाकळी फुललेलं डॉ. कोलत्यांचं हृदयपुष्प आणि संवेदना मोहरविणारा व अस्मितेला जागृत करणारा तो अवीट आनंदाचा मधुर गंध!

...आणि आता 'मी संस्कृतची प्राध्यापक होणार' सोन्याचा मुलामा घेऊन स्वप्नं फिरोजी रंगात रंगू लागली. स्वत:विषयी जोजवणाऱ्या कल्पना मस्तकात निरनिराळे आकार घेरू लागल्या.

### शब्दार्थ

**कुवत** शक्ती, सामर्थ्य **रुची** आवड **व्रण** डाग **घृणा** तिरस्कार **आर्जव** विनवणी **व्रात्य** खोडकर **अतीत** भुतकाळ

### टीप

**अतीताच्या अंतरात** भूतकाळाच्या आठवणीत

### स्वाध्याय

**1. खाली दिलेल्या विकल्पामधून योग्य विकल्प शोधून प्रश्नांची उत्तरे द्या :**

(1) 'माझ्या संस्कृतची कथा' या पाठाचा साहित्य प्रकार कोणता?
(अ) कथा (ब) नाट्यांश (क) निबंध (ड) आत्मचरित्र

(2) 'माझ्या संस्कृतची कथा' या पाठाच्या लेखिका कोण?
(अ) सरोजिनी बाबर (ब) कुमुद पावडे (क) स्मिता भागवत (ड) अरुणा ढेरे

(3) लेखिकेला संस्कृत शिकविण्यात खरीखुरी मदत कोणाची झाली?
(अ)हातेकर गुरुजी (ब) गोखले गुरुजी (क) दामले गुरुजी (ड) कदम गुरुजी

**2. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :**

(1) लेखिकेला काय ऐकायला आवडत नाही ?

(2) लेखिकेला जातीबद्दल काय ऐकलेले आठवते ?

(3) लेखिका अतीताच्या अंतरात केव्हा शिरते ?

(4) लेखिकेला डॉक्टरी पेशा का आवडत नाही ?

(5) गोखले गुरुजींच्या घराचे वर्णन करा.

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) गोखले गुरुजींच्या घरी लेखिकेला कोणता अनुभव आला ?

(2) लेखिकेला गोखले गुरुजींबद्दल अधिक आदर का वाटतो ?

(3) लेखिकेला 'सावित्रीबाई फुले' ह्यांची आठवण का आली ?

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- 'स्त्री शिक्षणासाठी' प्रयत्न करणाऱ्या सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, धोंडो केशव कर्वे या महान व्यक्तींची माहिती मिळवा आणि वाचा.

**भाषाभिव्यक्ती**

दलित साहित्याचा प्रवाह हा मराठी भाषेला, मराठी साहित्याला समृद्ध आणि संपन्न करणारा आहे. दलित कथा आणि आत्मकथने यांनी यामध्ये महत्वाचा वाटा उचललेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेमुळे दलित जीवनामध्ये परिवर्तन झाले. अज्ञानाविरुद्ध, अन्यायाविरुद्ध, शोषणाविरुद्ध दलित समाजाने लढा दिल्यामुळे त्यांच्यामध्ये आत्मविश्वास आला. जाती वर्णापेक्षा माणसाचे मनुष्यत्व महत्वाचे आहे ही दृष्टी शिक्षणामुळे त्यांना प्राप्त झाली. दलित स्त्री वर्गानेही आपल्या वेदना लेखनातून माडल्या. परिवर्तनाच्या वाटेवर असणाऱ्या अनेक संकटांना, मानहानीला, अन्यायकारी वर्तनाला त्या जिद्दीने कशा सामोऱ्या गेल्या याची प्रेरणादायी कहाणी यामध्ये आहे.

•

# 23 ॲन फ्रँकची डायरी

**मंगला निगुडकर**

''द डायरा ऑफ ॲन फ्रँक'' हे जागतिक साहित्य विश्वातील अमोल लेणे आहे. ''द डायरा ऑफ ॲन फ्रँक'' या मूळ इंग्रजी भाषेतील पुस्तकाचा मराठीत अनुवाद श्री मंगला निगुडकर यांनी केला आहे. प्रस्तुत पाठात ॲनची तीन दिवसांची रोजनिशी घेतली आहे.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ज्यू लोकांचा हिटलर प्रेरित नाझी लोकांकडून जो छळ झाला, त्यातील अघोरी अनुभव वाट्याला आलेली ही बालिका ॲनची आई, बहीण आणि वडील भस्मासुरापासून दूर पळत, एका इमारतीत लपून-छपून जीवन कंठू लागतात त्यांना दोन वर्षातच हुडकून काढण्यात येते आणि जर्मन छळछावणीत सर्वांची रवानगी होते.

---

प्रिय किटी,

अन्नाचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत चालला आहे. नुसत्या हॉलंडात नव्हे, तर साऱ्या युरोपभर.

इथे या गुप्तनिवासात राहायला आल्यापासून गेल्या एकवीस महिन्यांत आमच्या अन्नपदार्थांची आवर्तने चालली आहेत. एकदा एक भाजी स्वस्त मिळायला लागली म्हणजे न्याहारीत तीच, दुपारच्या जेवणात तीच, संध्याकाळी तीच. कधी रस्सा, कधी परतलेली तर कधी तळलेली किंवा उकडलेली. अशी काकडी, टोमॅटो, पालक वगैरे भाज्यांची आवर्तने झाली आहेत. फार कंटाळवाणी! पण भूक लागली म्हणजे, मिळेल ते खाण्याशिवाय इलाजच नसतो. सध्या ताज्या भाज्याच मिळत नाहीत, म्हणून एका दृष्टीने सुखी आहोत. बटाटे रोजच्या प्रत्येक वेळच्या आहारात असतातच. शिवाय सरकारी रेशनमधून मिळणाऱ्या पिठाची यीस्ट घालून बनवलेली डंपलिंग्स. सरकारी रेशनमधल्या वस्तूंचा दर्जा इतका चांगला असतो की, त्यापासून बनवलेली डंपलिंग्स दगडासारखी पोटात बसतात. आठवड्यातून फक्त एकदा पावाला लावायला मुरंबा मिळतो. एवढे हाल सोसूनही आम्ही आपले जगतोच आहोत. एवढेच नाही, तर असल्या या कदान्नाचासुद्धा आनंदाने आस्वाद घेतो.

तुझी, ॲन.

प्रिय किटी,

युद्धाचा शेवट अजूनही दृष्टीच्या टप्प्यात येत नाही. 'युद्धसमाप्ती' ही एक अद्‌भुत गोष्ट वाटते आहे. या सप्टेंबरपर्यंत युद्ध संपले नाही, तर मी शाळेत जाणारच नाही. कारण वय वाढते आहे, पण शाळेतली इयत्ता मात्र दोन वर्षांपूर्वीची. या सर्व विचाराने मला रडू येते. इतरांसमोर मी हसतमुखाने बोलते. पण एकांतात मला भडभडून येते. परवा रात्री देवाची प्रार्थना केली आणि एकेक गोष्टी आठवून इतके रडायला आले, विचारू नकोस. शेवटी हुंदके जोरात यायला लागले, तशी मी घाबरून रडणे आवरले. कुणी येऊन माझी समजूत घालायला लागले तर मला कसेतरीच वाटते. मी मग स्वत:ची स्वत:च समजूत घातली आणि हळूहळू शांत झाले. रडणे थांबवले.

आता झटून अभ्यास केला पाहिजे. माझ्या मनातून लेखक आणि पत्रकार व्हायचे आहे, मला लिहिता येते याची मला पूर्ण जाणीव आहे. आतापर्यंत मी बऱ्याच कथा लिहिल्या आहेत. या 'गुप्तनिवासाची' मी केलेली वर्णने विनोदी आहेत, असे मला वाटते. पण माझ्यात खरे साहित्यिक गुण आहेत का नाहीत, ते अजून ठरायचे आहे.

'इव्हाचे स्वप्न' नावाची एक छान परिकथा मी लिहिली आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, माझ्या लिखाणाची उत्तम टीकाकार मीच आहे, माझे कोणते लिखाण चांगले उतरले आहे, कोणते नाही ते मला कळते, एकेकाळी, आपल्याला चित्रकला अवगत नाही याचे मला भारी वाईट वाटत असे. आता. समाधान वाटते की, निदान मला लिहिता येते. माझे लेखन छापले जावो न जावो, मला तर निर्मितीचा आनंद मिळतो!

मृत्यूनंतर अमर राहायची माझी इच्छा आहे. त्यासाठी देवाने मला ही जी कला दिली आहे, त्याबद्दल त्याचे आभार मानावेसे वाटतात. लेखन रूपाने मी अमर राहू शकेन.

मी लिहायला बसले की, माझे दु:ख, भीती सारे लांब पळते. होईन का मी मोठी लेखिका किंवा पत्रकर्ती? माझी अगदी फार फार इच्छा आहे.

'कॅंडीचे जीवन' या माझ्या लेखाचा अजून मी शेवट नाही केला. तो कसा करायचा हे सर्व माझ्या मनात अगदी स्पष्ट

आहे; पण का कोण जाणे, पेन घेऊन लिहायला बसले की मनासारखे जमतच नाही. एखाद दिवशी ती कथा कचऱ्याच्या टोपलीत टाकून देईन झालं! नाहीतरी चौदा वर्षांच्या मुलीने तत्त्वज्ञानावर लिहिण्याचा प्रयत्न करणे धाडसाचेच आहे.

मला वाटते, शेवटी मी लेखन कलेत यशस्वी होईन कारण लेखन करणे ही. माझ्या अंतर्यामीची तीव्र इच्छा आहे.

तुझी ॲन

प्रिय किटी,

माझ्या आवडीनिवडी आणि छंद सांगते हं आज तुला. पण खरे तर, ते इतके आहेत की, लिहायला बसले तर दहा पाने नाही पुरायची.

नंबर एक - लेखन. पण त्याला छंद म्हणायचे?

नंबर दोन - मला राजघराण्याच्या वंशावळींची माहिती करून घ्यायची फार आवड आहे. मी वर्तमानपत्रे, ग्रंथ, पुस्तिका यातून मिळेल तेवढी त्यांची माहिती जमवते. सध्या माझ्याजवळ फ्रेंच, जर्मन, स्पॅनिश, इंग्लिश, ऑस्ट्रियन, रशियन, नॉर्वेजियन आणि डच राजघराण्यांची बरीच माहिती टिपलेली आहे. आत्मचरित्रे, इतिहासांची पुस्तके यातून मी ती जमवली आहे.

नंबर तीन- इतिहास. या विषयावरची बरीच पुस्तके डॅडींनी मला आणून दिली आहेत. केव्हा एकदा या अज्ञातवासातून बाहेर सुटू आणि सार्वजनिक वाचनालयात जाऊन या विषयाचा मी भरपूर अभ्यास करेन, असे मला झाले आहे.

चौथी आवड म्हणजे, ग्रीक आणि रोमन पुराणकथा वाचणे. त्यांचीही बरीच पुस्तके माझ्या संग्रही आहेत.

नटनट्या. सिनेमा, कौटुंबिक फोटोही पाहायला मला आवडते. वाचनाची आवड तर विचारूच नकोस.

संगीत, आवडते. पुढे-मागे शिकण्याचा विचार आहे. गणित विषयाची मात्र अतिशय नावड आहे.

तुझी, ॲन

## शब्दार्थ

**आवर्तन** आधीचेच पुन्हा करणे **न्याहारी** सकाळचा नास्ता **यीस्ट** आंबविण्यासाठी पदार्थ, पाव करण्यासाठी वापरतात **डंपलिंग्स** गोल आकाराचा पदार्थ की ज्यात काही पदार्थ भरलेले असतात **कदान्न** अतिशय खराब अन्न / शिळे अन्न **अंतर्यामी** अंतर्मनात

## वाक्‌प्रचार

**भडभडून येणे** मन भावनेने भरुन येणे **अवगत असणे** एखादे काम / कला करता येणे

## टीप

**रोजनिशी** दैनंदिन घडणाऱ्या घटनांची नोंद करणे

## स्वाध्याय

**1. खालील पश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) ॲन गुप्तनिवासात किती काळ राहात होती?

(2) ॲनला आपल्या जगण्याविषयी काय वाटते?

(3) ॲन शाळेत का जाऊ शकत नाही ?

(4) ॲन लेखनकार्य का करीत होती ?

**2. खालील प्रश्नांची दो-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) ॲनने कोणकोणते लेखन कार्य केले?

(2) ॲन फ्रँक लेखन कलेत यशस्वी होईल, असे का वाटते ?

(3) ॲनने कोणकोणत्या राजघराण्यांची माहिती मिळवली?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) ॲनला मिळणाऱ्या अन्नाचे वर्णन करा.

(2) ''कॅडीचे जीवन'' ही कथा अपूर्ण का राहिली ?

(3) ॲनच्या छंदांविषयी लिहा.

**4. खालील प्रश्नांची योग्य पर्याय निबडून उत्तरे लिहा :**

(1) गुप्तनिवासात राहायला आल्यापासून ॲनच्या अन्नपदार्थांची काय होत आहेत ?

(अ) आवर्तने (ब) परीक्षण (क) यादी (ड) विक्री

(2) ॲनचे कुटुंबीय कशाचा आनंदाने आस्वाद घ्यायचे ?

(अ) चांगले अन्न (ब) कदान्न (क) परिस्थिती (ड) गुप्तता

(3) ॲनने लिहिलेली परिकथा कोणती होती ?

(अ) कॅडीचे जीवन (ब) रोजनिशी (क) इव्हाचे स्वप्न (ड) युद्ध

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

- स्वत:च्या दिनक्रमाविषयी रोजनिशी लिहा

**भाषाभिव्यक्ती**

ॲन फ्रँकच्या मृत्यूनंतर तिची डायरी वडिलांच्या हाती आली, इ.स. 1947 साली ही डायरी प्रसिद्ध झाली; तेव्हा तिचे वाङ्‌मयीन आगळेपण वाचकांना जाणवले ॲनची ही रोजनिशी म्हणजे 'युद्ध' या विषयावरचे एक उत्तम, भावना हेलावून टाकणारे पुस्तक आहे. तेरा वर्षीय मुलीची ही अनुभवगाथा आहे. ॲन गुप्त निवासात असताना तिचे जीवन अत्यंत त्रासाचे होते. खाण्याची आवश्यक प्राथमिक गरज पूर्ण करण्यासाठी तिला अन्न योग्य दर्जाचे आणि वेळेवर मिळत नव्हते. तिने अशा भयंकर परिस्थितीतसुद्धा विचाराची अभिव्यक्ती करण्याचे काम डायरी लेखनद्वारे केल्यामुळेच तिचे जीवन सुसह्य झाले. ॲनला स्वत:चे छंद, आवडीनिवडी कळले. तिचा स्वत:शी परिचय झाला. भयग्रस्त काळाचा उपयोग सकारात्मक पद्धतीने करता येतो, हा बोध आहे. ॲनच्या या डायरीतून स्वत:च्या मनाचे हिंदोळे तिने शब्दांतून मांडले आहे. युद्धाच्या आगीतही 12-13 वर्षांचे मुलीच्या मनाचे हळवे कोपरे, तिचे उमलणे, तिचे कोमेजणे तिच्या शब्दांतून ती व्यक्त करते.

जगाची सत्तास्पर्धा, ईर्षा, आक्रमणे करण्याची वृत्ती या सर्वांचे राजकारण तिला समजत नाही; पण तिच्या छोट्याशा मनाला वाटते की, शांतीच्या मार्गाने माणसांना जाता आले तर कसे ? तिच्या वयानुसार, साधेसुधे, बालसुलभ विचार तिने मांडले आहेत.

•

# 24 नदी वाहते आहे

**दासू वैद्य**
**( जन्म : 1967 )**

नव्या पिढीतील कवी म्हणून प्रसिद्ध आहेत. अनेक मासिकांतून काव्यलेखन केले आहे. 'तूर्तास' हा पहिलाच काव्यसंग्रह उत्तम गुणवत्तेमुळे नावाजला गेला. त्यांनी विविध मालिकांची उत्तम शीर्षक गीतेही लिहिली आहेत.

प्राचीन काळापासून नदीच्या पाण्यावर मानवी संस्कृतीचा विकास झाला, त्यामुळे मानवी जीवनात नदीचे स्थान महत्त्वाचे आहे. नदीच्या पाण्याचा लोक सार्वजनिक उपयोग करतात. नदीचे पाणी स्वच्छ ठेवणे, हे शेवटी माणसांच्या, पशुपक्ष्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक असते. आपण ही गोष्ट नेहमी लक्षात ठेवली पाहिजे की, नदीचे अस्तित्व धोक्यात असेल तर त्याचा परिणाम मानवी जीवनही धोक्यात येईल. या कवितेत काळाच्या ओघात माणसाच्या चुकांमुळे नदीचे रुप किती विकृत झाले, याची जाणीव कवी करुन देतो.

---

नदी वाहते आहे
माझी ? तुमची ? कुणाकुणाची ?
या गटारगंगेत
पूर्वी दर अमावस्येला स्नान करून
आजी पवित्र व्हायची
तेव्हा नदीचा तळ दिसायचा
स्वत:चा चेहरा पाण्यात हसायचा
काय झालं, कसं झालं माहीत नाही
या गावाचं शहर झालं
नदीत मग सांडपाण्याचे लोंढे आले
लोंढ्याबरोबर किडे खाणारे बगळे आले
आता तर
आभाळाचे तुकडे वाऱ्याबरोबर
हेलकावे खात खाली यावेत
तसे बगळे नदीत उतरतात
आपले लांब पाय
पाण्यात किंवा खडकावर रोवून
बगळे मनसोक्त किडे खातात,
सांडपाण्यावर वाढलेले किडे खाऊन
बगळ्यांचाही पांढरा रंग
मळल्यासारखा झालाय,
म्हणून या महिन्यात कपड्याबरोबर
बगळ्यांनाही धोब्याकडे धुवायला देण्याचा
मी विचार करीत होतो
तेवढ्यात मित्राने एक बातमी दिली
धोबी सगळे कपडे याच सांडपाण्यात धूत असतो
आता चित्रकलेच्या तासात
मुलांना पांढराशुभ्र रंग दाखवताना
मास्तरच्या डोळयांसमोर काळाकुट्ट
अंधार आला तर
तो दोष कुणाचा ?

## शब्दार्थ

**गटरगंगा** दूषित पाण्याची नदी **लोंढा** पाण्याचा मोठा प्रवाह **आभाळाचे तुकडे** ढग **हेलकावे खाणे** वाऱ्याबरोबर हलणे

## टीप

नदीचे पाणी इतके दूषित झाले आहे की, त्यामुळे पांढेरशुभ्र बगळेसुद्धा काळवडून गेले आहेत.

''कावळा म्हणे मी काळा पांढराशुभ्र तो बगळा''

अशी कविता पूर्वी मुलांना सहज कळत असे पण आता प्रदूषणाच्या वेगामुळे अशी स्थिती झाली आहे की, बगळेसुद्धा काळवंडून गेले आहेत. मुलांना दाखविण्यासाठीसुद्धा पांढरा रंग आता शिल्लक नाही याची खंत कवी व्यक्त करतो.

## स्वाध्याय

**1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) आजी कशी पवित्र होत असे ?
(2) पूर्वी नदीचे पाणी कसे होते ?
(3) बगळ्यांचा रंग आता कसा झाला आहे ?
(4) पांढरा शुभ्र रंग दाखवितांना मास्तरांची आता कशी अवस्था होते ?

**2. खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा :**

(1) नदीमध्ये बगळे काय काय करतात ?
(2) बगळ्यांना धोब्याकडे देण्याचा विचार कवीला का सुचला ?
(3) नदीमध्ये किडे का वाढले आहेत ?

**3. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**

(1) नदीच्या पूर्वीच्या आणि आताच्या स्थितीचे वर्णन करा.
(2) कवी या कवितेच्याद्वारे बगळे आणि त्यांचा पांढराशुभ्र रंग याविषयी काय सांगतो ?
(3) मास्तरांच्या डोळ्यांपुढे काळाकुट्ट अंधार का येतो ?

**विद्यार्थी-प्रवृत्ती**

● 'नदीचे मानवी जीवनातील स्थान' या विषयावर निबंध लिहा.

## भाषाभिव्यक्ती

माणसाला आजच्या जगात अनेक भेडसावणारे प्रश्न आहेत. त्यामध्ये पर्यावरणाचा ऱ्हास, नैसर्गिक साधनसंपत्तीचा संपत येणारा साठा हे प्रश्न मुख्य आहेत. या कवितेमध्ये नदीच्या स्वच्छ असणाऱ्या पाण्याची माणसाने आपल्या करंटेपणामुळे किती दुर्दशा केली आहे, याचे चित्र दिसते. भरपूर पाणी असणाऱ्या आपल्या दोन्ही तीरांवर असणाऱ्या गावांचे जीवन फुलवणाऱ्या नद्या पूर्वी जीवनदायिनी मानल्या गेल्या होत्या. परंतु आता हे सुंदर दृश्य विद्रुप झाले आहे. नदीचे पाणी आटत गेले. तिच्यात साचलेल्या गाळामुळे, कचऱ्यामुळे नदी रोगट झाली. स्वच्छ वाहते पाणी थांबून तिच्यात निरनिराळ्या फॅक्टरींचे गलिच्छ आणि विषारी सांडपाणी सोडले गेले आणि पवित्र समजल्या गेलेल्या नदीची गटारगंगा झाली. आज भारतात जवळजवळ सगळ्याच नद्यांची अशी अवस्था आहे. जलतज्ज्ञ राजेंद्र सिंह यांनी वेळोवेळी नद्यांच्या दुखण्याविषयी आपल्याला सावध केलेले आहेच.

या कवितेत दासू वैद्य आपल्या मनाची घालमेल, दु:ख व्यक्त करतात. आजीच्या काळात नदीचा तळ दिसत असे इतके स्वच्छ पाणी होते आणि आज मात्र या पाण्याची अवस्था एखाद्या गटारासारखी झाली आहे. खेडी ओस पडत चालली आणि शहराकडे सगळ्यांचा ओढा वाढू लागला. लहान गावांचे बकाल शहरात रुपांतर होऊ लागले. त्याचे वाईट परिणाम म्हणजे ह्या निसर्गसंपत्तीचा, पर्यावरणाचा विनाश होणे होय.

''या गावाचं शहर झालं
नदीत मग सांडपाण्याचे लोंढे आले''

असे कवी म्हणतो आणि या नदीत उतरणाऱ्या बगळ्यांचा पांढरा रंगसुद्धा काळवंडून गेला इतके या नदीचे पाणी प्रदूषित झाले आहे. ज्या नदीत बालपणी आपला चेहरा स्पष्ट पाहता यायचा, ज्या पाण्यातल्या स्नानाने आजी स्वत:ला पवित्र करायची; त्या नदीची ही अवस्था कवीला फार दु:खी करते.

●

# व्याकरण

## 1 वाक्य रूपांतर

अर्थ आणि पदरचना या वर आधारित वाक्याने तीन मुख्य प्रकार आहेत. (1) केवल वाक्य (2) संयुक्त वाक्य (3) मिश्र वाक्य या प्रकारची वाक्ये आपण एकमेकांत कशी बदलून लिहू शकतो ते आपण पाहिले.

आता रचनेच्या दृष्टीने वाक्यांचे आणखी वेगळे प्रकार सांगता येतात. एकच अर्थ वेगवेगळ्या पद्धतींनी व्यक्त केला जाऊ शकतो. त्या साठी वाक्याची रचना बदलावी लागते; परंतु वाक्याचा मूळ अर्थ मात्र बदलत नाही. अशा तऱ्हेने वाक्यांचे एकूण चार प्रकार असतात. ते असे--

(1) विधानार्थी वाक्य

(2) प्रश्नार्थी वाक्य

(3) उदगारार्थी वाक्य

(4) आज्ञार्थी वाक्य

(1) विधानार्थी वाक्य म्हणजे ज्या वाक्याचा शेवट पूर्णविरामाने (.) होतो असे वाक्य . यात आणखी दोन प्रकार होतात- (1) होकारार्थी वाक्य (2) नकारार्थी वाक्य तसे पाहता आज्ञार्थी वाक्य हे विधानार्थी प्रकारातच असते. परंतु अर्थाच्या द्दष्टीने हा एक वेगळा प्रकार मानला जातो.

(2) ज्या वाक्यात प्रश्न विचारलेला असतो त्या वाक्याचा शेवट प्रश्नचिह्नाने होतो. वाक्याच्या शेवटी प्रश्नचिह्न आवश्यक आहे. ( ?)

(3) आनंद, दु:ख, आश्चर्य इ. भाव व्यक्त करताना ते बोलतांना वाक्यरचना वेगळी होते. या वाक्यात उदगारचिह्न ( !) आवश्यक आहे. या प्रकारात अरेरे! , वा ! सुंदर! , बापरे! ओहो! या सारखी केवल प्रयोगी अव्यये ही घेतली जातात.

(4) आज्ञार्थी वाक्य हे विराम चिह्नाच्या दृष्टीने विधानवाक्यच असते. परंतु इंग्रजी व्याकरणानुसार हा एक वेगळा प्रकार मानला जातो; काळाचा बोध न मिळता बोलण्याचा भाव कळतो. (आज्ञा, आदेश, विनंती, उपदेश, सूचन असे विविध भाव व्यक्त करणाऱ्या वाक्यांना आज्ञार्थी वाक्य असे म्हणतात.)

वरील प्रकारच्या वाक्यांना रचनेत बदल करून वाक्यांचे परिवर्तन अन्य प्रकारात करता येते. याला वाक्य परिवर्तन असे म्हणतात.

**वाक्य परिवर्तन:**

* होकारार्थी वाक्य → नकारार्थी वाक्य करणे
* विधानार्थी वाक्य → प्रश्नार्थी वाक्य करणे
* विधानार्थी वाक्य → उदगारार्थी वाक्य करणे
* प्रश्नार्थी वाक्य → आज्ञार्थी वाक्य करणे.

वरील प्रकारची वाक्य-परिवर्तने दिलेल्या प्रकारापेक्षा उलट अशीही करता येतात.

वरील वाक्यपरिवर्तने कशी करावी ते आपण उदाहरणातूनच पाहू. परिवर्तन (बदल) करताना वाक्यांचा मूळ अर्थ न बदलावा, हा या ठिकाणी मुख्य आणि महत्त्वाचा नियम लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

**उदाहरणे :** 1. मी नेहमी लवकरच उठतो. (होकारार्थी) -मी कधीच उशीरा उठत नाही. (नकारार्थी)

2. विद्यार्थ्याला कष्ट केल्या शिवाय यश मिळत नाही (नकारार्थी) विद्यार्थ्याला कष्ट केल्या शिवाय यश मिळेल का? (प्रश्नार्थी)

3. आनंद, दु:ख, आश्चर्य, संताप इत्यादि, भावना जेंव्हा अचानकपणे व्यक्त केल्या जातात. ते वाक्य बोलण्याची पद्धती थोडी वेगळी असते. तो अचानक बोललेला उद्‌गार असतो; अशा वाक्यांना उद्‌गारार्थी वाक्य म्हणतात. हया प्रकारचे वाक्य विधानार्थी वाक्यरचनेत बदलता येते.

उदा. किती घाबरली मी ते द्दष्य पाहून! (उदगारार्थी)

| 2 | # वाक्य संश्लेषण ( संकलन ) |
|---|---|

केवल वाक्य, संयुक्त वाक्य आणि मिश्रवाक्य असे वाक्यांचे तीन प्रकार आहेत. दोन स्वतंत्र वाक्ये एकमेकांशी जोडून संयुक्त वाक्य किंवा मिश्रवाक्य करता येते; यालाच वाक्य संश्लेषण असे म्हणतात.

ज्या वाक्यात एकच उद्देश्य व एकच विधेय आहे अशा वाक्याला केवल वाक्य असे म्हणतात. सोप्या शब्दात सांगायचे तर एक कर्ता व एकच क्रियापद जेव्हां असते तेव्हा ते केवल वाक्य असते. अशी दोन किंवा तीन केवल वाक्ये एकत्र आणून त्याचे मिश्र वाक्य किंवा संयुक्त वाक्य करता येते. दोन केवल वाक्ये एकत्र आणून एक केवल वाक्य देखील करता येते. मात्र मिश्रवाक्य म्हणजे काय आणि संयुक्त वाक्य म्हणजे काय हे त्या आधी समजून घेतले पाहिजे.

- मिश्र किंवा संयुक्त वाक्ये करण्याचा हेतू कमी शब्दात अधिक अर्थपूर्ण भाषा व्यक्त करणे हाच असतो.
- मिश्र वाक्यात एक मुख्य वाक्य तर दुसरे त्याच्याशी जोडले गेलेले वाक्य गौण असते.
- संयुक्त वाक्यात जोडली गेलेली दोन ही वाक्ये स्वतंत्र अर्थ व्यक्त करतात, त्यामुळे वाक्ये मुख्य स्थानी असतात.
- दोन वाक्यांना जोडण्यासाठी संयुक्त वाक्यात आणि, व, परंतु, पण, अथवा, किंवा, म्हणून अशी उभयान्वयी अन्वये योजली जातात.
- मिश्र वाक्य बनविताना- की, म्हणून, कारण, जर-तर, जेव्हा-तेव्हा , जरी-तरी ,जसे-तसे, जिथे-तिथे अशा सारखी उभयान्वयी अव्यये योजली जातात. ही अव्यये गौणत्वबोधक असतात. म्हणजे गौण वाक्य मुख्य वाक्याचा आधार घेत असते. स्वतंत्रपणे ते पूर्ण अर्थ व्यक्त करीत नाही.
- उदाहरणातून आपण हे स्पष्टपणे समजू शकतो.

  दोन केवलवाक्ये जोडून एक केवल वाक्य करताना धातुसाधित क्रियाविशेषणे, किंवा धातुसाधित नामांचा प्रयोग होतो.

- **उदा.** करणे या क्रियेसाठी - केल्यावर, केल्याने, करतांना, केल्यास, करून आशी धातुसाधिते वापरून दोन वाक्यां पैकी एक क्रियापद कमी करून एक केवलवाक्य होऊ शकते.

केवल + केवल = केवल वाक्य

- उदा : तु एकदम रागावतोस तुझे हे वागणे मला आवडत नाही.

  उत्तर : तुझे एकदम रागावणे मला आवडत नाही. (केवल)

केवल + केवल = मिश्र वाक्य

- ती मुलगी देखणी आहे. तिचे वागणे योग्य नाही.

  उत्तर : ती मुलगी जरी देखणी असली तरी तिचे वागणे योग्य नाही.

केवल + केवल = संयुक्त

- सुमीत अभ्यासात हुशार आहे. सुमीतला जराही गर्व नाही.

  उत्तर : सुमीत अभ्यासात हुशार आहे, परंतु त्याला जराही गर्व नाही.

  हेच वाक्य केवल + केवल = असेही करता येईल.

  सुमीत अभ्यासात हुशार असूनही त्याला जराही गर्व नाही.

केवल + केवल = मिश्र एकाहून अधिक पद्धतींनी ही करता येते.

- उदा. काही विद्यार्थी शाळेत उशीरा येतात. त्यांना शिक्षा केली जाईल.

  1. जे विद्यार्थी शाळेत उशीरा येतील त्यांना शिक्षा केली जाईल.
  2. विद्यार्थी शाळेत उशीरा आले तर त्यांना शिक्षा केली जाईल.
  3. विद्यार्थी शाळेत उशीरा आले की, त्यांना शिक्षा केली जाईल.

  - वरील वाक्यांचे संश्लेषण केवल वाक्यात ही होऊ शकते.

ते दृष्य पाहून मी अतिशय घाबरलो. (विधानार्थी)

* एकच वाक्य तीनही प्रकारांत कसे व्यक्त करता येते ते आपण पाहू.

- अरे, एवढे चिडणे चांगले आहे का? (प्रश्न)

- बाप रे! किती चिडतोस तू ! (उद्‌गार)

-एवढे चिडणे चांगले नाही. (नकारार्थी विधान)

**स्वाध्याय**

**1. सूचनेनुसार वाक्य परिवर्तन करा.**

1. हे नाटक खूप छान आहे. (उद्‌गारार्थी करा)
2. या माणसाला सुधारणे अशक्य आहे. (नकारार्थी करा)
3. तुमचे घर फारच सुंदर आहे. (उद्‌गारार्थी करा)
4. तुझ्या थापांवर कोणीही विश्वास ठेवणार नाही. (प्रश्नार्थी करा)
5. यशस्वी होणे कोणाला आवडणार नाही? (विधानार्थी करा)
6. किती गोड गाते सुगंधा! (नकारार्थी करा)

•

उदा. विद्यार्थी शाळेला उशीरा आल्यास त्यांना शिक्षा केली जाईल.

वाक्य संश्लेषण वेगवेगळ्या प्रकारांनी होऊ शकते. एका प्रकारात दिलेले वाक्य दुसऱ्या प्रकारात बदलायला विचारले जाऊ शकते.

या प्रमाणे – केवल वाक्य $\rightarrow$ मिश्र वाक्य

मिश्र वाक्य $\rightarrow$ केवल वाक्य

केवल वाक्य $\rightarrow$ संयुक्त वाक्य

संयुक्त वाक्य $\rightarrow$ केवल वाक्य

उदाहरणे :

(1) आळशी माणसे आयुष्यात काहीही चांगले काम करू शकत नाहीत (मिश्र वाक्य करा)

उत्तर : जी माणसे आळशी असतात, ती आयुष्यात काहीही चांगले काम करू शकत नाहीत.

(2) पावसाची पहिली सर आली की मातीचा सुगंध सर्वदूर पसरतो. (केवल वाक्य करा)

उत्तर : पावसाची पहिली सर येताच मातीचा सुगंध सर्वदूर पसरतो.

(3) आम्ही घराबाहेर पडताच पावसाला सुरुवात झाली. (संयुक्त वाक्य करा)

उत्तर: आम्ही घराबाहेर पडलो आणि पावसाला सुरुवात झाली.

(4) तुम्ही चहा घ्या किंवा कॉफी घ्या. (केवल वाक्य करा)

उत्तर : तुम्ही चहा किंवा कॉफी, घ्या.

**स्वाध्याय**

**1. वाक्य संश्लेषण सूचनेनुसार करा.**

1. तो मनुष्य पाय घसरून पडलेला पाहून मला फार हसू आले. (मिश्रवाक्य करा)
2. सयाजीराव महाराजांना शिक्षणाविषयी अतिशय आस्था होती हे जग जाहीर होते. (केवलवाक्य करा)
3. वर्तमानपत्रातील भविष्यानुसार आज मुसळधार पाऊस पडणार आहे. (मिश्रवाक्य करा)
4. मी गुलाबाचे रोप आणले आणि आमच्या बागेत लावले आहे. (केवलवाक्य करा)

•

| 3 | # समास |
|---|---|

समास म्हणजे काय हे इ. 9 वीमध्ये आपण शिकलो आहोत. द्वंद्व समास अव्ययीभाव समास, विभक्ती तत्पुरुष हा तत्पुरुष समासाचा एक प्रकार तसेच कर्मधारय हे समासांचे प्रकार आपण शिकलो आहोत.

आता आणखी काही समास प्रकार आपल्याला अभ्यासायचे आहेत.

**द्वंद्व समासाचा तिसरा प्रकार :** समाहार द्वंद्व.

सामासिक शब्दात उल्लेख केवल दोन पदांचा असतो, परंतु दोनहून अधिक शब्दांचा समावेश त्याच्या अर्थामध्ये असतो. अशा सामासिक शब्दांना समाहार द्वंद्व असे म्हणतात समाहार म्हणजे समूह.

**उदा.** भाजीपाला – फळभाजी, पालेभाजी, मिरच्या कोथींबीर इत्यादी.

कपडालत्ता – स्त्रियांचे, पुरुषांचे, लहान मुलांचे विविध प्रकारचे कपडे.

चहापाणी – चहा किंवा अन्य पिण्याचे पदार्थ, पाणी, खाण्याचे पदार्थ इत्यादी.

सोनेनाणे – रोकड पैसे, सोन्याचे दागीने, चांदीच्या वस्तू , इतर मालमता.

वेणीफणी – केसनीट विंचरणें, चेहरा धुणे व पावडर इतर प्रसाधन.

बाजारहाट – येथे दोन्ही पदांचा अर्थ एकच आहे. अनेक प्रकारच्या वस्तूंची खरेदी.

घरदार – घर, जमीन आणि घरातील अन्य सामान.

अशा प्रकारे अर्थाची व्याप्ती जेव्हा दोन पदांहून अधिक असते, तेव्हा **समाहार द्वंद्व** समास होतो.

अव्ययीभाव समास आपण शिकलो आहोत.

दोन पदांपैकी एक अव्यय असते व पूर्ण सामासिक शब्द क्रियाविशेषण अव्यय असते, तेव्हा अव्ययीभाव समास होतो. या समासाचे थोडेसे पुनरावर्तन करु.

यात काही संस्कृत अव्ययांचाही उपयोग मराठी भाषेतही होतो. उदा. प्रति – प्रतिदिन, प्रतिमास, प्रतिवर्ष इ.

यथा – यथाशक्ती, यथामती, यतेच्छ, इ.

आ – आजन्म, आमरण, आजीवन.

तसेच इतर काही अव्ययपदे – दरडोई, दरमाह, दररोज इ. दर या अव्ययाचा अर्थ 'प्रति' या संस्कृत अव्यया सारखाच आहे. अव्ययीभाव समासाचे अर्थ 'पर्यंत' असे होतो. यथा – प्रमाणे.

एकाच शब्दाची द्विरुक्ती होऊन ही अव्ययीभाव समास होतो. मराठीत अशा पदांचा उपयोग बराच होत असतो. उदा. क्षणोक्षणी, दारोदारी, घरोघरी, पदोपदी, पावलोपावली, जागोजागी, रस्तोरस्ती, गावोगाव, गल्लोगल्ली, इत्यादी.

काही फारसी भाषेतील उपसर्ग ही मराठी भाषेत आपण स्वीकारले आहेत. ते ही अव्ययीभाव समासाची उदाहरणे होऊ शकतात. उदा. दर, बे, बिन, गैर – या- उपसर्गांनी तयार होणारे शब्द – दररोज, बेकायदा, बिनजरुरी, गैरशिस्त इत्यादी.

तत्पुरुष समासाचे दोन प्रकार आपण इ. ९वीत अभ्यासले आहेत. तत्पुरुष समासाचे आणखी काही प्रकार पाहू.

कर्मधारय हा तत्पुरुष समासाचाच प्रकार आहे. परंतु हा प्रकार अतिशय महत्त्वाचा आहे, त्यामुळे कर्मधारय या प्रकाराला स्वतंत्र समासाचे स्थान आहे.

**कर्मधारय** – या समासाचे वैशिष्ट्य म्हणजे दोन्ही पदे एकाच विभक्तीत – प्रथमा विभक्तीत असतात. मुख्यत्त्वे तीन प्रकारांनी कर्मधारय समास होऊ शकतो.

(1) पहिले पद विशेषण व दुसरे पद नाम. नामपद मुख्य पद आणि विशेषण पद गौण असते काहीवेळा दुसरे पद विशेषण व पहिले पद नाम असे ही असू शकते.

उदाहरणे – नीलकमल – निळे असे कमल

कृष्णसर्प - काळा असा साप

महासागर - महा(मोठा) असा सागर

महापुरुष - महान असा पुरुष

शुद्धोदक - शुद्ध असे उदक (जल)

दुसरे पद विशेषण : पुरुषश्रेष्ठ - श्रेष्ठ असा पुरुष

घनीनीळ - निळा असा घन (मेघ)

नरोत्तम - उत्तम असा नर

(हा समास नरांमध्ये उत्तम - असा सप्तमी तत्पुरुष सुद्धा होऊ शकतो.)

अन्तर = अन्य, वेगळे असे विशेषण घेऊन बरेच सासासिक शब्द कर्मधारय प्रकारात आहेत.

**उदाहरणे -** देशान्तर - अन्य देश

वेषांतर - अन्य वेष

स्थळांतर स्थानान्तर - अन्य स्थान / अन्य स्थळ

मतान्तर - अन्य मत

भाषान्तर - अन्य भाषा

कर्मधारय समासाचा दुसरा प्रकार आहे, ज्यात-एका पदाची तुलना दुसऱ्या पदाशी केलेली असते. हा तुलनेचा अर्थ कधी 'उपमा' अर्थाने किंवा कधी रूपक अर्थाने ही हो् शकतो. तुलनेचा भाव दोन पदांमध्ये असणे - हेच या समासाचे वैशिष्टय आहे. या प्रकारच्या कर्मधारय ? समासाची काही उदाहरणे पाहू.

| **सामासिक शब्द** | **विग्रह** | **समासाचा प्रकार** |
|---|---|---|
| नरसिंह | सिंहा सारखा (शूर) नर | कर्मधारय |
| मुखकमळ | कमळासारखे (सुंदर) मुख | कर्मधारय |
| ज्ञानप्रकाश | ज्ञानरूपी प्रकाश | कर्मधारय |
| हंसगती | हंसा प्रमाणे (डौलदार) गती (चाल) | कर्मधारय |
| घननीळ | घना प्रमाणे निळा-(मेघा प्रमाणे सावळा) | कर्मधारय |
| भवसागर | भव (संसार) रूपी सागर | कर्मधारय |
| भूमाता | माते समान (पूज्य) भू- (पृथ्वी) | कर्मधारय |

कर्मधारेय समासाच्या तिसऱ्या प्रकारात दोनही पदे विशेषणेच असतात.

**उदाहरणे** लांबरूंद - लांब तसेच रूंद असे

भव्यदिव्य - भव्य तसेच दिव्य असे

निळासावळा - निळा तसेच सावळा असा

काळी सावळी - काळी किंवा सावळी अशी

मूकबधिर - मूक आणि बधिर असा

हिरवे गार - हिरवे आणि गार असे

लाल भडक - लाल आणि भडक असा.

हया उदाहरणातील दोनही पदे विशेषणे आहेत म्हणून विग्रह करताना आणि / किंवा या सारख्या शब्दयोगी अव्ययांचा उपयोग होत असला तरी हे **द्वंद्व समास** म्हटले जात नाहीत.

**उपपद तत्पुरूष समास :-** या समासाचे मुख्य वैशिष्टय असे की, या सामासिक शब्दातील अंतिम / दुसरे पद क्रियापदावरुन

बनलेले किंवा कृदन्त पद असते हे पद असे असते की स्वतंत्रपणे शब्द म्हणून वाक्यात त्याचा उपयोग होऊ शकत नाही. संपूर्ण नामाचा अर्थ व्यक्त करतो.

उदाहरणांवरुन हे तुम्हाला नीटपणे लक्षात येईल.

**उदाहरणे:** काही शब्द संस्कृत प्रत्यय लागून तयार झालेले असतात परंतु मराठी भाषेत उपयोगात आहेत. काही शब्द सुद्ध मराठी भाषेतील कर्तुवाचक अर्थाचे प्रत्यय असतात.

पंकज – पंकात जन्मलेले – (ज – जायते)– उपपद तत्पुरूष

जलद – जल देणारे – (द – दाति) – उपपद तत्पुरुष

गृहस्थ – घरात राहणारा – (स्थ–तिष्ठति) – उपपद तत्पुरूष

चक्रधर – चक्र धारण करणारा / धरणारा (धृ – धारयति) उपपद तत्पुरुष

दिनकर – दिवस करणारा (कृ – करोति)

वरील उदाहरणातील ज, द, स्थ, धर, कर या पदांना स्वतंत्रपणे भाषेत स्थान नाही, परंतु नामपदाला जोडल्यानंतर त्यांना कर्तृवाचक नामाचा अर्थ प्राप्त होतो.

**मराठी प्रत्ययांची काही उदाहरणे पाहू**

| | | |
|---|---|---|
| लाकूडतोड्या | लाकूड तोडणारा | उपपद तत्पुरुष |
| मोळी विक्या | मोळी विकणारा | उपपद तत्पुरुष |
| टाळकुटया | टाळ कुटणारा | उपपद तत्पुरुष |
| लाचखाऊ | लाच खाणारा | उपपद तत्पुरुष |
| शेतकरी | शेती करणारा | उपपद तत्पुरुष |
| गोडबोल्या | गोड बोलणारा | उपपद तत्पुरुष |

या उदाहरणातील तोड्या , विक्या , कुटया , खाऊ , करी , बोल्या

**प्रादि तत्पुरुष आणि प्रादि बहुव्रीहि:** प्र + आदि = प्रादि असा हा शब्द आहे. प्र हा एक प्रत्यय आहे. हा शब्दाच्या आरंभी लागतो.

'प्र' सारखेच इतरही काही प्रत्यय आहेत, जे प्रादि तत्पुरुष व प्रादि बहुव्रीहि या दोन्ही समासांमध्ये वापरले जातात. सु , दुः, सत् , कु ,परा ,वि असे हे काही प्रत्यय विशेषणाच्या अर्थाने योजलेल असतात स्वतंत्रपणे नुसत्या प्रत्ययांचा उपयोग भाषेत केला जात नाही. हे प्रत्यय नामपदाला जोडले जातात आणि संपूर्ण सामासिक शब्द जेव्हा नामपदच असते तेव्हा प्रादि तत्पुरुष हा समास होतो.

यातील प्रत्यय किंवा उपसर्ग विशेषणाचे काम करतात परंतु स्वतंत्रपणे ते विशेषण नसतात. या साठीच ते कर्मधारय पेक्षा वेगळे आहेत.

| **उदाहरणे :** | **सामासिक शब्द** | **विग्रह** | **प्रकार** |
|---|---|---|---|
| | सुकन्या | सु (चांगली) कन्या | प्रादि तत्पुरुष |
| | दुर्जन | दुः+ जन – वाईट जन | प्रादि तत्पुरुष |
| | सन्मार्ग | सत्+ नार्ग – चांगला मार्ग | प्रादि तत्पुरुष |
| | पराजय | जयापासून दूर, तो | प्रादि तत्पुरुष |
| | कुमती | कु (वाईट) मती (बुद्धी) | प्रादि तत्पुरुष |
| | विनम्र | विशेष असा नम्र | प्रादि तत्पुरुष |

वरील सर्व उदाहरणांत उपसर्गाबरोबर नामपद आहे व सामासिक शब्द ही नामपदच आहे.

**प्रादि बहुव्रीहि समासाची उदाहरणे :**

सदगुणी – ज्याच्यात चांगले गुण आहेत असा.

सुशील – ज्याचे शील चांगले आहे, असा,

सुनयना – जिचे डोळे सुंदर आहेत अशी.

**नञ् तत्पुरुष :** ज्या समासात नामपद मुख्य असते व पहिले पद नकार दर्शविणारे असते किंवा विरुद्ध अर्थ व्यक्त करणारे असते तेव्हा नञ् तत्पुरुष समास होतो.

नकारार्थी पद उपसर्ग असते. स्वतंत्रपणे अर्थ सांगणारे पद नसते, नत्स – नाही / न / अभाव इ अ / अन् + अप, अव, न इत्यादि उपसर्ग या समासात योजले जातात.

**उदाहरणे :** असत्य – सत्य नाही ते!

अधर्म – धर्म नाही तो! अनेक – एक नाही ते! (एकाहून अधिक)

अपूर्ण – पूर्ण नाही ते!

असभ्य – सभ्य नाही तो!

प्रादि प्रमाणेच नञ् तत्पुरुष आणि नञ् बहुव्रीहि हे दोन्ही प्रकार होऊ शकतात. नञ् बहुव्रीहि मध्ये नकारार्थी उपसर्ग लागून सामासिक पद कोणाचे तरी विशेषण (विशेष गुण सांगणारे) असते.

**उदा :** अमर – जो कधीही मरत नाही

अजेय – जो जिंकला जात नाही

अनन्त – ज्याला अन्त नाही

अनुत्तरित – ज्याचे उत्तर (मिळत) नाही

निर्धन – ज्याच्याकडे धन नाही

निर्दय – ज्याला दया वाटत नाही

अमूर्त – जे मूर्त स्वरुपात नाही

**महत्त्वाचे मुद्दे : समासाचा प्रकार बरेचदा विग्रह करण्याचा पद्धतीवर अवलंबून असतो.**

बहुव्रीही समास नेहमी 'विशेषणच' असते.

द्वंद्व व तत्पुरुष समासाचे सर्व प्रकार 'नाम' असत.

काहीवेळा संधीशब्द समासाचा प्रकार असतो; परंतु सर्व संधी समास नसतात.

## स्वाध्याय

**1.पुढील सामासिक शब्दांचे योग्य ओळखा व लिहा :**

विठ्ठलरुक्मिणी, चित्तचैतन्य, दूधभात, सभामंडप, हस्तस्पर्श, पांढराशुभ्र, भजनकीर्तन, पहारेकरी, तळपाय, गृहछिद्र, निसर्गोपासना, सेवाभावी, स्वच्छतायज्ञ, अजाण, सुप्रसिद्ध कोकणस्थ, हौसमौज, मनमोकळा, वनवास, घरोघरी, अधर्म

**2. पुढील सामासिक शब्दांचे योग्य विग्रह, दिलेल्या विकल्पातून निवडा व लिहा :**

(1) वारकरी – (अ) वार करणारा (ब) वारी करणारा (क) जो वारी करतो तो (ड) वारा करात आहे ज्याच्या.

(2) दंडाबेडी – (अ) दंडा असलेली बेडी (ब) दंड्यासहित बेडी (क) दंडयाची बेडी (ड) दंडा व बेडी

(3) वज्रमूठ – (अ) वज्रासारखी मूठ (ब) वज्राची मूठ (क) वज्र हीच मूठ (ड) वज्र आणि मूठ

(4) तळहात – (अ) तळाचा हात (ब) हाताचा तळवा (क) हाताचा तळ (ड) हातवरील तळ

(5) स्वातंत्र्यवीर – (अ)स्वातंत्र्याचा वीर (ब) स्वातंत्र्यासाठी लढणारा वीर (क) वीराचे स्वातंत्र्य (ड) जो स्वातंत्र्य मिळवतो तो

(6) परमेश्वर – (अ) परमेचा ईश्वर (ब) परम असा ईश्वर (क) परम आणि ईश्वर (ड) परम असा श्वर

(7) शुभारंभ – (अ) शुभाचा रंभ (ब) शुभ असा आरंभ (क) आरंभात शुभ (ड) शुभा असलेला अरंभ

**दिलेल्या विकल्पांमधून विचारलेला समासाचा प्रकार कोणता आहे, ते ओळखा.**

(1) सर्वज्ञ - हा सामासिक शब्द खालील पैकी कोणत्या प्रकारचा आहे ?

(अ) कर्मधारय (ब) उपपद तत्पुरुष (क) अव्ययीभाव (ड) बहुव्रीही

(2) सभामंडप - समासाचा प्रकार सांगा.

(अ) इतरेतर द्वंद्व (ब) षष्ठी तत्पुरुष (क) द्विगू (ड) चतुर्थी तत्पुरुष

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (3) हातरुमाल - | (अ) सप्तमी तत्पुरुष | (ब) मध्यमपद लोपी | (क) कर्मधारय | (ड) अव्ययीभाव |
| (4) कार्यवाह - | (अ) उपपद तत्पुरुष | (ब) बहुव्रीही | (क) विभक्ती तत्पुरुष | (ड) द्वंद्व |
| (5) जमाखर्च - | (अ) तत्पुरुष | (ब) कर्मधारय | (क) इतरेतर द्वंद्व | (ड) बहुव्रीही |
| (6) यथावकाश - | (अ) विभक्ती तत्पुरुष | (ब) अव्ययीभाव | (क) कर्मधारय | (ड) अव्ययीभाव |
| (7) शुभारंभ - | (अ) प्रादि तत्पुरुष | (ब) कर्मधारय | (क) बहुव्रीही | (ड) द्वंद्व |
| (8) बंदुकधारी - | (अ) बहुव्रीही | (ब) विभक्ती तत्पुरुष | (क) अव्ययीभाव | (ड) उपपद तत्पुरुष |
| (9) गुणसंपन्न - | (अ) कर्मधारय | (ब) तृतीया तत्पुरुष | (क) द्वंद्व | (ड) द्विगू |
| (10) अचेतन - | (अ) नञ् तत्पुरुष | (ब) कर्मधारय | (क) सप्तमी तत्पुरुष | (ड) नञ् बहुव्रीही |

•

| 4 | # अलंकार |
|---|---|

आपण सुंदर दिसण्यासाठी दागिने घालतो, त्याच प्रमाणे भाषा छान वाटावी, यासाठी अलंकारांचा उपयोग केला जातो.

अलंकारांचा अतिरेक असला तर भाषा बोजड व कृत्रिम वाटू शकते, म्हणून अलंकारांचा वापर योग्य रीतीने, सुजाणपणे केला जावा.

एक सुंदर उदाहरण पाहू. सांज ये गोकुळी, सावळी सावळी।
सावळ्याची जणू साऊली॥

नेमक्या शब्दात संध्याकाळचे सावळेपण सावळ्या श्रीकृष्णाच्या रूपाशी तुलना केली आहे. कुणालाही मोहविणारे हे वर्णन उत्प्रेक्षा अलंकाराचे उदाहरण आहे.

अलंकाराचा उपयोग दोन प्रकारांनी होतो हे आपण शिकलो आहोत. विशिष्ट शब्दांचा उपयोग केल्याने भाषेचे सौंदर्य वाढते, तेव्हा त्यास **शब्दालंकार** असे म्हणतात. जेव्हा विविध प्रकारांनी वाक्य रचना केल्याने भाषेचे सौंदर्य वाढते, तेव्हा अर्थाच्या वैविध्यामुळे अलंकारिक भाषा दिसून येते तेव्हा त्यां ठिकाणी **अर्थालंकार** आहे असे म्हटले जाते.

इ. 11वीत सर्व प्रमुख अलंकारांचा अभ्यास झालेला आहे. परंतु आता आपण ते सर्व अलंकार तुलनात्मक पद्धतीने अभ्यासू, म्हणजे आपोआप पुनरावर्तन होईल व अलंकारांविषयीची समज स्पष्ट होईल.

**शब्दालंकाराचे तीन प्रकार आहेत.**

1. यमक 2. अनुप्रास 3. श्लेष

यमक आणि अनुप्रास या दोन अलंकाराच्या समजुती बाबत गोंधळ होण्याची शक्यता असते त्यासाठी एका 9 अक्षरांचे अथवा शब्दांचे पुन्हा पुन्हा येणे व नाद माधुर्य होणे याला अनुप्रास अलंकार होतो.

उदाहरण-1. रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा।

2. हे मंद मंद पद सुंदर कुंददंती.

2. कवितेतील चरणाच्या शेवटी येणारे किंवा अर्ध्या चरणाच्या अंती एक किंवा अधिक अक्षरे पुन्हा पुन्हा आल्यामुळे नादमय ओळी निर्माण होतात, तेव्हा **यमक** अलंकार होतो.

उदा. ॐ नमोजी आद्या। वेदप्रतिपाद्या। जयजय स्वसंवेद्या। आत्मरूपा॥

हटातटाने पटा रंगवुनि जटा धरिशी का शिरी? मठाची उठाठेव का तरी॥

या उदाहरणातून एकाच वेळी यमक आणि-अनुप्रास दोन्ही अलंकार योजले आहेत. ट, ठ. अक्षरांची पुनरावृती अनुप्रास अलंकार दर्शविते, तर शिरी, तरी अंतिम शब्द यमक अलंकार दाखवितात.

अर्थालंकारांचा अभ्यास नीटपणे कळण्यासाठी उपमेय, उपमा, साधर्म्य दर्शकपदे या शब्दांना परिचय समजून घेणे गरजेचे आहे या पदांचा समावेश मुख्यत्वे उपमा, उत्प्रेक्षा. रूपक, व्यतिरेक अपन्हुती अनन्वय या अलंकारात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने होत असते.

आपण दोन गोष्टींची तुलना करतो एक वस्तू दुसऱ्या सारखी आहे, असे वर्णन **उपमा** या अलंकारात केलेले असते. उदा. सीतेचे मुखचंद्रासारखे सुंदर आहे. या वाक्यात चंद्राशी तुलना केली आहे, म्हणून चंद्र हे उपमान आहे सीतेच्या मुखाची तुलना आहे, म्हणून सीतेचे मुख हे उपमेय आहे. सारखे हा साधर्म्य दर्शक शब्द आहे, तर सुन्दर सामान्य गुणधर्म मानला जाते.

हे स्पष्टीकरण नीटपणे कळले तर वर निर्देश केले अलंकार सहजपणे समजतील.

**साधर्म्यदर्शक**

1. उपमा - उपमेय व उपमान - समान,सारखे, जसे-तसे
2. उत्प्रेक्षा - उपमेय व उपमान - समान आहेत असे वाटते, भासते - जणु, जणुकाही
3. रूपक - उपमान व उपमेय यांच्यात अभेद -दोन्ही एकाच आहेत असा भाव.
4. अनन्वय - उपमेयाला उपमेयाची तुलना उपमानाचे अस्तित्व नाही.
5. व्यतिरेक - उपमेय हे उपमानापेक्षा श्रेष्ठ दर्शविलेले असते.

6. अपन्हुती – उपमेयाला उपमेय न म्हणता, ते उपमानच आहे असे विधान करणे.

वरील प्रत्येक अलंकारात उपमान व उपमेय यांचे स्थान वेगवेगळ्या रीतींनी व्यक्त करून अलंकारांचे विविध प्रकार साधले आहेत. वरील अलंकारांना अधिक स्पष्टपणे समजण्यासाठी पुढील उदाहरणे वर दिलेल्या स्पष्टीकरणांशी ताडून पहा.

1. उपमा – सीतेचे मुख चन्द्रा सारखे आहे. (समानता, साम्य)
2. उत्प्रेक्षा – सीतेचे मुख म्हणजे जणु काही चंद्रच (आभास)
3. रूपक – सीतेचा मुखचंद्र पाहून राम सुखावले (अभेद, एकरुपत्व)
4. अनन्वय – सीतेचा मुख केवल सीतेच्यो मुखासारखेच (उपमेय-उपमान)
5. व्यतिरेक – सीतेचे मुख चंद्राहून ही सुन्दर आहे. (उपमेयाचे श्रेष्ठत्व)
6. अपन्हुती – छे! हे सीतेचे मुख नव्हेच; हा तर चंद्रच आहे (उपमेयाचा निषेध)

ज्यांत उपमेय व उपमान नाहीत, तसेच तुलनेचा भाव ही नाही, असे काही अलंकार आहे. ते अलंकार असे आहेत- स्वभावोक्ती, अतिशयोक्ती, अन्योक्ती आणि व्याजोक्ती.

वरील सर्वनावांमध्ये उक्ती हा शब्द आहे. उक्ती म्हणजे बोललेले शब्द यातील प्रत्येक अलंकारात बोलण्याची तेव्हा किंवा पद्धत वेगळी आहे, ती कळल्यास अलंकार कोणता आहे, ते कळू शकते.

(1) स्वभावोक्ती – स्वाभाविक रीतीने बोललेले शब्द म्हणजेच स्वभावोक्ती एखाद्या वस्तूचे, प्रसंगाचे अथवा द्दश्याचे वर्णन इतके हुबेहुब व नेमके असते की ते चित्र डोळ्यापुढे साकार होते. अशा वर्णनात स्वभावोक्ती अलंकार असतो.

या अलंकारात कृत्रिम वर्णनाला स्थान नसते. साधेपणात व नेमकेपणात सौंदर्य – हे-या अलंकाराचे वैशिष्ट्य आहे.

उदा. (1) भरे वाळ्याचा चहुकडे सुगंध
जळे शेजारी शामदान मंद
फिरे पंखा गरगरा कोपऱ्यात
हवा खेळतसे थंडगार आत

(2) लहान सुंदर गोजिरवाणी दिसे कशी ही खार
गुलगुलीत हे अंग मजेचे, शेपुट गोंडेदार
लहान डोळे लुकलुक बघती, दृष्टि किती तरी छान
खुटकन कोठे सहज वाजले तरीहि ऐकती कान

**स्वाध्याय**

**1. पुढील उदाहरणातील अलंकार ओळखा व प्रकार लिहा :**

1. पौर्णिमेचे चांदिणे क्षणक्षणां होय उणे।
   तैसे माझे जिणे विठ्ठलावीण
2. पांढरा एकला फिरतो ढग।
   पाहत खालचे विश्रब्ध जग।
3. पोटात भुकेची आग भडकली होती.
4. नांगरल्या मातीवानी व्हावं काळीज उघडं
5. नागीण धावते जणुं रोषाने
   वाफा टाकीत धापांपरी ही गाडी धडधडते।
6. जिकडे तिकडे जलधारा ही सारखी खळखळत
7. पिवळे तांबसु ऊन कोवळे पसरे चौफेर
   ओढा नेई सोने वाटे वाहुनिया दूर
8. चतुर नव्हे तर अभ्रकी पंखांचे ते विमान उडे तेथे
9. बलाकमाला उडता भासे कल्पसुमांची माळचि ते
10. हा अलंकार हो भूलोकाचा। यासनसे उपमान। प्रियकर हिंदिस्तान।
11. तू माऊलीहून मायाळ। चंद्राहूनि शीतळ।
    पाणियाहूनि पातळ । कल्लोळ प्रेमाचा॥

•

# 5 वृत्तविचार

वृत्ते हा प्रकार काव्याशीच संबंधित आहे. आपण वेगवेगळ्या कविता वाचतो. सर्व कवितांना एकाच चालीत आपण गाऊ शकतो का? नाही. कारण प्रत्येक कवितेची रचना तंत्रदृष्ट्या वेगवेगळी असते. त्यातील अक्षरसंख्या, ऱ्हस्व-दीर्घ अक्षरांचा क्रम या बाबती ध्यानात घेऊन, कवितेची रचना तांत्रिक दृष्ट्या वेगवेगळ्या प्रकारात विभागले गेले आहेत. या प्रकारांना वृत्त असे म्हणतात. वृत्त संस्कृत भाषेतून घेतली गेली आहेत वृत्तांचे मुख्यत्वे दोन प्रकार आहेत.

(1) अक्षरगणवृत्त (2) मात्रावृत्त.

अक्षरगणवृत्तांचे अनेक प्रकार आहेत. त्यांना समजून घेण्यापूर्वी 'गण' म्हणजे काय व ते कसे असतात हे शिकायला हवे. गण आणि वृत्ते कशी ठरवायची ऱ्हस्व-दीर्घ अक्षरांच्या क्रमाला अनुसरून एकूण आठ गण होऊ शकतात. विशिष्ट अक्षरांची नावे देऊन गणांची ओळख दिली गेली आहे. एक गण हा तीन अक्षरांचा एक घटक किंवा समूह असतो. [ऱ्हस्व अक्षर U लघु. दीर्घअक्षर:- गुरु]

**गण :**

- य - य मा ता = (आद्य लघु)
  U – –
- मा - मा ता रा = (सर्व गुरू)
  - - -
- ता - ता रा ज = (अंत्य लघु)
  - - U
- रा - रा ज भा = (मध्य लघु)
  - U U
- ज - ज भा न = (मध्य गुरू)
  U - -
- भा - भा न स = (आद्य गुरू)
  - U U
- न - न म न = (सर्व लघु)
  U U U
- स - स म रा = (अंत्य गुरू)
  U U -

अशा प्रकारे आठहून अधिक गण होऊ शकत नाहीत, कारण या आठ प्रकारांत सर्व प्रकारे ऱ्हस्व-दीर्घ अक्षरांचे समूह आले आहेत. तीन अक्षरांचा एक समूह या प्रमाणे कवितेच्या एका ओळीत 12,15,18, किंवा 21 अशी गणांची रचना असू शकते. याहून अधिक एक किंवा दोन अक्षरे जास्तीची असल्यास, शेवटच्या दोन अक्षरांना लघु-ल, गुरु-ग या रीतीने ल-ग अथवा ग - ग असे लिहिले जाते. कवितेचे अंत्याक्षर लघु असले तरीही त्याला गुरु (-) असेच म्हटले जाते.

वर दिलेल्या गणांचा तक्ता लक्षात ठेवायला सोपा जावा या साठी एक पंक्ती पाठ केली तर सोपे होईल--य मा ता रा ज भा न स ल गा।

या ओळीतून सर्व गणांचा संदर्भ मिळतो, शेवटचे लगा म्हणजे लघु (U) व गुरू (-)

वृत्त ओळखण्यास जी काव्य पंक्ती घ्यायची आहे. ती सुट्या अक्षरांमध्ये लिहावी व तीन तीन अक्षरांचे विभाग करावेत. प्रत्येक विभागत अक्षरांच्या खाली लघु-गुरू क्रम लिहावेत व तक्त्यातील विभागानुसार त्यांचे गण लिहावेत. सर्व गण एकत्रितपणे लिहिले की तुम्ही अभ्यासलेल्या वृत्तांपैकी एक वृत्त तुम्हाला मिळेल.

लघु-गुरू क्रम ठरविताना एक महत्त्वाचा नियम लक्षात ठेवायला हवा. कवितेचा ओळीत जेव्हा जोडाक्षर येते तेव्हा त्या जोडाक्षराच्या आधीचे अक्षर लघु असले तरीही गुरू (-) मोजावे.

उदा. - म स्त क स ज्ज न

- U U - U U

गणरचना करून वृत्त कसे ओळखावे, ते आपण प्रत्यक्ष रीत करून पाहू.

(1) **भुजंगप्रयात:**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रभाते | मनी रा | म चिंती | त जावा |
| U - - | U - - | U - - | U - - |
| य | य | य | य |

वरील सर्व गणांमध्ये लघु गुरू क्रम एकच आहे.

U - - हा आद्य लघुक्रम य नावाने ओळखला जाते.

वरील पंक्तीत एकूण अक्षरे 12 आहेत; त्यामुळे चार गण- विभाग झाले आहेत.

अक्षरे 12, यती 6 व्या अक्षरावर

गण - य - य - य - य

वृत्त - भुजंगप्रयात.

(कारिका - खुणेची ओळ) कारिका - भुजंगप्रयात य ये चार वेळा।

'मनाचे श्लोक' मधून कोणतीही पंक्ती घेतल्यास ती भुजंगप्रयात वृत्तात असल्याचे कळेल.

(2) **मालिनी :**

| उदा. | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | प ख र | ण ब घ | घा ली भू | व री पा | रि जा त |
| | U U U | U U U | - - - | U - - | U - - |
| | न | न | म | य | य |

अक्षरे- 15, यती 8व्या अक्षरावर

गण : न - न - म - य - य

कारिका - न न म य य गणांनी मालिनी वृत्त होते.

(3) **शार्दूलविक्रीडित :**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| आजीच्या | जवळी | घडयाळ | कसले | आहे च | चमत्कारि | क । |
| - - - | U U - | U - U | U U - | -- U | - - U | - |
| म | स | ज | स | त | त | ग |

अक्षरे- 19, यती - 12व्या अक्षरावर

गण : म - स - ज - स - त - त ग.

या वृत्तात 19 अक्षरे असल्यामुळे सहा गण केल्यावर एक अक्षर उरते. अंतीम अक्षर नेहमीच गुरू (-) असते.

शेवटचा त गण आहे; त्यात जोडाक्षराच्या आधीचे अक्षर लघु असून ही गुरू होत आहे, याची नोंद घ्यावी.

कारिका:- मा सा जा स त ता ग येती गण ते शार्दूलविक्रीडित

**(4) शिखरिणी :**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रयत्ने | वाळूचे | कण र | गडिता | तेलहि | गळे |
| U-- | --- | U U U | U U- | -UU | U - |
| य | म | न | स | भ | ल ग |

अक्षरे - 17, यती 6 व्या, 12 व्या अक्षरावर

गण - य - म - न - स - भ - ल - ग

कारिका - जयामध्ये येती यमनसभलगा शिखरणी.

**(5) पृथ्वी :**

| अ सा अ | ति थि धा | र्मि क स्तु | त प दा | क दा सा | प डे |
|---|---|---|---|---|---|
| U - U | U U - | U - U | U U - | U - - | U - |
| ज | स | ज | स | य | ल ग |

अक्षरे - 19, यती 8 व्या अक्षरावर.

गण : ज - स - ज - स - य - ल - ग

कारिका : सदैव धरिते जसाजसयलगा **पृथ्वी पदी**.

**(6) मंदाक्रांता :**

| मे घां नी | हे ग ग | न भ र | ता गा ढ | आ षा ढ | मा सी |
|---|---|---|---|---|---|
| - - - | - U U | U U U | - - U | - - U | - - |
| म | भ | न | त | त | ग ग |

अक्षरे - 17, यती 4थ्या व 6व्या अक्षरांवर

गण : म - भ - न - त - त - ग - ग

कारिका : **मंदाक्रांता** म भ न त त गा गा गणी मंद चाले।

**(7) वसंततिलका :**

| जो तो ष | वी स्व ज | न का स | सु पु त्र | तो च |
|---|---|---|---|---|
| - - U | - U U | U - U | U - U | - - |
| त | भ | ज | ज | ग ग |

अक्षरे - 14, यती 8 व्या अक्षरावर.

गण : भ - ज - ज - ग - ग

कारिका : यती **वसंततिलकी** ज भ जा ज गा गा.

## सूचना

1. कारिका म्हणजे खुणेची पंक्ती. प्रत्येक वृत्त व त्याचे गण लक्षात ठेवण्या साठी कारिका तोंडपाठ करणे हा उत्तम उपाय आहे.
2. प्रत्येक वृत्तात कवितेला एक वेगळी चाल लावता येते. शिक्षकांकडून या चाली शिकून घेतल्यात तर कारिका पाठ करणे सोपे होईल.
3. महत्त्वाची अक्षरगणवृत्ते आपण येथे अभ्यासली आहेत. या व्यतिरिक्त मात्रावृत्त हा दुसरा प्रकार ही असतो. मात्रावृत्तांमध्ये अनुष्टुभ, चंद्रकांत, बालानंद, दिंडी, आर्या, पादाकुलक इत्यादी प्रकार आहेत. मात्रावृत्तां मध्ये मात्रांची संख्या महत्त्वाची असते. लघु मात्रा 1 व गुरू मात्रा - 2 या प्रमाणे मात्रा मोजल्या जातात.

## स्वाध्याय

**1. पुढील काव्यपंक्ती मध्ये गण विभाग करा व वृत्त ओळखा.**

1. निघे दंडका राम कोदंडपाणी।
2. जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे।
3. तुझे जेव्हा जेव्हा सहज मजला दर्शन घडे।
4. दीपांनी दिपल्या सण असे हा आज दीपावली।
5. अनुदिनी अनुतापे तापलो रामराया।

•

# 6 कल्पना विस्तार

मनात आलेला एखादा चांगला विचार जेव्हा सुविचाराचे रुप धारण करतो किंवा नेमक्या शब्दांत एखाद्या सुंदर विचार गद्यात किंवा पद्यातसुटसुटीत स्वरुपात माडला जातो, त्याला 'कल्पना' असे म्हणता येईल. काव्यमय पद्धतीने मांडलेला सुंदर विचार इतरांना पटवून देण्यासाठी उदाहरणांच्या मदतीने त्यातील आशय विस्तारपूर्वक मांडण्याची गरज असते. या लेखनाला कल्पना-विस्तार असे म्हणतात.

सुटसुटीतपणे व मुद्देसूदपणे कल्पनाविस्तार लिहिणे हे कौशल्य आहे. लेखनात मुद्यांचे पुनरावर्तन टाळावे.

मूळ कल्पना किंवा विचार आपल्याला नीटपणे समजला असेल तर योग्य प्रकारे त्याचा विस्तार करणे शक्य होते.

दिलेली कल्पना कधी गद्य वाक्य असते. कधी एखादी काव्यपंक्ती असते, तर एखादी म्हणही असू शकते.

येथे आपण नमुनारुप कल्पना विस्तार वाचू.

**मरणात खरोखर जग जगते**

ही काव्यपंक्ती कविवर्य भा. रा. तांबे यांच्या कवितेची शीर्षक पंक्ती आहे. यात कवीने फार मोठा विचार मांडलेला आहे. या कवितेचा संदर्भ माहीत नसला तर, ही पंक्ती थोडी विरोधाभासी वाटू शकते.

मरण आणि जगणे या दोन्ही विरुद्ध गोष्टी एकत्र कशा येऊ शकतात? मरणात जग जगते कसे? या ओळीच्या पुढची ओळ वाचल्यास यातील गर्भित अर्थ ध्यानात येईल. मरणानंतर अमरपण कसे येते हा विचाराचा धागा पुढे येतो शरीररुपाने अमर या जगत कोणीच नाही. परंतु आपल्या कर्तृत्वाने मनुष्य कीर्ती मिळवतो व कीर्तिरुपाने त्याचे नाव लोक लक्षात ठेवतात. हेच त्याचे अमरपण असते. याच अर्थाने-

कवितेची पुढील ओळ आहे, 'आधी मरण अमरपण ये मग ते' या जगात शरीराने अमरपण कोणात्लाच मिळत नाही. शरीराचा मृत्यू कधी ना कधी होणारच आहे, परंतु महान कर्तुत्व करणाऱ्या व्यक्तींना शेकडो वर्षानंतर सुद्धा जग विसरत नाही.

मृत्यू अटळ आहे. परंतु जीवनचक्र सतत चालत राहते. जाणारे जातात व नवीन येणाऱ्या, जन्म घेणाऱ्यांना जागा करून देतात. जीर्ण वृक्ष मोडून पडतात, पण नवीन बीजाला जन्म देऊन जातात. अशा रीतीने जीवनचक्र अमर आहे. त्यामुळे मरणाची भीती कोणीही ठेवू नये. जे अटळ आहे, त्याचे दु:ख कशासाठी? हा निसर्गाचा नियम आपण स्वीकारला पाहिजे, आधी त्याग करावा लागतो, नंतर त्याचे मधुर फळ मिळते, हा ही अर्थ येथे आहे.

सरावासाठी पुढे काही विषय दिले आहेत.

(1) देव भावाचा भुकेला

(2) यत्न तो देव जाणावा

(3) ग्रंथ हेच गुरु होत.

(4) देश हा देव असे माझा.

•

# 7 सारांशलेखन

एकदा विस्तृत लेख, निबंध अथवा एखादे दीर्घ व्याख्यान यांतिल विषय जर थोडक्यात समजून घ्यायचा असेल किंवा अन्य कोणाला तरी समजावून सांगायचा असेल तर, त्यातील मुख्य विषयाला ध्यानात घेऊन, मुद्यांची नोंद करायची असते.यालाच 'सारांश लेखन' असे म्हणतात अभ्यासक, पत्रकार, संशोधक वगैरे मंडळींना असे सारांश लेखन करावे लागते.

बरेचदा वर्तमानपत्रातील संक्षिप्त बातम्या किंवा एखाद्या वक्त्याच्या भाषणाचे टिपण हे सारांशलेखनच असते.

सारांशलेखन हे एक प्रकारचे कौशल्य आहे.

सामान्यपणे परीक्षेत सारांशलेखनासाठी 100 शब्दांचा एक परिच्छेद दिला जातो व विद्यार्थ्यांना त्याचा एकतृतीयांश इतका सारांश म्हणजे सुमारे 30 ते 35 शब्दात सारांश लिहायचा असतो.

काहीसूचना : दिलेला परिच्छेद नीटपणे समजून घेतला पाहिजे.

सारांश लेखनाला शीर्षक देणे आवश्यक असते. मुख्य विषय ध्यानात घेऊन, विषयाला अनुसरूनच शीर्षक ठरवून घ्यावे.

एकच मुद्दा वेगवेगळया प्रकारे मांडला असल्यास एकच आटोपशीर वाक्यात तो स्पष्ट शब्दांत मांडावा.

सारांशलेखनात उदाहरणे काढून टाकावीत.

वाक्य रचना सोपी व आटोपशीर असावी.

*** एक नमूनारूप परिच्छेद व त्याचा एकतृतीयांश सारांशः**

दुःखे येतात ती आपली कसोटी पाहण्यासाठीच येतात. त्यावेळी न डगमगणे हाच खरा पुरूषार्थ. भट्टीतून तावून सुलाखून निघाल्याखेरीज सोन्याला तेज चढत नाही किंवा टाकीचे घाव सोसल्याखरीज दगडाला देवपण येत नाही, हे आपणांस माहीत नाही काय ? पैलू पाडल्या शिवाय हिऱ्याला सुद्धा किंमत येत नाही. आपणावर कोसळणारी दुःखे ही अशीच आपल्या व्यक्तिमत्वाला पैलू पाडण्यासाठी निर्माण झाली. आहेत असे आपण का समजू नये ? शिवाय असे पाहा जगात दुःखे आहेत, म्हणून सुखाची किंमत आपल्याला कळते ना ? जगात अंधारी रात्र आहे म्हणूनच चन्द्राला महत्त्व त्याचप्रमाणे दुःख आहे म्हणूनच जगात सुखाचे महत्त्व आहे, असे तुम्हाला नाही वाटत ? नुसते गोड जेवण जेवण्याचा तुम्ही कधी प्रयत्न केला आहे काय ? नुसत्या गोडाने तोंडाला कशी मिठी बसते, हे तुम्हाला माहीत आहेच. केवळ सुखच जगात असते तर, अशीच आपली स्थिती झाली नसती का ? शिवाय दुःखानंतर सुख आले म्हणजे त्याची लज्जत काही न्यारीच असते. असा अनुभव कुणाला नाही ? परीक्षेसाठी मरमर कष्ट केल्यानंतरच निकालाच्या आनंदाची खरी गोडी आपणांस कळते. असे जर आहे तर, वर्तमानकाळच्या दुःखाबद्दल आपण कुरकुर का करावी ? दुःख पर्वता एवढे असे का मानावे ?

**● सारांशलेखन : दुःखाचे महत्त्व**

दुःखे येतात ती माणसाची कसोटी पाहण्यासाठीच अशावेळी घाबरून न जाण्यातच पुरूषार्थ आहे. दुःखांचा सामना केल्याने आपल्या व्यक्तिमत्त्वाला अधिक तेज येते. दुःखांमुळेच सुखाची किंमत कळते. दुःखांनंतर येणाऱ्या सुखांची गोडी वेगळीच असते म्हणूनच दुःखांबद्दल कुरकुर करू नये.

●

# 8 अहवाल लेखन

विविध संस्थांमध्ये शाळा-कॉलेजमध्ये विविध प्रसंग घडत असतात. सांस्कृतिक शिक्षण प्रवृत्ती होत असतात. रस्त्यावर अपघात घडत असतात. या सर्व घटनांचे अहवाल वर्तमानपत्रात आपण वाचतो. शाळांच्या व संस्थांच्या मासिकांमध्ये ही त्यांच्या विशेष प्रवृत्तीचे अहवाल लिहिले जातात हे अहवाल लिहिण्याची पद्धत कशी असावी, हे पाहू.

अहवाल लिहिताना आकर्षक शीर्षक आवश्यक असते. शीर्षकाच्या खाली तारीख लिहून, लेखनाला सुरुवात करावी. अहवाल कधीही प्रथम पुरुषी कर्ता घेऊन (मी / आम्ही, आमचे) लिहू नये.

नमूनारूप एक अहवाल पुढे दिलेला आहे.

**आदर्श विद्यालयात 'स्वच्छता अभियान'**

दि. 10 जुलै. माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी साऱ्या राष्ट्रला 'स्वच्छता अभियान' राबविण्यसाठी हाकल दिली आहे. या उत्कृष्ट योजनेला देशभरातून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे.

दि. 8 जुलै. रोजी, शहरातील नामांकित विद्यालय 'आदर्श विद्यालय' या शाळेत खूप उत्साहने 'स्वच्छता अभियान' राबविले गेले. सर्व शिक्षकगण व विद्यार्थी यांनी मिळून शाळा व आसपासचा परिसर स्वच्छ केला प्रत्येक वर्गासाठी एक कचरा कुंडी देण्यात आली ; धुवून-पुसून लख्ख झालेली शाळा विशेष रूपाने सजविण्यात आली होती.

हा सर्व कार्यक्रम झाल्यानंतर शहराचे मेयर माननीय श्री XXX यांना निरीक्षणासाठी निमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले व आपल्या भाषणात स्वच्छतेचे महत्त्व समजावले.

**खालील विषयांवर अहवाल लिहिण्याचा सराव करा. व शिक्षकांशी चर्चा करा.**

1. शाळेत साजरा केलेला वृक्षारोपण समारंभ.
2. रस्त्यात हिंडणाऱ्या गर्दीमुळे झालेला अपघात.
3. लो. टिळक पुण्यतिथी निमित्त शाळेत वक्तृत्त्वस्पर्धा-
4. शाळेत साजरा झालेला गणेशोत्सव.
5. शाळेचे आचार्य निवृत्त होत असताना त्यांचा निरोप समारंभ.

अहवाल लिहिताना शाळेचे / संस्थेचे नाव काल्पनिक असावे.

•

# ( पूरक वाचन )

## 1 वाहता नळ पाहून

**आश्लेषा महाजन**

वाहता नळ पाहून माझं काळीज फाटतं
धावत जाऊन बंद करावा, असं खूप वाटतं

पाणी वाया गेलं की डोळा येतं पाणी
गळ्यामध्ये रुतून बसते ओठांमधली वाणी

पाणी जेव्हा शांत करते एखाद्याची तहान
'पाणी म्हणजे जीवन आहे' याचे येते भान

पाटामधून शेतीसाठी वाहतं जेव्हा पाणी
गळ्यामधून झरू लागतात हिरवी ओली गाणी

पाण्यापासून वीज आणि विजेपासून सुख
पाणी नसेल तर मात्र दुष्काळ आणि भूक

पाण्यासाठी पाण्यासारखा खर्च करून पैसा
दारामध्ये येई, गंगा, घालून गाव-वळसा

पाण्यासाठी वणवण करतात खेड्यांमधल्या बाया
एका एका घोटासाठी करपून जाते काया

वाहता नळ बंद करता, कित्ती छान वाटतं
आनंदाचं तळं माझं थेंब थेंब साचतं... !

**शब्दार्थ**

**वणवण करणे** भटकणे **काया** शरीर

•

# 2 जीव घाबरा करणारी भाषा

**मॅक्सीन बर्नसन**
**( जन्म : 1935 )**

भाषातज्ज्ञ, शिक्षिका आणि लेखिका मूळच्या अमेरिकन असून येथे येऊन मराठीचे रीतसर शिक्षण घेतले भाषा व शिक्षणशास्त्र तसेच बालशिक्षण या विषयी त्यांनी इंग्लिश व मराठीतून लेखन केले आहे. हे ललितलेखन 'निवडक भाषा आणि जीवन' मधून घेतले आहे.

---

इकडे यायच्या अगोदर मला भारताबद्दल फारसे काही माहीत नव्हते. पण हा देश शांतताप्रेमी आणि अहिंसावादी आहे अशी माझी ठाम समजूत होती. महात्मा गांधींचे चरित्र, थोडेसे हिंदू तत्त्वज्ञान आणि टी.एस. एलियटचे वेस्टलँड (ॐ शांतिः शांतिः शांतिः) वगैरे वाचल्यामुळे ही कल्पना झाली असेल. इकडे आल्यानंतर मी प्रथम हैद्राबादला राहायला गेले. तिथे माझ्या पूर्वीच्या कल्पनांना फारसा धक्का लागला नव्हता; पण माझा मराठीचा अभ्यास सुरू झाला तेव्हा माझा पूर्व भ्रमनिरास झाला.

अगदी पहिल्याच दिवशी माझे मराठीचे शिक्षक म्हणाले, ''मी सातारा जिल्ह्यातला आहे, आमच्या जिल्ह्याचे लोक मारामारीसाठी प्रसिद्ध आहेत. 'मी तुला मारीन' याला मराठीत अनेक वाक्प्रचार आहेत- 'मी तुला तुडवीन', 'मी तुला वाजवीन', 'तुझं नरडं दाबीन', 'तुझ्या नरड्यावर पाय ठेवीन' इत्यादी इत्यादी.''

सुरुवातीला मला वाटले, की हा भांडखोरपणा फक्त सातारा जिल्ह्याचे वैशिष्ट्य आहे. हळूहळू मात्र माझ्या लक्षात यायला लागले, की ही वृत्ती मराठी भाषेतच भिनलेली आहे. बाळबोध लिपीबरोबरदेखील हिंसेचे बाळकडू पाजले- अक्षरांचे पाय मोडणे, पोट फोडणे. (आणि पुढे तर ध चा मा करून काय झाले हे इतिहासाच्या वर्गात शिकवले जाते.)

केवळ अक्षरांच्या बाबतीत ही स्थिती, तर सामाजिक व्यवहाराची काय कथा? 'नाक दाबले तर तोंड उघडते,' ह्यांसारख्या म्हणींमध्ये तर उघड हिंसाचार दिसतोच, पण एरव्ही सुद्धा काय होतं हे पहा. नुसता दोष देऊन पुरेसे समाधान न होता लोक अमक्याचे खापर इतरांच्या माथी फोडतात, त्यांना धारेवर धरतात. राजकारणी लोक एकमेकांच्या पाठीत खंजीर खुपसतात, न्हावी नसलेली माणसे लोकांची बिनपाण्याची हजामत करतात आणि भांडवलदार कामगारांचे रक्त आटवतात! रोजच्या जीवनाच्या स्पर्धेमध्ये लोक एकमेकांच्या पोटावर पाय ठेवतात किंवा एकमेकांचे पाय ओढतात. आई-बाप लहान मुलांचे कान उपटतात आणि मुले झाल्यावर आई-बापांच्या डोक्यावर मिरी वाटतात.

ही झाली अप्रत्यक्ष भांडणाची उदाहरणे. मग उघड भांडण सुरू झाले की भाषाही एकदम भडकते! तळपायाची आग मस्तकाला जाते, माणूस दात-ओठ खातो, आपले तापलेले हात थंड करून घेतो आणि शिव्या द्यायला हपापलेला जीव भरपूर तोंडसुख घेतो.

नवलाची गोष्ट म्हणजे हा हिंसाचार फक्त इतरांच्याच विरुद्ध असतो असे नव्हे स्वतःविरुद्ध लोक तितकेच हिंसक असतात. झोपेतून उठल्यावर अंग मोडतात, गप्पा मारता मारता बोटे मोडतात, घसाफोड करतात, तोंड फाटेस्तोवर बोलतात. प्रेमप्रकरणाच्या बाबतीत तर ही स्वतःवर हिंसा करण्याची प्रवृत्ती विशेष दिसून येते. आपली एकुलती एक मुलगी प्रेमविवाह करणार आहे असे कळल्यावर आई-बाप घर डोक्यावर घेतात. बायको परपुरुषाशी गप्पा मारतीय हे पाहून नवरा स्वतःच्या डोक्यात राख घालतो.

भांडखोरपणाबरोबरच मराठी भाषेचे एक वैशिष्ट्य म्हणजे शरीरशास्त्रविषयीच्या अद्भुत कल्पना. जिभेला हाड असणे ही चांगली गोष्ट समजली जाते. लोकांचे हातपाय गळतात, त्यांच्या काळजाचे पाणी होते, त्यांच्या तोंडचे पाणी पळते, त्यांच्या पोरांना पंख फुटतात, शिंगे फुटतात, ज्याला तिसरा डोळा फुटतो माणूस आदरणीय समजला जातो.

मराठी माणसांना होणारे रोग तर अनाकलनीय आहेत. लोकांचे तोंड येते (ते गेले होते कुठे?) डोळे येतात. झोपडपट्टीतल्या मुलांच्या जिवाला येते (नेमके काय येते देव जाणे), कोणी वेड्यासारखे वागायला लागले, की त्याचे डोके फिरले किंवा डोके हलले असे म्हणता.

शरीराबद्दल विचित्र कल्पना आहेतच, तर खाण्याबद्दल तर काही विचारूच नका. मराठी माणसे वाट्टेल ते खातात- बोलणी खातात, डोके खातात, वेळ खातात, मार खातात, अक्षरे खातात, चेकोस्लोवाकियामध्येही ही अक्षरे खाण्याची प्रवृत्ती आढळते. एका चेक गोष्टीमध्ये 'एका मुलाने इतकी अक्षरे खाल्ली होती, की त्याच्या पोटावर शस्त्रक्रिया करून अक्षरे काढावी लागली.' असे वाचल्याचे आठवते. पैसे खातात. (शेणही खातात असे मी ऐकले आहे.)

मग ही राकट, दांडगट, शरीरशास्त्र आणि तर्कशास्त्र ही दोन्ही न जुमानणारी भाषा परकीय माणसाने शिकायची कशी? कधी कधी या विचाराने मी वैतागून जाते. मग ही भाषा थोडी का होईना, माझ्यावर कृपा करून (मला) यायला लागली आहे, या सुखद विचाराने माझा जीव भांड्यात पडतो.

**शब्दार्थ**

**अनाकलनीय** जे कळू शकत नाही असे.

**वाक्प्रचार**

**भ्रमनिरास होणे** सत्य समोर येणे **खापर फोडणे** दुसऱ्याला दोष देणे, नष्ट होणे
**पाठीत खंजीर खुपसणे** घात करणे, फसविणे
**बिनपाण्याने हजामत करणे** चुकीबद्दल अतिशय रागावणे, चिडणे
**डोक्यावर मिरी वाटणे** वरचढपणाने वागणे
**तळपायाची आग मस्तकात जाणे** अतिशय संतापणे
**दात- ओठ खाणे** खूप चिडणे
**तापलेले हात थंड करून घेणे** बडवून काढणे
**डोक्यात राख घालणे** खूप संतापणे
**हातपाय गळणे** धीर सुटणे
**काळजाचे पाणी होणे** खूप घाबरणे
**तोंडचे पाणी पळणे** अतिशय घाबरणे.

•

# 3 एवढें लक्षांत ठेवा

**विंदा करंदीकर**

**( जन्म : 1918 मृत्यू : 2010 )**

गोविंद विनायक करंदीकर हे नवकाव्याचे प्रखर पुरस्कर्ते कवी आहेत. प्रेम, निसर्गसौंदर्य, यंत्रयुगातील मानवाचे जीवन यासारख्या अनेक विषयांना त्यांच्या काव्यात महत्त्वाचे स्थान आहे. ते लघुनिबंधकार आणि टीकाकार म्हणूनही प्रसिद्ध आहेत. त्यांचे स्वेदगंगा, मृद्‌गंध, धृपद, एटु लोकांचा देश हे काव्यसंग्रह व स्पर्शाची पालवी, आकाशाचा अर्थ लघुनिबंधसंग्रह आहेत. त्यांना केंद्रशासनाची तीन, महाराष्ट्र शासनाची दहा पारितोषिके, भारतीय पातळीवरील कबीर पुरस्कार, जनस्थान पुरस्कार, कोणार्क पुरस्कार, ज्ञानपीठ पुरस्कार असे सन्माननीय पुरस्कार मिळाले आहेत.

---

उंची न अपुली वाढते फारशी वाटून हेवा!
श्रेय ज्याचें त्यास द्यावें; एवढें लक्षांत ठेवा.

ती पूर्वजांची थोरवी त्या पूर्वजांना गौरवी;
ती न कामीं आपुल्या; एवढें लक्षांत ठेवा.

जाणतें जें सांगती तें ऐकुनी घ्यावें सदा;
मात्र तींही माणसें! एवढें लक्षांत ठेवा.

चिंता जागीं या सर्वथा कोणा न येई टाळतां;
उद्योग चिंता घालवी; एवढें लक्षांत ठेवा.

विश्वास ठेवावाच लागे; व्यवहार चाले त्यावरी;
सीमा तयाला पाहिजे; एवढें लक्षांत ठेवा.

दुप्पटीनें देतसे जो ज्ञान आपण घेतलेलें,
तो गुरूचे पांग फेडी; एवढें लक्षांत ठेवा.

माणसाला शोभणारें युद्ध एकच या जगीं;
त्यानें स्वत:ला जिंकणें! एवढें लक्षांत ठेवा.

**शब्दार्थ**

**श्रेय देणे** चांगले काम केल्याचे कबूल करणे **थोरवी** महानता **पांग फेडणे** ऋण, कर्ज फेडणे.

•

| 4 | # भावसाक्षरता |
|---|---|

**जयंत जोशी**

मराठी साहित्यातील प्रतिभासंपन्न असे लेखक वक्ते आणि विचारवंत आहेत. मुंबईच्या रूईखा कॉलेज मधील व्याख्यान मालेमध्ये त्यांनी दिलेल्या व्याख्यानाचा हा संपादित अंश आहे. साने गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वातील व्यक्तिमत्त्वाचा आणि त्यातील सूक्ष्म लाटांचा येथे शोध घेतला आहे.

साने गुरुजी या पाठात जयंत जोशी यांनी त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकला आहे गुरुजींना विचारवंत म्हणत त्यांचा जन्म ज्या कार्यासाठी झाला ते कार्य त्यांच्या आई विषयीच्या आठवणी आहेत. तसेच गुरुजीची दलिता विषयीची तळमळ नैसर्गिक दृष्टीकोण विज्ञानाभिमुखता, त्यांची संस्कृती विषयक मते या पाठात आहेत. या वैचारिक निबंधामध्ये लेखकाने साने गुरुजींच्या जीवनाचे अनेक पैलू दाखवून दिलेले आहेत.

---

सर्वसाधारण पुरुषाला जे भाग्य लाभणार नाही, ते भाग्य साने गुरुजींना लाभलं होतं. महाराष्ट्रातल्या दोन पुरुषांना 'आई' म्हणून ओळखलं जात असे. एक म्हणजे ज्ञानेश्वर आणि दुसरे साने गुरुजी. हे दोघं मातृहृदयी पुरुष संतही होते आणि क्रांतिकारकही होते. याविषयी बरंच लिहिलं गेलं आहे. पण सानेगुरुजी हे फार मोठे विचारवंतही होते. त्यांचा जन्म गेल्याच्या गेल्या शतकाच्या शेवटच्या वर्षाला झाला. गेल्या शतकाच्या मध्यभागी ते आपल्याला सोडून गेले. पण त्यांच्या विचारांचा प्रभाव याच शतकात पुरेपूर उमजला जाईल आणि तो उमजावा, यासाठी मी सानेगुरुजींवर बोलतो आहे. तरुणांनी सानेगुरुजीच्या विचारांचा विचार करावा.

साने गुरुजी विचारवंत आहेत, हे स्वीकारायलाच काही लोक तयार नसतात. साने गुरुजींना विचारवंत कसं म्हणावं? साने गुरुजी म्हणजे प्रचंड तळमळ आणि समाजकार्य, साने गुरुजी म्हणजे हातापायात कार्य करण्याची प्रचंड क्षमता आणि तत्परता, ध्येयासाठी केवळ मरायची तयारीच नाही तर उत्सुकता; असे साने गुरुजी होते. बहुतेक विचारवंत असे नसतात. त्यामुळे कदाचित बऱ्याचशा विचारवंतांना साने गुरुजी विचारवंत वाटत नसतील. साने गुरुजींना विचारवंत कसं म्हणायचं, या प्रश्नाला एक प्रतिप्रश्न विचारावा लागेल की हिमालयाला टेकडी कसं म्हणावं? साने गुरुजींच्या विचारावर बोलायच्या आधी त्यांच्या व्यक्ती म्हणून एकदोन गोष्टी सांगाव्याशा वाटतात.

स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक, लेखक म्हणून सानेगुरुजी सगळयांना ज्ञात आहेत. त्यांची प्रत्येक कृती ही जरी भाबडी, उत्स्फूर्त वाटत असली, तरी एका विचारबैठकीच्या अनुषंगानं त्यांच्या कृतीत सातत्य होतं. एकेकाळी ते जेव्हा शिकवत होते, तेव्हा वर्गातल्या अत्यावश्यक गोष्टींसारखी एक काठी असायची; कारण ती प्रत्येक शिक्षकाला लागायची. आता ते बदललं. साने गुरुजी दापोलीला शिकवायला गेल्यावर 'वर्गात काठी नेणार नाही', असं सांगितलं., पण काही मुलं फारच निर्ढावलेली, मस्ती करणारी होती. त्यांना कंटाळून शेवटी त्यांनी काठी मागवली. शाळेत जरा सनसनाटी झाली. छडी आल्याबरोबर त्यांनी ती छडी आपल्या हातावर मारून घेतली. तेव्हापासून मुलांना जरब द्यायचा प्रसंग त्यांच्यावर कधी आला नाही. कोणतंही कार्य ते अत्यंत उत्स्फूर्तपणे करायचे. अमळनेरला सखाराम महाराजांची समाधी आहे. तिथे दसऱ्याच्या दिवशी संध्याकाळी ते एक दिवस बसलेले होते. दसऱ्याचं सोनं 'देणं-घेणं' संपलेलं होतं. 'आता काय करावं' असा कुणीतरी प्रश्न विचारला. साने गुरुजींनी त्यांच्या प्रसिद्ध कवितेची दुसरी ओळ प्रथम म्हटली, 'जगी जे दीन अति पतित, तयांना प्रेम अर्पावे' असं म्हणून ते उभे राहिले आणि त्यांनी सांगितल की, 'चला, आपण दलित वस्तीत जाऊन सोनं देऊ या' बरोबरची मुलंही ती कविता म्हणत-म्हणत निघाली. दलित वस्तीत 'आई' पोहचली, तेव्हा त्यांच्याबरोबर दोन हजार लोक कुठल्याही आमंत्रणाशिवाय होते, अशी उत्स्फूर्त कार्य सानेगुरुजींनी अनेक केलेली आहेत.

साने गुरुजी हे काही 'सानेगुरुजी' म्हणून जन्मले नाहीत. साने गुरुजींचा जन्मच एका 'मुक्त विद्यापीठात' झाला, त्या विद्यापीठाचं नाव यशोदा सदाशिव साने! हे नाव फारसं परिचित नाही; पण 'श्यामची आई' म्हटलं की, ते सर्वांच्या परिचयाचं

असतं. त्यांना मी दुसरं मोठं मुक्त विद्यापीठ म्हणतो; कारण पहिलं मुक्त विद्यापीठ हे पुण्यश्लोक जिजामाता यांनी सुरू केलं होतं. सानेगुरुजींचा जन्म 1899 साली झाला. हा काळ सावित्रीबाई फुले गेल्यानंतरचा आहे. तेव्हा पंडिता रमाबाई, आनंदीबाई जोशी अशा महान स्त्रिया होत्या. यशोदाबाई त्यांच्या काळापेक्षा फार पुढे होत्या, असं मला वाटतं.

'पायरीचं शेत आधी एका दलिताचं होतं. आपल्या पूर्वजांनी ते त्यांच्याकडून घेतलं', अशी एक कबुली यशोदाबाईंनी श्यामजवळ दिली, आपल्यापेक्षा गरीब असणाऱ्या माणसांबद्दल त्या अतिशय कनवाळूपणे बोलत. 'त्यां गरीबावर आपल्यामुळे अन्याय झालेला आहे', ही जाणीव त्यातून डोकावत असे. एक दलित स्त्री पाठीवर लाकडाचा भारा घेऊन त्यांच्या घराच्या गल्लीत आजारी असल्यानं पडली. तिच्या डोक्यावरचा लाकडाचा भाराही पडला. श्यामला त्यांनी सांगितलं की, 'तो भारा तिला उचलून दे'. हे साधं ह्यूमन डिसेन्सीचं काम करायला त्या गावात कुणी नव्हतं. काही लोकांची हे काम करण्याची इच्छा असली तरी ते तसं करायला धजत नव्हते. तेव्हा यशोदाबाईंनी तिला 'मदत कर' म्हणून श्यामला सांगितल. त्यांना माहिती होतं की, आजूबाजूची मंडळी आरडाओरडा करतील. मग त्यांनी सांगितलं की, 'अशा लोकांना सांग की, मग आई मला आंघोळ घालणार आहे'. हे केल्यावर आंघोळ करताकरता श्याम विचारतो की, 'यांना स्पर्श केल्यावर आंघोळ का कराचयी?' त्यां म्हणतात, 'आपल्यात जोपर्यंत समाजाशी लढण्याची ताकद येत नाही तोपर्यंत असं करावं लागेल. तू खूप शीक, मोठा हो. मोठा झाल्यावर तुझ्यात जेव्हा एकनाथ महाराजांसारखी शक्ती येईल, तेव्हा मग तूसुद्धा दलिताला पोटाशी घे'. स्वत:च्या पतीकडून त्यांच्या फार माफक अपेक्षा होत्या. भाजीत मीठ कमी पडलं आणि ती अळणी भाजी सदाशिवरावांनी बिनतक्रार खाल्ली, याचा त्यांना आनंद होता; पण श्यामनं मात्र याच्या पुष्कळ पुढे जावं, असं त्यांना वाटे. स्त्रीपुरुषांची काम वेगळी नाहीत, कुठलंही काम कमीपणाचं नाही, हे त्यांनी श्यामच्या मनावर बिंबवलं. साने गुरुजींची जी भावसाक्षरता व सामाजिक बांधिलकीची जाणीव आपल्याला जाणवते, ती तेव्हापासून त्यांच्या मनात यशोदाबाईंनी रुजवली होती. या तिन्ही बाबतीत मग साने गुरुजींनी शक्ती मिळवून पंढरपूरची दारं सर्वांना खुली केली.

यशोदाबाईंच निधन झालं, त्यावेळी साने गुरुजी कॉलेजमध्ये गेलेले नव्हते. ते मॅट्रिकच्या परीक्षेची तयारी करत होते. यशोदाबाईंनी त्यांना कॉलेजमध्ये जाताना पाहिल नाही. पण भावसाक्षरतेची सर्वोच्च पदवी साने गुरुजींना मिळेल, याची व्यवस्था त्यांनी आपल्या या मुक्त विद्यापीठाद्वारे करून ठेवली होती. 'साने-विचार' हा मला फार महत्त्वाचा वाटतो. एका आठवड्याच्या आत लिहिलेलं पुस्तक 'श्यामची आई' बेचाळीस आठवडे लिहिलेलं 'सुधास पत्रे' आणि एका रात्रीत लिहिलेलं 'सोन्या मारुती' ही तीनही पुस्तकं त्यांच्या विचारांच्या दृष्टीनं फार महत्त्वाची आहेत. पण सगळ्यात महत्त्वाचं त्यांचं पुस्तक म्हणजे 'भारतीय संस्कृती'. 1935-36 साली हे लिहिलं गेलं. त्यावेळी अमळनेरच्या कॉलेजचे काही विद्यार्थी पुण्याला शिकत होते. कॉलेज बंद पडलं होतं. त्यावेळेला त्या मुलांचा सांभाळ करून, त्यांना जेवू घालून, उरलेल्या वेळात साने गुरुजींनी 'भारतीय संस्कृती' हे अजरामर पुस्तक लिहिलं. साने गुरुजींच्या विचारांमध्ये 21व्या शतकात ज्या संधी उद्‌भवतील, त्यांना सामोरं जण्याची क्षमता आहे. 21व्या शतकाबद्दल बोलायच्या आधी विसाव्या शतकावर ओझरता दृष्टीक्षेप टाकणं गरजेचं आहे.

या शतकात निसर्गाकडे पाहाण्याचा दृष्टीकोनही बदललेला दिसतो. 'निसर्गाला समजून घेत आपल्याला जगायचं आहे', अशी एक धारणा व्हायला सुरुवात झाली आहे. विज्ञानच्या सहाय्यानं आपण निसर्गाबरोबर संवाद साधू शकू अशी धारण या शतकात निर्माण व्हायला सुरुवात झालेली दिसते. पर्यावरणशास्त्र वगैरे शास्त्रांचा उदयही याच शतकातला आहे. ही विचारांची बैठक साने-विचार' चांगल्या तऱ्हेनं ओळखू शकतो. 'मतिभि: उद्‌धृत:।' असं धर्माबाबत महाभारतात भीष्म म्हणतात. सानेगुरुजीही म्हणतात की, 'धर्म हा मानवी मतीतून निर्माण झाला आहे. लोक चांगला विचार करतात आणि त्यातूनच धर्म ठरतो. आपलं जे काही बरंवाईट होणार आहे, ते आपल्या हातूनच होणार आहे, आपल्या कार्यामुळेच होणार आहे, दुसऱ्या कोणाच्या कर्माचं फळ म्हणून ते होणार नाही. आपल्या कार्यामुळेच आपली प्रगती होऊ शकेल', हा विचार साने गुरुजींनी दिला.

सानेगुरुजींची मुख्य शक्ती ही त्यांची विज्ञानाभिमुखता आहे. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर विज्ञानाचा संबंध येणार आहे, याची स्पष्ट जाणीव ते करून देतात. धर्मानेसुद्धा समाजाकडून आणि विज्ञानाकडून माहिती मिळवून सतत बदलत राहिलं पाहिजे, असं साने-विचार ठामपणे मानतो. हा विचार फार महत्त्वाचा आहे. तसंच दुसरा विचार असा की, 'गुरुच्या चुका सुधारून गुरुचं काम पुढे नेणं म्हणजे गुरूभक्ती' हा वैज्ञानिक दृष्टीकोन सानेगुरुजींनी पूर्णपणे ओळखला होता. त्यांचे सामाजिक आणि राजकीय विचार त्यांच्या समकालीनांपेक्षा जास्त पुरोगामी होते. 1937 च्या आधीच त्यांनी हिटलरच्या विचारांचा भयंकरपणा ओळखला होता. भारतात संततीनियमन व्हायला पाहिजे, लोकसंख्या आटोक्यात राहायला पाहिजे, हे त्यांनी स्पष्टपणे भारतीय संस्कृतीत मांडलेलं आहे. 'वर्ण' या संकल्पनेचा अगदी वेगळा अर्थ त्यांनी लावला. ते म्हणतात की, वर्ण हा जन्मानं ठरत नसून प्रत्येक माणसाची 'आवड', याला त्यांनी वर्ण असं म्हटलं आहे. या आवडीप्रमाणे प्रत्येकाला स्वत:चा विकास करायची संधी ज्या समाजात मिळेल, त्या समाजात स्वराज्य आलं, असं साने गुरुजी म्हणतात. जेव्हा ते 'भारतीय संस्कृती अशी आहे', असं म्हणतात, तेव्हा ती 'अशी असली पाहिजे', असाही अर्थ त्यांना अभिप्रेत असतो. साने गुरुजींच्या मते आस्तिक असणं म्हणजे, दृश्य संसारातली विषमता, विरोध, कुरूपता दूर करणं होय आणि परलोकाच्या गप्पा मारणारा तो नास्तिक होय. जोपर्यंत आस्तिक आपल्या आजूबाजूला जे चाललं आहे, ते माणूस म्हणून सुधारू शकत नाही, तोपर्यंत त्याला अस्तिक म्हणता येणार नाही, असं ते म्हणतात. जेव्हा वेद लिहिले गेले. तेव्हा त्या दर्जाचं दुसरं साहित्य जगात उपलब्ध नव्हतं, याची जाणीवही साने गुरुजींना होती, असं दिसतं. वेद ही जर आपल्या संस्कृतीची सुरुवात असेल तर पुढे आपली संस्कृती कशी व्हायला हवी होती, याबाबतही त्यांनी अनेक वेळेला सांगितलं आहे. ते म्हणतात की, 'संतांनी वाळवंटात एकी आणली, तर आम्ही सर्वांना वाळवंटात आणलं. आमचे वंशज असे करंटे की, त्यांना दोन पावलं पुढे मंदिरातही जाता येऊ नये!' आपण आपल्या विद्या सीमित केल्यामुळे त्या सर्वांपर्यंत पोचल्या नाहीत; इतकंच नव्हे तर पुढे त्या विद्यासुद्धा सीमित झाल्या. साने गुरुजी विचारधर्म मानतात. हा विचारधर्म सतत प्रगत व्हायला पाहिजे. आता हे विचार सर्वमान्य आहेत का, असाही एक प्रश्न पडतो. साने गुरुजींच्या विचारांमांग एक भारतीय विचार आहे, तो म्हणजे अद्वैताचा!

सानेगुरुजींचं विज्ञानप्रेम-विज्ञाननिष्ठा ही त्यांची जीवनमूल्यं होती. रामकृष्ण परमहंस, टागोर आणि गांधी यांना ते गुरू मानत. ते म्हणत की, 'माझ्यात त्यांचा परार्धांश जरी असला तरी मी सुखी राहीन'. पण त्यांच्यात एक वैज्ञानिक होता. हृदय मही या गुरुंच्या पायाशी असलं तरी त्या गुरुंच्या खांद्यावर चढून पुढलं जग पाहायचं, हा त्यांचा विचार फार स्पष्ट आहे. या साने -विचारावर अनेक अंगांनी विचार व्हायला पाहिजे, असं मला वाटलं. साने गुरुजींच्या विचारांचं परिशीलन जितकं जास्त होईल, तितकं आपल्याला या नव्या युगाच्या वैज्ञानिक आव्हानांकडे पाहायची आणि संधींचा उत्तम उपयोग करायची अधिक क्षमता प्राप्त होईल. तसंच दुसरा विचार असा की,'गुरूच्या चूका सुधारून गुरूचं काम पुढे नेणं म्हणजे गुरूभक्ती'हा वैज्ञानिक दृष्टिकोण साने गुरूजींनी पूर्णपणे ओळखला होता. या क्षमतेतून आपण अधिक चांगल्या समाजाकडे जाऊ शकतो. असं मला वाटतं.

### शब्दार्थ

**निर्ढावलेली** बेफिकीर **जरब** धाक, दबाव **विज्ञानभिमुखता** वैज्ञानिक दृष्टीकोण **क्षमता** सामर्थ्य **ज्ञात** परिचित, माहीत असणारे **भाबडी** भोळी, सादी **सनसनाटी** अस्वस्थता, बेचैनी **माफक** थोडेसे, कमी प्रमाणात **मतिभि** उद्धृत आपल्या बुद्धी प्रमाणे बोलला **बिंबवणे** ठसविणे **ह्यूमन डिसेन्सी** ( Human decency) माणुसकीची वागणूक **परिशीलन** सखोल अभ्यास

## टीपा

**(1) मुक्त विद्यापीठ :** कोणत्याही ठराविक अभ्यासक्रमात बंदिस्त नसूनही जगाचे ज्ञान देणारी आईची शिकवण यात 'मुक्त विद्यापीठ' असे लेखक म्हणतात. विद्यापीठात न शिकता आईने हे संस्काराचे ज्ञान श्यामला (साने गुरुजीना) दिले आहे.

**(2) भावसाक्षरता :** साक्षर म्हणजे अक्षरज्ञान असणारा सुशिक्षित लिहीता वाचता येणारा परंतु शिक्षण घेणे म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान मिळवणे नव्हे तर स्वत:ला सुसंस्कृत करणे यामध्ये गरजेचे असते गुरुजीच्या आईने त्यांना फक्त अक्षर ओळख करून दिली नाही तर जीवनामध्ये असणारे भावनांचे महत्त्व शिकवले इतरांचे दु:ख वेदना समजावून घेण्याची दृष्टी दिली. म्हणून लेखक या दृष्टीत्व भावसाक्षरता म्हणतो.

**(3) परार्धांश :** अत्यंत सूक्ष्म भाग अंश

**परार्ध** एकाच्या आकड्यावर 17 शून्ये असणारी संख्या.

• • •